"संसार."

[१]

घरांतलीं कामें.

लेखक—

त्र्यंबक नारायण लेले

व

वासुदेव गोविंद आपटे बी. ए.

संपादक "आनंद," इंदूर.

किं. १२ आणे.

प्रापंचिकांना अत्यंत उपयुक्त–

संसार.

[१]

घरांतलीं कामें.

लेखक–

त्र्यंबक नारायण लेले

व

वासुदेव गोविंद आपटे बी. ए.

संपादक " आनंद, " इंदूर.

सप्टेंबर १९१४

किंमत १२ आणे.

Printed by Crishnarao Sakharam Patkar at the Shri Laxmi-Narayan Press, 402, Thakurdwar, Bombay
and
Published by Gopal Balwant Joshi,
400, Shanwar Peth Poona City.

प्रस्तावना.

प्रपंचांतलीं कामें व्यवस्थित रीतीनें करण्याचें ज्ञान प्रत्येक स्त्रीपुरुषास असणें अवश्य आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन याविषयींची माहिती संसार नांवाच्या पुस्तकमालिकेच्या द्वारें मराठी वाचकांना करून देण्याचें योजिलें आहे. या मालेपैकीं प्रस्तुतचें पुस्तक ' घरांतलीं कामें ' हें पहिलें आहे. याचा कांहीं उपयोग होत असल्याचें दिसून आल्यास पुढचीं पुस्तकेंही लवकरच प्रसिद्ध होतील.

त्र्यं. ना. लेले.
वा. गो. आपटे.

अनुक्रमणिका.

घरांतलीं कामें.

प्रकरण १ लें.

आरंभीचे दोन शब्द.

या संसारांत पुष्कळ वेळां आपणांस असें दिसून येतें कीं आरोग्य, संपत्ति, विद्या व संतति या सर्वांची अनुकूलता माणसास असून ही घरांतल्या कामांची व्यवस्था नीटपणें पाहणारी अशी सुगृहिणी न लाभल्यामुळें त्या माणसाला लागावें तसें सुख लागत नाहीं. पुरुषाचा बहुतेक काळ आपापल्या उद्योगधंद्यांत जात असल्यामुळें व त्यानिमित्त त्याला दिवसाचा पुष्कळसा काळ घराबाहेर घालवावा लागत असल्यामुळें घरांतल्या कामावर देखरेख ठेवण्यास त्यास वेळ मिळत नाहीं. सुखवस्तु माणसाच्या घरांत नोकरचाकर पुष्कळ असतात. पण या नोकरांकडून व्यवस्थित रीतीनें काम करून घेण्यास त्यांचेवर कोणातरी घरच्या माणसाची देखरेख लागते. कारण, पुष्कळ वेळां नोकर अप्रामाणिक, अंगचुकार आणि कामाची चालढकल करणारे असतात. सुदैवानें प्रामाणिक आणि खटपटी असे नोकर मिळाले तरी त्यांना काम करण्याची पद्धति ठाऊक नसते. ती त्यांना दाखवून त्यांचेकडून घरांतलीं कामें योग्य रीतीनें करवून घेण्यास कोणी तरी घरचें मनुष्य असावें लागतें. नाहींतर पैशापरी पैसा खर्च होऊन पुनः घरांत सगळी अव्यवस्था होते. असें घरचें मनुष्य गृहिणीशिवाय दुसरें कोण असणार ? कारण, दिवसेंदिवस अनेक कारणामुळें आपल्या समाजांत विभक्तकुटुंबपद्धतिच ज्यास्त ज्यास्त प्रचारांत येत

चालली असल्यामुळें बहुधा नवरा, बायको व मुलें येवढींच माणसें पुष्कळ कुटुंबांतून आढळतात. घरांत वडील व पोक्त अशीं माणसें असलेलीं कुटुंबें फार थोडीं सांपडतील. बरें, गृहिणीनें घरांतल्या कामांची व्यवस्था पहावी, तर या अवघड कामाला अवश्य शिक्षण तरी तिला कोठें मिळतें ? हल्लीं स्त्रीशिक्षण वाढत्या प्रमाणावर आहे खरें, पण त्या स्त्रीशिक्षणांत गृहव्यस्थेला महत्त्वाचें स्थळ मिळालेलें दिसत नाहीं. घरांत सांगण्यास वडील माणूस नाहीं, आणि शाळेंतूनही तें शिक्षण मिळालेलें नाहीं, अशा स्थितींत गृहिणीला घरकामाची नीट व्यवस्था ठेवतां आली नाहीं तर त्यांत तिच्याकडे तरी काय बोल आहे ? सारांश काय, तर सध्याच्या गृहिणींच्या हातून घरकामें व्हावीं तशीं होत नाहींत ही गोष्ट जरी खरी आहे, तरी त्याबद्दलचा दोष त्यांच्याकडे नाहीं. तो परिस्थितीच्या व शिक्षणपद्धतीचा दोष आहे, आणि हा दोष काढून टाकल्याशिवाय आपली नुसती राजकीय किंवा सांपत्तिक स्थिति सुधारल्यानें आपण ज्यास्त सुखी होऊं अशी आशा करणें हें मृगतृष्णेप्रमाणें निष्फळ आहे. अशा स्थितींत गृहिणींना त्यांचीं गृहसंबंधीं कृत्यें कशीं करावीं त्याचें ज्ञान पुस्तकावरूनच करून घेणें भाग आहे. वडीलमाणसांच्या प्रत्यक्ष उदाहरणापासून मिळणाऱ्या शिक्षणाची सर पुस्तकापासून मिळणाऱ्या ज्ञानास येणार नाहीं हें प्रस्तुत लेखकांसही कबूल आहे; तरी 'अकरणान्मंदकरणं श्रेयः' या न्यायानें या गोष्टीचा विचार करतां प्रस्तुत पुस्तकापासून गृहिणींना थोडा बहुत तरी लाभ करून घेतां येईल अशी खात्री बाळगण्यास हरकत नाहीं.

गृहिणी अगर घरधनीण घरांतल्या कामांवर नजर ठेवील तेवढी थोडीच आहे, आणि घरांतलीं बारीकसारीक कामें कांहीं थोडीं थोडकीं

नसतात. तथापि त्या सर्वांचें विवेचन एका पुस्तकांत होणें शक्य नसल्यामुळें ठळक ठळक घरकामांचाच विचार या पुस्तकांत केला आहे. अशीं ठळक कामें ह्मणजे १ केरवारा, २ रांगोळी घालणें, ३ सडासंमार्जन, ४ चूल पोतेरें, ५ उष्टें खरकटें, ६ भांडीं घासणें, ७ धुणें, ८ पाणी, ९ संध्ये पूजेचीं उपकरणीं मांडणें व आवरणें, १० दळणकांडण, ११ बिछाने घालणें काढणें १२, तेलवात, १३ विड्याचे सामानाची व्यवस्था, १४ पानपत्रावळ, १५ बागेची निगा, १६ दूधदुभतें, आणि १७ मुलांची जोगवण हीं होत. यांतली कांहींना कांहीं तरी आपल्या स्थितीच्या मानानें गरीब व मध्यम वर्गांतल्या स्त्रियांना घरीं करावीं लागतात, आणि श्रीमंतांच्या बायकांनीं नोकरांकडून तीं करवून घेऊं ह्मटलें तरी नोकरांकडून तीं योग्यप्रकारें करवून घेण्यास घरधनिणीला त्या कामांची पद्धति माहित असण्याची अत्यंत जरूरी असतेच. ह्मणून या पुस्तकांत वरील १७ गोष्टींचेंच विशेषत: पद्धतशीर विवेचन करून कोणतें काम कसें करावें व तें करतांना कोणकोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावें हें सांगितलें आहे. हें विवेचन सर्व स्थितींतल्या व सर्व मतांच्या स्त्रियांना बहुधा लागूं पडेल अशीच काळजी घेण्यांत आली आहे. तथापि जुन्या मतांच्या व जुन्या वळणानें चालणाऱ्या कुटुंबांचीच संख्या समाजांत जास्त असल्यामुळें त्यांच्या स्थितीकडे विशेष लक्ष देऊन पुस्तकाची रचना केली आहे. कित्येक प्रकरणें नव्या मताच्या व साहेबी पद्धतीनें राहणाऱ्या स्त्रियांना कदाचित् उपयुक्त वाटणार नाहींत. कित्येक स्त्रियांना घरच्या गरिबीमुळें किंवा जागेच्या अडचणींमुळें बागबगीचा तयार करण्याचें सामर्थ्य नसेल; कित्येकांना शहरांतल्या राहण्यामुळें पानपत्रावळ हें प्रकरण अनवश्यक वाटेल. अशीं कित्येक प्रकरणें वगळलीं तरी बाकीचीं प्रकरणें कोण-

त्याही स्थितींतल्या व दर्जाच्या स्त्रियांना उपयुक्त होतील असा भरंवसा आहे. उपक्रमादाखल इतकें सांगून आतां वर सांगितलेल्या घरकामांचें क्रमाक्रमानें विवेचन करूं.

प्रकरण २ रें

केरवारा.

१ आपल्यांत ह्मण आहे कीं ' जेथें केरसुणी फिरे, तेथें लक्ष्मी फिरे. ' स्वच्छतेचें महत्त्व लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठीं ही ह्मण प्रचारांत आली असली पाहिजे हें उघड आहे. घरांत स्वच्छता राखणें अत्यंत अगत्याचें आहे ही गोष्ट जुन्या व नव्या दोन्हीं मतांच्या लोकांस कबूल आहे. पण घर झाडावें कसें तें मात्र सर्वांनाच ठाऊक असतें असें नाहीं. यासाठीं पुढील सूचना लक्षांत ठेवाव्या.

२ घरांत कोठेंही केर पडलेला राहूं देऊं नये. तो अमंगल व रोगकारक आहे. घराच्या ज्या भागांत माणसांचा वावर असेल, त्या सर्व भागांतला केर दिवसांतून एकवेळ तरी निघाला पाहिजे. ज्या भागांत पुष्कळ वरदळ असेल तेथें जेव्हां जेव्हां केर झालेला दिसून येईल, तेव्हां तेव्हां तो लागलाच काढून टाकिला पाहिजे. भाज्यांचे डेंख, फळांच्या साली व बिया, चोयट्या, व पुरुषांच्या बैठकींतले विड्यांचे व सिगारेटचे तुकडे वगैरे थोडा वेळ सुद्धां तसेंच पडून राहूं देणें चांगलें नाहीं.

३ संध्याकाळीं आणि रात्रीच्या वेळीं केर काढूं नये. काढलाच तर निदान तो लागलीच बाहेर टाकूं नये. शिपरांत भरून तसाच एका कोपऱ्यांत राहूं द्यावा, आणि सकाळीं उजेडांत तो नीट पाहून मग टाकावा. कारण, संध्याकाळची वेळ मंडळीची घरीं येण्याजाण्याची

असते; त्यावेळीं केर काढणें बरें नाहीं. रात्रींच्या वेळीं एखादी बारीक सारीक वस्तु केरांत गेली तर दिसावयाची नाहीं.

४ सकाळचा केर होईल तितका लवकर ह्मणजे घरांतलीं माणसें हिंडूं फिरूं लागण्यापूर्वीं काढावा. निजण्याच्या खोलींतला केर निजलेलीं माणसें उठून गेल्यावर काढावा, आणि संध्याकाळचा केर घरांतली मंडळी बाहेर गेल्यावर आणि ती परत येण्याच्या अगोदर-ह्मणजे या दोन्ही गोष्टींच्या मधल्या वेळांत—काढावा. मंडळी बसली असतां केर काढण्यासाठीं जाणें चांगलें नाहीं. कित्येक देशांत तर तो एक मोठा अपमान समजतात.

५ बसून केर काढूं नये. ओणव्यानें किंवा त्यापेक्षांही चांगलें ह्मणजे केरसुणीला लांब काठी बांधून उभ्यानें काढावा. थकवा आला तर मात्र बसावें. घर लहान असल्यास ओणव्यानें काढला तरी चालेल.

६ केर काढते वेळीं मळकें व धुवावयाचें असेल असें वस्त्र नेसावें किंवा असें एखादें फडकें नेसलेल्या वस्त्रावरून गुंडाळावें. डोकीवरून पदर घ्यावा अगर फडकें बांधावें. झाडतांना केर आपल्या अंगावर—विशेषत: डोळ्यांत—पडूं देऊं नये. तशीच तो दुसऱ्याच्याही अंगावर न उडेल अशी खबरदारी घ्यावी. केर फार असेल, आणि माणसाचा वावरही सारखा चालू असेल, तर झाडण्याच्या जागीं अगोदर पाणी शिंपून मग केर काढावा. ह्मणजे पाण्यानें तो दबतो, उडत नाहीं. वारा समोरचा असेल तर केर काढतांना दार लावून घ्यावें. झाडतांना अगोदर पाणी शिंपडून मग केर काढल्यानें तो उडून भिंतीवर किंवा खोलींतल्या सामानावर बसत नाहीं. केर उडूं देणें स्वच्छतेच्या व आरोग्याच्या दोन्ही दृष्टींनीं वाईटच आहे. केर माणसाच्या नाकातोंडांत गेला असतां त्याच्या

बरोबर रोगाचीं बीजें त्याच्या शरीरांत जाण्याचा संभव असतो. केर नाकातोंडांत गेला असतां ठसका लागतो. याचा अर्थ हाच कीं केर शरीरांत न राहूं देण्याचा शरीराचा प्रयत्न असतो.

७ शोभे करितां मांडून ठेवलेल्या वस्तु, चित्रें, झाडें वगैरे, खुंट्यांवर ठेवलेले कपडे, व खाण्यापिण्याचे पदार्थ यांवर केर पडूं नये ह्मणून केर काढण्याचे अगोदर त्यांवर झांकणें घालावीं. लोकरीचीं आसनें, चर्में वगैरे गुंडाळून ठेवून मग केर काढण्यास लागावें.

८ घर हमरस्त्यावर असेल तर बाहेरल्या ओसरीवरला केर काढतांना अंग चांगलें झांकून घ्यावें. लोकांना आपले अवयव उघडे दिसूं देऊं नयेत.

९ सकाळचा केर काढण्यापूर्वीं घराचे सर्व दरवाजे आणि खिडक्या हीं चांगलीं उघडावीं, ह्मणजे रात्रभर घरांत सांचलेली दूषित हवा बाहेर जाऊन बाहेरची स्वच्छ हवा आंत येईल व हवेची शुद्धि होईल. केर काढतानां तीं लावून घ्यावीं व झाडण्याचें काम झाल्यावर पुनः उघडून द्यावीं.

१० झाडणें ह्मणजे नुसत्या भुईवरचा केर काढणें इतकाच अर्थ समजूं नये. छत, भिंती, दारांच्या मागची जागा, खिडक्यांच्या चौकटी, कपाटें, कोनाडे वगैरेंतून जाळीं होतात व केर बसतो. ह्मणून झाडतांना यांवरही हात फिरविला पाहिजे. भिंती, छत वगैरे झाडण्यास रोज वेळ न मिळाला तर निदान तिसऱ्या चौथ्या दिवशीं तरी त्यांवरून हात फिरला पाहिजे. उंच जागेवरील केर काढण्यासाठीं लांब दांड्याची एक केरसुणी निराळीच करून ठेवावी.

११ केर काढतांना सहज उचलतां येणाऱ्या वस्तु उचलून त्यांच्या खालीं असलेला केर काढावा. कोपऱ्यांतून छत्र्या, जोडे,

काठ्या किंवा कांहीं अडगळीचे जिन्नस असतील तर ते उचलून त्यांच्या खालचाही केर काढावा. जाजम, सत्रंजी, बिछाईत वगैरे काढण्यास अवजड असलेलें सामान न हालवितां त्यांच्यावरूनच केरसुणी अमळ दाबून केर काढावा, आणि आठचार दिवसांनीं एकदां हें अवजड सामान काढून त्यांच्या खालचा केर काढीत जावें.

१२ लोकरीचे गालीचे, आसनें, किंवा केसाचीं कोणतींही आस्तरणें (उदा० मृगचर्म, व्याघ्रचर्म इ.) झटकूं नयेत, किंवा त्यावर केरसुणी फिरवूं नये. तसें केल्यास त्यांवरचे केंस निघून जातील, व केरसुणीनें त्यांतला केरही निघणार नाहीं. असे जिन्नस राठ केसांच्या किंवा दात्यांच्या ब्रशानें साफ करावे. काचेचें सामान पिसांच्या कुंच्यानें हलक्या हातानें झाडावें. धातूचें, दगडी, लांकडी, वेताचें, कापडी, किंवा कागदाचें सामान (उदा० भांडीं, टेबलें, कपाटें, पलंगाचे पाय, पुस्तकें वगैरे) फडक्यानें झाडून झटकून किंवा पुसून निर्मळ करावें. या कामासाठीं एक स्वतंत्रच फडकें करून ठेवावें.

१३ सोंवळ्यांतल्या वस्तु ह्मणजे देवांचा देव्हारा, पापडलोणच्यांचे डबे किंवा बरण्या, व त्या वस्तु ठेवलेली जागा ह्मणजे देवघर, स्वयंपाकघर वगैरे, शिंदीच्या केरसुणीनें ओंवळ्यानें झाडूं नयेत. स्नानानंतर सोंवळ्याच्या केरसुणीनें (ह्मणजे हीरांच्या, गवताच्या, लव्हाळ्याच्या) किंवा मोळाच्या किंवा तसल्याच एखाद्या सोंवळ्यांत चालणाऱ्या पदार्थाच्या कुंच्यानें झाडावीं, आणि हा कुंचा सोंवळ्याच्या घरांतच भिंतीला खिळा ठोकून त्या खिळ्याला लावून ठेवावा.

१४ केर काढतांना सामानाची जागा बदलूं नये. केर काढण्यापुरतें तें उचलून केर काढल्यावर पुनः जागचे जागीं ठेवावें. पाण्याचीं भांडीं, पिकदाणी, तस्त, झाऱ्या, वगैरे घासण्यासाठीं मोरीवर नेऊन ठेवावीं.

१५ गच्ची व दगडाची किंवा चुन्याची फरशी केरसुणीनें झाड-ल्यानंतर शक्य असल्यास पाण्यानें साफ धुऊन टाकावी. पाणी जाण्यास वाट नसेल तर जाड फडकें ओलें करून त्यानें घासून स्वच्छ करावी.

१६ घरांतल्या मोऱ्या, न्हाणी, व परस यांतला केरकचरा अगो-दर काढून टाकून नंतर त्या केरसुणीनें घाण नाहींशी होईपर्यंत घासून घासून धुवाव्या. इतकेंही करून घाण आली तर थोडें फेना-ईल पाण्यांत मिसळून तें पाणी मोरींत ओतावें किंवा कार्बोलिक आसिड नांवाची चुनखडी मिसळलेली एक भुकटी मिळते, ती घाणीच्या जागीं भुरभुरावी. मोऱ्या धुण्याची केरसुणी दुसऱ्या कामांत घेऊं नये.

१७ घराच्या आंतील भागांतल्या शेतखान्यांतून जेथें भंग्याचा संचार होण्यासारखा नसेल तेथील केर, जाळीं, दिव्याची काजळी, विड्यांचे व आगकाड्यांचे तुकडे वगैरे स्नानाचे अगोदर काढून ती जागा स्वच्छ करावी. हें काम आठचार दिवसांनीं करावें.

१८ केर काढल्यावर तो कोपऱ्यांतून जेथें तेथें सांठवून ठेवूं नये. त्यापासून चिलटें, पिसा, माशा वगैरे वाढून तीं रोग पसरवितात. उंदीर, विंचू, ढेंकूण, आळ्या वगैरे प्राण्यांनाही त्यांत लपण्यास सांपडतें. ह्मणून केर काढल्यावर तो लागलीच बाहेर टाकावा. पण तो दारासमोर रस्त्यावर टाकूं नये. म्युनिसिपालिटीनें यासाठीं मुद्दाम जागोजाग ठेविलेल्या पेट्यांत टाकावा[1]. माडीवर राहणाऱ्यांनीं खिडकीं-

१ लहान गांवांतून व खेड्यांतून जागजागीं केराचा ढीग करण्याची चाल पूर्वीं असे व अजूनही कित्येक गांवीं आहे. या ढिगाला उकिरडा ह्मणतात. या उकिरड्याचा खताकडे उपयोग करतात. खतासाठीं असा उकिरडा ठेवण्याची जरूरीच असली तर तो निदान गांवाच्या बाहेर ठेवावा; आंत ठेवूं नये.

तून खालीं रस्त्यांत केर फेंकू नये. त्यामुळें एक तर रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्यांच्या अंगावर तो पडण्याचा संभव असतो, आणि दुसरी गोष्ट असें करण्यानें तो केर वाऱ्यानें उडून दुसऱ्याच्या घरांत जातो. त्यापेक्षां असा केर टोपलींत भरून ती टोपली दिवसांतून एकदां केव्हां तरी खालीं नेऊन म्युनिसिपालिटीनें ठेविलेल्या पेटींत ओतावी हें चांगलें. सडकेवर किंवा रस्त्यांत अथवा लोकांच्या दाराशीं केर ओतूं नये. रस्त्यावर केर टाकणें हा गुन्हा आहे, आणि आपल्या थोड्याशा आळसामुळें दुसऱ्याच्या आरोग्याला अपाय होईल अशी एखादी गोष्ट करणें हें पाप आहे. शिवाय आपण जसे दुसऱ्याच्या दाराशीं केर टाकण्यास पाहतों, तसे दुसरेही आपल्या दाराशीं केर टाकूं लागले तर आपणांस काय वाटेल याचाही विचार करावा.

१९ केव्हांही पाहिल्याशिवाय केर टाकूं नये. कारण, घरांतली एखादी बारीक सारीक वस्तु केरांत जाण्याचा संभव असतो. झाडतांना भुईवर कागद वगैरे पडलेले दिसले तर ते वाचून पाहिल्याशिवाय किंवा कोणाला दाखविल्याशिवाय रद्दी समजून टाकूं नये. कागदाचे तुकडे वगैरे केरांत टाकण्यापेक्षां जाळून टाकलेले बरे.

२० रद्दी झालेलीं वर्तमानपत्रें आणि वेष्टनाचे कागद उचलून त्याचें पुडकें बांधून ठेवावें. हे कागद पुष्कळ वेळां उपयोगीं पडतात, किंवा पुष्कळ जमल्यावर विकतां येतात.

२१ कोऱ्या किंवा स्वच्छ कापडाच्या चिंध्या मुलांचे चेंडू किंवा मुलींसाठीं भावल्या करण्याच्या उपयोगीं पडतात. मळालेल्या चिंध्यांचाही काकडा करण्याचे किंवा चूल वगैरे पेटविण्याचे कामीं उपयोग होतो. दोऱ्यांचे तुकडे तर नेहमीं लागतात. यासाठीं अशा चिंध्या

व दोऱ्या टाकण्यासाठीं एक वेगळीच टोपली करावी आणि तींत त्या नेहमीं टाकीत जाव्या.

प्रकरण ३ रें.

रांगोळी.

१ रांगोळी घालणें हें आपल्या लोकांत एक मंगल चिन्ह समजतात. नुसतें पोतेरें किंवा सडा घालून ठेवण्यापेक्षां त्यावर रांगोळी घालण्यानें घरापुढच्या जागेला शोभाही येते, ह्मणून ही चाल पडली असावी. रांगोळी घालण्याची चाल बहुतेक हिंदुजातींत व पारशी लोकांत ही आहे.

२ रांगोळी, शिरगोळे किंवा गारगोट्या भाजून व दळून करतात. चुनखडीची भुकटी ही या कामीं उपयोगांत येते. कोणी लोक रांगोळी घातलेली बरेच दिवस टिकावी ह्मणून खडी पातळ करून तिची रांगोळीसारखीं चित्रें व आकृति काढतात. जेथें रोज सडासंमार्जन व्हावयाचें, तेथें मात्र खडीची ही रांगोळी उपयोगाची नाहीं. कांहीं लोकांत कणिकेची रांगोळी घालण्याची चाल आहे, पण ती चांगली नाहीं. कारण, त्या पासून माशा, मुंग्या, चिलटें वगैरेंच्या वाढीला साह्य होऊन त्रास होण्याचा संभव आहे. हळदीचा, कुंकवाचा व क्वचित् प्रसंगीं गुलालाचा* ही या कामीं उपयोग करतात. निरनिराळ्या रंगांत रांगोळीचीं चित्रें काढावयाचीं असलीं ह्मणजे या द्रव्यांचा चांगला उपयोग होतो.

---

* आरारूट, खडी, बारीक रांगोळी किंवा पीठ यांत तांबडा रंग मिळवून व तीं पाण्यांत घोटून वाळवून गुलाल तयार करतात. हिरवे, पिवळे, वगैरे दुसऱ्या रंगांचे गुलाल अशाच रीतीनें केलेले असतात.

३ सडासंमार्जन झाल्यावर घराच्या मागल्या आणि पुढल्या दोन्ही दारांशीं, निदान पुढल्या दाराशीं तरी, तसेंच तुळसीवृंदावनापुढें आणि देवापुढें, रांगोळी घालण्याची चाल आहे. रांगोळी घालण्याचे पुष्कळ प्रकार आहेत. त्यांतले मुख्य मुख्य येथें देतों:—

१ मंडलें—स्वस्तिक, गोपद्म, चक्र इ०
२ घराचे भाग— तोरण, दरवाजा, तुळसीवृंदावन, पर्वत, मंदिराचें शिखर इ०
३ फुलें—कमळ, सूर्यफूल, गुलाब, जाईचा मंडप इ०
४ फळें—खरबूज, अननस, नारळ वगैरे.
५ जनावरें—गाय, हत्ती, बैल, घोडा इ०
६ पक्षी—पोपट, मोर, हंस, बदक इ०
७ जलचर प्राणी—मासळी, कासव, शंख इ०
८ देवता—शिवलिंग, शाळुंका, सूर्य, चंद्र, तारका, नवग्रह इ०

यांपैकीं देवादिकांची रांगोळी फक्त देवघरांत, किंवा तुळसीवृंदावनापुढें घालणें योग्य आहे. इतर ठिकाणीं घातल्यास तिच्यावर येणाऱ्या जाणाऱ्यांचा पाय पडण्याचा संभव असतो. ह्मणून ती फारशी कोणी घालीत नाहींत.

४ रोज तीच ती रांगोळी घालूं नये. नित्य नवीन प्रकारची घालावी. ह्मणजे आपणास पुष्कळ प्रकार आपोआप येऊं लागतात. सामान्यतः एकाच रंगांत रांगोळी घालण्याची चाल आहे. कित्येक बायका आपलें विशेष कौशल्य दाखविण्यासाठीं रांगोळी घालून तींत निरनिराळे रंग भरतात.

५ रांगोळी काढतांना ती आपण जागेला शोभा आणण्यासाठीं काढीत आहों ही गोष्ट ध्यानांत ठेवावी. रांगोळीवरून आपल्या

अंगच्या कुशलतेची व टापटिपीची परीक्षा व्हावयाची आहे हें लक्षांत न ठेविल्यामुळें कित्येक बायका व मुली रांगोळी काढतांना कशातरी वाकड्या-तिकड्या व बोजड रेघा काढतात. अशा रांगोळीनें जागेला शोभा तर येत नाहींच, पण उलट ती कृति हास्यास्पद मात्र होते.

६ रांगोळी काढण्याचें काम फारसें कठीण आहे असें नाहीं. त्यांत थोडें मन घातलें असतां व बोटांना संवय ठेविली असतां कोणालाही टिंबांच्या साह्यानें रांगोळीच्या छानदार आकृति काढतां येण्यासारख्या आहेत. पूर्वीं बायकांना ड्रॉइंगचें (चित्रकलेचें) प्राथमिक शिक्षण देण्याची उत्कृष्ट व्यवस्था या रांगोळी काढण्याच्या योगानें होत असे. ज्यांना हातानें नीट आकृति काढतां येणार नाहींत, त्यांनीं रांगोळीचे छाप टीनच्या पत्र्याचे केलेले असतात, त्यांचा वाटेल तर उपयोग करावा. पारशी लोकांत दारासमोर रांगोळीचे हे छाप उठविण्याची चाल आहे.

प्रकरण ४ थें.

सडासंमार्जन.

१ सडा घालणें याचा सामान्य अर्थ ‘ एखादा जिन्नस चोहोंकडे पसरून टाकणें ’ असा आहे. त्याचा विशेष अर्थ शेण व माती पाण्यांत कालवून तें मिश्रण जमिनीवर शिंपडणें असा आहे. हा सडा सकाळचे वेळीं दाराबाहेर व अंगणांत घालण्याची चाल आहे.

२ घरांत जाण्यायेण्याच्या रस्त्यावर व अंगणांत माणसांची वर्दळ फार असल्यामुळें ती जागा नेहमीं उखळते आणि वाईट दिसते. तिच्यावरून केर उडून वाऱ्यानें घरांत येतो. याचा बंदोबस्त व्हावा व त्या जागेवरली माती तेथेंच दबलेली रहावी आणि घराची जागा

शुद्ध व स्वच्छ रहावी यासाठीं सडा घालावयाचा असतो. तुळशी-वृंदावन किंवा घराच्या अंगणांत किंवा परसांत असलेलें उंबराचें किंवा पिंपळाचें झाड यांच्या भोंवतींही सडा घालतात. कारण, तुळशीच्या, उंबराच्या, किंवा पिंपळाच्या पूजेसाठीं व त्यांना प्रदक्षिणा घालण्यासाठीं बायकांना तेथें नेहमीं जावें लागतें व प्रदक्षिणेची जागा पायांनीं उखळते. यासाठीं या झाडाभोंवतींही सडा घालतात.

३ पहाटेस लोक हिंडूं फिरूं लागण्यापूर्वीं सडा घातलेला वाळला पाहिजे. ह्मणून सडा फार लवकर घालावा, ह्मणजे लोकांच्या पायाला ओलें लागणार नाहीं व शेणाची घाणही येणार नाहीं. सडा घालण्यासाठीं होतां होईल तों सडकें शेण घेऊं नये, ह्मणजे घाण कमी येईल.

४ पावसाळ्यांत, आणि धुकें पडलें असेल किंवा गारठा फार असेल अशा दिवशीं, सडा घालण्यापासून तो घालणाराला व त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्याला दोघांनाही फार त्रास होतो. ह्मणून अशा वेळीं सडा न घातला तरी चालेल. पाऊस पडत असला ह्मणजे सडा घालण्याचें काम मेघराज स्वतः करीतच असतात. उन्हाळ्यांत मात्र तो दररोज घालावा. उन्हाळ्यांत संध्याकाळीं उघड्या हवेंत बसण्यासाठीं पलंग, चौरंग, किंवा खाटा वगैरे घालण्यापूर्वीं नुसत्या पाण्याचा छिडकाव एक दोन वेळां जरूर करावा. त्याच्या योगानें जमिनीची उष्णता थोडीशी कमी होते.

५ सडा घालण्यापूर्वीं अगोदर शेण, माती, तीं कालविण्याचें भांडें व दुसरें एक पाण्याचें भांडें हीं घ्यावीं. पदर घट्ट बांधावा. दोन्ही हात चांगले मोकळे करावे. थंडीकरितां अंगांत बंडी वगैरे घातली

असली तर तिच्या बाह्या कोपरापर्यंत वर कराव्या आणि ओचे वर सावरून घ्यावे.

६ मग एका भांड्यांत प्रथम माती पाण्यांत कालवावी, आणि मग त्यांत शेण मिळवावें. तें सारखें चांगलें मिळविलें गेलें ह्मणजे डाव्या हातांत त्या मिश्रणानें भरलेली तपेली घेऊन उजव्या हातानें त्याचा लांब शिबका मारीत जावें. सडा फार दाट घालूं नये. तो सारखा घालीत जावें. मधून मधून कोरडी जागा राहूं देऊं नये.

७ सड्याकरितां माती घेणें ती तांबडी, किंवा पिंवळी असावी. काळी चिकणमाती उपयोगी नाहीं. शेतांतली खत घातलेली माती घेऊं नये. मातींत खडे किंवा वाळू असूं नये. रस्त्यावरली मातीही कामाची नाहीं. रानांतून आणिलेली माती चांगली.

८ शेण घ्यावयाचें तें घरच्या किंवा शेजारपाजारच्या गाईम्हशींचें घ्यावें. तें ताजें असावें. शिळें घेण्यापेक्षां वाळलेलें घेणें चांगलें. पातळ, वास येत असलेलें, ज्यांत धान्याचे कण किंवा किडे असतील असें, किंवा घाणेरड्या जागेवरलें घेऊं नये. घोड्याची लीद किंवा बकरीच्या लेंड्या घेऊं नये.

९ सड्याकरितां पाणी घ्यावयाचें तें गोडें, खारें, ताजें, शिळें, केर पडलेलें कसेंही चालेल. मात्र तें धुण्याचें किंवा घाणेरड्या डबक्यांतलें किंवा मोरींतलें कधीं घेऊं नये.

१० सड्याकरितां एखादा टिनाचा रुंद तोंडाचा डबा, लहानशी बादली (बालटी), किंवा मोठ्या तोंडाचें मडकें निराळेंच करून ठेवावें, व सड्याचें काम झाल्यावर तें चांगलें धुऊन स्वच्छ करून ठेवावें. स्वयंपाकाचें किंवा धुण्यापाण्याचें भांडें या कामीं उपयोगांत आणूं नये.

११ फरसबंदी किंवा चुन्यानें पक्क्या केलेल्या जमिनीवर सडा घालण्याचें बिलकुल कारण नाहीं. त्यापासून जागेला अधिक स्वच्छता न येतां उलट घाण मात्र होईल. तसेंच चुना पोतलेली किंवा रंग दिलेली भिंत असेल अशा जागींही सडा घालूं नये. अशा जागीं नुसत्या पाण्याचा शिडकाव करावा. फुलझाडांना पाणी घालण्याचा हजारा असतो, तो या कामासाठीं घेतलेला अधिक चांगला.

१२ सडा घालणें झाल्यावर हातपाय वरपर्यंत चांगले स्वच्छ धुवावे. हाताला वास आणि नखांतून मळ अगदीं राहूं देऊं नये. वास जाण्यासाठीं हातांला पाहिजे तर थोडी माती लावून ते धुवावे, आणि लागलीच कोरडे करावे. तसेच ओलेत्यानें वापरूं नये.

प्रकरण ५ वें.

चूलपोतेरें.

१ चूलपोतेरें ह्मणजे चुली पुढली जागा सावडून पोतेऱ्यानें ती सारवणें. हें जेवणींखाणीं आटोपल्यावर करावयाचें असतें. क्वचित् जेवणींखाणीं होण्यास फार उशीर असला किंवा दुसरीकडे जेवण्यास जावयाचें असलें तर पोतेरें घालण्याचें काम स्वयंपाक आटोपतांच करतात.

---

१ बायकांना शेण, माती, व राख यांत हात ... -
व नखें वाढल्यास त्या नखांत तीं घाण जमून बस...
पिण्याच्या पदार्थांसही होतो. यांसाठीं बायकांन... करा-
चाढूं देऊं नयेत. हात धुतांना नखांतून दुसरें नख ... आहेत
काढून हात धुवावे. ... एकाहून

२ चुलीचें काम आटोपलें ह्मणजे लाकडें व निखारा बाहेर काढून लाकडें मोरीवर आणि निखारा चुलीपुढेंच पाण्यानें विझवावा. लाकूड एखाददुसरेंच असलें तर दोन्हीं ह्मणजे निखारा व लांकडें हीं तेथेंच विझविण्यास हरकत नाहीं. निखाऱ्याबरोबर राख ओढून घेऊं नये. विझविण्यासाठीं पाणी हातानें शिंपडल्यासारखें घालावें. तांब्यानें ओतूं नये. तसें केल्यास राख उडून ती आपल्याच अंगावर येते, आणि चुलीजवळ पाणी सांडून चिखल होतो.

३ जेवणींखाणीं आटोपल्यावर शिल्लक राहिलेल्या अन्नापैकीं जें पुनः खाण्याच्या उपयोगीं येण्यासारखें आणि दुसऱ्या खाण्याच्या वेळेपर्यंत चांगलें टिकण्यासारखें असेल[1] तेंच राखून ठेवावें. तें तसें नसेल तर तें लागलीच देऊन टाकावें.

४ राखून ठेवण्याचें अन्न खरकटें[2] वेगळें व बिनखरकटें वेगळे ठेविलें पाहिजे. सोंवळ्याचें सोंवळ्यांत[3] व ओंवळ्यांचें ओंवळ्यांत ठेवावें.

---

१ अन्न जितकें सत्त्वयुक्त आणि चांगलें परिपक्व केलेलें असेल तितकें तें ज्यास्त टिकतें. भाकर, पोळी, भात, वरणाचा घट्ट गोळा इ. १०।१२ तास टिकतात. खार, बासुंदी, श्रीखंड इ दुधादह्याचे पदार्थ २४–३६ तास पर्यंत टिकतात. पदार्थ पाकवलेले चार सहा दिवस व तळलेले दोन तीन दिवस पर्यंत बिघडत नाहींत.

२ खरकटें अन्न कोणतें व बिन खरकटें कोणतें ह्याबद्दलचे नियम सांगतां येणार नाहींत. तथापि सामान्यतः तुपातेलानें भाजून तयार केलेले (ज्यांत पाण्याचा संपर्कही नसतो त्यास निर्लेप ह्मणतात),दुधांत शिजविलेले किंवा अगोदर अग्नीवर भाजून मग त्यांत पाणी घालून शिजविलेले,वैगेरे पदार्थांस बिनखरकटें ह्मणतात, आणि पाणी घालून शिजविलेल्या अन्नाला खरकटें ह्मणतात.

३ सोंवळ्याओंवळ्यांत पुष्कळ भेद आहेत. पण स्थूल मानानें मुंज झालेलीं मुलें व प्रौढ वयाच्या बायका सोंवळ्यानें जेवतात व ओंवळ्याचा स्पर्श झालेलें अन्न खात नाहींत.

५ राखून ठेवावयाचें अन्न (१) पानपत्रावळीवर, ताटलींत, बशींत किंवा स्वयंपाकाच्या भांड्यांत ठेवूं नये. (२) ज्याचा कळंक किंवा वास लागेल अशा भांडयांत ठेवूं नये. (३) एका पदार्थावर दुसरा पदार्थ दडपून ठेवूं नये. (४) घट्ट अन्नास लावून पातळ पदार्थ ठेवूं नये. (५) अन्न मोकळें पसरलेलें ठेवूं नये. (६) भुई-बरोबर ठेवूं नये. (७) पाणथळ, अथवा ओलसर जागेंत किंवा मोरी जवळ ठेवूं नये. (८) कोंदट हवेच्या किंवा बंद जागीं ठेवूं नये. (९) कुत्र्यामांजराला सहज उचलतां किंवा ढकलतां येईल अशा झांकणाखालीं ठेवूं नये.

वरील सर्व प्रकार असे आहेत कीं त्यापासून अन्न एकांत एक मिसळतें, सांडतें, कळंकतें, कुजतें, नासतें, उबतें, किंवा आळ्या, मुंग्या, मुंगळे, इ० येतात अथवा उंदीर, मांजर, मुंगुस किंवा कुत्रें यांस त्यांत तोंड घालण्यास सांपडतें. ह्मणून अन्न फार व्यवस्थेनें व सुरक्षित राहील असें ठेविलें पाहिजे.

६ अन्न झांकून ठेवावयाचें तें नीट व्यवस्थेनें ठेवावें. पोळ्या ठेवावयाच्या असल्या तर एकीवर एक अशी त्यांची चळत करून ती दुमडतां येण्यासारखी असल्यास दुमडून ठेवावी. भात ठेवावयाचा असल्यास तो वाडग्यासारख्या एखाद्या भांड्यांत मुदेसारखा घालून नीट दडपून ठेवावा, ह्मणजे मऊ राहील.

७ अन्न ठेवण्यासाठीं भांडें घ्यावयाचें तें कल्हई केलेलें व न कळंकणारें असून आटपसर बेताचें असावें. त्याला अंगचेंच घट्ट झांकण असेल तर फार चांगलें. पितळी डबे किंवा अलीकडे फराळाचे डबे ह्मणून एका विशेष घडणीचे पूडदार डबे निघाले आहेत ते चांगले. डबा एकच पूडदार नसेल तर जरूरीप्रमाणें एकाहून

अधिक डबे घ्यावे. एकाच प्रकारचें अन्न एका डब्यांत ठेवावें. पातळपदार्थ (उ० वरण, कढी, आमटी वगैरे) निराळे ठेवावे. वाडगे, वाट्या, तपेल्या, किंवा पातेलीं घेतलीं तर त्यांचीं झांकणें त्यांच्या बेताचीं असावीं.

८ अन्नाचीं भांडीं फडताळांत, शिंक्यावर किंवा जाळीदार पेटींत अथवा कपाटांत ठेवावीं. तीं खालीं भुईवर ठेवणें झालें तर त्यांवर आणखी एक जड मोठेंसें पातेल्यासारखें झांकण घालावें. झांकण जड नसेल तर त्यावर एखादा दगड किंवा वरवंटा ठेवावा. ह्मणजे मांजराला तें उचलून अन्न खातां येणार नाहीं.

९ अन्न एखाद्या कोनाड्यांत किंवा खुल्या फरताळांत वगैरे ठेवणें झालें, तरी त्याच्या भांड्यास मजबूत झांकण पाहिजेच. नाहीं तर उंदरा–मांजराचा उपद्रव तेथेंही झाल्यावांचून राहणार नाहीं. ताट किंवा पत्रावळ वाढून झांकून ठेवावयाची असली तर ती एखाद्या पाटावर ठेवून तिच्यावर दुसरा पाट किंवा भांडें झांकण घालावें.

१० अन्न ठेवणें तें स्वच्छ, सुक्या जागेंत, हवा लागेल अशा बेतानें ठेवावें.

११ चुली भोंवतालचीं कामांत न अडलेलीं भांडीं, साहित्याचे डबे, तिखटामिठाचें पंचपाळें, लोणच्याच्या व चटण्यांच्या दगड्या, दुधातुपाच्या कथल्या इ. वस्तु जेथल्या तेथें उचलून ठेवाव्या.

१२ विझविलेल्या लांकडास कोठें विस्तव राहिला आहे कीं काय हें प्रथम नीट पहावें. विस्तव असल्यास तो पुरता विझवावा आणि मग लाकडें जळका भाग वर करून उभीं करून ठेवावीं. विझविलेले कोळसे एखाद्या कोठींत किंवा टिनच्या डब्यांत घालून ठेवावे. हे कोळसे विस्तव पेटविण्यास उपयोगीं पडतील.

१३ चुलीपुढील जिनसांची आवरासावर झाली ह्मणजे पदर व ओचे चांगले घट्ट खोवून घ्यावें, आणि पाण्याचा तांब्या, बादली (बालटी), केरसुणी, शेणगोळा व पोतेऱ्याचें सामान तयार करून ठेवावें.

१४ चुलींतली राख सगळी भरून घ्यावी. चुलीसमोरच्या भागांतून आणि आवेलाकडली राख उलथा किंवा पळी, यांनीं काढावी. ही राख उष्ण असण्याचा किंवा तींत जळते कोळसे असण्याचा संभव असतो. ह्मणून ही राख हातानें काढूं नये. वरून हाताला राख थंड लागली तरी पोटांत ती उष्ण असण्याचा संभव असतो. राख काढतांना तळाला फार खरडूं नये. कारण, तसें केल्यास तळची जळकी मातीही निघून तेथें खाच पडते.

१५ खरकटीं भांडीं सगळीं एके जागीं गोळा करावीं. खालीं परात, तीवर झांकण्या (वेळण्या), ताटें, नंतर बोघुणीं, वाडगे, वाट्या, एकांत एक घालून, त्यांवर तपेल्या, पळे, सांडसे, ओगराळें, चमचे वगैरे ठेवावे. आणि ती सगळी भांड्यांची रास मोरीवर नेऊन ठेवावी. भांडीं पसरून ठेवूं नयेत. घासण्याला विलंब असला तर भांड्यांत आंत व बाहेर बरेंच पाणी घालून ठेवावें, नाहीं तर भांडीं वाळून जातील व घासण्याचें काम जड जाईल. भांडीं बंदोबस्तानें ठेवावीं. कारण, कुत्रे, मांजरें, कावळे वगैरे तीं विसकटतात, आणि एखादें लहानसान भांडें उचलून सुद्धां नेतात.

१६ लोखंडी चूल असली तर ती उचलून नेण्यासारखी असल्यास मोरीवर न्यावी व चांगली धुऊन पुसून ठेवावी.

१७ लाटणें व पोळपाट हीं बहुधा लाकडाचीं असतात. तीं भांड्यांत न टाकतां लागलींच स्वतःधुऊन टाकावीं हें बरें. एक तर

तीं तशींच पाण्यांत भिजत रोज पडूं दिलीं, तर लवकरच लाकूड कुजून ते जिन्नस निरुपयोगी होतात; आणि दुसरी गोष्ट त्यांत एखादी भेग असली आणि तींत खरकटें जाऊन बसलेलें नोकराचाकरानें नीट काढलें नाहीं, तर सोंवळ्या माणसाला ते जिन्नस स्वयंपाकांत घेतां येत नाहींत. या साठीं ते स्वतःच धुऊन घेणें बरें.

१८ सांडलेलें अन्न (पोळीचे किंवा भाकरीचे तुकडे, भाताचीं डिखळें वगैरे) हातानें उचलून टाकतां येण्यासारखें असेल तर तें उचलून खरकट्या भांड्यांत टाकावें. पातळ पदार्थ सांडला लवंडला असेल किंवा भाज्यावरणाचे थेंब पडले असतील अशा जागा उलथण्यानें खरवडून टाकाव्या.

१९ चुलीवर * आणि सभोंवतालच्या सगळ्या खरकट्या जागेवर पाण्याचा शिपका द्यावा, आणि नंतर त्यावरील खरकटें व केरकचरा सावडावा. हें काम नुसत्या हातानें, शेणगोळा फिरवून, किंवा कुंच्यानें झाडून करतां येतें. पण नुसत्या हातानें करण्यांत हात वाईट व खडबडीत होतात. ह्मणून दुसऱ्या दोन प्रकारांपैकीं जो योग्य दिसेल त्यानें करावें.

२० शेणगोळे दोन करावे. एकानें खरकटें टिपीत पुढें न्यावें; दुसऱ्यांतून थोडथोडें शेण पातळ करून हात फिरवावा. चूल शेणानें सारवूं नये. तिच्यावरून पहिला गोळा फिरविला ह्मणजे झालें. सगळें सारवण झालें ह्मणजे खरकटा गोळा आणि चांगल्यापैकीं राहिलेलें शेण फेंकून द्यावें.

---

* चूल तापलेली असेपर्यंत तिच्यावर पाणी शिंपडूं नये; नाहीं तर तिचे पोपडे निघतात, व केव्हां तुकडाही पडतो.

२१ शेण कसें असावें तें पूर्वीं सड्याच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. तें चांगलें किंवा मुळींच मिळालें नाहीं तर हें सावडण्याचें काम कुंच्यानें करून नंतर माती मिळवून किंवा नुसतेंच पाणी फिरवावें.

२२ चूल आणि सभोंवतालची जागा दगडी किंवा पक्की चुन्या-विटांची असेल, तर अशा स्थितींत शेणगोळा फिरविणें किंवा पोतेरें घालणें व्यर्थ आहे. कुंच्यानें झाडून पाण्यानें जागा धुऊन टाकली ह्मणजे काम होईल. कोणी प्रथम शेण कालवून न फिरवितां एकदम पोतेरेंच्र फिरवितात. पण हा प्रकार कांहीं अंशीं गौण आहे.

२३ शेणपाणी चांगलें लाविल्यावर पोतेरें घालण्याची विशेष गरज राहत नाहीं. तरी ज्या स्वयंपाकानें देवाचा नैवेद्य वैश्वदेव व्हावयाचा तो करण्यास चूल आणि सगळें स्वयंपाकघर पोतेरें घालून शुद्ध केलेलें असलें पाहिजे. हें पूर्वींच्या स्वयंपाकाचें काम उरकतांच* करून ठेवलेलें बरें. कारण आयत्यावेळीं करण्यापासून त्याचा वाईट वास नाकातोंडांत शिरतो. ओल्यांत फिरणें किंवा बसणें आरोग्यालाही अपायकारक असतें, व शिवाय भांडीं व स्वयंपाकाचें साहित्य ताज्या पोतेऱ्यावर ठेवावें लागतें. तें बरें नाहीं. चूल गरम असतांना मात्र ती सारवूं नये. नाही तर चुलीचे तुकडे पडतात.

२४ मातीच्या चुलीला नुसतें मातीचेंच पोतेरें फिरवावें. त्यांत शेण मिसळूं नये. कारण, तें विस्तव पेटल्यावर जळून भांड्यांत उडतें. चुलीच्या तळाशीं पुढें खळगा पडला असेल, तर कोरड्या

* रात्रींचें पोतेरें घालण्याची जुनी चाल नाहीं. जुन्या चालीच्या घराण्यांतून तें सकाळींच घालतात. हा प्रचार दुपारीं उशीरानें जेवण्याचा परिपाठ असलेल्या काळांत बाधक नव्हता. आतां सकाळीं ९।१० वाजतांच जेवण करणें भाग झालें आहे, तर त्याबरोबर पोतेऱ्याचा वेळही बदलणें प्राप्त आहे.

मातीचे लहान खडे त्या खळग्यांत भरून लाकडानें ते चांगले कुटावे आणि थोडें पाणी शिंपडून लिंपण करावें. नंतर पूर्वी सड्याचे प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, सड्याच्या भांड्यांत माती व शेण मिळवून सरबरीत मिश्रण करून पोतेऱ्याच्या फडक्यानें प्रथम चुली-वरल्या भागावर व नंतर सर्व जागीं पोतेरें घालावें. भिंतीवर किंवा भुईवर पोतेऱ्याचा थर जमेल तर कधींकधीं तो खरडून काढून टाकावा. पोतेऱ्याचें सारवण बेताचेंच करावें, आणि केलें असेल तेवढें संपवून टाकावें. शिलक राहिलेंच तर त्यांतलें शेणपाणी कुजूं नये ह्मणून पुष्कळशी माती घालून ठेवावी. पोतेऱ्याचें फडकें चांगलें स्वच्छ धुऊन वाळत घालावें, आणि पोतेरें घातलेल्या जागेवरून केरसुणी फिरवावी.

प्रकरण ६ वें.

उष्टेंखरकटें.

खरकट्याचे दोन प्रकार आहेत. एक, उष्टें नाहीं असें खरकटें व दुसरें उष्टें असलेलें खरकटें. पैकीं पहिल्याचा विचार ' चूलपोतेरें ' या प्रकरणांत झाला. दुसऱ्याचा ह्मणजे उष्टें असलेल्या खरकट्याची व्यवस्था काय करावयाची त्या संबंधानें या प्रकरणांत सांगावयाचें आहे.

उष्टेंखरकटें करणें ह्मणजे जेवून गेलेल्या मंडळीची ताटवाटी उचलून ती जागा स्वच्छ व शुद्ध करणें.

२ स्वयंपाकघर व जेवणघर एकच असलें तर चूलपोतेरें आणि उष्टेंखरकटें हीं कामें एकदमच करतां येतात. मात्र प्रथम चुली-पुढील काम व नंतर उष्ट्यांतलें काम असा त्यांचा क्रम ठेवा-वयाचा असतो. ह्मणजे चुलीपुढें उपयोगांत आणिलेलें शेण आणि

कुंचा उष्ट्यांत उपयोगांत आणतां येतील, पण याच्या उलट मात्र करतां येणार नाहीं.

३ स्वयंपाकघर आणि जेवणघर निरनिराळीं स्वतंत्र असलीं तर जेवणघरांतून मंडळी उठून गेल्यावर चुलीकडील काम संपण्याची वाट न पाहतां उष्ट्याखरकाट्याचें काम लागलींच करून टाकावें.

४ उष्टें फारवेळ पडलें राहूं देऊं नये. तें जेवण झाल्यावर लागलींच काढावें. तसें न केल्यास मांजर घरभर उष्टें पसरतें, आणि माशा, मुंग्या, मुंगळे, चिलटें वगैरेंची वाढ होऊन मनस्वी त्रास होतो.

५ जेवणाराचे कडेस राहिलेल्या अन्नाची, किंवा एखादें वाढलेलें ताट जेवणारा न आल्यामुळें तसेंच राहिल्यास त्याची विल्हेवाट पूर्वीं चूल पोतेऱ्याचे प्रकरणांत सांगितल्या प्रमाणें लावावी. होईल तोंपर्यंत जेवणारें माणूस पानावरून उठून जाण्यापूर्वींच हें काम करावें. कारण, नंतर तें अन्न उष्ट्यासारखें होतें. *

६ उष्टें काढण्याचे कामास लागण्यापूर्वीं ओचे व पदर नीट खोवून घ्यावे. तसेंच पाण्याचा तांब्या, बादली (बालटी), शेण व केरसुणी हें सामान पाहून तयार ठेवणेंही अवश्य आहे

७ उष्टें काढण्याचें काम नेहमीं ओंवळ्यानेंच करतात. कारण, सुती लुगड्याचें सोंवळें उष्ट्याचा स्पर्श झाल्यावर कायम राहत नाहीं. रेशमी किंवा तागाच्या सोंवळ्यानें हें काम केलें असतां तें सोंवळें विटाळत नाहीं हें खरें; तथापि तें 'जेवलेलें' होतें, आणि देवपूजेच्या किंवा श्राद्धापक्षाच्या वगैरे कामाला तें चालत नाहीं.

---

* कडेस ठेवलेल्या अन्नावर जेवणाराचे पात्रांतून अन्नाचा अंश उडून किंवा जेवणाराचा चुकून स्पर्श होऊनही तें अन्न उष्ट्यासारखें होतें.

८ ज्याचा व आपला पंक्तिव्यवहार नाहीं, पण ज्याचा स्पर्श झाला असतां विटाळही मानण्यांत येत नाहीं अशाचें उष्टें सोंवळ्यानें काढूं नये. ज्याच्या स्पर्शानें विटाळ झाला असें मानण्यांत येतें अशाचें उष्टें काढण्याचा प्रसंग आला असतां तें काढल्यावर, जशी चाल असेल त्याप्रमाणें, नवें वस्त्र नेसावें अथवा स्नान करावें.

९ उष्ट्यास हात लावण्यापूर्वी बिनउष्टें सामान जें कामाकरितां किंवा उपचार ह्मणून जेवतांना घेतलेलें असतें तें प्रथम उचलावें. जसें–टेकावयाचे पाट, समया, उदबत्त्यांचीं घरें, शेगड्या, गडवे, झाऱ्या, फडकीं किंवा हात पुसण्याचे रुमाल, गंधाची तबकडी किंवा वाटी, गंध लावण्याची साखळी वगैरे.

१० बारीक चीजवस्त (जशी नथ), कडोसरीचा पैसाअडका, तपकिरीची डबी, दक्षिणेचा पैसा, अंगावरची शाल किंवा पामरी वगैरे कोणाचें पानापाशीं राहिलेलें आढळून आल्यास तें नीट उचलून ठेवावें व ज्याचें त्यास द्यावें.

११ बसण्याच्या पाटांचें * पुढील अर्धे भाग जागच्याजागींच धुऊन मग ते पाट उचलावे. या पाटांवर क्वचित् उष्टें सांडलेलें असतें. मुलांच्या पाटावर तर हटकून असतें. ह्मणून असे पाट धुण्याचा परिपाठ आहे. पाट धुण्याचा प्रकार—पाटाच्या मागील

* बसावयास चौरंग किंवा आसनें ही घेतात. चौरंग उचलण्याची व धुण्याची रीत पाटाप्रमाणेंच आहे. आसन दर्भाचें किंवा गवताचें असेल तर तें झटकून त्यास पाण्याचा हात लावण्यास हरकत नाहीं. लोकरीचें किंवा केसाचें आसन असेल तर तें फारच हलक्या हातानें झटकावें. क्वचित् कोठें एखादें शीत अडकून बसलें असेल तर तें काढून टाकून तेवढ्याच भागाला पाण्याचा स्पर्श करावा.

बाजूस उभे राहून डाव्या हातांत पाण्याचा तांब्या धरावा. उजव्या हातानें प्रथम पाटावर सांडलेलें उष्टें खालीं लोटून द्यावें, व डाव्या हातानें तांब्यातलें पाणी पाटाच्या लांबीवर थोडथोडें टाकावें. उजव्या हातानें तें पाणी एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत फिरवावें. याप्रमाणें सगळे पाट धुऊन झाले ह्मणजे दोन्ही हातांनीं जोडीजोडीनें ते उचलून त्यांच्या योग्य जागीं उभे करून ठेवावे.

१२ चांदीचीं भांडीं जेवणांत असतील तर तीं अगोदर उचलून लागलीच घांसून पुसून ठेवावीं, किंवा योग्य माणसाच्या स्वाधीन करावीं. जर जेवणारी मंडळी पुष्कळ व बाहेरची अनोळखी असतील तर हीं भांडीं मंडळी उठल्याबरोबर अगोदर उचलावीं. नाहीं तर त्या गडबडींत एखादें भांडें गहाळ होण्याची भीती असते.

१३ पानांतून कालवून, चिवडून किंवा मोडून तोडून खराब न केलेलें असें, चांगलें अन्न उरलेलें असेल तें उष्टें अन्न खाण्यास ज्यांना हरकत नसेल अशांना, किंवा भिकाऱ्यांना अथवा भंग्याला देऊन टाकावें.

१४ अन्न ह्मणण्यासारखें उरलें नसल्यास जेवलेल्या पत्रावळी व द्रोण तशाच एकीवर एक ठेवून व उचलून केराच्या हौदींत टाकाव्या. या पत्रावळी उचलून नेतांना त्या मध्येंच मोडल्यामुळें किंवा बाजूस लागलेलें खरकटें गडबडत जाऊन खालीं सांडण्याचा संभव असतो. याकरितां अशा पत्रावळी परातीसारख्या मोठ्या रुंद भांड्यांत किंवा ताटांत भरून न्याव्या. ताटें वाट्या असल्यास त्यांतील अन्न–पातळ व घट्ट–वेगवेगळें उष्ट्यांतल्याच वाट्यांतून किंवा निराळ्या भांड्यांत एकत्र करावें. (ह्मणजे आमटींत आमटी, भाज्यांत भाज्या, कढींत कढी याप्रमाणें) आणि तें अन्न गुरें किंवा कुत्रीं यांस चारण्या-

करितां एकीकडे ठेवून पाणी पिण्याचे गलास, वाट्या, आणि ताटें सगळीं मोरीवर उचलून ठेवावीं. भुईवर अन्न सांडलें असेल तेंही अर्थात् या अन्नांतच भरून घ्यावें.

१५ वर सांगितल्याप्रमाणें उष्टें काढणें झाल्यावर शेण लावावयाचें, पोतेरें फिरवावयाचें, किंवा पाण्यानें जागा धुऊन टाकावयाची असते. हें काम पूर्वींच्या चूलपोतेऱ्यासंबंधाच्या प्रकरणांत सांगितलें आहे, त्याप्रमाणें करावें.

प्रकरण ७ वें.

भांडीं घासणें.

मनुष्याचें सगळे जीवन आणि आरोग्य अन्नपाण्याच्या शुद्धतेवर आहे, आणि ती शुद्धता राखण्याला भांड्यांची शुद्धता राखणें फार अवश्य आहे. भांडयांची शुद्धता तीं वरचेवर नीट घासून पुसून निर्मळ ठेविलीं तरच राहते, नाहीं तर राहत नाहीं. कसाही चांगला उंची पदार्थ कां असेना, तो कळकट भांडयांत शिजविला किंवा नुसता कमज्यास्त वेळ ठेविला, तरी तो नासतो. केव्हां केव्हां तो खाल्ला असतां मळमळतें, वांती होते, किंवा दुसरा कांहीं अपाय होतो. ह्मणून भांडीं नेहमीं स्वच्छ निर्मळ ठेवावीं. तीं उपयोगांत आणण्याचे वेळीं तर घासून पुसून स्वच्छ केलेलीं असलींच पाहिजेत.

स्वयंपाकांतलीं भांडीं—स्वयंपाकांत वापरलेलें भांडें घासल्या पुसल्या शिवाय तसेंच पुनःदुसऱ्या वेळीं उपयोगांत आणणें अगदीं गैर आहे. कित्येक लोक कढया, तवा, वगैरे तळण्याचीं भाजण्याचीं भांडीं तशींच ठेवून पुनःकांहीं वेळानें तीं वापरतात. पण तसें करणें शुद्धतेच्या दृष्टीनें चांगलें नाहीं. तव्यावर पोळ्या किंवा चपात्या करून

तो तसाच ठेवून दिला, आणि रात्रीं पुनः त्याच तव्यावर पोळ्या व पिठलें केलें, तर हे पदार्थ कदाचित् रुचीला वाईट लागणार नाहींत; तरी पण जळकी पिठी लागलेला, काळे पिंवळे डाग पडलेला, व खाली जळालेला तवा सात आठ तास तसाच ठेवून पुनः तो स्वयंपाकांत घेणें पाहणाराला ओंगळपणाचें वाटेल यांत शंका नाहीं. अशा अस्वच्छपणाच्या व ऐदीपणाच्या संवयीपासून तत्काळ जरी नव्हे, तरी कालांतरानें दुष्परिणाम घडल्यावांचून सहसा राहावयाचे नाहींत.

भांडीं घासणें — भांडीं घासावयाचीं तीं स्वच्छतेसाठीं, नुसत्या बाहेरच्या भपक्यासाठीं नव्हेत, हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. अर्थात् भांडीं बाहेरून तेवढीं घासलीं आणि स्वच्छ केलीं, पण आंतून तशींच मळकट राहिलीं तर काय उपयोग ? ह्मणून वापरावयाचीं भांडीं आंतून व बाहेरून सारखीं स्वच्छ ठेविलीं पाहिजेत. भांडीं घासण्याचे निरनिराळ्या प्रांतांतून निरनिराळे प्रकार आहेत. १ पुरभय्ये लोक भांडयाच्या बुडाला सुद्धां काळें राहूं देत नाहींत. त्यांचीं भांडीं आंतून व बाहेरून, वर आणि खालीं, फारच स्वच्छ असतात. २ दुसरा प्रकार मारवाडी लोकांचा. हे लोक भांडें राखेनें कोरडें घासून घासून स्वच्छ करतात, त्याला पाणी लावीत नाहींत. या प्रकाराला सुखमंजन (सुकें घासणें) ह्मणतात. ३ तिसरा प्रकार आपला महाराष्ट्रीयांचा. आपल्यांत भांडयाच्या बाहेरील सफाईकडे जितकें लक्ष असतें तितकें आंतील स्वच्छतेकडे नसतें. आपल्या भांडयांचीं बुडें पहावीं तर बहुधा काळीं असतात.

भांडें घासण्याला लागणारें सामान जर अगोदरच तयार करून ठेविलें असेल, तर भांडें घासण्याचें काम थोडक्या वेळांत व्यवस्थित

रीतीनें उरकतां येतें. ह्मणून हें सामान घासण्यावेळीं अगोदर तयार करून ठेवावें हें चांगलें. निरनिराळ्या जातींचीं भांडीं घासण्याला साधारणपणें पुढील सामान लागतें—

(१) **राखेचा कुंडा**—यांत राख भरून ठेवावी. ही राख गवरी (गोवरी) ची घेणें चांगलें. तींतून खडे वेंचून टाकलेले असावे. कारण खड्यांच्या योगानें भांड्यांना चरे पडतात. तेलातुपाचीं भांडीं घासण्याला राख फार चांगली. अशीं भांडीं राखेनें घासण्यापूर्वीं शेणानें एकदां घासलीं तर ओशटपणा फार लवकर जातो. ओशट भांडीं घासण्यास गोवरीच्या राखेपेक्षांही लाकडाची राख—जी अगदीं पांढरी शुभ्र दिसते व ओली असतां हाताला बुळबुळीत लागते ती—ज्यास्त चांगली. भांड्याचा ओशटपणा घालविण्यासाठीं साबणाचाही उपयोग करतात. साबणाचें पाणी अशा भांड्यांत घालून चांगलें खळबळल्यास सगळा ओशटपणा साफ निघतो. मागून साध्या पाण्यानें भांडें दोनचार वेळां धुवावें ह्मणजे साबणाचा वास जातो.

राखेनें भांडें घासल्यावर तें विसळून कोरड्या फडक्यानें पुसलें ह्मणजे भांड्यास चिकटून राहिलेला व नुसत्या विसळण्यानें न जाणारा राखेचा पातळ थर फडक्यावर निघून येतो. भांडें फडक्यानें न पुसलें व तसेंच वाळूं दिलें तर तो तसाच राहतो आणि भांडें कोरडें झाल्यावर त्यावर बोट फिरविल्यास बोटास राख लागलेली स्पष्ट दिसते.

(२) **विटकरीचा कुंडा**—विटेचे किंवा कौलाचे तुकडे कुटून त्यांची किंवा चुनखडीची भुकटी करून ठेवावी; किंवा रांगोळी, मुरुमाची माती, अगर बारीक रेती कुंड्यांत भरून ठेवावी.

(३) **कोंड्याचें डबडें**—यांत तांदुळाचा, किंवा तुरीच्या डाळीचा कोंडा, किंवा हरभऱ्याच्या डाळीचें पीठ ठेवावें.

(४) **ठिकऱ्या व काथ्या**—दुसऱ्या एका डब्यांत विटेच्या ठिकऱ्या व नारळीचा काथ्या, ताडाचा किंवा शिंदीचा मोळ, काथ्याच्या दोरीचे तुकडे, केळीचें सोपटें, हिरवीं पानें वगैरे ठेवलेलीं असावीं. जी घासणी कमी झिजणारी आणि ज्यास्त दिवस टिकणारी असेल ती चांगली.

(५) **दाभण, नोंकदार खिळा व काड्या**--या वस्तु भांडयांतल्या सांदीकोपऱ्यांतून सांचलेली राख, माती, मळ वगैरे काढण्यास लागतात.

हे सगळे जिन्नस पांच चार खण असलेल्या एकाच लांकडी पाळ्यांत ठेवणें अधिक सोयीचें असतें.

या शिवाय भांडीं धुण्यासाठीं एक, भांडीं विसळण्यासाठीं एक, व जरूर असल्यास वरून गोडें पाणी घालण्यासाठीं एक अशा तीन बादल्या (बालद्या) किंवा रुंद तोंडाचीं भांडीं जवळ ठेवावीं. या भांडयांतून पाणी काढण्यासाठीं एक तांब्या किंवा तपेली घ्यावी.

भांडीं घासतांना बसण्यासाठीं एक आणि धुऊन पुसून स्वच्छ केलेलीं लहानसहान भांडीं ठेवण्याला एक असे दोन पाट घ्यावे. धुतलेलीं भांडीं पुसून स्वच्छ करण्यासाठीं एखादा रुमाल किंवा जाड फडकेंही जवळ ठेवावें.

१ **भांडीं घासतांना पुढील गोष्टी ध्यानांत ठेवाव्या**—खरकटीं आणि बिनखरकटीं भांडीं मिसळूं नयेत. तीं वेगवेगळीं ठेवावीं. प्रथम बिनखरकटीं भांडीं घासावीं, नंतर दुसरीं घासावीं.

२ स्वयंपाकाच्या भांडयांत प्रथम आंतबाहेर थोडथोडें पाणी घालून ठेवावें ह्मणजे आंतलें खरकटें व बाहेरचें काळें सुटण्यास मदत होऊन त्यामुळें भांडें घासण्यास सोपें जातें.

३ अगोदर अगदीं लहान, मग त्याहून मोठीं आणि नंतर सर्वांत मोठीं अशा क्रमानें भांडीं घासावीं. एखाद्या भांड्याची विशेष जरूर असेल तर तें अगोदर घासून द्यावें.

४ घासावयाचें भांडें अगोदर पाण्यांत बुडवून अगर ओलें करून मग घासणीनें घासावें. नुसत्या हातानें भांडें लवकर आणि पाहिजे तसें स्वच्छ निघत नाहीं. शिवाय हातानें घासल्यास हात काळे व खरखरीत होऊन थंडीचे दिवसांत ते फुटतात, नखांतून मळ जमतो, आणि तो निघतां निघत नाहीं.

५ नुसत्या हातानेंच भांडें घासणें झालें तर बोटापेक्षां तळहातावर ज्यास्त जोर द्यावा. सगळाच पंजा लावण्याची अवश्यकता असेल तेव्हां तसें करावें.

६ भांडें घासतांना खालीं भुईवर किंवा दगडावर आपटूं देऊं नये.

७ ज्या भांड्याचें तोंड अरुंद असेल, हात आंत जाण्याजोगें नसेल, त्याचा आंतील भाग घासणी चिमट्यांत किंवा सांडशींत धरून तिनें रगडावा.

८ कित्येक भांड्यांचे काठ तीक्ष्ण धारेचे किंवा तुटलेले असतात. अशीं भांडीं जपून घासलीं पाहिजेत. नाहीं तर काठावरून हात फिरवितांना बोटें कापावयाचीं.

९ होतां होईल तों फुटकें भांडें वापरूं नये. आपली जुनी समजूत अशी आहे कीं फुटकें भांडें वापरणें हें दारिद्र्याचें लक्षण आहे. भांडें थोडेंसें फुटतांच तें नीट करून आणावें. फारच फुटल्यास मोडींत देऊन नवें घ्यावें.

१० भांड्यांना फार डाग पडले असले तर प्रथम ते युक्तीनें काढून टाकावे. साधारण डाग अंमळ रगडून घासल्यानें जातात.

११ कांहीं लहनसान बारीकसारीक धातूच्या जिनसा मेटल् पॉलिश नांवाची पूड किंवा चॉक (खडू) यांनीं लवकर स्वच्छ व चकचकीत होतात. ही पूड फार थोडी लावावी, व चिंधीनें खूप घासावें.

१२ भांडीं घासणें झाल्यावर घासलेलीं भांडीं पाण्यानें चांगलीं विसळून व फडक्यानें पुसून पाटावर ठेवावीं.

१३ भांडीं घासण्यासाठीं व विसळण्यासाठीं खारें पाणी घेतलें असेल तर तीं गोडया पाण्यानें चांगलीं धुऊन व पुसून ठेवावीं. नाहीं तर त्यांना काळे पिंवळे डाग पडतात.

१४ भांडीं घासणें व विसळणें या दोन कामांसाठीं दोन निरनिराळीं माणसें असलीं तर हीं दोन्ही कामें लवकर व चांगलीं होतात.

१५ भांडीं घासतांना ओठ चावूं नयेत,तोंड वेडेंवाकडें करूं नये, व राखेचे, मातीचे किंवा पाण्याचे शिंतोडे अंगावर किंवा वस्त्रावर उडवून घेऊं नये.

१६ **खरकटया भांड्यांसंबंधानें विशेष नियम**—खरकट्या भांडयांस अन्न चिकटलें असेल तें आधीं एका भांडयांत काढून घ्यावें व तें पशुपक्ष्यांना चारावें. एक शीत देखील मोरींत जाऊं देऊं नये. कारण, अन्न मोरींत गेल्यास तेथें तें कुजतें, आणि मग त्यामुळें आळया व किडे होऊन घरांतलें चांगलें अन्नपाणी आणि हवा हीं ही दूषित होतात. याशिवाय खावयाचें अन्न अशा रीतीनें मोरींत जाऊं देण्यापेक्षां तें पशुपक्ष्यांच्या तोंडांत पडलें तर हातून थोडा फार परोपकार घडेल. तें अधिक चांगलें नाहीं काय ?

१७ भांडयांस चिकटलेलें खरकटें उलथ्याच्या किंवा पळीच्या दांडयानें खरडून काढावें, बोटांच्या नखांनीं काढूं नये.

१८ भांड्यांचीं जळकीं बुडें—कोणत्याही भांडयाच्या बुडाला काळें जमूं देऊं नये. तसलें भांडें पाण्यांत बुचकळण्याच्या किंवा एखादा पदार्थ शिजत असतां त्यावर झांकण ठेवण्याच्या उपयोगीं अगदीं राहत नाहीं. बुडाला काळें जमूं दिल्यानें भांडें बुडाशीं मजबूत होतें ही समजूत अगदीं चुकीची आहे. भांडयाची झीज कमी करण्याचा खरा उपाय ह्मणजे तें चुलीवर ठेवण्यापूर्वीं त्याच्या बुडाला व गळ्यापर्यंत वर राख किंवा माती ओली करून तिचा थर द्यावा. त्यानें भांडयाचें जळण्यापासून रक्षण होतें आणि तें घासण्याचें काम ही सोपें होतें.

चुलीवर ठेवलेलें भांडें बुडाशीं काळें होण्याचें कारण चुलींत आपण लाकडें जाळतों हें आहे. लाकडाच्या ऐवजीं कोळसे जाळल्यास भांडीं फारशीं जळत नाहींत व तीं घासायास फारशी मेहनत ही लागत नाहीं. लाकडापेक्षां कोळसे थोडेसे महाग पडतात खरे, पण भांड्याची जळ व घासण्याचे श्रम यांचा विचार केला तर एकंदरींत कोळसे वापरणें चांगलें असें वाटतें. कोळशापासून दुसरा फायदा हा आहे कीं स्वैपाकघरांत धूर होण्याची व त्यामुळें डोळे खराब होण्याची भीती नसते. शिवाय लाकडांपेक्षां कोळसे लवकर पेटवितां येतात. कोळसा वापरणें झाल्यास खालीं जाळीचा पत्रा बसविलेली शेगडी सारखी चूल वापरावी; ह्मणजे या जाळींतून खालीं राख पडून जाळीवाटे पेटलेल्या निखाऱ्यांस सारखी हवा मिळत राहील, व लांकडांना फू फू करीत फुंकत रहावें लागतें, तोही त्रास वांचेल.

१९ विशिष्ट धातूंचीं भांडीं—वर सांगितलेले नियम तांब्या-पितळेच्या भांड्यांविषयींचे आहेत. चांदीच्या, जर्मन सिल्व्हरच्या,

किंवा अल्युमिनच्या भांड्यांना हे नियम लावतां यावयाचे नाहींत. अशीं भांडीं बेसन (हरबऱ्याचें पीठ), कोंडा, किंवा राख यांनीं हलक्या हातानें साफ करावीं. तीं फार काळवटलीं असलीं तर लिंबू, चिंच, आंबट ताक किंवा दुसरा कांहीं आम्ल पदार्थ यांनीं साफ करावीं.

चांदीचीं लहानसान भांडीं शामाय लेदर, प्लेट पॉवडर, किंवा प्लेट क्लीनिंग अल्कली हीं द्रव्यें चोळल्यानें स्वच्छ होऊन चकचकीत दिसूं लागतात.

अल्युमिनमचीं भांडीं कांहीं दिवस वापरल्यावर त्यांच्या आंतल्या बाजूस भुऱ्या रंगाचा थर बसल्यासारखा दिसतो. हा थर खरवडून काढण्याचें कारण नाहीं. कारण, तो विकार करणारा नसतो. उलट त्यापासून भांड्यांचें संरक्षण होतें हा फायदाच आहे. अल्युमिनमच्या भांड्यांस तुरटीच्या बारीक भुकटीनें चोळलें असतां चकाकी येते. अल्युमिनमच्या भांड्यांत क्षारयुक्त (मीठ घातलेले) पदार्थ विषारी होतात अशी कित्येकांची समजूत आहे, ती खरी नाहीं. तथापि असे क्षारयुक्त पदार्थ त्या भांड्यांत बराच वेळ ठेविल्यानें त्या भांड्यास भोंकें पडतात, ह्मणून असे पदार्थ त्यांत ठेवूं नयेत.

लोखंडांचीं भांडीं—प्रथम ठिकरीनें चांगलीं रगडून घासावीं. आणि नंतर विटकरीनें किंवा वाळूनें घासल्यास तीं चांगलीं स्वच्छ होतात.

२० ओशट किंवा तेलकट भांडीं प्रथम विस्तवांत घालून भाजून काढावीं, किंवा शेण लावून कढत पाण्यानें धुवावीं आणि मग घासावीं.

२१ कथलाचें किंवा कल्हईचें भांडें विस्तवांत घालूं नये, किंवा फार वेळ विस्तवाच्या आश्रयानें ठेवूं नये. नाहीं तर कथील वितळून भांडें कामांतून जाईल.

जंगलेलें, कळकलेलें किंवा काळें ठिक्कर पडलेलें भांडें असेल त्यास ताक, चिंच, लिंबू किंवा दुसरा कांहीं आंबट पदार्थ लावावा, किंवा मीठ, सोरा किंवा दुसरा एखादा क्षार चोळावा, किंवा ते पदार्थ पाण्यांत विरघळून त्या पाण्यांत तें भांडें कांहीं तास बुडवून ठेवावें, आणि त्याचा काळेपणा किंवा जंग सुटला ह्मणजे घासावें; किंवा निळीचें अथवा एरंडीचें तेल चोपडून ठेवावें आणि कांहीं वेळानें जाड कापडाचा तुकडा, चिंधी किंवा जुना कापूस त्याच तेलांत बुचकळून त्यानें चोळून चोळून सावकाश घासावें. एकवेळ याप्रमाणें करून भांडें साफ झालें नाहीं, तर दोन किंवा तीन वेळां तसेंच पुन: पुन: करावें. भांडें फार जड व मोठें असलें तर नुसत्या विटकरीची पूड किंवा जाड रेती यांनीं घासावें ह्मणजे स्वच्छ निघेल.

२२ लांकडी, दगडी, चिनी व कांचेचीं भांडीं गार पाण्यानें धुवावीं. विशेष ओशट असलीं तर गरम पाण्यानें धुवावीं. जरूर असल्यास बेसनाचें पीठ किंवा राख चोळावीं. आधणाचें पाणी कांचेच्या, चिनी मातीच्या, किंवा हस्तिदंती जिनसेवर ओतूं नये. त्यानें ती तडकेल. चिनी किंवा कांचेच्या भांड्यावरचा डाग किंवा कळकट धुरकट अशा रीतीनें धुऊन निघालें नाहीं तर गुळाचें किंवा चुन्याचें पाणी किंवा लांकडाची राख चोळावी, ह्मणजे भांडें स्वच्छ निघेल.

२३ **देवाच्या मूर्ति**--बाळकृष्ण, गणपति, देवी, गंगा, गाय इ. मूर्ति घरोघर असतात. त्यांस धुतांना राख किंवा माती लावूं नये. लिंबू, चिंच, किंवा कवठाचें पाणी लावून साखरेनें चोळावें किंवा बारीक वस्त्रगाळ रांगोळी किंवा कुंकू चोळून घासावें.

२४ भांडीं घासणें झाल्यावर तीं पुसून जेथील तेथें नेऊन ठेवावीं. भांडीं घासलेली जागा धुऊन साफ करावी. तेथें राखोडी किंवा

केरकचरा राहूं देऊं नये. घासणी धुऊन राखेच्या कुंड्यांत ठेवावी. गवत, पानें वगैरे दुसऱ्या वेळीं पुनः घासण्याच्या उपयोगीं पडण्यासारखीं नसतील तीं उचलून केराच्या हौदींत टाकावी. बाकीचे जिन्नस जागचे जागीं ठेवावे. भांडीं विसळून उरलेलें पाणी फेकून द्यावें. बालद्या व भांडीं स्वच्छ धुऊन जागचे जागीं ठेवावीं. रुमाल, फडकीं वगैरे धुऊन वाळत घालावीं.

२५ भांडीं घासण्याचें काम तळ्यांत, विहिरींत, घाटावर, किंवा डबक्यांत करूं नये. तें स्वैपाकघरांतही करूं नये. बाहेरच्या मोरीवर करावें.

२६ भांडीं घासण्याचें काम संपल्यावर हातपाय स्वच्छ धुवावे. नखांत मळ सांचला असेल तर तो काढावा, अंगावर किंवा वस्त्रावर राख वगैरे उडाली असेल तर ती सगळी झाडून स्वच्छ व्हावें. अंगाचे सगळे भाग ओल्या फडक्यानें पुसावे. कपाळाचा घाम वगैरे पुसावा. भांडीं घासण्यानें हात खरखरीत झाले असतील त्यास थोडें कढविलेलें मेण, किंवा व्हॅसेलीन, अगर तूप, दुधावरची साय वगैरे एखादा ओशट पदार्थ थोडासा चोळावा.

सूचना—घरांतलीं केरपोतेरें, भांडीं घासणें वगैरे कामें करतांना एखादे जुनेरें वस्त्र नेसावें. तें अशा कामाकरितां निराळेंच राखून ठेवावें. याच्या योगानें चांगलें नेसतें वस्त्र खराब होत नाहीं. साहेब लोकांच्या घरांत कामें करतांना बायका झग्यावरून कमरे पासून खालीं पायापावेतों एक फडकें बांधीत असतात. त्याला एप्रन ह्मणतात. ही फडकें बांधण्याची रीत फार चांगली आहे.

प्रकरण ८ वें

धुणें.

१ मनुष्याच्या आरोग्याला वस्त्रें स्वच्छ राखण्याची किती अवश्यकता आहे तें वर्णन करून सांगण्याचें कारण नाहीं. आरोग्यासाठीं माणसानें स्वच्छ वस्त्रें वापरलीं पाहिजेतच. पण त्याशिवाय चारचौघांत आपला अमंगलपणा दिसून लोकांनीं नांवें ठेवूं नयेत आणि आपला तिरस्कार करूं नये ह्मणून ही स्वच्छतेनें व नीटनेटकेपणानें राहणें जरूर आहे.

२ आपण जीं वस्त्रें वापरतों त्यांचे साधारणतः तीन वर्ग करतां येतील. १ फारशीं न धुतां येण्यासारखीं वस्त्रें, २ परटाकडे देण्याचीं वस्त्रें, आणि ३ घरच्या घरीं धुण्यासारखीं वस्त्रें. या तिन्ही वर्गांतल्या वस्त्रांचा आपण आतां क्रमाक्रमानें विचार करूं.

फारशीं धुतां न येणारीं वस्त्रें–यांत भारी किंमतीच्या रेशमी, जरीच्या, व लोंकरीच्या वस्त्रांचा समावेश होतो. यांतलीं कित्येक वस्त्रें अशीं असतात कीं त्यांचा रंग किंवा आब न जाऊं देतां धुणें हें आपणांस घरीं तर साधत नाहींच, पण परटाला सुद्धां तीं चांगलीं धुतां येत नाहींत. अशा वस्त्रांसाठीं युरोपांत ड्राय वॉशिंग (सुकें धुण्याची पद्धति) नांवाची पद्धति निघाली आहे. पण ही पद्धति अद्याप हिंदुस्थानांत मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद, आग्रा वगैरे मोठाल्या शहरांखेरीज इतर ठिकाणच्या लोकांना फारशी ठाऊक झालेली नाहीं. तिचा प्रचार इकडे जारीनें सुरू होईल, तेव्हां लोक आपलीं महावस्त्रें परटाकडे देऊं लागतील, व सोंवळ्यांत वापरण्याचीं वस्त्रें परटाकडे देऊं नयेत असा जो निर्बंध आपल्या समाजांत आहे तो ही थोडासा ढिला होईल.

शाली, लोकरीचे कोट, रेशमी रुमाल, पटके, व रेशमी कोट वगैरे वस्त्रें बरेच दिवस वापरल्यानें मळलीं असतां व त्यांचा रंग बिघडला असतां तीं धुऊन पुन: रंगविण्याची तजवीज मुंबई, पुण्या-सारख्या मोठ्या शहरांतून हल्लींही करतां येते. तेव्हां शक्य असेल त्यांनीं या तजविजीचा फायदा करून घ्यावा.

परटाला देण्याचीं वस्त्रें— जाड, मोठालीं, अवजड, घरीं धुतां न येण्यासारखीं वस्त्रें (उदा०--जाजम, सतरंज्या, सुताडे) हीं परटा-कडेसच धुण्यास दिलीं पाहिजेत. आपले परीट पिढीजाद धुण्याचाच धंदा करीत असल्यामुळें थोडया खर्चांत कपडे चांगले स्वच्छ धुतां येतील अशा देशी मसाल्याची त्यांना माहिती असते. त्यामुळें अशीं वस्त्रें घरीं धुण्यास आपणास जे श्रम पडावयाचे किंवा खर्च लागावयाचा, त्यापेक्षां अल्प श्रमांत व खर्चांत त्यांचेकडून तीं आपणांस धुऊन मिळूं शकतात. तरी आमच्या परटांना युरोपियन परटांपासून शिकण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. पाश्चात्य लोकांनीं प्रत्येक गोष्टीचें शास्त्र केलें आहे, तसें कपडे धुण्याच्या कलेलाही त्यांनीं शास्त्राच्या योग्यतेला चढविलें आहे. या शास्त्रावर पुस्तकें आहेत, व शेंकडों प्रकारचे साबण, क्षार, व इतर शुद्धिकारक द्रव्यें शोधून त्यांचा उपयोग केव्हां व कसा करावा तें शिकविण्याचें आणि धुण्याच्या यंत्रांची माहिती करून देण्याचें काम तिकडे त्या धंद्याच्या शाळांतून व खाजगी वर्गांतून जोरानें चाललें आहे. तिकडे वस्त्रें धुण्याचे वाफेच्या साह्यानें चाललेले शेंकडो कारखाने शहरोशहरीं आहेत. यांना लॉंड्री ह्मणतात. या कारखान्यांत कपडे भिजवून व कोरडे दोन्ही पद्धतींनीं धुण्याचें व रंगविण्याचें काम करतात. धुणें व रंगविणें हीं एकाच धंद्याचीं दोन अंगें ते मानतात. यामुळें तिकडे

रंगाऱ्यांचा वेगळा वर्ग नाहीं. आमच्या इकडे ही या पद्धतीवर कांहीं शहरांतून लहान प्रमाणावर असे कारखाने निघत आहेत ही संतोषाची गोष्ट आहे.

कित्येक श्रीमान् लोक परटास चाकरीस ठेवून आपले सगळेच कपडे त्याच्याकडून धुववितात; पण सोंवळयाओंवळयाचा आणि स्पर्शास्पर्शाचा निर्बंध मानणारे जुन्या चालीचे लोक ही रीत पसंत करीत नाहींत.[1] सामान्य स्थितींतल्या माणसांना तर सगळे कपडे परटाकडे धुण्यास देऊन चालत नाहीं. पुष्कळसे कपडे घरचे घरींच धुऊन कांहीं निवडक कपडेच परटाकडे देणें खर्चाच्या दृष्टीनें त्यांना सोयीचें असतें. शिवाय मध्यम किंवा गरीब स्थितींतल्या माणसांजवळ कपडे बेताचेच असल्यामुळें ते ज्यास्त दिवस परटाकडे राहूं देणें ही त्यांना फार गैरसोयीचें होतें. या शिवाय आणखी एक मोठी अडचण त्यांच्या मार्गांत असते. ती ही कीं आपले धोबी कपडे धुतांना ते भट्टींत घालतात व जोरानें आपटतात. त्यामुळें अग्नीच्या संसर्गानें जळून व आपटण्यानें त्या कपडयांचा अर्धा जीव होतो. कपडे लवकर जीर्ण होतात, व शिवलेल्या जागीं उसवतात. अशा अनेक कारणांमुळें मध्यम व गरीब स्थितींतल्या लोकांनीं होतां होईल तों कपडे घरींच धुवावे व जरूरीपुरते कपडे परटाकडे धुण्यास द्यावे हें सर्व दृष्टींनीं चांगलें आहे.

---

१ जुन्या आचाराचा निर्बंध असा आहे कीं परटानें धुतलेले वस्त्रावर स्नानसंध्या, देवपूजा वगैरे करूं नये. वस्त्राची पवित्रता राहावी हा या निर्बंधाचा मूळ उद्देश आहे. परटाकडे अनेक घरचे अनेक प्रकारें दूषित झालेले कपडे धुण्यास येतात. तेव्हां त्यांच्या संसर्गानें अपवित्र झालेलीं वस्त्रें वापरणें अपवित्रच नव्हे तर रोगोत्पादकही असतें ही गोष्ट कोणीही नाकबूल करणार नाहीं.

घरीं धुतां येण्यासारखीं वस्त्रें–रोजचीं नेसण्यापांघरण्याचीं आणि अंगांत घालण्याचीं बहुतेक सर्व वस्त्रें घरीं धुतां येण्यासारखीं आहेत. उदा०--पुरुषांचीं धोतरें, मुकटे, पंचे, उपरणीं, सदरे, पायमोजे, हातरुमाल इ.; बायकांचीं लुगडीं, पातळें, चोळ्या, छिटें, चौघडया, पोलकीं वगैरे; मुलांचीं आंगडीं टोपडीं, बाळंतीं, परकर, लंगोट्या इ०; यांशिवाय अंथरुणांतल्या चादरी, उशीच्या खोळी, किरकोळ फडकीं वगैरे वस्त्रें पुष्कळ सांगतां येतील.

३ घरीं वस्त्रें धुण्याच्या संबंधांत पुढील गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत--(१) रोजचें घरीं धुण्याचें काम बेताचें व आटोपशीर असलें पाहिजे. तें अवश्यकतेपेक्षां अधिक वाढविणें योग्य नाहीं. रोज नेसण्याचीं किंवा अंगांत घातल्यानें घामानें खराब होणारीं वस्त्रें रोजचे रोज धुतलीं पाहिजेत. पण कधींकाळीं लागणारीं वस्त्रें कधींकाळींच धुवावीं. तीं रोज धुण्याचें कारण नाहीं. धुणें पुष्कळ वाढविल्यानें एक तर त्यांत वेळ फार मोडेल आणि धुण्याचें—मळ काढण्याचें–काम व्हावें तसें चांगलें होणार नाहीं. कित्येकांना धुण्याचा सोस फार असतो. यामुळें व कित्येक सोंवळ्या–ओंवळ्याचें स्तोम फार वाढवितात यामुळें धुणें वाढतें. दोन्ही गोष्टी मर्यादेंत ठेवणें फार जरूर आहे.

(२) स्पर्शास्पर्शाच्या विचारासंबंधानेंही थोडेंसें विचारपूर्वक वर्तन ठेविल्यावांचून चालत नाहीं. विटाळशीचा विटाळ, सुतक्याचा विटाळ, अस्पृश्य वस्तूचा स्पर्श वगैरे होण्याचे प्रसंग जितके कमी आणतां येतील तितकें चांगलें. पण लहान मुलांना कळत नसल्यानें तीं विटाळशीच्या कपड्याला शिवतात, किंवा तिच्या तांब्याला हात लावतात, आणि मग त्या मुलाच्या अंगांतले सगळे कपडे विटाळले

असें समजून ते धुवावे लागतात. अशा ठिकाणीं स्पर्शास्पर्शाचा विशेषसा विधिनिषेध मानूं नये हें इष्ट आहे. आपल्या जुन्या समजुतीप्रमाणें सुद्धां जितकी लागालाग ज्यास्त होईल, तितका विटाळ कमी समजतात. बाजारांत तर हा दोष मुळींच मानीत नाहींत. फार झालें तर असा स्पर्शास्पर्शदोष घालविण्यासाठीं विटाळलेल्या कपड्यावर गोमूत्र शिंपडण्याचा प्रकार सांगितला आहे. तो जुन्या चालींच्या लोकांच्या समजुतीखातर पाहिजे तर करावा. परटानें धुऊन आणून दिलेल्या कपड्यांवर पाण्याचे चार थेंब शिंपडून मग त्यांना हात लावावयाचा अशी जुनी चाल होती, पण आतां ही चाल बहुतेक मोडल्यासारखीच आहे.

(३) सोवळें वस्त्र ओवळें झालें असतां तें धुतल्याशिवाय पुनः सोवळ्याच्या कामीं येत नाहीं. सोवळ्याचें ओवळें होण्याचे मुख्य प्रकार ह्मणजे कटिमुक्त होणें (नेसलेलें वस्त्र सोडणें), पर्युषित (वस्त्र नेसल्यापासून त्यावरच तीन अहोरात्रें उलटून जाणें,) ओवळ्याचा संसर्ग होणें, नेसलेल्या सुती वस्त्रावर जेवण होणें, शौचास जाऊन येणें, उष्टयाचा संसर्ग घडणें वगैरे. यांतले पुष्कळसे प्रकार व्यवस्थित राहणीनें टाळतां येण्यासारखे आहेत. तेव्हां तसें राहून धुण्याचें काम सहज कमी करतां येईल.

(४) घरीं धुण्याचें काम जसें कित्येक लोक निरर्थक वाढवितात, तसें कित्येक लोक तें निरर्थक कमीही करतात. तसें करणें ही चांगलें नाहीं. जैनधर्मी श्रावक लोक मळीण कपड्यांत बसणाऱ्या जीवांचा नाश होऊं नये ह्मणून वस्त्रें धुण्याचा संकोच करतात. फार काय, पण त्यांच्यांतले जे अत्यंत धर्मनिष्ठ ह्मणविणारे असतात ते याच कारणासाठीं वर्षानुवर्षें स्नान सुद्धां करीत नाहींत! धर्माच्या

नांवाखालीं हा खरोखर अधर्म घडत आहे असें ह्मणावें लागतें. आपल्या हिंदुधर्मांतही सोंवळ्याचा अतिरेक करणारांच्या हातून गैर-समजुतीनें अशा प्रकारच्या कित्येक विचित्र गोष्टी घडतात. कांहीं फार सोवळ्या बायका जळाऊ लांकडें आणि बाजारचे मीठ सुद्धां धुऊन घेतात असें ह्मणतात! याच्या उलट खाणावळींतला प्रकार पहा! स्वच्छ धुतलेलें धोतर नेसून जेवावयास बसलेला मनुष्य भ्रष्ट समजतात, आणि महिनामहिना ज्याला पाण्याचा स्पर्श झालेला नाहीं व ज्यावर घामाची मेणचट पुटें चढून घाण येत असते असा मुकटा नेसून जेवण्यास बसलेले मोठे धर्मनिष्ठ गणिले जातात! अशा घाणेरड्या लोकांची वेगळी पंगत करून स्वच्छ धुतलेलें वस्त्र नेसून बसणाऱ्या लोकांना त्यांचा अमंगल स्पर्श न होऊं देण्याची जी खबरदारी ठेवण्यांत येते ती एका दृष्टीनें फार स्तुत्य आहे यांत शंका नाहीं.

(५) कित्येकांच्या मनालाच मलिनपणा व गलिच्छपणा यांचें कांहीं वाटत नाहीं. स्वच्छतेनें कां राहिलें पाहिजे, याची त्यांना कल्पनाच नसते. अंगावर कपडा पाहिजे, मग तो कसा कां असेना? ही त्यांची समजूत. लहानपणीं स्वच्छतेचें महत्व त्यांच्या मनावर कोणीं बिंबविलें नसतें व स्वच्छतेनें राहण्याच्या संवयी त्यांना लागलेल्या नसतात, त्याचा हा परिणाम असतो. ह्मणून ते धुण्याचें काम करवेल तितकें कमी करतात.

(६) कित्येकांना स्वच्छता पाहिजे असते, पण धुण्याला लागणारीं साधनें ह्मणजे विपुल व स्वच्छ पाणी, धुण्यासाठीं प्रशस्त मोरी व दगडी चौरंग, किंवा नदीचा घाट पुरेसा वेळ, आणि अंगांत शक्ति यांची अनुकूलता नसते. अशांनीं जी अनुकूलता असेल तिच्यांतच शक्य तेवढी स्वच्छता ठेवण्यास झटलें पाहिजे. स्वच्छता ठेवणें

हें एक महत्त्वाचें व हिताचें कर्तव्य आहे अशी समजूत मनांत पक्की बाणल्यावर शक्य असेल तेवढें तरी करा असें निराळें सांगावें लागत नाहीं.

(७) कोणतेंही वस्त्र धुण्यास घेण्यापूर्वी तें कोठें फाटलें तुटलें असेल तर तें अगोदर शिवून नीट करून घ्यावें. नाहीं तर धुतांना तें ज्यास्तच फाटत जावयाचें. वस्त्रावर तेलाचे, शाईचे किंवा दुसरे कशाचे डाग पडले असले तर ते डाग अगोदर साबणानें वगैरे काढून मग तें वस्त्र धुवावें. नाहीं तर त्याच्या संसर्गानें दुसऱ्या वस्त्रांनाही डाग पडण्याचा संभव असतो.

(८) वस्त्रावरचे डाग काढण्याचें काम सोपें नाहीं. त्याला रासायनिक द्रव्यांची चांगली माहिती लागते. निरनिराळ्या पदार्थांचे डाग निरनिराळ्या रासायनिक द्रव्यांनीं निघतात. डाग काढण्याची साधारण पद्धत अशी आहे कीं वस्त्र रंगीत व पाण्याच्या स्पर्शानें बिघडण्यासारखें असेल तर डाग पडलेल्या भागाखालीं एखादा कापडाचा तुकडा धरून डागावर बेंझोल[1]चा बोळा तो भाग चांगला भिजेल इतका फिरवावा. सायनाइड ऑफ पोट्याशचें पाणी करून तें ब्रशानें जरीच्या कपड्यावर फिरविल्यास जर साफ आणि नव्यासारखा चकचकीत दिसूं लागतो. सिल्व्हर नायट्रेट सारखे न निघणारे डागही या द्रव्यानें निघतात. पण हें द्रव्य घरीं ठेवणें सुरक्षितपणाचें नाहीं. एखादे वेळीं मुलानें चुकून तें औषध ह्मणून घेतल्यास तें खात्रीनें दगावेल. ह्मणून हें औषध घरांत आणून ठेवूं नये.

---

१ बेंझोल किंवा बेंझीन हें एक खनिज द्रव्य आहे. पाणी न लावतां सुकें धुण्याचे कामीं याचा फारच चांगला उपयोग होतो.

जें वस्त्र पाण्यानें धुण्यासारखें असतें त्यावरचे डाग काढणें बरेंच सोपें जातें. तरी त्यांत वस्त्राचें सूतपोत पाहून व डागाच्या द्रव्याचे गुणधर्म ओळखून योग्य उपायाची योजना केली पाहिजे. सामान्यतः डाग किंवा मळ काढणाऱ्या द्रव्यांत तेल, क्षार, व आम्ल हीं तीन बहुधा असतात. जसें--हरभऱ्याचें किंवा तुरीच्या डाळीचें पीठ, सज्जी-खार, वॉशिंगसोडा, पोट्याश, खारी माती, मीठ, टर्पेंटाईन[1] वगैरे.

(९) वस्त्रें धुण्यास साधारणपणें पुढील सामान लागतें. यापैकीं ज्या धुण्यास ज्याची अवश्यकता असेल तें त्या वेळीं घ्यावें:—

पाणी--हें गोड व निर्मळ असावें. साधारण खारें किंवा मचूळ पाणीही चालतें. ज्यांत लोह, क्षार, चुना किंवा खडूचा अंश पुष्कळ असेल तें किंवा गढूळ झालेलें पाणी वस्त्र धुण्यास चांगलें नाहीं. पाण्यांत दोन गुण असतात. १ वस्त्र निर्मळ करण्याचा व २ त्याला आब ह्मणजे तजेला देण्याचा. कांहीं ठिकाणच्या पाण्यांत हे दोन गुण विशेष प्रमाणानें असतात. सुती कपडे धुण्याला दक्षिणेंत कृष्णानदीचें व पूर्वेस महानदीचें पाणी उत्तम समजतात. लोकर धुण्याला काश्मीरांतील श्रीनगराखालीं झेलम नदीचें पाणी सर्वोत्कृष्ट समजलें जातें. पांढरें सुती वस्त्र ऊन पाण्यांत रोज धुतल्यानें त्याला लवकरच मोतिया रंग चढतो. कित्येकांना अशा मोतिया रंगाच्या धोतरांची विशेष आवड असते. ऊन पाण्यानें भिजून कांहीं वेळ धोतर तसेंच त्या पाण्यांत पडून राहणें मोतिया रंग चढण्यास पुरें होतें.

---

१ टर्पेंटाइन हें पाइन जातीच्या वृक्षापासून वाफेच्या साह्यानें काढतात. हें तेल अमेरिका आणि रशिया या देशांत विपुल होत असून तेथून साऱ्या जगाला त्याचा पुरवठा होतो. दोन्ही देशांचे तेलांचे गुणधर्म सारखेच आहेत. रशियन तेलाला वास मात्र अधिक असतो, व तो वस्त्राला तेल लाविल्यावर बरेच दिवस जात नाहीं. यासाठीं अमेरिकेंतलें टर्पेंटाईन वापरणें चांगलें.

धुण्याचा दगड—धुण्याचा दगड हा थोडा उंच पाहिजे. तसा तो नसला तर वस्त्र आपटण्याचें काम पायावरच करावें लागतें. त्यानें धुण्याचें काम व्हावें तसें होत नाहीं व अंगावर शिंतोडेही उडतात. हा दगड अगदीं गुळगुळीत उपयोगीं नाहीं. थोडासा खरखरीत असलेला चांगला.

भांडीं—तांब्याचीं किंवा पितळेचीं घंगाळें खालीं बूड बसविलेलीं असावीं. रुंद तोंडाच्या पातेल्याला हरकत नाहीं, पण त्याला खालीं बूड नसल्यामुळें तीं लवकर झिजतात. बादल्यांच्या कड्यांचे जागीं वस्त्र अडकून फाटण्याची फार भीति असते. बादल्या घेतांना याबद्दल फार सावधगिरी ठेविली पाहिजे. धुतांना जवळ दोन भांडीं असावीं. एक धुण्याला व दुसरें खळबळण्याला.

वस्त्र निर्मळ करणारीं द्रव्यें—ह्मणजे रिठे, साबण, वॉशिंग-सोडा वगैरे. रिठे हीं एका झाडाचीं लहान बोराएवढीं फळें असतात. यांच्यावरची साल पाण्यांत चोळली ह्मणजे त्यापासून फेस निघतो. हा फेस वस्त्रांना लावावा. साबण अंगाला लावण्याचा वेगळा व धुण्याचा वेगळा असतो. धुण्याचा साबण सज्जीखार, चुना, खड्ड, किंवा खारी माती आणि कसलें तरी तेल यांचा करतात. खोबरेल तेलाचा साबण सर्वांत चांगला. विलायती साबणांत तेलाच्या ऐवजीं बहुधा चरबी घातलेली असते. चरबीच्या अंगीं फेस जास्त आणण्याचा धर्म असतो. उत्तम साबणाचें लक्षण हें आहे कीं तो आर्द्र व तुकतुकीत असावा. रुक्ष व सुकट साबू वाईट. साबू हातावर चोळल्यावर फेस सहज व पुष्कळ निघाला पाहिजे. बारसोप नांवाचा कपडे धुण्याचा साबू मिळतो. हा साबण इकडेही होतो. विलायती साबणांत कपडे धुण्यास सनलाइट सोप सारखा चांगला दुसरा

साबण नाहीं. हा साबण आदले दिवशीं रात्रीं ओल्या कपड्यांना थोडासा लावून त्या कपडयांची गुंडाळी करून ठेवावी, व दुसरे दिवशीं ते कपडे धुवावे ह्मणजे थोडया श्रमांत ते फार स्वच्छ निघतात.

(१०) घरगुती धुण्यांत वस्त्रें भिजाविणें, घासणें, पिळा करणें, खळबळणें, आपटणें, पुनः खळबळणें, पिळणें, झटकणें आणि घडी घालणें इतक्या गोष्टी येतात. वस्त्राच्या मळकटपणाप्रमाणें यांतल्या कित्येक गोष्टी पुनः पुनः कराव्या लागतात. या प्रत्येक गोष्टीसंबंधानें पुष्कळ सांगतां येईल. पण विस्तार होईल ह्मणून व हीं कामें संवयीनें आपोआप चांगलीं करतां येतात ह्मणून त्यांसंबंधानें ज्यास्त लिहीत नाहीं. येथें येवढें मात्र सांगून ठेवणें अवश्य दिसतें कीं वस्त्र दगडावर आपटल्यानें तें स्वच्छ निघण्यास विशेषशी मदत होते ही समजूत चुकीची आहे. ओला कपडा पाण्यांत पुष्कळवेळां चांगला खळबळल्यानें व पाणी वरचेवर बदलल्यानें अधिक स्वच्छ निघतो.

(११) कांहीं वस्त्रें कांहीं विशेष प्रकारानेंच धुवावीं लागतात. कोरें वस्त्र जाड व मळिण असेल तर प्रथम परटाकडून धुऊन आणावें. लुगडीं मात्र परटाकडेस देण्याची चाल नाहीं. लुगडीं परटानें धुतल्यास त्या लुगडयांचा रंग व काठ बिघडून वाईट दिसूं लागतात. कोरें वस्त्र घरीं धुवावयाचें तर तें थंड पाण्यांत चिंब भिजवून कांहीं वेळ तसेंच ठेवावें, ह्मणजे त्यास खळ असली तर ती सुटून मोकळी

१ कापडाचें पोत सारखें भरलेलें, टणक व तुकतुकीत दिसावें ह्मणून वस्त्र विणून तयार झाल्यावर त्याला खळ ह्मणजे शिजविलेलें पातळ पीठ लावण्याची चाल आहे. ही खळ कित्येक धान्यांच्या पिठाची, कंदमुळांच्या सत्त्वाची, बियांची किंवा प्राण्याच्या अंडयांतल्या बलकाची केलेली असते. परीट लोक कपडे धुतल्यावर व रंगारी लोक कपडे रंगविल्यावर ते ताठ राहावे व तजेलेदार दिसावे ह्मणून त्यांस खळ लावतात. तिला कलफ ह्मणतात.

होते, आणि तें वस्त्र बारीक विरळ असलें तर त्याचें सूत फुगून तें सारखें भरतें. इतकें झाल्यावर मग तें वरचेवर पाणी बदलून दोन चार वेळां धुवावें ह्मणजे झालें. वस्त्र जर फार अवजड असेल तर त्यास धुतांना लाकडानें बडवितात. पण या बडविण्यापासून तादृश फायदा नाहीं. त्यापेक्षां असा कपडा पायाखालीं खूब तुडवावा. वरचेवर पाण्यांत घालून वरचेवर तुडविल्यानें त्यांतला मळ पाण्यांत उतरतो.

पोलकीं, बनियानी, अंगडीं टोपडीं वगैरे उन्हाळ्यांत व हिंवाळ्यांत कोंबट पाण्यांत बुचकळून दगडावर पसरावीं आणि त्यांस थोडासा साबण लावून व पिळे करून तीं एकावर एक दाबून ठेवावीं. कांहीं वेळानें तीं धुतलीं ह्मणजे स्वच्छ निघतात. शिवलेले कपडे दगडावर कधीं मोठ्यानें आपटूं नयेत.

कापसाचीं किंवा तागाचीं फार मळकीं किंवा ओशट वस्त्रें थोडा सज्जीखार, रिठे किंवा साबण विरघळलेल्या व कडकडीत तापलेल्या पाण्यांत घालून कांहीं वेळ शिजत ठेवावीं. भांड्यावर झांकण ठेवावें. मधून मधून तीं वस्त्रें एका काठीनें वर खालीं करावीं. जो भाग अधिक डागलेला असेल तो वर करून हातांनीं चोळून टाकावा. नंतर तीं वस्त्रें बाहेर काढून थंड पाण्यानें धुवावीं. जरूर पडल्यास ही क्रिया दोन तीन वेळां करावी.

रेशमी व लोकरीचीं रंगीत वस्त्रें घरीं धुण्याच्या भानगडींत पडूं नये. वाफेनें धुण्याचा कारखाना जवळपास असल्यास त्याकडे द्यावीं. रंगीत नसतील अशीं वस्त्रें घरीं धुण्यास हरकत नाहीं. मात्र तीं चुलीवर कढवूं नयेत; आणि दगडावर आपटूं नयेत. अशीं वस्त्रें घंगाळांत रिठे, साबू किंवा सोडा विरघळून किंवा लिंबाचा रस पिळून त्यांत

कांहीं वेळ बुचकळून ठेविलीं तर त्यांचा बराच मळ निघून जातो. नंतर तीं थंड पाण्यांत नुसतीं हातांनीं चोळून स्वच्छ करावीं. लोकरीचीं वस्त्रें कधींही जोरानें पिळूं नयेत. त्यांतलें पाणी काढणें तर तीं एका पाटावर ठेवून त्यांवर दुसरा पाट घालून वर उभे राहावें किंवा जड वजन घालावें ह्मणजे वस्त्रांतलें पाणी निघून जाईल.

(१२) धुण्याची जागा आड किंवा विहीर यांच्या तोंडाशीं असेल तर वस्त्रें धुतांना पाण्याचे शिंतोडे किंवा धुण्याचें पाणी त्या आडांत किंवा विहिरींत न जाईल अशी खबरदारी घ्यावी. धुण्याचें पाणी विहिरींत न जातां लांब वाहून जाईल असा त्या पाण्याचा पाट काढून द्यावा.

(१३) ज्या घाटावर किंवा तळ्यावर वाटेल त्या लोकांनीं जाण्यायेण्याचा किंवा बायकापुरुषांनीं जमण्याचा कांहीं निर्बंध नसेल, ज्याच्या शेजारीं बाजार, किंवा चवाठ्याची जागा असेल आणि सर्व तऱ्हेचे लोक जमत असतील, किंवा याच्या उलट जी जागा अगदीं एकीकडे व वस्ती पासून दूर असेल, अशा ठिकाणीं एकटें धुण्यास जाऊं नये.

(१४) धुण्याचें काम होतां होईल तों स्नानाचे पूर्वी उरकून घ्यावें. धुण्याकरितां थंडीचे वेळीं पाण्यांत फार वेळ वावरणें अपायकारक आहे हेंही त्याबरोबर लक्षांत ठेवावें. हिंवाळ्यांत हें काम उन्हाचे वेळीं करावें. पण जेवण झाल्यानंतर लागलीच करूं नये. तिसरे प्रहरीं करावें.

(१५) धुण्याचीं वस्त्रें पुष्कळ असतील तर तीं धुण्याचे आधीं व नंतर मोजून बरोबर आहेतना हें पाहावें.

(१६) धुतांना तोंड उघडें ठेवूं नये. ओठ मिटून घ्यावे.

(१७) धुतांना स्वतःच्या व दुसऱ्याच्या अंगावर शिंतोडे उडूं देऊं नयेत.

४ धुण्याच्या कामा नंतर वस्त्रें वाळत घालण्याचें एक काम असतें. हें करतांना कांहीं गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत. त्या ह्या—धोतरें, उपरणीं, व रुमाल, तसेंच लुगडीं व चोळ्या ज्याचीं त्याची जोडीनें दांड्यांवरून किंवा दोऱ्यांवरून वाळत घालावीं. एकीकडे धोतर आणि लांब अंतरावर त्याचें उपरणें किंवा एका ठिकाणीं एकीचे लुगडें आणि तेथून बरेंच दूर तिची चोळी असें घालूं नये. दांडीवर, दोरीवर किंवा खुंटीवर वाळत घालण्यापूर्वी त्यावरचा मळ किंवा धुराळा चांगला हलवून किंवा पुसून काढावा.

धूर लागेल किंवा धुराळा उडेल अशा जागीं वस्त्रें वाळत घालूं नयेत. धुरानें कपड्यावर पिंवळा रंग चढतो, आणि कडू वास येतो. ऊन किंवा वारें लागेल अशा जागीं वस्त्रें वाळत घालावीं.

वस्त्रें इतक्या उंचीवर वाळत घालावीं कीं कोणीं माणसानें हात सहज वर केला असतां तो हात वस्त्रांना लागूं नये. नाहीं तर सोवळ्यांतलीं वस्त्रें ओवळीं होऊन पुनः तीं धुण्याची पाळी यावयाची.

गच्चीवर वाळण्यासाठीं वस्त्रें आंथरलीं तर वाऱ्यानें तीं उडून जाऊं नयेत ह्मणून त्यांवर दडपणें ठेवावीं. गच्चीच्या वरवंडीवर घातलीं तर वाऱ्यानें उडून खालीं पडणार नाहींत, पडलींच तर निदान आंत गच्चीवर तरी पडतील, अशा बेतानें घालावीं. ह्मणजे त्यांचा अर्धा अधिक भाग गच्चीकडे असावा, व कमी भाग बाहेर सोडावा. वरवंडीवर किंवा सज्ज्यांत वस्त्रें वाळत घालावयाचीं तीं अशीं घालावीं कीं खालून जाणारा येणाराला तीं सहज ओढून घेतां येऊं नयेत.

रंगीत वस्त्रें फार कडक उन्हांत वाळत घालूं नयेत. त्यानें त्यांचा रंग फिका पडतो. वस्त्र लवकर वाळावें ह्मणून केव्हां केव्हां तें विस्तवावर धरतात. असें करण्यानें तें हडकतें, पण सुकें वाळत नाहीं. शिवाय अशानें वस्त्र धुरकटण्याचा व एखादे वेळीं ठिणगी उडून जळण्याचाही संभव असतो. हिंवाळ्यांत व पावसाळ्यांत लहान मुलांचे कपडे लवकर वाळत नाहींत, तेव्हां ते विस्तवावर वाळविण्याचा प्रसंग येतो. अशावेळीं एक युक्ति करतात. ती अशी कीं ज्यांतून धूर निघत नाहीं आणि ठिणग्या वगैरे उडत नाहींत अशा कोळशांच्या विस्तवावर एखादा बांबूचा गोल व उंच घुमटासारखा हारा घालून त्यावर कपडे पसरून ठेवतात. ह्मणजे ते आंतील उष्णतेनें लवकर वाळतात.

नदीच्याकांठीं वाळवंटांत वगैरे वस्त्रें वाळत घालण्याचें काम पडलें तर जनावरें किंवा माणसें वर पाय देऊन जाणार नाहींत अशा व स्वच्छ जागीं घालावीं, आणि त्यांवर नजर ठेवावीं. नाहींतर भामटे तीं उचलून नेतील. कांटेरी झाडांवर वस्त्रें वाळत घालूं नयेत. काढतांना वस्त्रें फाटण्याची फार भीति असते.

प्रकरण ९ वें.

पाणी.

१ पाणी हें मनुष्याच्या जीवनाला अवश्य आहे. त्यावांचून त्याचें एक दिवसही चालावयाचें नाहीं. ह्मणून मनुष्यांची वस्ती नेहमीं पाण्याच्या आश्रयानें होते. जेथें सृष्टिनिर्मित जलाशयें नसतात तेथें मनुष्यप्राणी स्वतःच्या बुद्धीनें तलाव, विहिरी, कालवे, यांसारखीं जलप्राप्तीचीं साधनें निर्माण करून राहतो. सृष्टिनिर्मित किंवा मनुष्य-

निर्मित जलप्राप्तीचीं साधनें असलीं तरी त्या जलाशयापासून घरापर्यंत पाणी वाहून आणावें लागतें. हीही अडचण नळासारख्या उपायानें मनुष्यानें दूर केली आहे.

२ नद्या, तळीं, विहिरी, वगैरे जलाशयापासून घरांत पाणी आणण्याचें काम स्त्री व पुरुष दोघांनाही करावें लागतें. पण दोघांचे प्रकार वेगवेगळे आहेत. पुरुषांनीं पाण्याचें भांडें खांद्यावर किंवा हातांत धरून नेण्याचें पतकरलें. पुढें कावडीनें पाणी आणण्याची युक्ति निघाली. कांहीं लोक जनावराचे पाठीवरून पाणी नेऊं लागले व पुढें याकामासाठीं बैलगाड्या, हातगाड्या वगैरेंचा उपयोग लोक करूं लागले. बायकांना खांद्यावरून पाणी वाहून नेणें आवडलें नसावें. पुरुषांचे खांदे बहुधा रुंद असतात व छातींत शक्तिही ज्यास्त असते, त्यामुळें पुरुषांनीं खांद्यावर घागर घेणें किंवा हातांच्या स्नायूंत अधिक शक्ति असल्यामुळें हातानें लोंबकळत धरून नेणें पतकरलें तें ठीकच आहे. स्त्रियांच्या शरीराचा रुंद व मजबूत भाग खांदा व छाती नसून कमर किंवा तिच्या खालचा भाग हा असतो, त्यामुळें त्यांना कमरेवर घागर घेणें अधिक सोयीचें वाटतें, असें आपल्या महाराष्ट्रीय स्त्रियांच्या उदाहरणांवरून दिसतें. पण सर्व स्त्रियांसंबंधानें हा सामान्य नियम ह्मणून मात्र सांगतां येणार नाहीं. कारण माळवी आणि गुजराथी बायका डोक्यावरून पाणी आणितात. स्त्रियांच्या आचारांत देशपरत्वें हा जो फरक झाला, त्यामुळें त्यांच्या वेणी घालण्याच्या पद्धतींत, शिरोभूषणांत, आणि चालण्याच्या ढबींतही बराच फरक पडला आहे. तो सोडून शारीरिक सुखदुःखांचा आणि सोयीगैरसोयींचा विचार केला तर असें दिसून येतें कीं महाराष्ट्रीय स्त्रियांच्या पद्धतींत गुण अधिक व दोष कमी आहेत. माळवी आणि गुजराथी स्त्रियांच्या

पद्धतींत ह्मणजे डोक्यावर पाणी आणण्यांत दोन्ही हात मोकळे राहतात, अंगाच्या एकाच भागावर ओझें पडत नाहीं व चाल सरळ राहते, हे गुण आहेत. पण सतत डोक्यावर पाणी वाहण्यानें मेंदूला विकार घडण्याचा संभव आहे. भारवाहक स्त्रियांची संतति मतिमंद निपजण्याची भीति असते. शिवाय डोक्यावरच्या भांड्यांना धक्का लागून पडण्याचा संभव असतो. कमरेवरच्या घागरीचें तसें नाहीं. महाराष्ट्रीयांच्या पद्धतींत भांडें स्त्रियांच्या पूर्ण स्वाधीन राहतें. कमरेवर घागर घेण्यांत एकमोठा दोष हा आहे कीं घागरींतलें पाणी हिसळून त्यामुळें नेसलेलें लुगडें भिजतें, आणि असें सतत होत गेलें तर त्यापासून शैत्याची बाधा होण्याचा संभव आहे. पण घागर अगदीं तोंडापर्यंत न भरतां गळ्यापर्यंत भरली तर हा दोष टाळतां येण्यासारखा आहे.

३ पाणी भरण्याच्या कामांत तीन पोटकामें सामिल आहेत १ पाणी भरणें, २ तें वाहून आणणें, आणि ३ तें साठवणें. पाणी भरण्याचे प्रकार दोन. एक प्रत्यक्ष हातानें भरणें आणि दुसरें तें ओढून घेणें. पाणी नळाचें भरणें असेल किंवा जलाशयाच्या पाण्याची सपाटी जमिनीबरोबर किंवा उंच असेल आणि हातानें पाणी सहज घेतां येईल तेथें हातानें तें घेणें सोईचें असतें. पण पाण्याला पोंचण्याला पायऱ्या उतरून जावें लागेल आणि त्या पायऱ्या अरुंद किंवा इतर रीतीनें धोक्याच्या असतील तेथें हातानें पाणी भरण्यास न जातां दोरीनें तें ओढून घेणें चांगलें.

४ **पाणी ओढणें**—पाण्याची सपाटी जमिनीपासून ३० फुटांपर्यंत खोल असेल तोंपर्यंत पाणी ओढणें येवढें कष्टाचें होत नाहीं. ३० पासून ४० पर्यंत पाणी ओढणें श्रमसाध्य, ४० पासून ६० फुटांपर्यंत कष्टसाध्य व त्यापुढें बायकांना तें अशक्य होतें.

पाणी ओढण्याला दोरी लागते. पाणी काढण्याला योग्य दोरी ह्मणजे सण, अंबाडी, नारळीचा काथ्या, किंवा कापसाचें जाड सूत यांची होय. कापसाच्या सुताची दोरी महाग पडते व तितकी मजबूतही नसते. लहानसान गडव्यानें पाणी काढण्याला ती चांगली. अंबाडीची, नारळाची किंवा सणाची दोरी प्रापंचिकांना चांगली. अंबाडीची दोरी दोन चार महिन्यांत कुजून तुटते. नारळाची दोरी पाण्यांत भिजल्यानें मजबूत होते, पण फार खोल पाण्याला ती उपयोगीं नाहीं. सणाची दोरी मात्र केव्हांही सारखीच उपयोगीं पडते. ती बेताबातानें वापरली, आणि जपून वागविली तर टिकतेहीं पुष्कळ.

दोरी पाण्याच्या अंतरापेक्षां तीन चार हात तरी अधिक असली पाहिजे. कारण, केव्हां केव्हां पाणी फार खोल जातें. शिवाय फांसांत दोरी बरीच तुटते, व वरचेवर नवा फांसा करण्यांत ती खर्च होते.

रहाट किंवा फिरकी यांच्या साह्यावांचून नुसत्या हातानें पाणी खेचून वर काढणें हें फार श्रमाचें काम आहे, आणि यांत भांडें सोडतांना व वर घेतांना तें आदळण्याची, व एखादे वेळीं स्वतःचा झोंक विहिरींत जाण्याची भीती असते. हातानें पाणी खेचून काढण्याला भांडें लहान व हलकें आणि दोरी बारीक पाहिजे. मोठ्या बायकांनीं थोड्या अंतरावरचें पाणी अशा रीतीनें प्रसंग विशेषीं काढावें, पण लहान मुलींना हें उपयोगाचें नाहीं.

कांहीं विहिरीवर तिच्या तोंडावर खालीं किंवा उंचीवर लोखंडी किंवा लाकडी फिरकी (लहानसें चक्र) बसविली असते. ही फिरकी हात सहज पोचेल इतक्या बेताची असली तर तिचा कांहींतरी उपयोग होतो. पण हात पुरत नसला तर कांहीं उपयोग होत नाहीं.

विहिरीच्या तोंडाशीं लाविलेल्या फिरकीवरून पाणी काढण्यास माणसास ओणवें व्हावें लागतें आणि फार वेळ तसें राहावें लागलें तर कंबर दुखते. उंच लावलेल्या फिरकीवर इतका त्रास पडत नाहीं.

फिरकी ज्या आडव्या दांड्यावर बसविली असते तो फार लांब नसला पाहिजे. नाहींतर ती फिरकी दांडाभर नाचत फिरते. त्या फिरकीच्या मधला खोलगटा त्यांत दोरी चांगली फिरेल असा व खोल असला पाहिजे. नाहींतर दोरी त्याच्यावरून खालीं घसरते आणि ती दरवेळीं फिरकीवर बसविण्यांत वेळ जातो. हातानें खेचून पाणी काढण्यापेक्षां फिरकीवरून पाणी ओढण्याचें काम कमी श्रमाचें व कमी धोक्याचें असतें.

रहाटानें पाणी काढण्याचें काम त्याहून सोपें असतें. रहाट लाकडी किंवा लोखंडी असतो, आणि त्याच्या दोन्ही अंगांस हातानें धरण्यासाठीं खुंट्या असतात. आलटून पालटून दोन्ही अंगांला काम केलें ह्मणजे शरीराच्या एकाच अंगावर जोर पडत नाहीं. या खुंट्या धरून पाणी काढतांना वाकूं नये.

दोरीच्या फांसाला भांडें अडकवून विहिरींत सोडलें ह्मणजे त्याला आंत लोटण्याचें काम रहाट स्वतःच करीत असतो. परंतु त्यानें भांडें एकदम आदळून दोरीलाही हिसका बसतो. ह्मणून दोरी थोडी सैल करून ती हाताच्या मुठीच्या पोकळींतून जाऊं द्यावी, किंवा ती सुटत असतां खुंट्यांना हात द्यावा.

फिरकी व रहाट दोहोंचीं आंसाचीं टोकें खांबावर जेथें टेकलीं असतात, तेथें दोनतीन दिवसांनीं ओंगण दिलें पाहिजे. ह्मणजे आवाज होत नाहीं व पाणी ओढण्यास जडही जात नाहीं.

५ पाणी ओढण्याला व वाहण्याला सगळ्या भांड्यांत घागर ही फार सोयीची आहे. तोंड अरुंद असल्यामुळें पाणी काढतांना तिच्या तोंडांतून तें फारसें सांडत नाहीं, व हातानें उचलण्यालाही ती सोयीची असते.

६ पाणी काढण्याची व वाहण्याचीं दुसरीं भांडीं ह्मणजे बालटी किंवा बादली, आणि पोहरे. खोल जागेंतून पाणी काढण्याला घागर उत्तम. मात्र ती लहान घेतली पाहिजे. त्याहून कमी अंतरावरच्या पाण्याला पोहोरे आणि अगदीं जवळच्या पाण्याला बादली घ्यावी. प्रवासांत क्यानव्हसचे केलेले पोहरे अधिक सोयीचे असतात.

७ **पाणी साठविणें**—घरांत एकवेळ पुरण्याइतकें पाणी नेहमीं भरलेलें पाहिजे. घरांत नळ किंवा आड नसला तर चोवीस तास पुरेल इतकी पाण्याची बेगमी करून ठेवावयास पाहिजे. घरांत खाऱ्या पाण्याचा आड असला तर वापरण्यास खारें पाणी घेऊन पिण्यापुरतें व स्वैंपाकापुरतें पाणी शेजारपाजारच्या आडावर किंवा नदीवर भरलें पाहिजे. शेजारपाजारच्या आडावर पाणी भरण्यास जाणें तें भलत्या वेळीं जाऊन दुसऱ्यास अडचण न होईल अशा रीतीनें भरावें.

पाण्याची बेगमी करतांना कित्येक गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत. त्या अशा:—

(१) पारोशानें आणिलेलें पाणी आणि स्नान केल्यावर आणिलेलें पाणी हीं दोन्ही एक करूं नयेत. पारोशानें आणिलेलें पाणी संध्येपूजेला व ज्याचा नैवेद्यवैश्वदेव व्हावयाचा आहे अशा स्वैंपाकाला चालत नाहीं.

(२) पाणी भरल्यावर एक रात्र उलटून गेली ह्मणजे तें शिळें होतें. असें पाणी पिण्याच्या व स्वैंपाकाच्या उपयोगांत होतां होईल तों आणूं नये.

(३) सोंवळें ह्मणजे शुद्ध जागेंत ठेविलेलें पाणी पिण्यासाठीं व स्वैंपाकासाठीं साठवून ठेविलें असेल त्यास हव्या तशा कपड्यांसुद्धां किंवा अमंगळ हातापायांनीं स्पर्श करूं नये, किंवा दिसेल तें भांडें स्वच्छ आहे कीं नाहीं तें न पाहतां त्यांत बुचकळूं नये.

(४) पाणी भरण्याचीं आणि साठवणाचीं भांडीं रोज आंतून बाहेरून हात फिरवून स्वच्छ धूत जावीं, आणि दुसरे तिसरे दिवशीं घासून स्वच्छ करावीं.

(५) पिण्याचें व स्वैंपाकाचें पाणी गाळून भरावें. गाळण्याचें फडकें निर्मळ, पांढरें शुभ्र,जाड, घट्ट विणीचें पण मृदु असावें. हें फडकें दूध, तूप इ० पदार्थ गाळण्याच्या किंवा भांडीं वगैरे पुसण्याच्या उपयोगांत आणूं नये. पाणी गाळणें झाल्यावर फडकें लागलेंच उचलून, व त्यांतलें पाणी पिळून टाकून, धूर नसेल अशा जागीं वाळत घालावें.

(६) पाण्याच्या सर्व भांड्यांवरून झांकणें घालावीं. मोठ्या भांड्यांतून पाणी काढण्यासाठीं एक स्वतंत्र भांडें केलेलें असावें व त्याच्या बुडास माती लागणार नाहीं अशा जागीं तें ठेविलेलें असावें.

(७) स्वैंपाकाचें पाणी स्वैंपाकघरांत, पिण्याचें पाणी बसण्या-उठण्याचे जागे जवळ, आणि एरव्हीं वापरण्याचें चौकांत किंवा मोरीजवळ ठेवावें.

(८) भांड्यांतून पाणी काढतांना तें सांडतें. असें सांडलेलें पाणी जेव्हांचे तेव्हां निघून जाईल अशी तजवीज केलेली असावी. ह्मणजे भांड्यांपाशीं खालीं चिखल व्हावयाचा नाहीं, आणि मुंगळे, मच्छरें, वगैरेंचाही उपद्रव त्यांपासून होणार नाहीं.

(९) पाण्याचीं भांडीं होईल तोंपर्यंत घडवंचीवर किंवा उंच जागीं ठेवलेलीं असावीं. त्याचे भोंवतीं गाळ, केरकचरा किंवा वर जाळीं वगैरे होऊं देऊं नयेत.

(८) **घेण्यास योग्य पाणी**—ज्या पाण्याचा उपसा होत असेल किंवा जें वाहत असेल असें पाणी घेण्यास योग्य. साचलेलें, दूषित, किंवा गढूळ पाणी घेऊं नये. पावसाळ्यांत सगळेंच पाणी गढूळ होतें. तेव्हां तें घेतल्याशिवाय गत्यंतरच नसतें. अशावेळीं दोनपदरी किंवा चारपदरी वस्त्रानें तें गाळून घ्यावें, किंवा निदान एक तास गढूळ पाणी तसेंच राहूं देऊन मग वरचें पाणी हलक्या हातानें ओतून घ्यावें. तुरटीचा खडा पाण्यांत फिरवावा आणि मग तासभर तें तसेंच राहूं देऊन गाळ खालीं बसल्यावर वरचें पाणी घ्यावें. पिण्याच्या पाण्यासाठीं नेहमीं फिल्टरचा उपयोग करावा. पाण्यास वास असेल तर पिण्याचें पाणी उकळून व गाळून घ्यावें. पिण्याचें पाणी ठेवण्याला आंतून बाहेरून स्वच्छ अशीं तांब्याचीं भांडीं उत्तम. अशा भांड्यांतलें पाणी सुद्धां नेहमीं गाळून पिण्याची संवय ठेवावी.

(९) **कित्येक सामान्य गोष्टी**--गळकें भांडें पाणी भरण्यास घेऊं नये. त्यास झाळ द्यावयास पाहिजे असेल तर ज्या धातूचें तें भांडें असेल त्याचाच द्यावा. टिनचा किंवा कथलाचा देऊं नये. झाळ देण्याची व्यवस्था होईपर्यंत राळ व मेण एकत्र करून त्यानें बाहेरून भोंक बंद करावें.

ज्या तळ्याची किंवा नदीची माहिती नसेल किंवा ज्यांत हिंस्र जलचर प्राणी (मगर, सुसरी, सर्प वगैरे) राहत असतील, त्यांत पाणी घेण्यासाठीं एकदम शिरूं नये. अंधार असतांना किंवा

घाटावर शून्य असतां एकटें दुकटें आणि मूकस्तंभ जाऊं नये. घाटावर शेवाळ किंवा घसरण झाली असेल तेथें फार जपून पाऊल ठेवावें.

पिण्याचें पाणी ज्या जलाशयांतून घेत असतील तेथें कपडे धुऊं नयेत, किंवा निर्माल्याचीं फुलें, तुटकीं जानवीं, किंवा केरकचरा टाकूं नये. जळकें किंवा राखमाती लावलेलें भांडें अशा पाण्यांत बुडवूं नये. त्यांत स्नान करूं नये.

बाहेरून पाणी आणावें लागतें तेव्हां तेथें साहजिकच पुष्कळ स्त्रीपुरुषांची गांठ पडते. त्यांतले कित्येक रिकामटेकडे गंमत पाहण्यासाठीं किंवा बायकामाणसांच्या चेष्टा करण्यासाठीं किंवा चारगटपणा अगर गप्पागोष्टी करण्यासाठीं आलेले असतात. अशांचा संसर्ग शक्य तेवढ्या उपायांनीं टाळला पाहिजे. यासाठीं होतां होईल तों आपण स्वतः अगदीं सभ्यपणाची वागणूक ठेवावी. कोणाशीं बोलण्याचालण्याचा प्रसंगच येऊं देऊं नये शक्य असल्यास बायकांनीं बायकांच्या व पुरुषांनीं पुरुषांच्या घाटावर जावें. गर्दीच्यावेळीं अगर अगदीं पाहटेस किंवा अगदीं संध्याकाळीं एकटें जाऊं नये. काम लवकर उरकून घरीं परत यावें. आपण विनाकारण जागा अडवून दुसऱ्याचा खोळंबा करूं नये. उच्चनीचतेबद्दल वाद घालीत बसूं नये. आपल्या आचरणावरून लोक आपणांस मान देतील तो खरा; मान मागण्यानें मिळत नसतो; त्यासाठीं वाद घालीत बसण्यानें उलट उपमर्द होण्याचा मात्र संभव असतो.

दुसऱ्याची दोरी किंवा भांडें अथवा दुसरी एखादी वस्तु त्याच्या परवानगीवांचून घेऊं नये. होतां होईल तों तीं मागूंच नये. एखाद्या आंधळ्यास, पांगळ्यास, किंवा तान्हेल्यास त्यानें पाणी मागितल्यास

घालावें; पण धडधाकड, आळशी किंवा चारगट माणसानें मागितल्यास कांहीं एक न बोलतां मुकाट्यानें ऐकलें न ऐकलेसें करून घरीं यावें.

सोबतिणीशीं किंवा ओळखीच्या माणसाशीं उगाच इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत वेळ घालवूं नये. अशा गोष्टी करणेंच झालें तर अगदीं हलक्या आवाजानें कराव्या, व त्या करतांना दुसऱ्याची निंदा करणें किंवा स्वतःच्या घरचीं छिद्रें उघड करणें हें तर फारच वाईट.

रस्त्यानें चालतांना उगाच इकडे तिकडे बघत जाऊं नये. तसेंच वाटेंत दिसला महादेव घाल त्याला पाणी, वड किंवा पिंपळ दिसला कीं घाल त्याला प्रदक्षिणा, असें करूं नये. या गोष्टी भाविकांच्या दृष्टीनें पुण्यकारक असतील. पण पुण्यकृत्य करतांना सुद्धां तारतम्य हें ठेविलेंच पाहिजे.

बायकांनीं रस्त्यानें जातांना गुडघ्याच्या वरचा पायाचा भाग, छातीचा भाग, आणि डोकें हीं चांगलीं झाकावीं. डोकींचीं, वेणींत घातलेलीं फुलें वगैरे अशा वेळीं दिसूं देऊं नयेत. पायांत जड साखळ्या, मोठालीं भरीव जोडवीं, शब्द करून लोकांचें चित्त आकर्षणारीं पैंजणें, घागऱ्या वगैरेही घालूं नयेत. नाकांत नथ असण्याची सुद्धां अवश्यकता नाहीं. ती आडांत किंवा नदीतळ्यांत एखादे वेळीं पडण्याचा संभव आहे. गळ्यांत सरी, माळा वगैरे अलंकारसुद्धां नसलेले चांगले. असलेच तर निदान त्यांचें प्रदर्शन तरी नको.

प्रकरण १० वें

संध्येपूजेचें मांडणें.

अलीकडे पुष्कळ कुटुंबांतून संध्यापूजा वगैरे करण्याचा प्रघात मोडला असल्यामुळें हें प्रकरण लिहिण्याची अवश्यकता नव्हती असें कित्येकांना वाटेल. त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं जेथें इंग्रजी शिक्षणाचा व नव्या सुधारकी मतांचा रिघाव झाला नाहीं अशा पुष्कळ प्रांतांतून नित्यनेमानें संध्यापूजा करण्याची जुनी चाल अनेक घराण्यांतून आहे; आणि इंग्रजी शिकलेल्या लोकांतूनही अलीकडे संध्येपूजेकडे कित्येकांचें परावर्तन होऊं लागलेलें दृष्टीस पडूं लागलें आहे. तेव्हां या विषयाला आजीबात फाटा देऊन चालणार नाहीं. पुढें मागें जरी संध्येपूजेविषयींचा इंग्रजी शिकलेल्यांचा तिटकारा फैलावत गेला, तरी पूर्वीं आपल्या देशांत संध्यापूजा करण्याची रीत कशी होती याचें ज्ञान तरी या प्रकरणावरून पुढच्या पिढ्यांना थोडें बहुत करून घेतां येईल. अशा दृष्टीनें या प्रकरणाचा समावेश या पुस्तकांत केला आहे.

संसारांतलें आपलें मन घटकाभर काढून परमार्थाकडे लावावें अशा उद्देशानें संध्यापूजा करीत असतात. ह्मणून संध्येपूजेची जागा मन एकाग्र होईल अशी एकांत असावी. त्याठिकाणीं गलबला नसावा. तेथें अडगळ किंवा अमंगल पदार्थ असूं नयेत. सात्विकभाव व मनाची स्थिरता ज्यांच्या दर्शनानें प्राप्त होतील अशीं देवादिकांचीं, ऋषींचीं, व साधूंचीं चित्रें या ठिकाणीं असावीं. संध्येचें मांडण्यापूर्वीं ही जागा झाडून, धुऊन, किंवा सारवून स्वच्छ केलेली असावी. तिच्या मध्यभागीं आणि देवाच्या देव्हाऱ्यासमोर रांगोळीचें लहानसें स्वस्तिक काढावें.

संध्येचें मांडणें—संध्यावंदनाला पुढील सामान लागतें. तें सर्व ठराविक जागीं नीट जुळवून यथायोग्य रीतीनें मांडून ठेवावें. संध्येचें सामान ह्मणजे–आसन, भांडीं, भस्म, चंदन. इ०

आसन--संध्येला नुसता पाट घेणें शास्त्राला धरून नाहीं. भुईवर किंवा काष्टपाषाणावर बसून संध्या करूं नये असें शास्त्रांत सांगितलें आहे. संध्येसाठीं दर्भाचें[१] किंवा लोकरीचें[२] आसन घालावें. हें जमीनीवर, पाटावर किंवा शिळेवर घालावें.

आसनाच्या लांबीरुंदीचें कांहीं परिमाण नाहीं. तरी साधारणपणें त्यावर मांडी घालून चांगलें बसतां येईल येवढ्या लांबीरुंदीचें तें असावें.

आसन पूर्वाभिमुख (पूर्वेकडे तोंड करून) किंवा उत्तराभिमुख (उत्तरेकडे तोंड करून) मांडावें.

ज्याचें आसन त्यासच मांडावें. अदलाबदल करूं नये. संध्येचें आसन संध्ये शिवाय इतर कामाला घेऊं नये. संध्येपूजेचे वेळीं कोणी भेटण्यास येतात. त्या माणसांला बसण्यासाठीं एखाद दुसरा पाट किंवा आसन निराळें जवळ असूं द्यावें.

भांडीं–तांब्या, पंचपात्र, पळी व ताम्हन येवढीं भांडीं संध्येला अवश्य आहेत. हीं भांडीं तांब्याचीं असलेलीं उत्तम. पितळेचीं व

---

१ दर्भांच्या जुड्या आडव्या ठेवून त्यांत उभी सुमळी घालून हें तयार केलेलें असतें. उत्तरहिंदुस्थानांत काशीकडे दर्भासनाचा प्रचार फार आहे.

२ लोकरीचें आसन बारीक असलेलें चांगलें. बनातीच्या तुकड्याला संजाब व काठकोर वगैरे लावून हीं तयार केलेलीं असतात. कोणी मृगचर्महि आसनासाठीं घेतात, आणि कोणी तिन्ही ही घेतात. तिन्ही घेतल्यास आधीं कुशासन (दर्भासन), त्यावर मृगचर्म आणि त्यावर लोंकरीचें आसन घालतात. व्याघ्रचर्म संध्येपूजेला वर्ज्य आहे.

चांदीचींही चालतात. जर्मन सिल्व्हर व अल्युमिनमचीं घेण्याचाही प्रघात पडला आहे. इतर धातूंचीं, इनामेल्ड (वरून रोगण लावलेलीं), चिनीमातीचीं किंवा काचेचीं भांडीं घेण्याची वहिवाट नाहीं. संध्येचीं भांडीं पाणी प्यालेलीं असतील तर तीं संध्येला ठेवण्यापूर्वी घासलीं पाहिजेत. हीं भांडींही ज्याचीं त्यास ठेवावीं. बदलूं नयेत. ताम्हनाची अवश्यकता अर्घ्याकरितां असते. कारण अर्घ्यें पाण्यांत किंवा भांड्यांत टाकावीं असा नियम आहे. हाच नियम तर्पणालाही लागू आहे. पळीचा उद्देश पाणी बेताचें घेतां यावें हा आहे. आचमनाला थोडें नियमित पाणी लागतें. ह्मणून पळी मोठी असूं नये, आणि पंचपात्रींत ठेविली असतां भारानें ती लवंडेल इतकी जडही ती नसावी. पंचपात्र किंवा पेला मोठा असला तर तेवढें पाणी संध्येला खरोखर पुरें होतें. तथापि आचमन करून उरलेलें पाणी दुसऱ्या कर्माला घेऊं नये असा नियम असल्यामुळें पाण्याचा तांब्या निराळा ठेवावा लागतो. ज्यांस संध्येनंतर ब्रह्मयज्ञ, तर्पण वगैरे करावयाचें असतें त्यांसही त्याकरितां पुष्कळ पाणी लागतें. तेव्हां संध्येसाठीं तांब्या ठेवावा हें चांगलें. तांब्या, पंचपात्र व पळी या तिन्हींचें काम एकट्या झारीनें उरकतें. ह्मणून पुष्कळ लोक झारी घेतात. पुष्कळ पाणी ज्यांना लागतें ते झारी घेऊन शिवाय जवळ पाण्याची लहानशी कळशी ठेवतात.

पाणी---संध्येला पाणी पारोसें, पारोशानें आणिलेलें, पारोशाचा स्पर्श झालेलें, किंवा पिण्यावापरण्याच्या कामांत येऊन उरलेलें असें उपयोगी नाहीं. तीर्थजलाला मात्र पारोशाचा दोष नाहीं.

---

१ "वर्ज्यं पर्युषितं पुष्पं वर्ज्यं पर्युषितं जलम्। न वर्ज्यं तुलसीपत्रं न वर्ज्यं तीर्थजं जलम्॥"

भांडीं मांडणें— आसनाच्या पुढें संध्या करणाराच्या डाव्या हाताला पाण्याचा तांब्या, त्यावर तबकडी किंवा हात पुसण्याचें ओलें फडकें घालून ठेवावा. तें कांहीं नसलें तर ताह्मन त्यावरच ठेवावें. ताह्मनांत पंचपात्री किंवा पेला आणि त्यांत पळी ठेवावी. एऱ्हवीं हीं भांडीं तांब्याच्या उजवे बाजूला खालीं ठेवावीं. पंचपात्रींत किंवा पेल्यांत पाणी ओतून उघडें ठेवूं नये.

भस्म—हें अग्निहोत्राचें[1] किंवा स्मार्ताग्नीचें असावें.तें एखाद्या बनातीच्या पिशवींत किंवा डब्यांत घालून ठेवलेलें असावें, आणि तें संध्या करणाराच्या उजव्या हाताला ठेवावें. लहानशा मडक्यांत भस्म भरून ठेवून तें मडकें संध्येच्या वेळीं पुढें करणें अभद्र समजतात. भस्माची चिमटी तबकडींत घालून ठेवण्याचीही चाल आहे.

गंध—गंधाचें नुसतें सामान ठेवण्यापेक्षां गंध उगाळून तें तबकडींत भरून ठेवणें अधिक चांगलें. गंधा जवळ एक निर्मळ आरसा ठेवावा. गंधाची तबकडी आरशावर ठेवूं नये. बाजूला ठेवावी.

चंदनाच्या ४ जाती प्रसिद्ध आहेत.त्या ह्या—१ श्रीखंड (पांढरें), २ पीतचंदन (मलयागरु). ३ रक्तचंदन (हें तांबडें असून त्याला वास नसतो) आणि ४ कुंकुम. चंदनाचें खोड चांगलें आहे कीं वाईट तें नाकाला खोड लावून पाहूं नये. असें चंदन देवपितृकार्याच्या उप-

१ गृहस्थानें विवाहाग्नीचें योग्य प्रकारें रक्षण करून रोज होम करावा असा नियम आहे. अग्निहोत्रही एक उपासना आहे. तींत पांच किंवा तीन अग्नि बाळगून त्यांत हवन करावयाचें असतें. अग्निहोत्र्याच्या घरून भस्म आणितेवेळीं पंचपात्रींत तांदूळ पाठवून तें आणावें. तसें फुकट परिश्रम देऊं नयेत.

२ वैष्णवसंप्रदायी लोक बहुधा भस्माऐवजीं गोपीचंदन वापरतात. ह्मणून वैष्णवाच्या संध्येला गोपीचंदनाचा खडा ठेवावा. शैव एखादेवेळीं गोपीचंदन लावतील, पण वैष्णव भस्म कधीं लावावयाचे नाहींत, हें ध्यानांत ठेवावें. गोपीचंदन यांत जरी चंदन हा शब्द आहे, तरी ती खरोखर माती आहे.

योगीं राहत नाहीं. तें कशावर तरी घासून पहावें. गंध उगाळतांना त्यांत कित्येक लोक केशर, कस्तुरी वगैरे सुवासिक पदार्थ घालतात. गंध उगाळणें झालें ह्मणजे सहाणखोड धुऊन खालच्या जागेवर लागलीच पाण्याचा हात फिरवावा, ह्मणजे भुईवर चंदनाचे डाग पडलेले राहणार नाहींत.

सामान्यतः रव्याचें तांबडें गंध लावण्याचा प्रघात आहे. हें गंध देवांच्या व पितरांच्या पूजेला चालत नाहीं. तें फक्त पुरुषांनीं कपाळीं लावण्याच्या उपयोगाचें असतें.रवे हळकुंडाचे करतात.हळकुंड सरळ, व बिनगांठीचें पाहून घेतात व त्यास लिंबांचा रस आणि पापडखार यांत कित्येक दिवस भिजत ठेवतात. ह्मणजे तें आंतून चांगलें लाल होतें. कित्येक दुकानदार रवा चांगला लाल दिसावा ह्मणून त्यास हिंगुळाचीं पुटें चढवितात. हा रवा वाईट असतो. तेव्हां दुकानांतून रवा घेतांना तो नीट पाहून ध्यावा.

कित्येक अल्लड मुलें रव्याच्या गंधाला तुकतुकी यावी ह्मणून तो दुधांत,आंब्याच्या रसांत किंवा साखरेबरोबर उगाळतात.

कांहीं लोक काडीनें किंवा ठशानें गंध लावतात. कोणाचा मुद्रा लावण्याचा प्रघात असतो. वैष्णवांत मुद्रा लावणें हें धार्मिक कर्तव्य समजतात. या मुद्रा बहुधा गोपीचंदनाच्या असतात.

कित्येक लोक केशराचें गंध लावतात.केशर रोजच्या रोज खलून घेण्यापेक्षां एकदांच चांगलें काजळासारखें खलून त्याच्या लहान मोठ्या गोळ्या करून ठेवणें सोयीचें असतें. पुण्याकडे अशा गोळ्या बाजारांत आयत्याही मिळतात.

चंदनाचें पांढरें गंध देवपूजेसाठीं व लावण्यासाठीं उगाळलें असतें. तें लावून उरल्यास त्यांतलें पाणी फडक्यानें टिपून गोळ्या करून

ठेवाव्या. या गोळ्या देवपूजेला उपयोगीं पडत नाहींत; तरी लावण्यास उपयोगीं पडतात.

कांहीं लोकांच्या घरीं देवांस गंधगोळ्या लावण्याची चाल असते. या गोळ्या दुसरे दिवशीं काढल्यावर एका डबींत घालून गंध लावण्यासाठीं जपून ठेवाव्या व काम पडेल तेव्हां तबकडींत भिजत घालून उपयोगांत आणाव्या.

वीरवैष्णव काळ्या गंधाची एकच उभी काडी लावून त्यावर केशरी गंधाचा किंवा इतर वर्णाच्या गंधाचा ठिपका देत असतात. परंतु काळ्या गंधासाठीं कृष्णागरु किंवा कस्तुरी सर्वांना मिळण्यासारखी नसते. ह्मणून त्यांचें काम कोळशानें किंवा काळ्या जळक्या सुपारीनें भागविण्यांत येतें.

जपमाळ, गोमुखा वगैरे— गायत्री मंत्र किंवा दुसरा एखादा मंत्र जपण्यासाठीं माळ आणि गोमुखी घेण्याची कित्येकांची[1] रीत असते. हें जपाचें काम संध्येबरोबर करावयाचा परिपाठ आपले घरीं असला तर जपमाळ व गोमुखी याही एखाद्या पाटावर संध्येच्या सामानाबरोबर लावून ठेवाव्या.

स्नानसंध्येनंतरचा व्यायाम—कित्येक स्नानसंध्येनंतर सूर्यनारायणाला नमस्कार घालतात, दंड काढतात, जोडी फिरवितात,

---

१ जप उघडपणें करूं नये असा नियम आहे. गायत्रीजप थोडा करावयाचा असतां हातांत जानवें धरून तो हात उपवस्त्रांत झांकून ठेवतात. गोमुखी बनातीची असते. तीवर शोभेसाठीं रेशमी फुलें किंवा सूर्यचंद्र, गाय, तुळशी, राधामुरलीधर इ. कशिद्याचीं चित्रें काढतात. कित्येक बायकाही एखाद्या मंत्राचा किंवा रामनामाचा जप करतात. पण तो नुसत्या माळेनें. गोमुखी घेत नाहींत. जपमाळ पदराखालीं झांकून घेऊन करतात. त्या आपली माळ डबींत, खुंटीवर किंवा गळ्यांत घालून ठेवतात.

किंवा दुसरा कांहीं व्यायाम करतात. तरी यांपैकीं व्यायामाचा जो प्रकार असेल त्याला लागणारें साहित्य व्यायामाच्या ठरलेल्या जागीं तयार करून ठेवावें.

पोथी—कित्येक स्नानसंध्येनंतर अध्यात्मरामायण, गीता, गुरुचरित्र यांचा किंवा दुसऱ्या एखाद्या पोथीचा नित्य नेमानें पाठ करतात. त्यांची वाचण्याची पोथी पाटावर ठेवावी. पाट इतका लांबरुंद असावा कीं त्यावर पोथी आणि तिचीं वाचलेलीं पानें उलटून ठेवतां येतील. पोथीवर सहज नजर पडेल इतकी पाटाची उंची असावी.

सूचना—सूर्याला नमस्कार घालतेवेळीं किंवा पोथी वाचण्याचे वेळीं पूजेचें साहित्य लागतें. तें ही जवळ तयार ठेवावें.

पूजेचें मांडणें.

पूजेचें साहित्य—ज्या प्रकारची पूजा असेल त्याप्रमाणें पूजेचें साहित्य केलें पाहिजे. पूजेचे सामान्यतः दोन वर्ग आहेत. १ नित्य व २ नैमित्तिक. नित्य पूजेंत लागणारें साहित्य नैमित्तिक पूजेला लागून शिवाय कांहीं ज्यास्त लागतें. वटसावित्री, मंगळागौरी, अनंतचतुर्दशी, ऋषिपंचमी, लक्ष्मीपूजन इ. पूजा या नैमित्तिक होत. या पूजांतील विशेष प्रकार येथें सांगतां येत नाहींत नित्य ह्मणजे रोजच्या पूजेचें साहित्य येथें सांगतों.

पूजेच्या साहित्यांत सामान्यतः पाणी, चंदन, अक्षता, पुष्पें, धूप, आणि आरतीचें सामान (कापसाची वात, तूप, कापूर इ.) व नैवेद्य यांचा समावेश होतो. याशिवाय अर्घ्य, पंचामृत, परिमलद्रव्यें, महानैवेद्य, फल, तांबूल, व दक्षिणा हे पदार्थ कारणपरत्वें नैमित्तिक पूजेला लागतात.

पूर्वतयारी—पूजेला बसण्यासाठीं आसन, पाण्याचा तांब्या, व इतर भांडीं संध्येप्रमाणेंच लावून ठेवावीं. याशिवाय एक चौरंग पूजा-

साहित्य मांडण्यासाठीं, एक तबक फुलांसाठीं, व एक भांडें पाणी सांडण्यासाठीं ठेवावें.

कोणत्याही समंत्रक पूजेला शंखघंटेची अवश्यकता असते.

पूजेचा कलश पूजा करणाराच्या डावीकडे आणि पूजाद्रव्य उजवीकडे ठेवावें असा नियम आहे.

उपकरणीं–पूजेचीं मुख्य उपकरणीं हीं आहेत—

(१) अर्घ्या–हा शाळुंकेच्या किंवा गोकर्णाच्या आकाराचा असतो; (२) पंचामृताच्या वाट्या, किंवा तपेल्या; (३) अभिषेकपात्र, व तें ठेवण्याची अडणी; (४) अक्षतांची व गंधाची तबकडी; (५) फुलांचें तबक; (६) धूपदान (धुपाटणें);(७) नीरांजन; (८) नैवेद्याचा पेला किंवा वाटी; (९) कापूर लावण्याची हलकार्ती; (१०) देवाचें अंग पुसण्याचें फडकें.

हीं सर्व उपकरणीं पूजेपूर्वीं घासून, धुऊन किंवा नुसतीं स्वच्छ करून पूजेच्या पाटावर तयार असलीं पाहिजेत.

हळदकुंकवाची डबी, कापराची डबी, वगैरेतलें द्रव्य कमी झाल्याबरोबर त्या डब्या पुनः भरून ठेवाव्या.अगदीं सरून पूजा करणारानें मागण्याची वाट पाहूं नये.

उपकरणीं वगैरे मांडतांना कांहीं गोष्टी ध्यानांत ठेवाव्या लागतात. त्या ह्या—

शंख पूजा करणाराच्या उजवीकडे व घंटा डावीकडे असतो. नैवेद्याचा पेला अगदीं मध्यावर असतो. त्याच्या उजव्याबाजूस नीरांजन, त्याच्या जवळ हलकार्ती व त्यापुढें गंधाक्षता हीं असतात.

डाव्या बाजूस धूप, हळदकुंकु, परिमलाच्या डब्या, आणि आगपेटी[१] असते. पंचामृत डाव्या हाताला असतें.

तांबूल, दक्षिणा, व फळें उजव्या हाताला असतात. फळांत नारळ, केळें, खारीक, व बदाम हीं मुख्य आहेत. ऋतुपरत्वें इतर फळेंही पूजेच्या वेळीं देवाला अर्पण करतात. रोजच्या पूजेला फळांची अवश्यकता बहुधा नसते.

सामान्यत: केशराचें किंवा चंदनाचें गंध पूजेला लागतें. तथापि कांहीं लोक आपल्या विशिष्ट आराध्यदेवतेला विशेष प्रकारचें गंध अर्पण करतात. जसें–

गाणपत्य किंवा सौर–रक्तचंदनाचें; वीरवैष्णव–कृष्णागरु किंवा काळें चंदन यांचें; इतर वैष्णव–तुलसीकाष्ठाचें; शांकर–बिल्ववृक्षाच्या खोडाचें.

चंदनाचें परिमाण–देवांच्या मूर्तींची व गंध लावणाऱ्या पुरुषमंडळींची संख्या लहान मोठी असेल त्या मानानें कमजास्त गंध उगाळावें लागतें.

अक्षता–अक्षता तांदुळाच्या वाहतात. त्या खंडित ह्मणजे तुटक्या नसल्या पाहिजेत. कित्येक देवांना कुंकुम किंवा केशरीगंधमिश्रित अक्षता वाहतात.

फुलें–यांतच बेल व तुळसीपत्रें यांचाही समावेश होतो. देवांसाठीं फुलें शक्य असल्यास स्वत:च्या बागेंतून ताजीं आणणें हा उत्तम मार्ग. बाजारांतून विकत आणणें हा मध्यम मार्ग आहे. एखा-

---

१ आगकाडयांवर फास्फरस असल्यामुळें त्या पूर्वी देवपूजेंत निषिद्ध मानल्या जात असत. हल्लींही कित्येक लोक देवघरांत आगपेटी न ठेवतां समई जळत ठेवतात. देवघरांत अंधार असेल तेव्हां समई लावून ठेवणें चांगलें.

द्याच्या बागेंतून त्याच्या न कळत आणलेलीं किंवा कुठल्या तरी जागेवरची काढून आणलेलीं फुलें निषिद्ध होत.

फुलें नेसलेल्या वस्त्राच्या पदरांत किंवा घोळांत घालून आणूं नयेत. तसेंच पाय लागलेलीं किंवा वास घेतलेलीं फुलें देवाला वाहूं नयेत. एकदां देवाला वाहिलेलीं फुलें पुनः वाहण्यासाठीं घेऊं नयेत.

फुलांवर पाणी शिंपडून त्यांतलीं निरुपयोगी, किडकीं, छिद्र पडलेलीं, पाकळ्या गळालेलीं, मातींत मळलेलीं, सुकलेलीं अशीं फुलें काढून टाकून चांगलीं तेवढीं घ्यावीं. कच्च्या कळ्या देवाला वाहत नाहींत. गंधहीन, आकारानें फार मोठीं व वजनदार अशीं फुलें देव्हाऱ्याच्या शोभेच्या मात्र उपयोगीं असतात. फुलें निवडून काढल्यावर त्यांची जातवारी लावावी. कारण, कांहीं जातीचीं फुलें देवांना वाहण्याचीं नसतात, व कांहीं विशेष प्रियकर असतात. जसें--मुकुंदाला कुंदाचीं फुलें, महादेवाला केवडा व गणपतीला तुळसी वाहत नाहींत.

जाई, जुई, मोगरा यांसारखीं कोमल व सुवासिक फुलें पुष्कळ असलीं तर त्यांचे गुच्छ, गजरे, किंवा हार देवासाठीं वेळ मिळेल तेव्हां गुंफून ठेवावे.

देवामध्यें शालिग्राम असला तर त्याच्या पूजेला तुळसी अवश्य पाहिजेत. वैष्णवांत तुळसीचें महात्म्य फारच आहे. त्यासाठीं ते लोक तुळसीचे बाग लावतात. ब्राह्मणांतला मोठा वर्ग पंचायतनाची पूजा करणारा आहे. पंचायतनांत शालिग्राम असावयाचाच. ह्मणून रोजच्या पूजेच्या साहित्यांत तुळसीपत्रें लागतात. बायका तुळसीची सेवा करतात. ह्मणून घरांत तुळसीचें झाड असणें हें ब्राह्मणाच्या घराचें एक मुख्य लक्षणच ह्मटलें पाहिजे. दिवसेंदिवस घरांत तुळस ठेवण्याचा प्रघात मोडत चालला आहे. आरोग्याच्या दृष्टीनें तुळसीचें झाड

असणें फार चांगलें असें ह्मणतात. या दृष्टीनें तरी तुळसीचें रोप घरांत असणें अवश्य आहे.

तुळस काळी व हिरवी अशा दोन जातींची असते. त्यांतली काळी तुळस विष्णूला अधिक प्रिय आहे असें समजतात. तुळसीचें पान व मंजरी यांची योग्यता सारखीच समजतात. पूजेला तुळसीची अवश्यकता असल्यामुळें तोडल्यापासून सहा दिवसपर्यंत तिचीं पानें व मंजरी शिळीं समजत नाहींत. एकदां वाहिलेलीं तुळसीचीं पानें प्रोक्षण करून सहा दिवस पुनः वाहतां येतात.

बायकांनीं तुळसीचीं पानें वगैरे तोडूं नयेत असा नियम आहे. ह्मणून गरज लागल्यास बायका तीं मुलांमाणसांकडून तोडवितात. वैधृति, व्यतिपात, मंगळवार, रविवार, द्वादशी, व सुतकसोयेराचे दिवस या दिवशीं तुळसी तोडूं नयेत.

बिल्वपत्र—जशी तुळसीचीं पानें विष्णूच्या पूजेला, तसें बिल्वपत्र महादेवाच्या पूजेला अवश्य आहे. त्याच्या प्रत्येक पत्राला तीन दळें (पानें) असलीं पाहिजेत. कमी उपयोगाचीं नाहींत. बेल तुळसी इतका सुलभ नाहीं, ह्मणून त्याची शिळा होण्याची कालमर्यादा तीस दिवसांची ठेवलेली आहे.

दूर्वा—या गणपतीला फार प्रिय आहेत. कित्येक इतर देवतांनाही त्या वाहतात. दूर्वा बहुधा मुळांसकट वाहतात. पण गणपतीच्या नित्य पूजेला मुळांसकट दूर्वा कदाचित् मिळणार नाहींत, ह्मणून त्यांचे तुरे खुडून वाहिले तरी चालतात. हे तुरे त्याच्या कांड्यापासून वर तीन पानांहून कमी संख्येचे उपयोगीं नाहींत. एकाच कांडावर ज्यास्त पानें फुटलेलीं चालतात. दूर्वा बहुधा एकवीस वाह-

तात. २१-२१ ची एकेक जुडी अशा २१ जुडयाही वाहतात. दूर्वा पाण्यांत घालून ठेवण्यानें टवटवीत राहतात.

नवरात्रांत ह्मणजे आश्विन शु० ५ चे दिवशीं ललितादेवीचा पूजा असते. ज्या सवाष्णीला कुंकवाच्या डबीचें झांकण कोठेंही एखादे वेळीं सांपडतें, तेव्हां ती तें शुभचिन्ह मानून ललितादेवीच्या पूजेचें व्रत घेते. पण ही पूजा पुरुष करतात हें विशेष आहे. सांपडलेलें कुंकवाच्या डबीचें झांकणासारखें चांदीचें झांकण करून तें देवांत ठेवितात व ललितापंचमीला या टाकाची पूजा करतात. या पूजेला १२१ दूर्वांची एकेक अशा १२१ जुडया लागतात.

पूजेच्या वेळेपर्यंत फुलें व तुळसी वाळूं नयेत ह्मणून तीं त्या बेतालाच पुड्यांतून काढावीं. अगोदर काढलीं तर त्यांवर थोडें पाणी शिंपडून ओलें फडकें त्यांच्यावर झांकण घालावें. पारिजातक किंवा जाई यांसारख्या नाजुक फुलांच्या पाकळ्या पाण्यानें गळतात हें लक्षांत ठेवावें. फुलें फार पाण्यानें तरर झालेलीं देवाला वाहिल्यास त्या पाण्यानें देवाचें अंग भिजतें व त्यांस नेसविलेल्या वस्त्रांवर डाग पडतात. ह्मणून फुलांवर पाणी शिंपडावयाचें तें बेतानें शिंपडावें.

धूप—ऊद हा धुपास चांगला. ऊद हा एक प्रकारचा झाडाचा चीक आहे. उदाचा धूप सौम्य असतो. लोभानाला उग्र वास असतो. ह्मणून तो विशेषेंकरून उग्र देवतांपुढें जाळतात. दशांगधूप नांवाचा एक धूप आहे. त्यांत रंगारी हिरडे, राळ, जटामांसी, गुगुळ, चंदन, लाख, शिलाजतु, कापूर, नखला, व कुष्ट अशीं दहा द्रव्यें असतात. पण हा धूप करण्याची खटपट फारशी कोणी करीत नाहीं.

उदबत्ती—धूप वरचेवर घालण्याची उपाधि टाळावी ह्मणून काड्यांना ओलेपणीं धूप लपेटून उदबत्त्या करण्याची युक्ति कोणीं

काढली. या काड्यांना उदबत्त्या ह्मणतात. पण त्या उदाच्या क्वचित्च करतात. अगरू नांवाच्या चंदनाच्या काड्या करतात त्यांना अगरबत्त्या ह्मणतात. कस्तुरी, शिलाजतु वगैरे सुगंधि द्रव्यें घालून केलेल्या काड्यांना चांगला सुवास असतो. पण साधारण उदबत्त्या उदेल किंवा मसाल्याचें तेल काढल्यावर जो गाळ राहतो त्याच्या करतात. ज्या उदबत्तींत कोळशाचा भाग अधिक असतो ती वाईट. उदबत्तीच्या दोन पेठा प्रसिद्ध आहेत. एक पंढरपूर व दुसरी ह्मैसूर. पंढरपूरची उदबत्ती जाड असते. ह्मैसूरची बारीक, लांब व पिंवळ्या रंगाची असते.

उदबत्त्या करण्यांतही कित्येक व्यापारी लबाडी करतात. उदबत्तीला वरून चांगल्या वासाचा हात मारतात, व तिच्या दोन्ही तोंडांना चांगला मसाला लावून मध्यें कशी तरी भरती करतात. शिवाय काड्या जाड करून मसाला थोडा लावतात.

दीप—पूजेला सामान्यतः फुलवात प्रशस्त आहे. साध्या वातीबद्दल तेलवातीच्या प्रकरणांत सांगितलें आहे तें पहावें. काडवात, रुद्रवात, बेलवात वगैरे वातीचे कांहीं प्रकार प्रसिद्ध आहेत. त्याबद्दल निराळ्या ठिकाणीं सांगण्यांत येईल. येथें फक्त फुलवातीविषयीं थोडें सांगतों.

चांगला कापूस आणून घरीं त्यांतली सरकी काढून तो साफ करावा. फुलवातीची तळी चांगली पसरट आणि जाड गादीची करावी. तिचा दांडा उंच, जाड व पीळदार असावा. अशा वाती फुरसतीनें एकदम आठपंधरा दिवसांच्या बेगमीच्या करून त्या तुपांत भिजवाव्या, आणि तूप थिजलें ह्मणजे डबींत भराव्या. उन्हाळ्यांत वातींत तूप फार ठेवूं नये. नाहीं तर तें डबींतून पाझरेल.

नैवेद्य—नैवेद्यासाठीं आठचार दिवस पुरेल असें पंचखाद्य, साखर किंवा गूळ डबींत भरून ठेवावा. पंचखाद्यांत बदाम, खारीक, खोबरें, खडीसाखर आणि बेदाणा इतके जिन्नस येतात. मुलांना नैवेद्याच्या डबींतून खाऊ देऊं नये. निराळा द्यावा.

नैवेद्यासाठीं साखरेऐवजीं खडीसाखर ठेवण्याचीही चाल आहे. पण बत्तासे मात्र ठेवीत नाहींत.

कापूर—जपानी आणि देशी असा दोन प्रकारचा कापूर बाजारांत मिळतो. जपानी कापराच्या अंमळ काळसर रंगाच्या लहान मोठ्या वड्या मिळतात. देशी कापूर पांढरा शुभ्र असून त्याच्या जाड ढेपी येतात. पूजेला कोणताही कापूर चालतो. त्याचा हरबऱ्यापासून चिंचोक्या येवढा पाहिजे तेवढा खडा हलकातींत काढून ठेवावा.

पंचामृत—दूध, दहीं, तूप, साखर, मध (अथवा त्याचे ऐवजीं गूळ) यांच्या समुच्चयाला पंचामृत ह्मणतात. याचें ठरीव परिमाण नाहीं. ज्यानें त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें व शक्तीप्रमाणें देवाला वाहावें. पंचामृतस्नान झाल्यावर शेष राहिलेल्या पदार्थांचा देवाला नैवेद्य समर्पण करतात, व स्नान घातलेलें पंचामृतमिश्रित पाणी तीर्थ ह्मणून घेतात.

अभ्यंगस्नान—ह्मणजे सुवासिक तेल वगैरे लावून स्नान करणें. कांहीं विशेष प्रसंगीं व नैमित्तिक पूजेच्या वेळीं देवाला अभ्यंगस्नान घालतात. रोजच्या पूजेच्या वेळीं अभ्यंगस्नान घालणारे फार थोडे. देवाच्या अभ्यंगस्नानासाठीं लहानशा वाटींत सुवासिक तेल घेतात, किंवा थोडासा कापूस तेलांत भिजवून पूजासाहित्यांत ठेवतात. एखाद्या फुलाला तेलांत बुडवून तें फूल स्नानाचे वेळीं देवाच्या अंगाला लावण्याचीही चाल आहे. तेल लाविल्यानंतर ऊन पाण्यानें देवाला

स्नान घालतात. अभ्यंगस्नानाचे दिवशीं ऊन पाण्यानें स्नान घातलें पाहिजे. कित्येक विशेष भक्तिमान् आणि ऐपतदार लोक रोज देवाला स्नान घालतांना त्याच्या अंगाला अत्तर लावतात. पण असे लोक फार क्वचित्.

परिमलद्रव्यें—ह्मणजे सुगंधिपदार्थ असा अर्थ आहे. सुवासिक अत्तरें, बुका, पुष्पपराग इ. परिमल द्रव्यें होत. हीं देवाला वाहण्यासाठीं पूजेच्या साहित्यांत ठेवावीं. कित्येक लोक या परिमलद्रव्याचे एवजीं ज्याला बिलकुल सुवास नाहीं असे जिन्नस ह्मणजे हळदकुंकु, गुलाल, शेंदूर, इ. पदार्थ परिमल द्रव्यें ह्मणून वाहतात! हळदकुंकु देवीला वाहिलेंच पाहिजे. शेंदूर गणपति व मारुती यांना ही तें प्रिय आहे.देवांना वाहण्याचे हळदकुंकवाचा करंडा वस्तुतः निराळा ठेविला पाहिजे. पण याच करंड्यांतून सुवासिनींना हळदकुंकू लावण्याची चाल पडली आहे.

विडादक्षिणा---विडा लावून किंवा नुसतीं विड्याचीं दोन पानें आणि सगळी सुपारी देवाला तांबूल ह्मणून देण्यासाठीं पूजा करणाराचे पुढें पानाचीं अग्रें करून उजव्या हाताला ठेवावीं. विडा लावलेला असला तर फोडलेली अगर कातरलेली सुपारी त्यांत घालावी; पण नुसतीं सुटी पानेंच ठेवावयाचीं असलीं तर मात्र सबंध सुपारी पाहिजे. दक्षिणा इच्छेप्रमाणें एक पैशापासून हवी तेवढी ज्यास्त ठेवतां येते. पैशाहून कमी मात्र ठेवीत नाहींत. फळासाठीं एकेक बदाम, एक खारीक, शक्ति असल्यास एक नारळ, आंबा, केळें, पेरू इ. ठेवतात. बदाम व खारीक विड्याच्या सुट्या पानांवर ठेवितात. इतर फळें विड्याच्या शेजारीं किंवा खालीं ताटांत ठेवितात. विडा व फळें रोजच्या पूजेला ठेवणारे लोक थोडे. नैमित्तिक पूजेला मात्र तीं अवश्य लागतात.

निर्माल्य–परवानगी असेल तर देव्हाऱ्यांतील व देवावरील निर्माल्य काढून देव पूजेच्या पाटावर काढून ठेवतात[1], आणि देव्हारा झाडून झटकून स्वच्छ करतात. देव्हारा केव्हां केव्हां धुऊन टाकणें चांगलें. देवांचीं आयतनें ह्मणजे तबकड्या, सिंहासनें, प्रभावळी, छत्रचामरें, तसेंच गाई, गंगेच्या लोट्या वगैरे दर एकादशीस व उत्सवाचे दिवशीं घासावीं. हीं घासण्याची रीत मागें एका प्रकरणांत दिली आहे.

निर्माल्य काढल्यावर तो हुंगून एका टोपलींत टाकावा. त्यांतलीं चांगलीं फुलें, हार, गजरे वगैरे प्रसाद ह्मणून उपयोगांत आणण्यास हरकत नाहीं. मात्र ते पायाखालीं येतां उपयोगीं नाहीं[2].

आवरसावर—पूजा आटोपल्यावर दक्षिणा आणि तांबूल उपाध्येबुवा असल्यास त्यांस, नसल्यास एखाद्या ब्राह्मणाला द्यावी. फळें व नैवेद्य घरच्या मंडळीस घेण्यास हरकत नाहीं.

नीरांजनांतील वात जळूं द्यावी, अगर मालवावी. मात्र त्याचा दुर्गंध देवाकडे जाऊं देऊं नये. निर्माल्यानें नीरांजन पुसावें. उदबत्ती जळत असेल तर ती भिंतीस टोंचून ठेवावी अगर पाण्याचा थेंब टोकावर टाकून विझवावी. उरलेलें गंध गोळी करून ठेवावें. उपकरणीं कोरडीं करून डब्यांत अगर संबळींत भरून ठेवावीं. जी

१ अल्पवयी स्त्रियांना देवांना शिवण्याची बहुधा परवानगी नसते. शालिग्रामाला तर स्त्रियांनीं मुळींच स्पर्श करूं नये. आयतनें व गाईच्या मूर्ति वगैरेंना शिवण्यास हरकत नाहीं.

२ कित्येक स्त्रिया निर्माल्यांतलीं चांगलीं फुलें, गजरे वगैरे वेणींत खोंचतात, पुरुष पागोट्यांत घालतात. मात्र तसे करण्यापूर्वीं त्यांत विंचू वगैरे जीवजंतु लपून बसले नाहींतना हें नीट पाहावें.

उपकरणीं मळलीं असतील तीं घासण्यास द्यावीं. पाणी तुळसीला घालावें किंवा मोरी शिवाय इतर जागीं टाकावें. आसनें गुंडाळून ठेवावीं. पोथी, गोमुखी, जपमाळ, पाट, चौरंग वगैरे उचलून झाडून स्वच्छ करून जागचे जागीं ठेवावें.

पार्थिवपूजा—देवांची पूजा झाल्यावर कित्येक लोक पार्थिवपूजा करतात. पार्थिव ह्मणजे मातीची केलेली. मातीचें शिवलिंग हातावर तयार करून त्याची जी पूजा हातावरच करतात तिला पार्थिवपूजा ह्मणतात. पार्थिवासाठीं माती घ्यावयाची ती शुद्ध जागेंतली घ्यावी. तींतले खडे, रेती वगैरे वेंचून फेकून द्यावी, आणि पाण्यांत घट्ट भिजवून तिचा गोळा एखाद्या पाटीवर गोळा करून ठेवावा. पार्थिवाला माती दहा मासे वजनाहून अधिक असली पाहिजे व तिचें केलेलें शिवलिंग किमानपक्षीं अंगुष्ठमात्र तरी पाहिजे. शाळुंका शिवाय.

सायंकाळची धूपारती–कित्येक घरीं सायंकाळीं निर्माल्य काढून देवांची पूजा फुलें वाहण्यापासून पुढें करण्याची चाल असते. ती असेल तर तिचें साहित्य तयार ठेवावें. कांहीं मंदिरांतून संध्याकाळच्या धूपारतीचा मोठा थाट करतात.मथुरेस विश्रामघाटावर यमुनेची व अयोध्येंतील रामाची धूपारती प्रेक्षणीय असते. पांचसहा मोठालीं नीरांजनें मिळून एक खूप जंगी पितळेचें नीरांजन हातीं घेऊन त्यानें देवाला ओंवाळतात. या सर्व नीरांजनामिळून २५०–३०० वाती असतात.

काकड—आरती—हिला बोधआरती असेंही नांव आहे. ही प्रात:काळीं करतात. पंढरपुरची कांकडआरती प्रसिद्ध आहे. शयन-आरती अथवा शेजारती ही रात्रीं देवाच्या निजण्याचे वेळीं करतात. काकड–अरतीच्या वेळीं कसला तरी लाडू किंवा लोणी व खडी-

साखर यांचा आणि शेजारतीचे वेळीं आटीव दुधाचा नैवेद्य समर्पण करतात. मग काकड आरतीचे वेळीं दोन काकडे आणि शेजारतीचे वेळीं पांच काकडे घेऊन त्यांनीं ओवाळतात. या आरतींचें सामान त्या त्या वेळीं तयार ठेवावें.

पूजापात्र—अंगणांत तुळसीवृंदावन, औदुंबर, इ. ची पूजा करण्यासाठीं लागणारें पूजेचें साहित्य आटोपशीर राहील अशीं पूजापात्रें मिळतात. त्यांना धरण्यास दांडा असून आंत पूजेचें निरनिराळें सामान ठेवण्यासाठीं वाट्या असतात. या पूजापात्रांचा उपयोग तीर्थस्नानांत फार होतो. तीर्थावरून स्नान करून येतांना वाटेंत अनेक देवळें आणि देवस्थानें लागतात. त्यांस नुसता नमस्कार करणें पुरें असतें. पण बायका त्यांच्या नैसर्गिक उत्कट भक्तिभावामुळें देवाला ‘ पत्रं पुष्पं फलं तोयम् ’ अर्पण केल्याशिवाय बहुधा राहत नाहींत. अशा वेळीं पूजासाहित्य नेण्यास पूजापात्र फार सोयीचें असतें.

प्रकरण ११ वें.

दळणकांडण.

या प्रकरणाला दळणकांडण असें नांव दिलें आहे. तरी वाटणें, कुटणें, खलणें, किसणें, कातरणें वगैरे अनेक क्रियांचा समावेश यांत करण्यांत येणार आहे. पंचवीस तीस वर्षांपूर्वीं चांगल्या सुखवस्तु घरच्या बायका सुद्धां दळणकांडणाचें काम घरी करीत असत. त्यांत त्यांना कमीपणा वाटत नसे. अलीकडे दहावीस रुपये पगाराच्या कारकुनाच्या बायकोला सुद्धां दळणकांडण करण्याचें काम कमीपणाचें वाटतें.

पांढरपेशा वर्गांत तरी हीं कामें बहुधां मोलानें करून घेण्याची वहिवाट पडली आहे. याला स्त्रियांची वाढती शारीरिक दुर्बलता, ऐपतीच्या बाहेर दिमाखानें राहण्याची हौस, शिक्षणप्रसाराबरोबर येणारा शारीरिक कष्टाविषयींचा कंटाळा किंवा कार्यबाहुल्य अशीं निरनिराळे लोक निरनिराळीं कारणें देतात. त्या कारणांचा विचार येथें कर्तव्य नाहीं. कांहींहीं कारणें असलीं तरी हीं कामें कशा रीतीनें केलीं असतां चांगलीं होतील याविषयींची माहिती सुगृहिणीला अवश्य पाहिजे यांत शंका नाहीं.

गरीब स्थितींतल्या बायकोला तरी दळून आणिलेल्या पिठाची भाकरी कशी करावी हें कळणें जितकें अवश्य आहे तितकेंच एखादें धान्य दळून त्याचें आपणांस पाहिजे तसें पीठ कसें करावें हें माहित असलें पाहिजे व त्या कामांची संवय पाहिजे. मध्यम व श्रीमंत स्थितींतल्या बायकांनाही भाजणी, मेतकूट, तांदुळाची पिठी वगैरे पदार्थ घरचे घरीं करण्याचे प्रसंग वारंवार येतात. सोंवळ्या बायकांचें तर त्यावांचून चालतच नाहीं. यासाठीं दळणकांडणाची थोडी बहुत तरी संवय प्रत्येक स्त्रीला असणें अवश्य आहे. आरोग्याच्या व काटकसरीच्या दृष्टीनेंही या अभ्यासापासून होणारे फायदे दाखवितां येतील. हातांत डंबेल्स घेऊन वेडेवाकडे अंगविक्षेप करण्यापेक्षां दळणकांडण, पाणी भरणें, वगैरे कामें केल्यानें बायकांची प्रकृति अधिक चांगली राहते असा पुष्कळ लोकांचा अनुभवही आहे. दिवसेंदिवस जीवनकलह तीव्र होत चालला आहे. महागाई वाढत्या प्रमाणावर आहे, आणि दळणकांडणाचीं कामें मोलानें करणाऱ्या बायांचाही तुटवडा वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें त्या या कामांबद्दल मजुरीही पुष्कळ मागतात. अशावेळीं हीं कामें गरीब स्थितींतल्या बायकांनीं घरच्या

घरीं केल्यास संसाराच्या नित्यखर्चांत बरीच काटकसर त्यांना करून दाखवितां येईल; व शिवाय मोलकरणी एखादे वेळीं मिळाल्या नाहींत, आणि पिठाची गिरणी गांवांत नसली, ह्मणजे पिठाची पडणारी अडचण त्यांना स्वतः हीं कामें करून दूर करतां येईल.

दळणकाम—शिकावयाचें तें क्रमाक्रमानें शिकावें. ह्मणजे अगोदर डाळी करणें, भरडा करणें, जाड दळणें, व नंतर बारीक दळणें. आरंभीं जातें लहान, व हलकें आणि नंतर मोठें व जड घ्यावें. पहिल्यानें जात्याच्या खुंट्याला फडकें बांधून ठेवावें, व हाताला संवय झाली आणि घट्टे पडले ह्मणजे तें सोडून दळावें. पावशेर अर्ध्या शेरापासून तों अडीच तीनशेर पर्यंत एका बैठकीला दळण्याचा अभ्यास झाला ह्मणजे पुष्कळ झाला.

दळण्याचे प्रकार दोन आहेत—१ दळणें व २ भरडणें. दळण्यांत पुनः जाडें व बारीक, आणि भरडण्यांत डाळ करणें व भरडा करणें असे पोट प्रकार आहेत. दळण्याचें जातें जाड आणि तळीस तळी चिकटलेली असें असतें. भरडण्याचें जातें हलकें असून त्याच्या तळ्यांत फट असते. भरडण्याला वैरण ज्यास्त घालून खुंटा वर शेंड्याकडील बाजूस धरून अंमळ लवकर फिरवावा लागतो. दळण्याला वैरण अंमळ कमी घालून खुंटा मध्यावर धरून अंमळ सावकाश ओढावयाचा असतो. दळण्याचें जातें भुईंत पक्कें रोविलें नसेल तर तें तात्पुरतें रोंवून घ्यावें. जात्याला क्वचित् खालीं मातीचें पाळें लावावें लागतें. तें लाविल्यानें पीठ उडण्याचें कमी होतें.

जात्याचा खिळा, खुंटा, व मारखणी (माणी) हीं मजबूत व तळांत योग्य प्रमाणानें बसविलेलीं असावीं. जात्याचा दगड पक्का असावा,

१ ही पक्कया लाकडाची केलेली नसली तर ती सुळते. खिळा तिच्या मधोमध न येतां एका अंगाला कलता राहिला तर एखादे वेळीं खिळ्यानें ती चेपून फाटते.

आणि त्याला आंतून टांकी दिलेली असावी. जातें जमिनींत रोंविलेलें असेल तर तें जमिनीपासून अर्धा फूट उंचीवर असावें.

वेळ—दळणाचें काम बहुधा पहांटेस चार वाजेपासून करतात. त्यावेळीं घरांतली मंडळी बहुधा निजलेली असते. लहान मुलेंही त्रास देण्यास नसतात,आणि बायकांनाही ही फुरसत असते.ही वेळ साधली नाहीं तर तिसरे प्रहरीं जेव्हां पुरुष मंडळी बाहेर गेलेली असते, मुलें खेळण्यांत गुंततात, व बायकांना फुरसत असते ती वेळ साधावी.

श्रमपरिहाराचा उपाय—दळतांना गाणीं[1] ह्मणण्याची चाल आहे. दळण्याचे श्रम जाणवूं नयेत हा त्याचा उद्देश. हीं गाणीं

---

१ नामदेव महाराजांची जनाबाई नांवाची एक कुणबीण असे. ती दळतांना श्रीकृष्णाचें गाणें अतिशय प्रेमळपणानें ह्मणे. तेव्हां भगवान् प्रसन्न होऊन तिला आनंदानें दळूं लागत अशी एक कथा सांगतात. हिच्या कांहीं ओंव्या पाठ करून ठेवण्या लायक आहेत. दळणाच्या दुसऱ्याही कांहीं ओंव्या आहे. त्या या—

पहिली माझी ओंवी । ओंवीन जगत्र
गाईन पवित्र । पांडुरंग ॥ १ ॥
दुसरी माझी ओंवी । दुजें नाहीं कोठें
जनीं वनीं भेटे । पांडुरंग ॥ २ ॥
तिसरी माझी ओंवी । तिला नाहीं ठाव
अवघाची देव । जनीं वनीं ॥ ३ ॥
चवथी माझी ओंवी । वैरिलें दळण
गाईन निधान । पांडुरंग ॥ ४ ॥
पांचवी माझी ओंवी । माझिया माहेरा
गाईन निरंतरा । पांडुरंग ॥ ५ ॥
साहावी माझी ओंवी । सहा हीं आटले
गुरुमूर्ति भेटले । पांडुरंग ॥ ६ ॥
सातवी माझी ओंवी । आठवे वेळोवेळां
बैसलासे डोळां । पांडुरंग ॥ ७ ॥

(पुढील पृष्ठावर चालू)

ईश्वरस्मरणाचीं असलीं तर स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही साधतां येतात. गाणीं हलक्या सुरांत ह्मणावीं. नाहींतर दुसऱ्यांना त्रास होईल.

कोणताही जिन्नस दळण्यापूर्वीं तो नीट चाळून, पाखडून व निवडून साफ करून घ्यावा. हळद, मीठ, शिंगाडे वगैरे जिनसांचे मोठाले तुकडे किंवा खडे असतील तर ते कुटून लहान करावे.

दळण्याचे वेळीं जुनें मळकें वस्त्र नेसावें. डोक्यावरून कपाळापर्यंत आणि मानेपासून वर नाकपुड्यांपर्यंत पदर घालावा. ह्मणजे नाका-तोंडांत पीठ उडणार नाहीं.

आठवी माझी ओंवी । अठ्ठावीस युगें
उभा चंद्रभागे । पांडुरंग ॥ ८ ॥
नववी माझी ओंवी । सरलें दळण
चुकलें मरण । संसारीचें ॥ ९ ॥
दहावी माझी ओंवी । दहा अवतार
न यावें संसारा । तुका ह्मणे ॥ १० ॥

दळीतां कांडीतां । तुज गाईन अनंता ॥
न विसंबे क्षणभरी । तुझें नाम गा मुरारी ॥
नित्य हाची कारभार । मुखीं हरी निरंतर ॥
माय बाप बंधुवहिणी । तूं बा सखा चक्रपाणी ॥
लक्ष लागलें चरणासी । ह्मणे नामयाची दासी ॥ १ ॥

एकच टाळी झाली चंद्रभागे वाळवंटीं । माझा ज्ञानराज गोपाळांसी लाह्या वाटी ॥ नामदेव कीर्तन करी पुढें नाचे पांडुरंग । जनी ह्मणे बोला ज्ञानदेवा अभंग ॥ अभंग बोलतां रंग कीर्तनीं भरला । प्रेमाचेनि छंदें विठ्ठल नाचूं लागला ॥ नाचतां देवाचा गळाला पीतांबर । सावध होई देवा ऐसा बोले कबीर ॥ साधु संतांनीं देवाला धरिलें मनगटीं । काय झालें ह्मणूनी दचकले जगजेठी ॥ ऐसा कीर्तन महिमा सर्वांमाजीं वरिष्ठ । जडमूक भाविकां सोपी केली पायवाट ॥ नामयाची जनी लोळे संतांच्यां पायीं । कीर्तनप्रेमरस अखंड देई गे विठाई ॥

दळण्याचे अगोदर जातें झाडून झटकून, सभोंवतालची जागा केरसुणीनें साफ करावी. भिंतीवर किंवा आढ्याला जाळीं असतील तर तीं झाडून टाकावीं. दाण्यांची टोपली, वैरणाचें मापटें, बसण्याचा पाट, रात्र असल्यास दिवा, कुंचा, चाळणी वगैरे अवश्यक जिन्नस जवळ घ्यावे. ज्या हातानें दळावयाचें, त्याच्या उलट्या हाताला दळण्याची टोपली ठेवावी. मापट्यानें वैरण घालावी. दळण्याचे कामीं आळीपाळीनें दोन्ही हातांचा उपयोग करावा. एकदम जोर करून दळण्यास लागूं नये. त्यानें लवकर थकवा येतो. सारखा वेग अखेर-पर्यंत ठेवावा. मधून मधून अंगाचा घाम पुसावा. त्याचे थेंब पिठांत पडणें चांगलें नाहीं. दळणें संपलें ह्मणजे कुंच्यानें पीठ गोळा करून पाटींत भरावें. वेळ असला तर चाळूनच भरावें.

मोलकरणीकडून दळण्याचें काम करवून घेणें असेल तर तें शक्य असल्यास आपलेच घरीं करवून घ्यावें. नाहींतर दाण्यांत बदल किंवा भेसळ होण्याचा व दाणे चोरीला जाऊन पीठ कमी मिळण्याचा संभव असतो.

दळण्याचीं यंत्रें—वाफेनें, किंवा पाण्याच्या प्रवाहाच्या जोरानें यंत्रें फिरवून त्या यंत्रांनीं दळलेलें पीठ बारीक येतें, आणि दळण्यांत उत्पन्न होणाऱ्या उष्णतेनें पिठाचा सत्त्वांशही थोडासा जळून पिठाची चव बदलते, व तें पीठ पचण्यासही थोडें जड जातें. हातानें दळलेल्या कणिकेची रुचि कांहीं निराळी असते.

वाटणें.

जात्यानें दळण्यास किंवा भरडण्यास, जिन्नस कोरडा व पुष्कळसा लागतो. ओल्या जिनसेला जातें निरुपयोगी आहे. थोडा जिनस जात्यानें दळण्यांत नुकसान आहे. ह्मणून असे जिन्नस वाटून, खलून,

किंवा घोटून अगर उगाळून बारीक करावे लागतात. असें करण्याचीं साधनें ह्मणजे १ पाटावंरवटा, २ खल, आणि ३ सहाण हीं तीन आहेत.

पाटा—निरनिराळ्या कामांसाठीं लहान मोठे पाटे लागतात; पाट्यांच्या आकृति दक्षिणेकडे व उत्तरहिंदुस्थानांत निरनिराळ्या असतात. दक्षिणेकडचे पाटे शेंड्याकडे अर्धचंद्राकृति असतात, उत्तरेकडचे बहुधा निमुळत्या टोंकाचे असतात. दक्षिणी वरवंटा लांब, गोल, व पंजांत राहील येवढा मोठा असतो. उत्तरेकडचे वरवंटे उंच, चपटे, व आंखुड असतात. आकृति कशीही असो, पण पाटा-वरवंटा पक्कया दगडाचा, जाड, दळदार व टाकी दिलेला असावा.

पाट्याचीं कामें—रोजच्या चटण्या, मसाले, आणि नैमित्तिक पुरण, कुरड्याचे गहूं, वड्यांच्या डाळी, अनरशांचीं, पापडांचीं व दुसरीं कित्येक पीठें, इ० पाटावरवंट्यानें वाटावयाचीं असतात.

वाटण्याची रीत—एकदम सपाट्यानें व जोरानें वाटण्यास लागूं नये. सावकाश थोडें थोडें घेऊन वाटावें. वरवंटा एकसारखा चाल-वावा. पाट्याच्या अगदीं कांठापर्यंत वाटीत नेऊं नये. वाटावयाचा जिन्नस पुष्कळ असला, तर पाट्याच्या खालीं एखादा कागद, पान किंवा पत्रावळ घालावी; ह्मणजे जिन्नस भुईवर सांडणार नाहीं. वाटतांना कांहीं भाग जाड राहिला असेल, तर तो पुनः वरवंट्याखालीं ओढून घेऊन वाटावा. आजूबाजूचा जिन्नस वाटावयाचा तसाच राहतो, ह्मणून तो एखाद्या उलथ्यानें, पळीच्या दांड्यानें, किंवा बोटांनीं सारून पुढें करून घेत जावा. सर्व जिनसेची सारखी बारीक पूड होईल, असें वाटावें. वाटणें झाल्यावर पाटावरवंटा स्वच्छ धुऊन पुसून ठेवावा. चटण्यामसाल्यासाठीं स्वतंत्र पाटा असावा. चिकट,

डाग राहणारा किंवा कडू पदार्थ त्यावर वाटूं नये. अशा कामासाठीं वेगळा पाटा असलेला चांगला.

खलणें किंवा घोटणें.

खलण्यांत वाटणें किंवा घोटणें या दोन्ही क्रिया येतात. घोटण्यांत नुसता घोटा फिरवावयाचा असतो. कधीं कधीं घोटण्याचें काम प्रहर, दोन प्रहर, आठ प्रहर, किंवा याहूनही जास्त वेळ करावें लागतें. घोटण्यानें औषधाचे परमाणु अत्यंत सूक्ष्म होऊन त्यांचा गुण शरीरावर फार त्वरेनें होतो.

पदार्थ फार थोडा असला ह्मणजे तो बारीक करण्यासाठीं खलावा लागतो. औषधि, वेलदोडे, केशर हे जिन्नस खलतात.

खल—खल लहान मोठे पाहिजे तसे मिळतात. देशी खल दगडी व डोंग्याच्या आकाराचे असतात. इंग्रजी खल चिनी मातीचे किंवा काचेचे असून, आकारानें गोल पेल्यासारखे असतात. पण इंग्रजी खल घोटा चालविण्याचे उपयोगीं नाहींत. खलाला दगड फारच कठीण पाहिजे. नाहीं तर खलतांना व घोटतांना दगडाचे बारीक परमाणु खलण्याच्या जिनसेंत उतरण्याची भीति असते.

खलण्याघोटण्याचे कामांत फक्त चिकाटी पाहिजे. कांहीं जिन्नस खलतांना कांहीं विशेष तयारी करावी लागते. उदाहरणार्थ, केशर खलतांना त्यांतला ओलसरपणा घालविण्यासाठीं अगोदर तें एका वाटींत घालून ती वाटी थोडा वेळ विस्तवाजवळ ठेवावी व वाटी ऊन झाली ह्मणजे तींतलें केशर खलण्यास घ्यावें. असें न केलें तर केशरांतल्या काड्यांची बारीक पूड लवकर होत नाहीं. जर फार-बारीक पूड करण्याची जरूर नसेल, आणि ओलसरपणा नसेल, तर

जिन्नस ऊन करण्याची अवश्यकता नाहीं. कामाच्या आरंभीं व शेवटीं खल चांगला धुऊन पुसून स्वच्छ करावा. खलतांना खलांत बत्ता सारखा फिरावा, पण तो आपटूं नये, नाहीं तर एखादे वेळीं खल फुटावयाचा !

औषधांचें काम फार नाजूक असतें. सबब त्यांचा खल वेगळा असावा. तो खल दुसऱ्या कामांना घेऊं नये. खलण्याघोटण्याचा जिन्नस फार असला तर तें काम करण्यासाठीं अलीकडे वाफेनें किंवा इतर शक्तीनें करण्याचीं यंत्रें निघालीं आहेत. खऱ्या मजबूत दगडाच्या खलास फार किंमत पडते. पण ते कित्येक वर्षें टिकतातही. कित्येक वैद्यांच्या घरीं शेंपन्नास वर्षें सारखें खलण्याचें काम चालूनही त्यांचे खल गहूंभर सुद्धां झिजत नाहींत. अलीकडे कोणत्याही दगडाचे खल करून, त्याला काळें पक्कें रोगण लावून, ते अस्सल दगडाचे खल म्हणून विकतात. म्हणून खल विकत घेतांना फार दक्षता ठेवावी लागते.

घासणें व उगाळणें.

वाटणें हें जसें दळण्याभरडण्याचें लहान रूप, तसें घासणें-उगाळणें हें खलण्या--वाटण्याचें लहान रूप आहे. जिन्नस फारच थोडी ह्मणजे मासे रति वगैरेंत परिमाणांत असलीं म्हणजे ती खलतां येत नाहीं. अशी जिन्नस उगाळून किंवा घासून घ्यावी लागते. जसें मुलांची घुटी, मात्रा, व दुसरीं कित्येक औषधें इ०. कांहीं जिन्नस घासण्यानें किंवा उगाळण्यानें त्यांच्यांत विशेष गुणधर्म येतात, किंवा ते विशेष उपयोगीं पडतात. उदा०—कायफळ, दालचिनी, जायफळ, इ०. काष्ठमय जिन्नस बारीक करून पातळ ठेवावयाचे असले, तर उगाळूनच ठेवणें सोयीचें असतें. जसें—चंदन घासण्याचें काम दगड, वीट किंवा खापर यांच्यावरही करतां येतें. उगाळण्याला

मात्र दगडच लागतो. ह्मणून उगाळण्याचे जिन्नस सहाणेवर उगाळतात. सहाण पक्क्या दगडाची व थोडीशी खरबरीत असावी लागते.

उगाळण्याचें व घासण्याचें काम करतांना हात स्वच्छ धुतलेले असावे. त्याचप्रमाणें उगाळण्याची जिन्नस आणि सहाण हीं स्वच्छ असावीं. उगाळतांना खालीं सांडूं नये किंवा खालीं ओघळ येऊं देऊं नयेत. हात बरबटूं नयेत.

सूचना–घासणें सुकें आणि उगाळणें ओलें असतें. तरी व्यवहारांत घासणें हा शब्द उगाळण्याच्या अर्थानेंही लावतात. जसें—चंदन घासणें.

कांडणें.

कांडण्यांत १ सडणें, २ कुटणें, आणि ३ कांडणें अशा तीन गोष्टी येतात. सडणें हा प्रकार अलीकडचा दिसतो. जुन्या ग्रंथांतून कुटणें आणि कांडणें अशा दोनच गोष्टी लिहिलेल्या आहेत. पैकीं कांडणें हा शब्द तांदुळाला व कुटणें हा इतर धान्यांना वात्स्यायनसूत्रावरील टीकाकारानें लाविलेला आहे. वस्तुतः सडणें हा तरी कुटण्याचाच एक प्रकार आहे. हलक्या हातानें कुटण्याला सडणें ह्मणतात. जिन्नस तुटूं न देतां हलक्या हातानें त्याच्यावरची बारीक त्वचा (कोंडा) काढणें याला सडणें ह्मणतात. कुटणें ह्मणजे मारून मारून नरम करणें. जसें—साळीचे पोहे किंवा पापडाचें पीठ कुटणें. कांडणें निराळें आहे. कांडण्यांत जिनसेचे तुकडे होऊन

१ कुरुंदाच्या दगडाची सहाण चांगली समजतात. श्रीमान् लोक सहाणेला तांब्यापितळेच्या किंवा चांदीच्या अडणींत बसवितात. जेथें पाव अर्धाशेर चंदन रोज लागतें, अशा कांहीं मोठाल्या मंदिरांतून जात्यायेवढाल्या मोठ्या सहाणी असतात, व त्यांचे भोंवतीं एक पाळें करतात. त्यामुळें पाणी किंवा गंध भुईवर सांडून जागा खराब होत नाहीं.

पीठ होतें. उदा०—तीळ कांडणें. हीं तिन्ही कामें उखळमुसळांनीं करावयाचीं असतात. कांडण्यांत हवा तसा हात टाकतां येतो, पण कुटण्याला युक्ति आणि सडण्याला थोडें चातुर्य लागतें. कुटणें वगैरे कामें करण्यास संवय पाहिजे.

उखळ व मुसळ—उखळ दगडी असतें. लाकडाच्या मोठ्या उखळाला उखळी ह्मणतात. उखळाचें तोंड खालीं भुईबरोबर पक्कें बसविलेलें असतें. पण लाकडी उखळी कधीं पक्की बसवीत नाहींत. बहुधा सडण्याचें व कुटण्याचें काम लाकडी उखळींत आणि कांडण्याचें दगडी उखळांत करतात. उखळावर सुद्धां हीं तिन्ही कामें होतात. मुसळ नेहमीं लाकडाचें असून त्याचे दोन प्रकार आहेत. १ हें खालीं जाड असून वर निमुळतें होत गेलेलें असतें, व मध्यभागीं हातांत धरण्याकरितां खोलगट भाग असतो. तळाला लोखंडाचें कडें मुसळ फुटूं नये ह्मणून घट्ट बसविलेलें असतें. या मुसळाला दक्षिणी मुसळ ह्मणतात. यांत कित्येक सोयी आहेत. २ हें सरळ वाशासारखें किंवा सळईसारखें असतें. यालाही कित्येक तळाशीं लोखंडी कडें बसवितात. लाकडी उखळी भुईवर उंच ठेवितात. त्यामुळें तिच्यावर काम करतांना उभें रहावें लागतें. यांतले जिन्नस उडूं लागल्यास क्षणोक्षणीं सारतां येत नाहींत, ह्मणून उखळ्या बहुधा खोलगट असतात. उखळावर बसून किंवा उभ्यानें दोन्ही प्रकारें काम करतां येतें. मात्र उभ्यानें काम करतांना उडालेला जिन्नस पायानें उखळांत लोटावा लागतो. उखळावर दोघींनाही आळीपाळीनें—एकीनें बसून व दुसरीनें उभें राहून किंवा दोघींनींही बसून हात मारतां येतात.

उखळावर काम करण्यापूर्वीं उखळ, मुसळ, भोंवतालची जागा, व आपले हातपाय स्वच्छ करावे, जुनें वस्त्र नेसावें, जिन्नस डोक्या-

वर उडणार नाहीं अशी व्यवस्था करावी. जिन्नस निसून, निवडून, पाखडून किंवा जरूर लागल्यास शेकून अगर तापवून घ्यावा.

कांडण्याची जिन्नस फार कठीण किंवा आकारानें मोठी असेल, तर ती अगोदर फोडून घ्यावी. एखाद्या जिंनसेचें पीठ लवकर होत नसेल, तर ती अगोदर सुकवून अगर तापवून घ्यावी. कांडतांना मधून मधून चाळून त्यांतला भरडा काढीत जावें आणि तो पुनः पुनः कुटून गाळावा; ह्मणजे हें काम लवकर होतें. एखादा जिन्नस खकाणा उडण्यासारखा असेल, तर तेल किंवा दुसरा शामक पदार्थ त्यांत मिसळावा. तिखट कुटतांना मुलांना दूर ठेवावें. तिखट कुटण्याचें तें बैठकीच्या किंवा आजारी माणसाच्या जागेजवळ कुटूं नये. चिकट जिन्नस उखळांत कुटूं नये. कांडतांना एखादी जिन्नस उखळांत किंवा मुसळांत चिकटून बसते. ती पळीच्या दांड्यानें किंवा काडीनें वगैरे उकरून काढीत जावी. कांडण्याचे वेळीं लक्ष त्याकडेसच ठेवावें; नाहीं तर मुसळाचे घाव जोरानें व योग्य जागीं पडत नाहींत. मुसळ उखळाचे कांठावर, किंवा बाहेर आपटतें आणि केव्हां केव्हां हातापायांवर पडण्याची भीति असते. कांडणें झाल्यावर उखळ, मुसळ व कांडण्याची जागा हीं साफ करावीं. खकाणा राहिल्यास सारवावी. उखळांत कोंडा किंवा कचरा भरून ठेवूं नये. जिन्नस गाळावयाची किंवा पाखडावयाची असल्यास, तें काम लागलेंच करून टाकावें.

हें काम शिकण्यास प्रथम मुसळ उचलेल इतक्या बेताच्या वजनाचें घेऊन क्रमा क्रमानें कांडणें, कुटणें, आणि सडणें यांची संवय अगोदर उभ्यानें. नंतर बसून, प्रथम एकीनें, मग दोघींनीं, प्रथम एका मुसळानें मग निरनिराळ्या मुसळांनीं, प्रथम भुईसपाट उखळावर मग उभ्या उखळीवर, अशा क्रमानें शिकत जावें.

वेळ—कांडण्याच्या वगैरे कामाला रात्रीची वेळ चांगली. विशेषसें काम नसेल तर तिसरे प्रहरीं हें काम करावें.[१]

कांडतांना कामाकडे विशेष लक्ष ठेवावें लागतें आणि डोळे व हातपाय सगळेच आपापले व्यापार करीत असतात. यामुळें दळतांना जसें गाणीं ह्मणण्याचें साधतें, तसें कांडतांना साधत नाहीं. ओंव्या[२] किंवा ज्यांत शब्दांचे वर खालीं आघात होत असतील, अशा प्रकारचीं गाणीं त्यावेळीं ह्मणतां येतील.

अलीकडे कुटण्याचीं यंत्रेंही निघालीं आहेत. त्यांनीं पोह्यांसाठीं भात [साळी] कुटण्याचें काम जें पूर्वीं फार श्रमाचें वाटत असे, तें फार हलकें झालें आहे.

खलबत्ता.

जात्याचा जसा पाटावरवंटा, तसा उखळमुसळाचा खलबत्ता हें संक्षिप्त स्वरूप आहे. खलबत्ते बहुधा सर्व बीडाचे (एक प्रकारचें लोखंड) देशांत घडून किंवा ढाळून केलेले असतात. ते लहान मोठे असतात. ते बुडाला जाड असावे लागतात. बत्ते खलाच्या उंचीच्या

१ सिद्ध करुनियां ठेविलें कांडण । मज सांगातीण शुद्धबुद्धि गे ॥ आठवण घरीं मज जागें करीं । मागील पाहारीं शेवटिंचा गे ॥ समतुकें घाव घालीं वो साजणी । मी तुज मिळणीं जीवें मिळे ॥ एक कशी पाखडी दुसरी निवडी । निःशेष ते सडी ओज करी ॥ सरलें कांडण पाकसिद्धि करीं । मेळवण क्षीरीं साकरेचें ॥ उद्धव अक्रुर बंधु दोघेजण । बाप नारायण जेवणार ॥ तुका ह्मणे मज माहेरीं आवडी । ह्मणोनी तांतडीं मूळ केलें ॥

२ सावडी कांडण ओवी नारायण । निवडे आपण भूस सारा ॥ मुसळ आधारीं आवरूनी धरी । सांवरोनी थोरी घाव घाली ॥ वाजतीं कांकणें अनुहात गजरे । छंद माहियेरे गाऊं गीतीं ॥ कांडितां कांडण नव्हे भागशीण । तुज मजपण निवडे तो ॥ तुका ह्मणे रूप उमटे आरिसा । पाक त्यासरिसा सिद्ध झाला ॥

सवापट लांब, शेंड्याला चापट व खालीं खोल आणि मुठींत धरण्यासारखे असावे. सडणें खेरीजकरून खलबत्त्यांत होणारीं बाकीचीं सर्व कामें उखळमुसळांनीं होणारीं असतात.

दळण्याभरडण्याचें काम दुसऱ्या तिसऱ्या मजल्यावरही करतां येतें. पण कांडण्याकुटण्याचें काम नेहमीं तळमजल्यावरच करावें लागतें.[1]

चाळणें, गाळणें व पाखडणें.

कित्येक जिनसा अशा असतात, कीं त्या जशाच्या तशाच दळण्याकांडण्याला घेतां येत नाहींत. त्या प्रथम साफ करून निवडून घ्याव्या लागतात, आणि दळल्याकांडल्यावरही त्यांस पुनः साफ करावें, निवडावें, किंवा त्यांत एकाहून अधिक प्रकार झाले असल्यास ते निरनिराळे करावे लागतात. उदा०—गहूं. यांत मातीचे खडे, बारीक बारीक दगड, व दुसरीं कित्येक धान्यें वगैरे मिसळलेलीं असतात. क्वचित् काड्याही सांपडतात. अर्थात् गव्हांची कणीक करावयाची झाली, तर ते प्रथम साफ करणें अवश्य आहे. तसेंच ते दळून कणीक झाली ह्मणजे तींतून गव्हांची चापड आणि जात्यांतून निसटून पडलेले गहूं वगैरे काढावे लागतात. कणिकेंतून रवा, सपीट, सांजा, चापड हींही निरनिराळीं व काढावयाचीं असतात. यासाठीं चाळणें, गाळणें, पाखडणें वगैरे गोष्टी केल्या पाहिजेत. या गोष्टी करण्याचीं साधनें ह्मणजे सूप, चाळणी, आणि टोपली हीं आहेत.

चाळणें आणि गाळणें हें एकच काम आहे. गाळणें फडक्यानें करतात, व चाळणें चाळणीनें करावयाचें असतें, येवढाच काय तो

१ मुंबईस चाळी चांगल्या मजबूत बांधलेल्या असतात. तेथें हीं कामें सुद्धां वरच्या मजल्यांत करतां येतात.

फरक. गाळण्यांत जिनसेचा बारीक भाग जितका काढून घेतां येतो, तितका चाळणीनें घेतां येत नाहीं. चाळणी गाळण्याचें काम करते तसें निवडण्याचें ह्मणजे सुपाचेंही करते. पण सूप जसें जिनसेची निवड तिच्या गुणावरून करतें, तसें तिला करतां येत नाहीं. उदा०---रवा किंवा सपीट यांच्या कणिकेंतून चाळणीला सपीट काढून घेतां येईल. तरी तें फडक्यानें गाळून घेतल्याइतकें बारीक नसेल. चाळणी रव्यांतून जाडे बारीक प्रकार निरनिराळे करील; पण सारख्याच प्रकारच्या रव्यांतून तांबूस रवा, काळसर रवा वगैरे तिला वेंचून घेतां येणार नाहीं. हें काम सुपानें सहज करतां येतें.

चाळणीचे दोन तीन प्रकार आहेत—

१ **चाळणा**—हा ढेंकळें, खडे, काड्या, आणि गोल आकाराचीं धान्यें निवडून काढण्याच्या उपयोगाचा आहे. हा लोखंडी पत्र्याचा करून लाकडी चौकटींत बसविलेला असतो. धान्यांचे पल्लेचे पल्ले चाळावयाचे असतात, किंवा सडकेवरील गिट्टींतून माती, रेती, वगैरे वेगळीं करावयाचीं असतात, तेथें हें काम चाळणे करतात.

२ **कणिकेची चाळणी**—ही बहुधा पितळेचीं, गोल आकाराची व लहान गोल भोंकांची केलेली असते. या चाळणीनें पदार्थांचे गुणदोष निवडले जातात. ती कणिकेंतलीं टरफलें व सबंध दाणे निवडून काढते. सबंध दाण्यांतून चुरी, बारीक रेती, व खडे वगैरे काढण्याचें कामही ती करते.

३ **रवा-सपीटाच्या चाळण्या**--या आडव्याउभ्या तारा विणून केलेल्या असतात, आणि तारांची जाळी ढिली पडूं नये ह्मणून त्यांच्या खालीं एकेक तार आडवी व उभी घातलेली असते. हिच्या भोंवतीं कठडा लांकडाचा, टिनाचा किंवा पितळेचाही असतो.

या चाळणीनें हवें तितकें जाडबारीक रवासपीट पिठांतून काढून घेतां येतें.

चाळणीचा उपयोग पिठाशिवाय आणखी साखर, दूध, तूप, चहा, आंब्याचा रस, श्रींखंड, इ० गाळण्याकडेही होतो. मात्र यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या चाळण्या लागतात. दूध व श्रीखंडासाठीं वस्त्राची चाळणी लागते. श्रीखंडासाठीं जाड खादीचा रुमाल घेतात. या रुमालाची वीण घट्ट नसली पाहिजे. दूध, चहा, कॉफी, कोको, भांग, थंडाई वगैरे पातळ पदार्थ गाळण्याला पातळ वस्त्र लागतें.

वस्त्रानें गाळण्याचें काम हात घालून किंवा पळीनें अथवा डावानें करावें लागतें. हें काम चाळणीभर करावें. मध्येंच एके जागीं करूं नये.

चाळणी अगोदर चांगली झाडून पुसून घ्यावी, आणि काम झाल्यावरही तशीच झाडून पुसून ठेवावी. तिच्यांत एखादा ओशट जिन्नस गाळावयाचा असेल, तर ती धुऊन घ्यावी आणि काम झाल्यावर ऊन पाण्यानें कुंचा फिरवून धुऊन टाकावी. वाळूं देऊं नये. तिच्या खालच्या उभ्याआडव्या तारांतून कांहीं अडकून राहिलें असेल तें नीट काढून टाकावें, आणि ती फडक्यानें कोरडी करून केर उडणार नाहीं, अशा उंच जागीं अगर खुंटीवर टांगून ठेवावी.

पाखडणें.

यांत १ पाखडणें (केरकचरा वगैरे मिसळलेले पदार्थ काढून टाकणें), २ असडणें (वजनदार खडे वर करून घेणें), ३ आणि वेंचणें (निरनिराळ्या आकाराचे व गुणांचे पदार्थ वेगळे काढणें) अशीं तीन कामें येतात.

पाखडण्याला जिन्नस पुढून उडवून मागें घ्यावयाचा, आणि असडण्याला मागून पुढें ढकलावयाचा असतो. वेंचण्याला सुपाला खालून बोटांची टिचकी मारून व पदार्थ रोळून रोळून काढावा लागतो. हें तिसरें काम अंमळ कठीण आहे. तरी तें संवयीनें येऊं लागतें.

सूप—हें बांबूच्या सालीचें किंवा गवताचें करतात. सुपें निरनिराळ्या आकृतींचीं असतात. दक्षिणी सुपांत शेंड्याचा मध्य आणि कोपरे गोल ठेवून शेवटाला दोन्ही काठ अगदीं साफ उताणे होऊन जावे लागतात. इतर प्रांतांतल्या सुपांचे काठ तिन्ही बाजूंनीं भिंतीसारखे अगदीं ताठ, उंच, व सरळ असतात. मात्र दोन्ही हातांच्या कडा पुढें शेवटाकडे उतरत्या होत जातात. या सुपानें वेंचण्याचें काम साधत नाहीं; ह्मणून दक्षिणी सूपच चांगलें.

टोपलें—सूप, टोपलें आणि चाळणी हीं एकाच कुटुंबांतलीं आहेत. त्यांतल्या त्यांत कदाचित् टोपल्यास मातृस्थानाचा मान योग्य होईल. ह्मणून त्याविषयीं कांहीं माहिती असणें अवश्य आहे.

टोपलें आणि पाटी हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. पाटी आकारानें कांहींशी लहान आणि टोपलें मोठें असतें. लहान पाटीला परडी, आणि मोठ्या व पसरट पाटीला हारा (ऐरणी) ह्मणतात. तिचा आकार कढईसारखा किंवा उभा असला तर तिला ग्वाल्हेर, झांशीकडे डाल्या आणि दक्षिणेंत दुरडी ह्मणतात.

टोपल्या बांबूच्या, वेताच्या, कित्येक काड्यांच्या, पानांच्या किंवा कागदाच्या लगद्याच्या करतात. कसल्याही केलेल्या असल्या, तरी त्यांचें बूड व काठ हीं मजबूत पाहिजेत. सूप टोपलें चांगलें टिकावें ह्मणून त्यांस पिंवळ्या मातीनें सारवितात, किंवा चिंध्यांची राख, किंवा मेण, राळ आणि गेरू तेलांत कालवून तें लावतात. त्यास मेणवलीं ह्मणतात.

निसणें–निवडणें.

जी जिन्नस चाळून पाखडून स्वच्छ करण्यासारखा नसते ती निवडून निसून साफ करतात. दोन्ही कामें एकाच प्रकारचीं आहेत, पण निवड हा शब्द चांगल्याच्या निवडीला आणि निसण वाइटाच्या निवडीला लावतात. चांगल्यांतून वाईट काढून टाकणें तें निसणें, आणि वाईटांतून चांगलें काढून घेणें तें निवडणें. निसण्यांत एक प्रकार 'वरंगळण्या'चा आहे. एखादा पाट भुईवर उंच कलता उभा करून मुगासारखे सरपटत जाणारे दाणे त्यावरून थोडथोडे सोडावे आणि ते खालीं पडत असतां मध्येंच त्यांतील निसण बाजूला सारीत जावें. निसण्या–निवडण्याच्या कामांत विशेष चातुर्य लागत नाहीं. बारीक दृष्टि मात्र लागते. ह्मणून हें काम रात्रीचें करूं नये, आणि हें काम सुपानें व चाळणीनें आधीं जितकें करून घेतां येईल तितकें आधीं करून घ्यावें.

इतर प्रकार.

निरनिराळ्या जिंनसांचे तुकडे किंवा बारीक पीठ करण्याचे, दळणकांडणाशिवाय आणखीही कित्येक प्रकार आहेत, आणि त्यांचीं साधनेंही निरनिराळीं आहेत. विस्तारभयास्तव त्यांच्या विषयीं माहिती न देतां येथें कांहींचीं नुसतीं नांवें सांगतों—

काम	साधनें
चिरणें, कापणें, तुकडे करणें....	विळी, चाकू, सुरी इ०
किसणें	किसणी
खवणें	खवणी
कातरणें	अडकित्ता, कातरी.

प्रकरण बारावें.

बिछाने घालणें व काढणें.

हें काम दिसण्यांत अगदीं क्षुल्लक दिसतें, पण खरोखर तसें तें सोपें नाहीं. बिछाना आरोग्याच्या व काटकसरीच्या दृष्टीनें कसा असावा, तो कसा घालावा व कसा काढावा, तें कळल्यावांचून त्यापासून जितकें सुख मनुष्यास लागावयाचें तितकें लागणार नाहीं.[1]

बिछान्याचें सामान---यांत अंथरूण, पांघरूण, पलंग, मच्छरदाणी, चादर व पलंगपोस वगैरे वस्तु येतात. यांतल्या पहिल्या दोन वस्तु अवश्यक आहेत. बाकीच्या तीन अवश्यक नाहींत.

अंथरूण.

(१) यांत सतरंजी, गादी, उशी, चादर, आणि उशीचा अभ्रा इतक्या गोष्टी येतात. यांत सतरंजी मुख्य आहे. तिच्या पोटांत बाकीच्या वस्तु गुंडाळल्या जातात; ह्मणून ती चांगली ऐसपैस व पोताला दणगट असली पाहिजे. तिचें साधारण परिमाण गादीपेक्षां फूट दीड फूट अधिक लांब व सुमारें फूटभर अधिक रुंद असें आहे. सतरंज्या सुताच्या, रेशमाच्या किंवा गर्भरेशमी असतात. पहिली गरीब व सामान्य लोकांसाठीं व दुसरी आणि तिसरी प्रत या श्रीमंतांसाठीं आहेत.

सतरंजी एका किंवा मिश्ररंगांची असते. कोणत्याही रंगाची असली तरी तो रंग पक्का पाहिजे. पांढऱ्या किंवा भडक रंगाची

---

१ राम जेव्हां वनवासाला गेले, तेव्हां पहिल्याच मुक्कामाला लक्ष्मणानें राम व सीता यांच्यासाठीं, तृण-पर्णांची शय्या रचून तयार केली होती. ही शय्या ह्मणजे उगाच चार पेंढ्या गवत किंवा गाठोडेंभर पानें पसरून केलेली नव्हती. तर ती इतकी चांगली व टिकाऊ होती कीं, पंधरा दिवसांनीं भरत त्यांच्या भेटीला आला,तेव्हांही ती जशीची तशी होती. यावरून लक्ष्मणासारख्या राजपुत्राला ही शय्यारचनेची कला चांगली माहित होती असें अनुमान निघतें.

सतरंजी लवकर मळलेली दिसते. सतरंजी वारंवार धुतां येत नाहीं, यासाठीं मळक्या अस्मानी वगैरे रंगांची सतरंजी घेणें चांगलें.

सतरंजीचा चांगुलपणा ह्मणजे ती नव्या कापसाच्या सुताची, पक्क्या रंगाची, आणि खळ न दिलेली असावी. फार जाड असूं नये. साधारण पातळ पण घट्ट विणीची असावी. इतकी कीं, ती नवी असतां भुईला टेकून आडवी धरली, तर ती ताठ भिंतीसारखी उभी रहावी, आणि तिच्यावर पाण्याचे थेंब टाकले, तर ते खालीं गळूं नयेत किंवा त्यानें तिचा रंग पसरूं नये.

चांगली सतरंजी काळजीपूर्वक वापरल्यास १५ वर्षें तरी खुशाल टिकते. बाजारच्या सतरंज्यांपेक्षां कित्येक तुरुंगांतून तयार होणाऱ्या सतरंज्या विशेष बळकट व टिकाऊ असतात.

कित्येक सतरंज्या मोठमोठ्या दालनांत बिछाइतीसाठीं मोठ्या लांबरुंद काढलेल्या असतात. त्यांस हिंदुस्थानी भाषेंत फर्श ह्मणतात. या रोज उचलण्यासवरण्यासारख्या नसल्यामुळें, बिछान्याच्या उपयोगीं पडत नाहींत.

गादी—निजलेल्या माणसाच्या अंगाला खालून ऊब राहावी व बिछान्याला मऊपणा यावा, यासाठीं गादीची योजना आहे. गादीला कापड पूर्वीं खारव्याचें घालीत, अलीकडे जिनासारखें, जाड, व तऱ्हेतऱ्हेच्या रंगांचें कापड निघालें आहे. श्रीमंत लोकांच्या गाद्या साटीण, मश्रु, किनखाब, यांसारख्या कापडाच्या करतात. कोणत्याही कापडाची गादी केलेली असली, तरी गादींत पुढील गुण ह्मणजे नरमपणा व ऊबदारपणा हे असावे, आणि मळकेपणा किंवा कापूस चिकटण्याचा धर्म हे नसावेत.

गादींत मऊपणासाठीं जें द्रव्य (कापूस वगैरे) भरावयाचें त्याच्याशीं त्या कापडाची मैत्री असावी. जसें—कापूस भरलेल्या गादीला खारव्याचें कापड जसें अनुकूल असतें, तसें इतर कापड नसतें. यासाठीं अनुकूल प्रकारचें कापड घेतलें पाहिजे.

गादी एक माणसाला किंवा दोन माणसांला शेजारीं शेजारीं निजण्याजोगी पाहिजे असेल, तर त्या मानानें तिची रुंदी कमजास्त ठेविली पाहिजे. लांबी अर्थात् एकच असणार. निजणाऱ्या माणसाला सरळ पाय पसरून अर्धा फूट तरी गादी उरली पाहिजे आणि कुशीला निजून एक हात सरळ लांब पसरतां येईल इतकी तिची रुंदी पाहिजे. साधारणत: एका माणसाची गादी ६ फूट लांब व ३॥ फूट रुंद, आणि दोन माणसांची ६ फूट लांब व ५ फूट रुंद पाहिजे.

गादींत ऊब येण्यासारखें द्रव्य भरलें पाहिजे. अशीं द्रव्यें म्हणजे कापूस, लोकर, पक्ष्यांचे पर, केस इ० होत.

गादी भरण्याचें काम पिंजारी लोक करतात. गादींत भरण्याचें द्रव्य अगोदर पिंजून साफ केलें पाहिजे. त्यांत गांठी किंवा केरकचरा राहतां कामा नये. तें द्रव्य गादींत सगळीकडे सारखें भरलें गेलें पाहिजे. कोठें कमी किंवा ज्यास्त उपयोगीं नाहीं; आणि तें चांगलें ठासून भरलेलें असलें पाहिजे; नाहीं तर गादी लवकर पातळ होते. गादीला टाके निदान तीन तीन इंच अंतरावर तरी पाहिजेत.

एका माणसाच्या गादीची जाडी एक इंच पासून दीड इंच करण्याला रुई [सरकी काढलेला कापूस] ४ पासून ६ पक्के शेर पर्यंत व दोन माणसांच्या गादीला ६ पासून ९ शेरपर्यंत लागतो. गादी फार जाड करूं नये. फार जाड गादीवर निजावयाचें असेल, तर एकीवर एक दोन किंवा हव्या तितक्या गाद्या पाहिजे तशा घालाव्या.

पर आणि लोकर कापसापेक्षां अधिक फुगीर असल्यामुळें, ज्यास्त जागा व्यापतात. ह्मणून हे जिन्नस कापसाच्या वजनाच्या पाऊणपटीनें घातले ह्मणजे पुरेत. केस मात्र फार थोडी जागा व्यापतो, ह्मणून ते कापसाच्या सर्वा किंवा दीडपटीनेंही लागतात.

गादी सतरंजीप्रमाणेंच पुष्कळ दिवस टिकते. मात्र ती व्यवस्थेनें वापरली पाहिजे. नाहीं तर लवकर खराब होते. गादी फार दबली किंवा तिला पाणी लागलें तर तिचा ऊबदारपणा कमी होतो. ह्मणून तिसऱ्या चवथ्या वर्षीं गादीची खोळ धुववून व आंतील द्रव्य साफ करवून ती पुनः भरावी लागते.

दोन चार माणसांना बसण्यासाठीं पुरेशा लांबी रुंदीची गादी असते तिला हातगादी ह्मणतात. बिछान्याची गादी एरव्हीं बसण्यास घेऊं नये. खुर्चीच्या बैठकीवर बसण्यासाठीं किंवा मागें टेकण्यासाठीं गादी असते, तिला इंग्रजींत कुशन ह्मणतात. हिच्यावर रेशमी किंवा जरीचें फुलेंवेलींचें काम केलेलें असतें.

मोठ्याल्या दालनांतून बिछाइतीवर अंथरण्यासाठीं मोठमोठ्या गाद्या असतात. त्यांस गदेले ह्मणतात.

श्रीमंतांच्या येथें जिन्याच्या पायऱ्यांवरूनही गाद्या पसरलेल्या असतात.

गादींत कित्येक लोक काथ्या घालतात. अशा गाद्या नवारीच्या ऐवजीं पलंगाला लांकडी दांड्या किंवा पट्ट्या असतात, त्यांवर घालण्याच्या उपयोगाच्या असतात. त्या बिछान्याच्या उपयोगीं नाहींत.

गरीब लोक ऐपत नसल्यामुळें गाद्यांत कापसाच्या किंवा लोकरीच्या ऐवजीं चिंध्या भरतात.

प्रवासांतल्या गाद्या लांबी—रुंदींत व त्याचप्रमाणें जाडींतही कमी असाव्या ह्मणजे त्या सोयीच्या होतात.

उशी.

उशीचा खरा उपयोग मानेपासून वर डोक्याच्या भागाला टेका देणें हा आहे. तथापि तिचा उपयोग आणखी पायाखालीं आणि हाताच्या पंजाखालीं ठेवण्यासही करतात. या उशांना अनुक्रमें मानउशी, मांडउशी आणि गिर्दी ह्मणतात. मानउशी व मांडउशी चौकोनी आणि गिर्दी गोल असते.

उशींत रुई किंवा लोकर यांच्या ऐवजीं पंपाचे साह्यानें ती चांगली तुडुंब भरेपर्यंत हवा भरतात, आणि तोंडाला फिरकीचें बूच गच्च बसवितात. उशीचें काम झालें ह्मणजे बूच काढतात. ह्मणजे तिच्यांतली हवा निघून जाऊन तिचा चिपटा होतो. ही प्रवासांत फार सोयीची असते. ही उशी रबाची असते.

चांदर.

गादीवर घालण्याची चादर खादी नादरपाट (मांजरपाट) आयरिश बेड लिनन, किंवा ड्रिलची करतात. चादरीचें कापड कसलें ही असो, तें इतकें जाड आणि घट्ट विणीचें असावें कीं, अंगांतून गळणारा घाम चादरींतून झिरपून गादीपर्यंत पोहचूं नये; किंवा गादींतल्या द्रव्याची ऊब अंगापर्यंत पोंचण्यास अडथळा होऊं नये.

लहान मुलें रात्रींचीं बिछान्यांत देहधर्म करतात, आणि त्यामुळें खालची गादी ओली होऊन खराब होते. ह्मणून मुलांच्या बिछान्यांत चादरीखालीं नरम मेणकापड किंवा रोगणी कापड घालून चादरीच्या वर अंमळ जाड व ओलावा शोषून घेणाऱ्या कापडाचीं लहानमोठीं फडकीं घालण्याची चाल आहे.

---

१ हिलाच कोणी पलंगपोस आणि पलंगपोसाला सरपोस ह्मणतात.

श्रीमंत लोक थंडीच्या दिवसांत उबेसाठीं चादरीखालीं फ्लानेल किंवा ब्ल्यांकेट घालतात व उन्हाळ्यांत घामानें गादी खराब होऊं नये ह्मणून टिशू पेपर (बारीक पारदर्शक व चिवट कागद) उशी-खालीं दाबून कमरेपर्यंत चादरीखालीं घालतात.

चादर चोहोंकडून गादीच्या खालीं वीतभर दाबून घालतां येईल येवढी लांब-रुंद असावी.

अभ्रा.

उशी मळूं नये ह्मणून तिच्यावर अभ्रा घालावा. कोणी शोभेसाठीं त्याला झालरही लावतात. साधा अभ्रा अंमळ ढिला व झालरदार उशीचा अंगाबरोबर असतो. अभ्र्याचें तोंड कसे किंवा गुंड्या लावून बंद केलेलें असतें. उशांना अभ्रे घालणें अवश्य आहे. नाहीं तर त्यांना घामाची व तेलाची घाण लवकरच येऊं लागते.

पांघरूण.

पांघरूण मुख्यत्वेंकरून थंडीच्या निवारणासाठीं असतें. थंडीचें मान नेहमीं बदलत असल्यामुळें पांघरूणही त्या मानानें बदलावयास पाहिजे. पांघरुणांत ऊब धरून ठेवण्याचा, तें अंगावर सुखानें घेतां येण्याचा, नरमपणाचा, आणि लांब-रुंदपणाचा, इतके गुण असले पाहि-जेत. पांघरुणाचे १ हलकें, २ मध्यम व ३ जड, असे तीन वर्ग करतां येतील.

हलकें पांघरूण—यांतही पुनः सामान्य आणि विशेष असे दोन प्रकार आहेत. सामान्य पांघरुणांत स्वच्छ धुतलेलें उपरणें किंवा अंगवस्त्र आणि चौघडी यांचा समावेश होतो. हीं रोज बहुधा धुतलीं जातात. धुतलेल्या वस्त्रांत ऊब राखण्याची शक्ति अधिक असते. विशेष प्रकारांत दुपेटे, रुमाल, रंगित पातळ छिटें, पातळ रेशीम-

काठी किंवा जरीकाठी उपरणीं किंवा पातळें हीं येतात. माशा, चिलटें वगैरेंचें निवारण तर व्हावें, पण उकडूं नये, ह्मणून त्यांचा उपयोग उन्हाळ्यांत करतात.

मध्यम पांघरूण--या वर्गांत पासोड्या येतात. पासोड्या बहुधा खादीच्या करतात. हातानें सूत काढलेल्या कपड्याची पासोडी चांगली ऊबदार व टिकाऊ असते.

जड पांघरूण—या वर्गांत दुलई, रजई, कांबळीं, रग, इ० येतात. दुलई, रजई, व गोधडी हीं रुईच्या प्रमाणावरून व कापडाच्या जातीवरून एकालाच तीन निरनिराळीं नांवें पडलीं आहेत. दुलईचें कापड बारीक पोताचें असून तिला चौफेर संजाब आणि शेवटीं मगजी लाविलेली असते. हींत रुई पक्का सवा किंबा दीड शेर इतकी असते. दुलई उंची कपडा घालून व गोटा लावून आणि अन्य प्रकारें शृंगारतात. हिची किंमत दोन रुपयांपासून ५०।६० रुपयांपर्यंतही असते.

रजईचें कापड मध्यम पोताचें असून, हींत रुई २।२॥ शेरांपर्यंत असते. दिल्ली, लखनौ, मुरादाबाद वगैरे उत्तर-हिंदुस्थानांतल्या कित्येक ठिकाणीं रजया चांगल्या मिळतात.

लेप किंवा गोधडें यांचें कापड जाड असून त्यांत रुई पांच शेरांपर्यंत असते. गोधडयांत कापसाच्या ऐवजीं कपड्याच्या चिंध्याही भरलेल्या असतात.

दुलई सामान्यतः ३ वर्षें, रजई ४।५ वर्षें आणि लेप ८।१० वर्षेंपर्यंत चालतो. हीं पांघरुणें फार वर्षें लोटलीं ह्मणजे खराब होतात. मग त्यांच्या खोळी काढून टाकून रुई दुसऱ्या एखाद्या कामीं लावावा. रुई प्रथम पांघरुणांत आणि मग अंथरुणांत वापरल्यास

शेवटीं तो कल्हई वगैरे करतांना हातीं धरण्याच्या कामीं पडतो. त्याचें सूत काढून त्याचें रकटें (सुताडा) बनवितात. अलीकडे ब्लीचिंग नांवाची एक धुण्याची कला निघाली आहे, तिच्यायोगें कसलीही घाणेरडी रुई स्वच्छ व नरम करतां येते. ही रुई काचेचे व चांदी--सोन्याचे जिन्नस बाहेर पाठवितांना त्यावर गुंडाळण्याच्याही उपयोगीं पडते.

कांबळें--हें लोकरीच्या पांघरुणांला सामान्य नांव आहे. हें लोकरीचें करतात. लोकरीच्या उच्च--नीचत्वाप्रमाणें याला पुढील निरनिराळीं नांवें मिळालीं आहेत. **गांवठी कांबळें**—हें धनगर करतात. हें बहुधा दोन अरुंद पट्ट्या जोडून केलेलें असतें. याला १॥ पासून ३ रुपयांपर्यंत किंमत पडते. **पंजाबी कांबळें**—हें गांवठी कांबळ्यापेक्षां थोडें नरम आणि बारीक धाग्याचें असतें. हें पंजाबांत अमृतसर, लुधियाना वगैरे ठिकाणीं बनतें. याला ५ रुपयेपर्यंत किंमत पडते. **लोई, धाबळ व दुस्सा**--यांत थोडा फरक असतो. लोई पांच सहा हात व धाबळ २४ हातपर्यंत लांब असते. धाबळीपेक्षां लोई आणि लोईपेक्षां दुस्सा पोतानें जाड व दणगट असतो. धाबळी बिकानेर येथें व लोई आणि दुस्से पंजाबांत चांगले होतात.

शाल—हें धाबळीचेंच उत्तम रूप आहे. या काश्मीरांत चांगल्या होतात. फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे युरोपांतील देशांहूनही त्या येतात. परदेशी शाली रंगाला भपकेदार असतात, पण पोत काश्मीरी शालीसारखें नसतें **बनात, ब्ल्यांकेट, व रग हीं** जाड, नरम, आणि मूल्यवान् असतात. बनातीचीं तर ठाणेंच येतात. ब्ल्यांकेटें व रग हीं लहान लांबी--रुंदीचीं पुष्कळ असतात. ह्मणून हीं घेतांना आपल्या बेताचीं पाहून घ्यावीं, हीं बहुधा परदेशी असतात. अलीकडे

कानपुरासारख्या ठिकाणीं ही यांचे कारखाने निघाले आहेत. त्यांत कांहीं निवळ लोकरीचीं असतात, पण कित्येक सूतमिश्रित असतात; त्यामुळें पुष्कळ वेळां लोक फसतात. कित्येक रग फारच मऊ आणि सुंदर रंगाचे असतात.

पलंग.

पलंग हा एक सुखोपभोगाचें साधन आहे. ह्मणून विरक्त, यति, व विधवा स्त्री यांना त्याचा उपयोग शास्त्रांनीं निषिद्ध मानिला आहे. पण कांहीं जागीं पलंगाची खरोखर अवश्यकता असते. निजण्याची जागा दमट किंवा ओल आलेली असेल किंवा अतिशय उष्णतेमुळें जमीन तापलेली असेल, अशा ठिकाणीं पलंगाशिवाय गति नसते. जेथें जीव–जंतूंची भीति असते, तेथेंही पलंग अवश्य पाहिजे.

पलंगाचे नवारीचा, लाकडी पट्ट्यांचा, कॅनव्हासचा, वेताचा, तारेचा, पितळी, चांदी–सोन्याचा इ० अनेक प्रकार आहेत. नवारीचा पलंग असला तर त्याची नवार चांगली नवी पाहून घ्यावी. कुजकी नवार लवकर तुटते. नवार चांगली घट्ट विणीची, चिवट व चांगली ताठ राहील अशा रीतीनें पलंगाला विणलेली असावी. नाहीं तर ती लवकर ढिली होऊन पलंगाला मध्येंच झोल पडतो, आणि निजणाराला चांगलें सुखानें निजतां येत नाहीं. लांकडी किंवा लोखंडी पट्ट्यांचा पलंग एका जागेवरून दुसऱ्या जागीं नेण्यास तितका सोयीचा नसतो. कानव्हस (पडम) चा पलंग नेण्याआणण्यास फार सोयीचा पण टिकाऊ नसतो. वेताच्या पलंगाचे वेत वारंवार तुटतात, व ते पुनः विणून घेणें हें बरेंच खर्चाचें काम असतें. तारेचा पलंग (वायर मॅट्रेस) मऊ असून टिकाऊही असतो. त्याला आरंभीं किंमत ज्यास्त पडते खरी, पण एकंदरींत हाच सोयीचा

झटला पाहिजे. यांत ढेकणासारख्या जंतूंना बसण्यास फारशी जागा मिळत नाहीं हाही एक फायदा आहे. पलंगांना खुरांच्या खालीं भुईवर टेकणारीं लोखंडाचीं लहान चक्रें बसविलीं असतां घरांतल्या घरांत इकडून तिकडे ता फिरवतां येतो. लोखंडी पट्टयांचे किंवा नवारीचे पलंग विलायतेहून येतात, किंवा इकडेही कित्येक कारखान्यांतून होतात. पण हे गरीब माणसांच्या उपयोगाचे नाहींत. हे इस्पितळांतून, विद्यार्थ्यांच्या बोर्डिंगांतून, किंवा शिपायांच्या बराकींतून वापरतात.

पितळेचे व चांदी सोन्याचे पलंग हे श्रीमंत, सावकार व राजेरजवाडे यांच्यासाठीं असतात.

झोपाळा.

हें पलंगाचेंच एक रूप आहे. खालीं खुरांच्या ऐवजीं याला वर टांगण्यास कड्या किंवा दोऱ्या लावतात, इतकाच फरक.यावर बसून झोके घ्यावे किंवा निजावें. दोन्ही कामांला हा येतो.

खाट किंवा बाज.

हें पलंगाचें गांवठी रूप आहे. खाट ह्मणजे ओबडधोबड व हलक्या किंमतीचा पलंग. नवारीच्या किंवा पट्टयांच्या ऐवजीं खाटेला सुंभ, मुंज, किंवा सुतळी विणलेली असते. किंमतींत कमी असून उपयुक्ततेंत ती पलंगाची बरोबरी करते. ह्मणून गरीब लोक बहुधा खाटा वापरतात. उत्तरहिंदुस्थानांत खाटांचा प्रचार सर्वत्र आहे. खाट उचलण्यालाही हलकी असते.

मच्छरदाणी.

हिचा उपयोग माशा, मच्छरें वगैरेंचें निवारण हा आहे. अर्थात् या कीटकांना आंत येतां येणार नाहीं इतकीं बारीक भोंकें मच्छर-

दाणीचीं असलीं पाहिजेत. या भोंकांतून वाऱ्याचा संचार मोकळेपणानें होईल, अशीं तीं भोंकें पाहिजेत. मच्छरदाणी फक्त पलंगालाच लावण्याची सोय असते. कित्येक लोक मच्छरदाणीच्या ऐवजीं कापडाची खोली करवितात. ढेकणांचा उपद्रव फार असतो, तेथें कित्येक लोक कापडाची खोली करून तिला छताप्रमाणें तळालाही कापड लावतात. ह्मणजे हा एक कापडाचा मेणाच होतो. याच्या आंत बिछाना घालतात किंवा बिछान्यावर या खोलीचें तळ ठेवतात. याच्या योगानें ढेकणांना आंत येतां येत नाहीं. हिला ढेंकुणदाणी ह्मणतात.

पलंगपोस वगैरे.

पलंगपोस ही एक मोठी लांब-रुंद चादर असते. बिछाना सर्वदा पसरून ठेवावयाचा असला ह्मणजे दिवससा हा त्याच्यावर आच्छादनासाठीं घालतात. हा बहुधा मळक्या रंगाचा असतो.

बिछान्याची वळकटी करण्यास सतरंजी असते. पण तीही मळूं नये ह्मणून कित्येक लोक तिच्यावर जुनें जाजम किंवा गोणपाट लपेटतात. प्रवासांत बचावासाठीं त्यावर कांबळें, मेणकापड किंवा रोगणी कापड गुंडाळतात. लहान प्रवासी बिछान्यासाठीं होल्ड-ऑल नांवाचें थैल्यासारखें एक वेष्टण मुद्दाम केलेलें असतें, तें फार सोयस्कर असतें.

बिछाना विस्कळित होऊं नये, त्याची केलेली वळकटी सुटूं नये आणि ती सहज उचलतां यावी ह्मणून ती काढणीनें बांधतात; किंवा बकल लाविलेल्या वादीनें आवळतात. या वादीला Bed-straps ह्मणतात.

बिछाना घालणें—बिछाना नेहमीं पसरून ठेविलेला असो किंवा वळकटी करून ठेविलेला असो, त्यावर निजण्यापूर्वीं गादी,

उशा, वगैरे सर्व कांहीं नीट झटकावीं. अशाकरितां कीं, दिवसभर दबून राहिलेल्या वस्त्रांच्या सर्वांगाला एकदा तरी स्वच्छ हवा लागावी. दुसरें असें आहे कीं, विंचवासारखे जीवजंतु अंथरुणांत शिरून चिकटून बसतात; तेही अशा झटकण्यानें काढतां यावे. ब्रशानें साफ करण्यासारखीं वस्त्रें न झटकतां ब्रशानेंच साफ करावीं. जसें—शाली, रग वगैरे.

कामाची वेळ--हें काम निजण्याच्या वेळीं करण्यावर ठेविलें असतां आयत्या वेळीं धांदल होते आणि त्याचा जो मुख्य उद्देश तो साधत नाहीं. ह्मणून हें काम संध्याकाळीं केरकचरा काढण्याच्या कामाबरोबरच उरकून घ्यावें. हें बरें.

बिछान्यांतील सर्व वस्त्रें झाडून झटकून झालीं ह्मणजे आंथरण्याचीं तीं नीट सारखीं आंथरावीं. त्यावरील चादरीचे सळ मोडावे. पांघरण्याचीं वस्त्रें एकाहून अधिक असतील तर तीं नीट बरोबर जोडावीं. त्यांत रोज फेरफार होत नसले, तर हवा असल्यास एक दोन कोपऱ्यांस दोरा घालावा म्हणजे तीं विसकटणार नाहींत.

चादर,अभ्रा, पांघरण्याचीं वस्त्रें वगैरेपैकीं जीं मळालीं असतील तीं धुण्यास काढून त्या जागीं दुसरीं घालावीं. पांघरुणांपेक्षां आंथरण्याचीं आणि त्यांतही विशेषत: उशांचे अभ्रे फार मळतात. ह्मणून ते वरचेवर बदलले पाहिजेत. बिछान्यांतलीं वस्त्रें वेळोवेळीं उन्हांत टाकावीं. एकादें वस्त्र फाटलें तुटलें असेल तर तें शिवून नीट करावें. तसें न केल्यास तें रात्रीचें हातापायांत अडकून ज्यास्त फाटण्याचा संभव आहे.

बिछान्यांची किंवा त्यांतल्या वस्त्रांची अदलाबदल ह्मणजे एकाचें दुसऱ्यास असें होऊं देऊं नये; ज्याचें त्यासच ठेवावें.

बिछाने ज्याच्या त्याच्या निजण्याच्या जागीं संध्याकाळीं नेऊन ठेवावे. जाण्या-येण्याच्या वाटेंत मात्र ठेवूं नयेत.

बिछाना घालतांना पुढील गोष्टी लक्षांत ठेवाव्या—

१ बिछाना पूर्व-पश्चिम किंवा दक्षिणोत्तर सरळ घालावा. उसें पूर्वेस किंवा दाक्षिणेस असावें. दक्षिणेस पाय होतील असा घालूं नये. अशी जुनी रीत आहे.

२ बिछाना भिंतीस अगदीं लागून घालूं नये. त्याचें कोणतेंही टोंक उंबऱ्यांत येईल, किंवा जिन्याच्या खालच्या पायरीस लागेल असा घालूं नये.

३ वर उभा पाट किंवा तुळई अथवा विजेचा पंखा, टांगलेला दिवा, अथवा शिंकें असेल, तर त्याच्या खालीं बिछाना घालूं नये.

४ बिछान्या शेजारीं बीळ असूं नये. असल्यास तें पक्कें बुजवावें.

५ रात्रीं झाडाच्या छायेखालीं किंवा त्याच्या मुळापाशीं बिछाना घालूं नये. विशेषतः ज्या झाडाला सुवासिक फुलें येत असतील अथवा ज्यांतून मध पाझरत असेल, अथवा ज्याच्या मुळाशीं मुंगळे, मुंग्या वगैरे नेहमीं राहत असतील, अशा झाडांपाशीं तर मुळींच घालूं नये.

६ वाऱ्याचा झोत अंगावर येईल असा—ह्मणजे दाराच्या किंवा खिडकीच्या समोर—बिछाना घालूं नये. दारें पुष्कळ असतील तर हवेच्या बाजूचें दार जरूरी असेल तेवढा वेळ उघडें ठेवून बाकीचीं बंद करावा. कोणतेंही दार उघडें ठेवणें सुरक्षित नसेल, तेव्हां तें सहसा उघडें ठेवूं नये. झोंप येऊं लागली ह्मणजे लावतां येईल असा विचार करून आळसूं नये. झोंप केव्हां लागेल, आणि धोका केव्हां होईल, याचा कांहीं नेम सांगतां येणार नाहीं.

७ वाळवी (उधई) किंवा ओल असेल तेथें, अथवा मोरीच्या किंवा शेतखान्याच्या जवळ बिछाना घालूं नये.

८ गच्चीवर आंथरुण घालावयाचें असेल व ती तापलेली असेल, तर अगोदर तिच्यावर पुष्कळ पाणी ओतून ती थंड करावी.

९ आंथरूण घालतांना त्याचा पायाकडील भाग अंमळ खालीं आणि डोक्या कडला थोडा उंच होईल असें घालावें.

१० रात्रीं निजण्याच्या वेळचे विशेष कपडे ह्मणजे पंचा, सदरा, टोपी हीं पलंगाच्या कठड्यावर किंवा खुंटीवर घडी घालून ठेवावीं.

११ उशाला किंवा पायथ्याला खुंट्यांवरून बोचकीं वगैरे न ठेवतां, निजण्याची जागा जितकी मोकळी ठेवतां येईल तेवढी ठेवावी.

निजण्याच्या खोलींतलें सामान—निजण्याच्या खोलींत बहुधा पुढील सामान ठेवावें लागतें–

(१) पिण्याचे पाण्याचा तांब्या–याला झारीसारखें पक्कया झांकणाचें भांडें चांगलें. एका दालनांत अगर खोलींत जितकीं माणसें निजावयाचीं त्यांना एक दोन वेळ पुरेल इतकें पाणी भरून तें भांडें कोनाड्यांत, स्टुलावर, किंवा दुसऱ्या एखाद्या उंच जागीं ठेवावें.

(२) सांडपाण्याचें भांडें–एकदोन सांडपाण्याचे तांबे आणि पाणी भरलेली बादली (बालटी)हीं मोरी असल्यास मोरीजवळ ठेवावीं.

(३) दिवा–रात्रभर पुरेल इतकें तेल घातलेला दिवा निजण्याच्या खोलींत ठेवावा. निजतांना त्याची ज्योत कमी करावी. केरोसीन (राकेल) च्या मोठ्या दिव्यानें खोली गरम होते व शिवाय दिवा भडकण्याची भीति असते. राकेलच्या दिव्यावर नेहमीं चिमणी असावी. नाहीं तर दिव्याचें काजळ व धूर हीं नाका-कानांत व घशांत जातात. तें अपायकारक आहे.

(४) हातकंदील—निदान एखादी मेणबत्ती व आगकाड्यांची पेटी ठेवावी. आगपेटी उशाला किंवा बिछान्यांतून दाबून ठेवूं नये. सेफ्टी म्याच अशा रीतीनें ठेवण्यास हरकत नाहीं.

(५) पंखा—उन्हाळ्यांत वारा घेण्यासाठीं पंखा लागतो.

(६) फुलांचे गजरे—कित्येक हौशी व ऐपतदार लोकांना निजण्याचे वेळीं सुगंधि फुलांचे गजरे जवळ ठेवावेसे वाटतात. हे बिछान्यावर न ठेवितां पलंगाच्या दांड्यांस किंवा दुसरीकडे वारा त्यावरून निजणाराकडे येईल अशा रीतीनें ठेवावे. अगदीं जवळ न ठेवण्याचें कारण कित्येक कीटक सुवासानें फुलाकडे आकर्षिले जाऊन त्यांत स्थान करतात.

ढेकूण, पिसा वगैरेंचा बंदोबस्त—ढेकूण, पिसा, मच्छरें वगैरे प्राण्यांपासून निजणारास फार त्रास होतो. हा त्रास कांहीं उपायांनीं कमी करतां येतो. अशा उपायांपैकीं कांहीं येथें सांगतों--(१) भिंतीचे पोपडे खरवडून त्या पातळ सारवाव्या. पोपडे येऊं देऊं नयेत. (२) पलंगाची नवार उकलून तो उन्हांत ठेवावा. त्याच्या भेगा भरून काढाव्या व तो कढत पाण्यानें धुवावा. त्याच्या सांधींतून राकेल किंवा नरम फेस येणारा साबू आणि रसकापूर यांचें समभाग मिश्रण लावावें; टर्पेंटाईन तेलांत कापूर मिळवून तें मिश्रण लावावें. (३) खाट किंवा पलंग उन्हांतच राहूं देऊन रात्रीं घरांत आणिल्यावर पुनः त्यांत ढेंकूण शिरूं नयेत ह्मणून त्यांच्या पायांखालीं पाण्यानें भरलेलीं दगडी भांडीं ठेवावीं. (४) मच्छरें बहुधा ओल, घाण, किंवा धूळ, माती यांच्या आश्रयानें राहतात. ह्मणून त्यांचीं आश्रय-स्थानें प्रथम मोडावीं. (५) मच्छरदाणीचा उपयोग करावा. (६) कोरफडीचें झाड खुंटीला किंवा आढ्याला अडकवून ठेवावें. (७)

मेंदीचीं पानें जवळ ठेविल्यानें हीं मच्छरें जवळ येत नाहींत असें ह्मणतात.(८)कीटिंग्ज पॉवडर किंवा लवंगाची पूड बिछान्यावर भुरभुरावी.

तांबड्या मुंग्या व मुंगळे विशेषतः पावसाळ्यांत घरभर होतात. त्यांच्यावर राख किंवा कापराची पूड टाकल्यानें ते जातात. त्यांच्या आश्रयाची जागा पाहून काढून तेथेंही कापराची पूड टाकावी.

वाळवी किंवा उधई हा प्राणी कपड्यांचा, व कागदांचा फार नाश करणारा आहे. विशेषतः गरम लोकरी कपडयांना याच्यापासून फार भीति आहे. ह्मणून कसर लागलेली जागा वरचेवर खरवडून तीवर राकेल घालून ती जाळावी. घराची ज़मीन करतांना मातींत किंवा चुन्यांत सल्फेट ऑफ कॉपर नांवाचें द्रव्य घातल्यानें या प्राण्याचा उपद्रव बिलकुल होत नाहीं.

माशांचा उपद्रव दिवसास–विशेषतः पावसाळ्याच्या आरंभाला फार होतो. त्यांना खोलींतून घालवून देऊन दार बंद करावें, पडदे सोडावे, अंधार करावा, आणि इतक्याही बंदोबस्तांतून त्या आल्याच तर केसांच्या चवरीनें त्या वाराव्या. कांहीं चिकट पदार्थ लावलेले कागद (Fly paper) इंग्रजी औषधें विकणारांकडे मिळतात; त्याकडे माशा धाव घेतात, व त्यावर बसल्या ह्मणजे कागदावर चिकटून राहतात. त्या कागदांचा उपयोग करावा.

बिछाने काढणें—यासंबंधांत पुढील गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत (१) माणूस निजून उठल्याबरोबर बिछाना काढूं नये. सगळ्या खिडक्या व दारें उघडून बिछान्यावरून मोकळी हवा थोडावेळ फिरकूं दिल्यावर मग काढावा.

(२) लहान मुलांनीं हगून मुतून घाण केली असेल तर अगोदर मुलाला मोरीवर नेऊन त्याला स्वच्छ करावें, आणि मग तें वस्त्र हळूच काढून बाजूला ठेविल्यावर बाकीचा बिछाना गुंडाळावा.

(३) पांघरण्याच्या वस्त्राच्या घड्या घालाव्या. त्यांनीं बिछाना फार मोठा व उचलण्यास जड होत असेल तर त्यांची वळकुटी निराळी करावी.

(४) शाली, रग, रेशमी आणि जरीचीं नाजुक वस्त्रें बिछान्यांत गुंडाळूं नयेत, किंवा पसरून ठेवूं नयेत. त्यांच्या नीट घड्या घालून त्या दांडीवर ठेवाव्या.

(५) बिछान्याची वळकुटी अशी करावी कीं आंतलीं वस्त्रें बाहेर लोंबूं नयेत.

(६) नेहमींच--पण विशेषतः पावसाळ्यांत आणि हिंवाळ्यांत सर्व वस्त्रें वाऱ्यावर आणि शक्य असेल तेव्हां उन्हांत घालावीं. ज्यांचा रंग जाण्याची भीति असेल त्यांच्यावर अभ्रा किंवा पातळसें वस्त्र घालून तीं उन्हांत ठेवावीं.

(७) बिछाने पुष्कळ आणि जागा सकुंचित असेल तर आळी-पाळीनें एकेक बिछाना अशा रीतीनें उन्हांत घालावा.

(८) बिछान्यांतलीं वस्त्रें वरचेवर धोब्याकडे धुण्यास द्यावींत अगर घरीं धुवावीं.

(९) बिछान्यांच्या वळकुट्या जेथल्या तेथेंच खाटापलंगावर ठेवण्याची सोय असेल तर तशा ठेवाव्या. तशी सोय नसेल तर उचलून दुसरीकडे ठेवाव्या. त्या सांदीकोपऱ्यांत ठेवूं नयेत. भुईवर ढीग करूनही ठेवूं नयेत. कोपऱ्यांत उभ्या करूं नयेत. एखाद्या घडवंचीवर किंवा आढे मजबूत असल्यास त्याला तखते बांधून त्यावर ठेवाव्या. उद्देश हा आहे कीं भिंतीवरून संचार करणाऱ्या प्राण्यांना त्यांत शिरतां येऊं नये; त्या दडपल्या जाऊं नयेत, आणि त्यांस चोंहीकडून हवा लागावी.

(१०) खाटापलंग उचलण्यासारखे असतील ते उचलून जागच्या जागीं किंवा बाहेर ओटीवर, अथवा त्यांत ढेंकूण झाले असल्यास अंगणांत उन्हांत ठेवावे.

भिकार हौस—ज्याप्रमाणें इतर बाबतींत त्याचप्रमाणें बिछान्याचे संबंधांतही कित्येकांच्या ठायीं श्रीमंतासारखें आपल्या ऐपती बाहेर सामान घेण्याची भिकार हौस असलेली दिसते. बिछाना शरीर रक्षणाकरितां लागतो, हें लक्षांत न ठेवतां ते शोभेकडे ज्यास्त लक्ष देऊन आपल्या पैशाचा निष्कारण चुराडा करतात. अवश्य वस्तूला ज्यास्त किंमत पडली तरी हरकत नाहीं, ती चांगल्या प्रतीची घेऊन शरीराचें व आरोग्याचें रक्षण अधिक करावें. पण निवळ शोभेसाठीं ऐपती बाहेर खर्च करणें हा वेडेपणा आहे. मच्छरदाणी पाहिजे असें वाटतें, पण ती मच्छरें व पिसा खुशाल आंत येतील इतक्या मोठाल्या भोंकांच्या जाळीची किंवा रेशमी गोठ लाविलेली घेतली किंवा घेऊन ती नीट वापरली नाहीं अथवा फाटेल ह्मणून तिचा उपयोग कधीं केला नाहीं, किंवा मळली तरी धुण्यास दिली नाहीं, तर ती घेण्याकरितां दिलेली किंमत फुकट गेली असें होत नाहीं काय? तसेंच गादीचें. लग्नांत किंवा न्हाणवल्या मुलीला बिछाना देतांना एखाद्या बाईनें मश्रूची गादी करून दिली ह्मणजे ती आपली हौस पुरली असें समजते. पण मश्रूच्या गादीवर अंथरण्याला पुरेशा चादरी कोठें तिच्यानें घेववतात? तिचें लक्ष सगळें बाहेरच्या शोभेकडे असतें. मश्रूच्या गादी ऐवजीं तिनें जर चांगलीं लांबरुंद व मऊ अशीं दोनतीन पंजाबी कांबळीं घेऊन मुलीला दिली तर तीं तिच्या किती उपयोगीं पडतील? ब्ल्यांकेटाचें ही तसेंच. चांगलें निखालस लोंकरीचें उंची जातीचें ब्ल्यांकेट ८।१० रुपये खर्चून घ्यावयाचें, पण बिछाना मळकट, पांघुरणें मळकीं,

ब्ल्यांकेटाच्या रंगाचा भपका जाईल या भीतीनें कितीही मळलें तरी तें धुवावयाचें नाहीं, न धुतल्यामुळें त्याला घाण येऊं लागते व विसविशीत होतें, तरी टाकवत नाहीं, असें करण्यापेक्षां धाबळ्या घेतलेल्या काय वाईट ? बिछान्यांतलीं सगळीं वस्त्रें एकमेकांना शोभतील, शरीराचें रक्षण चांगलें करतील व स्वच्छ ठेवतां येतील अशीं असलीं पाहिजेत. नुसतें एकाच वस्तूच्या शोभेकडे पाहून चालावयाचें नाहीं.

प्रकरण तेरावें.

तेलवात.

तेलवात किंवा दिवाबत्तीची तयारी करून ते लावणें हें घरांतल्या कामांपैकीं एक महत्त्वाचें काम आहे. या कामाला दिवे, तेल, वाती, चिमण्या वगैरेंचें चांगलें ज्ञान पाहिजे.

तेलवात करण्याच्या कामांत जाळण्याचें तेल व तें ज्यांत जाळावयाचें तो दिवा यांच्या गुणधर्मांची चांगली माहिती पाहिजे. तेलाचा योग्य पात्रांतच उपयोग केला पाहिजे; नाहीं तर भलताच परिणाम व्हावयाचा ! उदाहरणार्थ, तिळाचें तेल चिमणींत घातलें तर दिवा जळावयाचा नाहीं, आणि राकेल समईंत घालून वात पेटविली तर एकदम भडका होईल. ह्मणून तेलें, वाती, आणि दिवे यांची माहिती वेगवेगळी न देतां प्रत्येक जातीच्या तेलाच्या वर्णनाचे पोटीं ती दिली आहे.

तेलांच्या गुणधर्मांप्रमाणें त्यांचे उद्भिज (वनस्पतीपासून काढलेलें), खनिज (खाणींतून निघालेलें) व प्राणिज (प्राण्याच्या शरिरापासून

झालेले) असे तीन वर्ग करतां येतात. यांपैकीं पहिल्या दोन वर्गांचींच तेलें घरोघरीं वापरण्यांत येतात. प्राणिज तेलें निघतात त्या स्थितींत तीं उपयोगांत आणतां येत नाहींत. त्यांचें बरेंच शुद्धीकरण किंवा परिवर्तन करावें लागतें, व तें करणें घरोघर शक्य नाहीं. शिवाय हीं तेलें इतरांपेक्षां महागही पडतात. ह्मणून उद्भिज्ज व खनिज याच तेलांविषयीं या प्रकरणांत मुख्यतः सांगण्यांत येत आहे.

उद्भिज्ज अथवा वनस्पतींचीं तेलें.

हीं सुमारें २९ वस्तूंचीं निघतात. पण तीं सगळींच दिव्यांत जाळण्याच्या उपयोगीं नाहींत. ज्यांचें तेल दिव्यांत जाळतात, असे जिन्नस ह्मणजे तीळ, खसखस, सरसू, कारळे, करडई, भुईमूग अळसी, खोबरें आणि एरंडी हे होत. तिळांत काळ्या तिळांचा उपयोग तेलाचे कामीं विशेष करतात. तिळाचें तेल शेरीं सरासरीं अर्धा शेर निघतें. त्याचा रंग लालसर पिंवळा असतो. हें तेल खाण्याच्याही उपयोगीं पडतें. खसखशीचें तेलाचें प्रमाणही तितकेंच पडतें. हें तेल पिंवळट रंगाचें असतें. सरसू ही एक मोहरीची जात आहे. तिचा दाणा मोहरीपेक्षां कांहीं मोठा व पिंवळ्या रंगावर असतो. सरसूच्या तेलाला उग्र वास असतो. भुईमुगाचें तेल दक्षिणेंत,विशेषतः कोल्हापूर, बेळगांव वगैरे प्रांतीं पुष्कळ होतें. हें जुनें झालें ह्मणजे त्याला खवट वास येतो. कारळे हे काळ्या तिळासारखेच दिसतात, पण त्यापेक्षां थोडे लांबट असतात. यांचें तेल खाण्याच्या ही उपयोगीं पडतें. खोबऱ्याचें तेल कोंकणपट्टी, मद्रास, मलबार वगैरे प्रांतांतून जेथें नारळ पुष्कळ होतात तेथें होतें. खोबरें खवट असलें तर त्याचें तेल पिंवळें, खवट आणि चिकट निघतें. या तेलाचीं पिपें भरून देशावर येतात. कारवार वगैरेकडे उत्तम खोबऱ्याचें ताजें तेल लोक

तळण्याला व खाण्यालाही घेतात. एरंडीचें तेल चांगलें शुद्ध व ताजें असेल तर त्याचा औषधाकडेही उपयोग होतो. जुनें व अशुद्ध तेल दिव्यांत जाळतात. हें मंद जळतें. करडईचें तेल करडईच्या दाण्यांपासून काढतात. हें तेलही खाण्यास उपयोगीं पडतें.

अलीकडे कापसाच्या सरकीचें तेल काढून विकतात. हें चांगलें शुद्ध केलेलें असलें, तर तळण्याच्या उपयोगीं पडतें. पण दिव्यांत जाळतां येत नाहीं. कारण, तें इतर तेलांपेक्षां महाग पडतें.

तेल काढणारे लोकांची आपणांत एक निराळी जातच आहे. तेली बैलाच्या घाण्यांत गळिताचीं धान्यें पिळून तेल काढतात. अलीकडे वाफेच्या यंत्रांनीं तेल काढण्याचे कारखाने पुष्कळ ठिकाणीं निघाले आहेत.

वर जीं दिव्याच्या उपयोगाचीं तेलें सांगितलीं आहेत, त्यांत तिळाचें तेल प्रमुख आहे. याचा प्रचार बहुतेक सर्व देशांत आहे. एरंडेलाचा प्रचार गुजराथेंत व रेलवेवर आणि खोबरेलाचा कोंकण व मलबार प्रांतांत व मोठाल्या शहरांत श्रीमान् लोकांच्या वाड्यांतून मात्र आहे. इतर जिनसांच्या तेलांचा उपयोग तीं जेथें होतात, त्याच प्रांतांत विशेष होतो.

वर सांगितलेल्या तेलांपैकीं कोणतेंच हवेंत उडणारें किंवा एकदम पेट घेणारें नाहीं. कित्येक थंडीनें गोठणारीं आहेत. त्यामुळें तीं ज्यांत जाळावयाचीं तीं दीपपात्रें सारखीं उष्ण राहिलीं नाहींत, तर दिवा नीट जळत नाहीं. अशामुळें एकाच उद्भिज्ज वर्गातल्या तेलांच्या दिव्यांचे तीन निरनिराळे प्रकार झाले आहेत. ते असे.—१ तिळाच्या तेलाचे दिवे, २ एरंडेलाचे दिवे, व ३ खोबरेल तेलाचे दिवे.

तिळाच्या तेलाचे दिवे—तिळाचें तेल जाळण्याला त्यांत कशाचीही भेसळ करावी लागत नाहीं; आणि पाण्याचा स्पर्श झाला असतां तें तिडतिडतें. हें तेल जाळण्याला दीपपात्र खुलें व खोलगट लागतें. अशा दीपपात्रांचे पंती, लामणदिवा व समई असे तीन निरनिराळे प्रकार बहुधा आळढतात. पंती बहुधा मातीची व क्वचित् धातूची असते. ही बहुधा कोनाड्यांत व क्वचित् ठाणवईवर किंवा लहान वडवंचीवर ठेवतात. राकेलाचा प्रसार झाल्यापासून पंत्यांचा प्रचार बहुतेक गेला. आतां शौचकूपांत, जाण्यायेण्याच्या रस्त्यावर, जिन्यांत किंवा दिवाळीसारख्या दीपोत्सवाचे वेळीं मात्र त्यांचा उपयोग करतात.

लामणदिवा बहुधा पितळेचा करतात. त्याला धरण्यास लांब दांडा असतो. हेही दिवे आतां बहुतेक प्रचारांतून गेले. हे दिवे आतां बायकांच्या हातीं क्वचित् ओंवाळण्याचे वेळीं किंवा लग्नकार्यांत करवल्यांच्या हातांत तेवढे दिसतात. एरव्हीं कोठें फारसे दिसत नाहींत.

समई—ही पितळेची असते. श्रीमंतांच्या घरीं चांदीच्या समया असतात. त्यांच्या घडणी दोन प्रकारच्या असतात—१ आवळ्याची ह्मणजे दांड्याला आवळ्यांसारखी किंवा जोडव्यांसारखी वेटोळीं थोडथोड्या अंतरावर असलेली; व २ सुरूची ह्मणजे सुरूच्या झाडाप्रमाणें खालून वर निमुळती होत गेलेली, पण डौलदार दांडा असलेली. समईला तेल घालण्यासाठीं वर किंचित् खोलगट तोंड असतें व त्याच्या घेराला वाती घालण्यासाठीं पुढें आलेल्या खांचा केलेल्या असतात. या खाचांची संख्या नेहमीं २।४।६ अशी सम असते. समईबरोबर तेलावर घालावयाची झांकणी, वात सारण्यासाठीं वातसारणी (धातूची काडी), कोजळी कातरण्यास चिमटा, समई ठेवण्यास खालीं ताट, वाऱ्यापासून ज्योतीचें रक्षण करण्यासाठीं कापडी टोप (फानूस), समई उंच ठेवण्यासाठीं तिपाई इ० उपकरणें लागतात.

समईच्या खालचा दांडा काढून टाकून नुसतें तोंड सांखळीनें वर टांगतात. आतां विलायती चिमण्या व तऱ्हेतऱ्हेचे ल्यांप यांनीं समयांना बहुतेक मागें टाकिलें आहे.

वात—ही कापसाची वळून करतात. सुताच्या वाती चांगल्या जळत नाहींत व चिंध्यांच्या फार लवकर जळतात. वात करतांना पुढील गोष्टी लक्षांत ठेवाव्या—

(१) वातीला कापूस नवा केर काढलेला व पिंजलेला असावा. जुना कापूस निःसत्त्व असतो व तो तेल चांगलें शोषून घेत नाहीं. (२) वात फार जाड किंवा फार बारीक नसावी. दाभणाइतकी जाड असली ह्मणजे बेताची होते. जाड केल्यास तेल अधिक जळतें, बारीक केल्यास उजेड कमी पडतो. ती जाडींत एकसारखी व चांगली पीळ घातलेली असावी; नाहींतर तेलांत घातल्यावर फुगून ती विसविशीत होते व काजळी धरते. (३) वाती पुष्कळशा दिवसांच्या एकदम करून ठेवूं नयेत. कारण, त्या इकडे तिकडे जातात. (४) वाती एक दोनच करावयाच्या असल्या तर तळहातावर वळतां येतात. पुष्कळ असल्या तर सहाणेवर कराव्या; पण जमिनीवर करूं नयेत.

वेळ व पद्धत—तेलवातीच्या कामाची एक जागा व सोयीप्रमाणें एक वेळ नेमलेली असावी. सकाळीं केरवाऱ्याचें काम करतांनाच सर्व पंत्या उचलून आणून नेमिलेल्या जागीं एकाद्या कोनाड्यांत किंवा लाकडी खोक्यांत ठेवाव्या; आणि संध्याकाळच्या केरवाऱ्याबरोबर त्यांत तेलवात घालून त्या पुनः जागचेजागीं नेऊन ठेवाव्या.

तेलवातीच्या जागीं तेलाची तपेली, तेलाची झारी, व तेल काढण्याला उंच दांडयाची पळी वगैरे सामान ठेवावें. झारी आणि पळी दोन्ही साफ ठेवाव्या. तेलानें बरबटूं देऊं नयेत. हीं दोन्ही भांडीं याच कामाकरितां स्वतंत्र ठेविल्यास रोजच्या तेलाच्या खर्चाचा अंदाज राहून कमजास्त झाल्यास कळेल, व त्याच्या कारणाचा शोध करतां येऊन फाजील खर्च होत असल्यास तो बंद करण्यास बरें पडेल. याशिवाय वाती करण्यासाठीं चपटा दगड अगर सहाण, वातीसाठीं कापूस, कातर, वात सारण्यासाठीं काडया, दिवे लावण्यासाठीं आगपेटी, व तेलकट भांडयावरले ओघळ पुसण्यासाठीं चिंधी वगैरे वस्तु लागतात. या सगळ्या एका जागीं ठेवाव्या.

तेलवात करतांना प्रथम दिव्यांतलें तेल व वाती काढून त्यांच्या तळी आंतून व बाहेरून तेलकट फडक्यानें[1] पुसाव्या. पंती आाणि दिवे-लावणें यांना येवढें पुरें आहे. समया व त्यांचीं ताटें वगैरे दुसऱ्या कोरड्या फडक्यानें पुसावीं. त्यांना थोडा देखील तेलकटपणा राहूं देऊं नये. आठवे चवथे दिवशीं सर्व समया व तेलाचीं भांडीं मातीनें व राखेनें रगडून घासावीं; ह्मणजे मेणचट होणार नाहींत.

---

१ हीं तेलकट फडकीं व जळक्या वाती मागाहून चूल पेटविण्याच्या कामाला उपयोगीं पडतात. प्रपंचाचें मुख्य धोरण हें असावें कीं, असलेल्यांत सर्व नीटनेटकें करावयाचें, आणि कांहीं निष्कारण फुकट जाऊं द्यावयाचें नाहीं. उदा०–एक नवें धोतर किंवा लुगडें घेतलें. तें नेसावयाचें तितके दिवस नेसून मग पांघरायला केलें. मग तें मुलांच्या अंथरुणाखालीं घातलें. पुढें त्याचीं फडकीं केलीं. तीं गाठोडीं बांधायला, केर झटकण्याला, जोडे पुसण्याला वगैरे उपयोगांत आणिलीं. पुढें त्यांचें पोतेरें केलें किंवा तेल पुसावयाला तीं ठेविलीं, आणि शेवटीं तीं चूल पेटाविण्याच्या कामाला आणिलीं. हा एक गरीबीच्या संसाराचा नमुना दिला आहे. ऐपत असली तर प्रत्येक कामाला निरनिराळें फडकें ठेवावें. पण निष्कारण फुकट मात्र कोणतीही वस्तु जाऊं देऊं नये.

तेल भरणें—दिव्यांत तेल बेतानें भरावें. इतकें कीं, तें सरासरीं त्याच्या गळ्यापर्यंत येईल. तोंडोतोंड भरल्यास दिवा उचलतांना तें सांडेल, आणि खालीं गळेल. राहिलेल्या तेलांतला गाळ, त्यांतल्या कीडमुंग्या, गाळणीनें काढून टाकून भांड्यांत भरून ठेवावें. हें तेल पंत्यांतून किंवा बैठकीशिवाय इतर जागच्या दिव्यांतून पुनः भरतां येतें.

मातीची पंती कोरी असली, तर ती पहिल्या दिवशीं बरेंच तेल शोषून घेते. तें तेल व्यर्थ जातें. यासाठीं ही पंती पाण्यांत भिजवून पाणी चांगलें जिरलें ह्मणजे मग उपयोगांत आणावी.

वात—दिव्याच्या बेताची वात घालावी. दिव्याच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सरळ पुरण्याइतकी तिची लांबी असावी. पण वातीचे तीन चार जोड घालावयाचे असल्यास मात्र ती दिव्याच्या मध्यापर्यंत पोंचेल, इतकीच लांब ठेवावी. नाहींतर वाती सारतांना एकमेकींत गुंततील.

जळक्या वातीचे तुकडे तेलकट फडक्यांत घालून ठेवावे. वात जर मोठी व चांगली असेल, तर जळका भाग कातरून पुनः उपयोगांत आणितां येईल.

प्रत्येक दिव्यांत वात सारण्यासाठीं एकेक काडी अवश्य पाहिजे. ती काडी फार तेलकट झाल्यावर फेंकून देऊन नवी घालावी.

दिव्यासंबंधाच्या कित्येक जुन्या समजुती व आचार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

१ मातीची पंती नुसत्या भुईवर ठेवूं नये. तें अमंगल आहे. धनत्रयोदशीला मात्र पंती रस्त्यावर नेऊन ठेवण्यास हरकत नाहीं. एरव्हीं प्रेत घरांतून नेल्यावर मात्र त्या जागीं अशी पंती भुईवर ठेवतात.

२ दिव्याचें तोंड दक्षिणेला करूं नये; करणें झालेंच, तर त्याच्या उलट दिशेला दुसरी एक वात लावून ठेवल्यास मग हरकत नाहीं. यमद्वितीयेला मात्र उकिरड्यावर दक्षिणेकडे तोंड करून पंती ठेवतात.

३ वातींची संख्या नेहमीं सम ह्मणजे २, ४, ६, अशी असावी. विषम संख्या लावूं नये.

४ जळता दिवा हातांतून पडणें मोठा अपशकून समजतात. दिवा पडल्या जागीं दूध घालतात.

५ दिवा विझला ह्मणूं नये, गेला असें ह्मणावें. विझवावयास सांगावयाचें तर ' निरोप दे ' किंवा ' मालव ' ह्मणावें.

६ दिव्याची वात बोटानें सारूं नये. सारलीच तर बोटाचें तेल अंगाला, भिंतीला किंवा दाराला पुसूं नये. फडक्याला पुसून मातीनें किंवा साबणानें हात धुवावा.

७ फुंकर घालून दिवा विझवूं नये. वात थोडी मागें सारली ह्मणजे दिवा आपोआप जातो. फार तर पदरानें मालवावा. मात्र असें करतांना पदर पेटणार नाहीं, याविषयीं फार सावधगिरी घ्यावी.

८ जेवतांना दिवा जाऊं नये. गेल्यास जेवण थांबवून कोणाकडून तरी दिवा पुनः लाववावा, व पानांतलें खाणें झाल्यावर उठावें.

९ सायंकाळीं दिवा लावल्याबरोबर त्याला नमस्कार करावा, व तोंडानें ' शुभं करोति कल्याणं आरोग्यं धनसंपदाम् । शत्रु–बुद्धि–विनाशाय दीपोज्योतिर्नमोऽस्तु ते ' असें मंगल ह्मणून, दिवा लावण्याच्या जागीं बसलेल्या सर्व मंडळीनें परस्परांस नमस्कार करावा.

१० आषाढी अमावास्येला दिव्याची पूजा करावी. नवरात्रांतही देवीजवळ दिवा ठेवून त्याची पूजा करावी.

एरंडीचें तेल—दिव्यासाठीं एरंडीचें तेल पातळ असेल तितकें चांगलें. तें दुसऱ्या तेलापेक्षां फार कमी जळतें. जवळ जवळ निमे झटलें तरी चालेल. त्याचा प्रकाश मंद व शीतल असून तें काजळ धरीत नाहीं. या तेलांत थोडें राकेल मिसळलें असतां तें जळण्यास चांगली मदत होते. समईचें तेलपात्र दिव्यानें सारखें उष्ण राहत नाहीं. यामुळें हें तेल समईंत चांगलें जळत नाहीं. पंतींत जळतें. रेलवेवर हें राकेलाशीं मिसळून टिनच्या चिमणींत जाळतात. याला जाड, बारीक कशीही वात चालते. रेलवेवर सुताच्या वातीनें हें जाळतात. राकेल स्वस्त मिळूं लागल्यापासून हें तेल फार मागें पडलें आहे.

खोबऱ्याचें तेल—हें कसेंही असलें तरी चालतें, मात्र इतर तेलांचें मिश्रण यांत उपयोगीं नाहीं. याचा प्रकाश मंद व दृष्टीला शीतल असतो; पण तेजस्वी नसतो.

हें बहुधा हंड्या, ग्लास, व कंदील यांतून जाळतात. याला वात ठोसर व जाड लागते. गलासांत अगोदर बरेंचसें पाणी भरून मग त्यांत आपणांस पाहिजे तितकें हें तेल भरतात. अशानें हें तेल ज्योतीच्या अगदीं जवळ पोचतें. याची वात सारणें झाल्यास ती चिमट्यानें धरून वर ओढावी लागते. याचा उपयोग आतां थोडासा विद्यार्थी—मंडळींत व थोडासा श्रीमान् लोकांच्या घरीं आराशीच्या वेळीं होतो. कित्येक मंदिरांतूनही अद्याप हे दिवे लावतात.

खनिज तेलें.

राकेल—या तेलाचे बहुधा पाण्यासारखे पृथ्वीच्या पोटांत झरे[1]

---

१. हे झरे जमिनीखालीं दोनशेंपासून चारशें फूटपर्यंत खणल्यावर लागतात. क्वचित् स्थळीं ते स्वतः जमिनीचा स्फोट करून फवाऱ्यासारखे उंच उडतांना आढळतात.

असतात. हें तेल मूळ झऱ्यांत असतां घट्ट, साधारण प्रवाही, आणि अत्यंत प्रवाही, अशीं त्याचीं तीन रूपें असतात. त्याचीं पेट्रोलियम, रॉक--आईल व नापथा अशीं तीन निरनिराळीं नांवें आहेत. झऱ्यांतून काढल्यावर शुद्ध करण्यासाठीं त्यांस कित्येक संस्कार करावे लागतात. या शुद्ध तेलास केरोसीन ह्मणतात. केरोसीनपेक्षां अधिक शुद्ध केलेलें तें पेट्रोल होय.

हें तेल हवेंत उडणारें व फार ज्वालाग्राही आहे. त्यामुळें घरांत व कारखान्यांत हें फार जपून ठेवावें लागतें. मुलांचा हात राकेलच्या डब्याला पोचणार नाहीं अशा ठिकाणीं तो डबा ठेवणें जरूर आहे. तसेंच आगकाडीची काडी ओढून तीं डब्यांत मुलांना टाकतां येणार नाहीं, अथवा कोणतीही ठिणगी उडून तेथें पडणार नाहीं; अशी खबरदारी घेणें अत्यंत अवश्य आहे.

हिंदुस्थानांत हें तेल ३०।४० वर्षांपूर्वी प्रथम अमेरिकेहून आलें. आतां त्याचा पुरवठा रशिया, ब्रह्मदेश व आसाम यांतूनही होतो.[१] आसामचें आणि ब्रह्मदेशचें हीं दोन्ही तेलें साधारण सारखीं असून गुणाच्या मानानें बाहेरून येणाऱ्या तेलापेक्षां हलक्या प्रतीचीं आहेत. रशियन किंवा बाकू आईल या नांवानें प्रसिद्ध असलेलें तेल याहून वरच्या प्रतीचें आणि अमेरिकन तेल सर्वांत उत्तम असतें. हलक्या प्रतीचें तेल पिंवळ्या रंगाचें व उत्तम प्रतीचें तेल पांढरें स्वच्छ

---

१. ब्रह्मदेशांत या तेलाच्या विहिरी आज २ हजार वर्षांपासून आहेत, पण त्यांचा खरा उपयोग आतां कळूं लागला. आसामांतल्या तेलाचा शोध सन १८७१ मध्यें लागला, पण तें काढण्याचें काम १८९९ मध्यें सुरू झालें. अमेरिकेंतून या तेलाचा पुरवठा शें. १९ व रशियांतून शें. ७५ या प्रमाणांत हल्लीं होत असतो. मोठमोठ्या रेलवेस्टेशनांवरून या तेलाच्या अजस्र टाक्या बांधलेल्या असतात. यांतून डबे भरून तें गांवोगांव पाठविण्यांत येतें.

आणि पाण्यापेक्षां पुष्कळ पटींनीं पातळ व हलकें असतें. हलक्या प्रतीच्या तेलाला धूर व काजळ फार आणि घाणही असते. उत्तम प्रतीच्या तेलांत हे तिन्ही दोष नसतात. पेट्रोलच्या दिव्याच्या प्रकाशाइतका पांढरा, तेजस्वी आणि डोळ्यांना दिपविणारा प्रकाश कोणत्याही तेलाच्या दिव्याचा पडत नाहीं.

बाहेरून येणाऱ्या तेलांच्या डब्यांवर कांहीं नंबर व ट्रेडमार्क (व्यापाऱ्याचे खुणेचे शब्द किंवा चित्र) असतें. त्यांवरून त्यातलें तेल कोणत्या प्रतीचें आहे, तें समजतें. आसामांतलें, ब्रह्मदेशचें तेल या परदेशीय रिकाम्या झालेल्या डब्यांतून भरून येतें.त्यामुळें व्यापारी लोकानां अजाण लोकांना सहज फसवितां येतें. व्यापारी चांगल्या तेलांत वाईट तेल किंवा पाणी मिसळतात आणि डबाही पुरा भरीत नाहींत. एका डब्यांत ४ ग्यालन (१८ शेर किंवा २४ मोठाल्या बाटल्या) इतकें तेल असतें. चांगलें तेल घेणें असेल तर पेटी किंवा डबा मूळचा बंद केलेला असेल, तो वजन करून घ्यावा. डबा उघडून हलकें तेल घालून पुनः बंद केलेला घेऊं नये. डब्यावरील नंबर किंवा ट्रेडमार्क यांजवर भरंवसा धरूं नये.

केरोसिनच्या दिव्यांना साधारणपणें ल्यांप व लहान टीनच्या डब्यांस चिमणी ह्मणतात. पण चिमणी हें नांव वस्तुतः वरच्या काचेच्या नळीचें आहे.केरोसीन तेल हवेंत उडणारें व लवकर पेट घेणारें असल्यामुळें त्याचे दिवेही अर्थात् चांगल्या बंदोबस्ताचे असले पाहिजेत. असे दिवे इंग्लंड, जर्मनी वगैरे परदेशांतून येतात. जर्मन माल भावाला कांहींसा किफायतशीर असतो. या दिव्याचे सामान्यतः चार प्रकार आहेत--१ टांगण्याचे, २ भिंतीला लावण्याचे, ३ भुईवर किंवा टेबलावर ठेवण्याचे आणि ४ कंदील (हातांत धरण्याचे किंवा खांबावर बसविण्याचे).

प्रत्येक दिव्याचीं तीन अंगें असतात. १ रिसीव्हर (तेलपात्र) २ बर्नर (वात ज्यांतून नेली असते तें तोंड) व ३ चिमणी (काचेची नळी). पैकीं बर्नर नेहमीं धातूचा असतो, व चिमणी काचेची असते. तेलपात्र धातूचें, काचेचें किंवा चिनी मातीचें असतें. कांहीं दिव्यांना चिमणीवर आणखी ग्लोब असतो. भिंतीला लावण्याच्या दिव्यांचा प्रकाश चांगला फाकावा ह्मणून चिमणीच्या मागें रिफ्लेक्टर लावलेला असतो. हा काचेचा किंवा चकचकीत धातूचा असतो. कंदिलाचे प्रकारांत दिवसेंदिवस पुष्कळच भर पडत आहे.

या ल्यांपांना कापसाच्या साध्या वाती चालत नाहींत. त्या दड्स, जाड, नवारीसारख्या असाव्या लागतात. त्या गोल, चपट्या, जाड्या, बारीक, रुंद, अरुंद अशा अनेक प्रकारच्या, यंत्रांवर विणून तयार केलेल्या असतात. किटनसारख्या ल्यांपांत वातीचीही गरज नसते. तेलाचा ग्यास (वायु) होऊन तो जळावा अशी तजवीज त्यांत असते.

केरोसिन तेलाच्या तेलवातीस पुढील सामान लागतें:—तेलाची बाटली, तेल काढण्याचा पंप, नरसाळें, कातर, आगपेटी, फडकीं, ब्रश, चुना किंवा चॉक इ०

प्रथम डब्यांतून पंपानें एका नसराळ्यांतून बाटलींत तेल ओतून घ्यावें, आणि डब्याचें तोंड बंद करून डबा दूर ठेवावा. तेल काढणें झाल्यावर पंप डब्यांतच राहूं न देतां बाहेर काढून पुसून ठेवावा, आणि मग त्या बाटलीनें ल्यांपच्या तेलपात्रांत नरसाळें ठेवून त्यांतून तेलपात्रांत बेताचें तेल घालावें. तें अगदीं तोंडोतोंड भरूं नये.

काचेचें सामान—चिमणी, ग्लोब, रिफ्लेक्टर वगैरे काचेचें सामान झाडून त्यावरील केर, धुरकट, माती वगैरे काढून टाकावी. एकाद्या वस्तूवर डाग पडला असेल, तर तो ब्रशानें घासून काढावा.

ती सगळीच वस्तु फार धुरकटली असेल, तर तिला राखेचें, गुळाचें किंवा चुन्याचें पाणी अथवा टरपेंटाईन चोळून स्वच्छ पाण्यानें धुवावें आणि कोरडें करावें. रोज रोज चिमण्या धुण्याचें कारण नाहीं; किंबहुना रोज त्या धुवूं नये हें चांगलें. चिमण्या फार फुटतात त्या झिजून कधींच फुटत नाहींत. हेळसांडीनें अगर गैरसावधपणानें फार फुटतात. चिमण्या फुटण्याचीं कांहीं कारणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहे.

१ चिमण्या चांगल्या जातीच्या काचेच्या नसणें. चांगल्या चिमण्या बहुधा पातळ व टणक असतात, आणि त्यावर डिटमार सारख्या चांगल्या नामांकित कारखानदाराचें नांव व खूण असते. जाड चिमणी दिसण्यांत सफाईदार दिसत नाहीं आणि लवकर फुटते.

२ चिमणी ओली असतांच दिव्यावर ठेवून दिवा लावणें.

३ दिव्याची वात मोठी असतां चिमणी वर बसविणें. व चिमणी घालतांच एकदम दिव्याची वात मोठी करणें.

४ वात नीट न कातरणें. अर्थात् ज्योतीचा झोक एकाच कडेला जाऊन ती बाजू अधिक तापून चिमणी तडकते.

५ ज्योत फार मोठी करणें.

६ वाऱ्याचा एकदम मोठा झटका लागणें इ०.

चिमण्या फुटूं नयेत ह्मणून पुढील युक्ति करून पाहण्यासारखी आहे. चुलीवर थंड पाण्याचें पातेलें ठेवून त्यांत कोऱ्या चिमण्या घालाव्या, आणि खालीं मंद आंच लावावी. हळू हळू तें पाणी कढत होऊं द्यावें. पाणी चांगलें तापलें ह्मणजे खालीं काढून निवत ठेवावें आणि गार झालें ह्मणजे चिमण्या काढून चांगल्या पुसाव्या, व मग उपयोगांत आणाव्या.

ल्यांपचे धातूचे भाग ह्मणजे बर्नर, तेलपात्र वगैरे चांगले पुसून साफ करावे. बर्नरवरील लहान लहान छिद्रें मळ सांचून बुजलीं असतील, तर तीं सुईनें साफ करावीं.

उंची प्रतीचे ल्यांपांत हलक्या प्रतीचें तेल भरूं नये. पाहिजे तर लिहिण्या-वाचण्याचे वेळीं घेण्याचे ल्यांपांत व त्याचप्रमाणें उठण्या-बसण्याच्या जागेच्या ल्यांपांत उंची प्रतीचें आणि इतर ल्यांपांत हलक्या प्रतीचें तेल वापरावें. लहानशा घरांत जेथें पुष्कळ दिवे लावावयाचे नसतात, तेथें सगळ्याच दिव्यांतून उंची तेल वापरणें चांगलें. कित्येक ल्यांपांबरोबर त्यांत भरण्याच्या तेलाचें व त्यापासून पडणाऱ्या प्रकाशाचें प्रमाण[1] दिलेलें असतें. अशा वेळीं त्या दिलेल्या प्रमाणानेंच तेल भरणें योग्य होईल. तेलपात्रांत पूर्वींचें तेल असेल व तें घामट झालेलें असेल, तर तें काढून घेऊन हलक्या प्रतीच्या ल्यांपांत भरावें आणि तेलपात्र आंतून स्वच्छ करून मग स्वच्छ तेल त्यांत भरावें. तेलपात्र काचेचें असेल तर आंतलें तेल पिंवळें झालेलें व आंत केरकचरा पडलेला बाहेरून स्वच्छ दिसतो. तेलपात्र काचेचें नसलें, तर मात्र थोडेसें तेल काढून पहावें लागतें.

वात बर्नरच्या बेताची असावी. ती सैल असूं नये व घट्टही होऊं नये. ती तेलांत बुडालेली असली पाहिजे, पण तळाला पसरेल इतकी लांब नसावी. नाहीं तर तेलांतला साक तिच्यांत जमतो आणि पुढें ती जळण्यास निरुपयोगी होते. वातीचा जळका भाग खालीं थोडी जागा ठेवून साफ व सरळ कातरावा किंवा काडीनें

१ या प्रमाणाला क्यांडल पॉवर ह्मणतात. हें प्रमाण साधारणपणें चरबीच्या मेणबत्तीची चरबी दर तासास १२० ग्रेन किंवा जवळ जवळ ८ मासे जळून जो प्रकाश पडतो, त्यावर बसविलेलें असतें.

कुरतडून टाकावा. बोटांनीं तें काम करूं नये. वातीला मध्यें मध्यें खंड किंवा दांते राहूं देऊं नयेत; किंवा कोणत्या एखाद्या भागाला लहान मोठें टोंक करून ठेवूं नये.

असलेली वात संपायला आली किंवा फार मेणचट किंवा मळकी झाली ह्मणजे बदलावी. पावसाळी किंवा दमट हवा असली, तर वात घालण्यापूर्वी ती चांगली वाळवावी; आणि ती लावण्यापूर्वी तेल शोषून घेण्याकरितां थोडा वेळ मध्यें जाऊं द्यावा.

वात घातल्यावर बर्नर तेलपात्रावर घट्ट बसवितांना त्यापासून वात आंत पिळवटूं देऊं नये.

आगकाड्या ज्यास्त खर्च होतील ह्मणून एका ल्यांपावरून दुसरा ल्यांप लावणें बरेंच धोक्याचें आहे. एकदम सगळे ल्यांप लावून मग त्यांवर भराभर चिमण्या घालणेंही तसेंच वाईट आहे. एकेक ल्यांप एकेका काडीनें लावून लागलीच त्याच्यावर चिमणी बसवावी. लावतांना वात खालीं करावी. बर्नर ऊन झाला ह्मणजे ज्योत आपोआप मोठी होते. मग पाहिजे तर वात हळू हळू वर करावी. चिमणी घातल्याबरोवर एकदम ती वर करूं नये.

केरोसिन तेल अलीकडचें असल्यामुळें त्याच्या संबंधानें जुने आचार विचार कांहीं नाहींत. हा दिवा वाटेल त्या दिशेला तोंड करून ठेवावा. तथापि आरोग्याच्या दृष्टीनें कांहीं नियम पाळणें अवश्य आहेत. ते हेः—

(१) केरोसिन तेल खाण्यांत येऊं नये. तें विषारी नाहीं, तथापि त्यापासून मळमळतें आणि वांति होते.

(२) याचें काजळ किंवा धूर नाका-तोंडांत आणि विशेषेंकरून डोळ्यांत जाणें चांगलें नाहीं. त्याचें रज उडून पात्रावर पडूं देऊं नयेत.

(३) बाळंतिणीच्या खोलींत आणि लिहितां-वाचतांना बिन-चिमणीचा खुला दिवा ठेवूं नये.

(४) लहान मुलांच्या जवळ आणि त्यांचा हात पुरेल अशा रीतीनें हा दिवा ठेवूं नये. त्या योगानें त्यांच्या दृष्टीला अपाय होतो, आणि एखादे वेळीं त्यांनीं तो ओढून घेतल्यास किंवा पाडल्यास कपडे पेटण्याची व अंग भाजण्याची भीति असते.

(५) लहान व कोंदट हवेच्या खोलींत मोठ्या ज्योतीचा दिवा लावून ठेवूं नये. कारण, त्यानें हवा दूषित होते. ठेवणें झाल्यास निदान ज्योत लहान करून ठेवावा.

प्राणिज तेलें.

प्राणिज तेलांचे दिवे घरोघरीं करतां येणें शक्य नाहीं, अर्थात् त्यांची तेल-वात कशी करावयाची तें सांगावयाला नको. पण हे दिवे कसे असतात, याविषयींची थोडीशी त्रोटक माहिती दिली असतां ती अस्थानीं होणार नाहीं.

प्राणिज तेलांत मधमाशांनीं केलेलें मेण, चरबी, कांहीं माशांचें तेल, वगैरेंचा समावेश होतो. मेण, चरबी व प्राण्याच्या शरीरापासून निघालेलें तेल हीं सगळीं मधासारखीं दाट असतात, व तीं स्वतः घट्ट होतात किंवा कृतीनें घट्ट करतां येतात. हीं एकसारखींच असल्यामुळें सोईसाठीं यांना एकच मेण हें नांव आपण देऊं.

मेणबत्ती—वर लिहिलेल्या मेणांच्या तीन प्रकारांपैकीं एकही प्रकार एकदम पेट घेणारा नाहीं. वातीशिवाय नुसतें पेटविलें असतां तें ज्योत धरीत नाहीं. त्याचा घट्ट गोळा वातीस लावून नुसता ठेविला आणि वात पेटविली तर वातीची ज्योत त्या गोळ्यास सारखी लागणार नाहीं, आणि अर्थात्च ज्योत लवकर विझेल. ह्मणून मेण

सगळ्या वातीला बेतानें चोपडणें आणि वात सरळ उभी राहील असें करणें भाग पडतें. आपणं नेहमीं पाहतों कीं मेणबत्ती पेटविल्या-बरोबर ती चांगली जळत नाहीं. तिची ज्योत अगोदर मंद असते, व अमंळशानें ती आपोआप वाढून चांगला प्रकाश पडतो. याचें कारण हेंच कीं मेण घट्ट असतें तें वितळून वातीच्या रंध्रांतून वर चढून येईपर्यंत त्याचा पुरवठा मिळत नाहीं. तो मिळाल्याबरोबर ती चांगली जळूं लागून उत्तम प्रकाश पडतो. नंतर या ज्योतीखालीं एक वाटी बनत जाते. तींत थोडें थोडें मेण वितळून तें एकसारखें वातीला पोंचतें आणि त्यामुळें ती वात शेवटपर्यंत सारखी जळत राहते.

मेण मळून किंवा पातळ मेणांत वात बुडवून अशा दोन्ही रीतींनीं मेणबत्त्या करतात. दुसऱ्या रीतीनें केलेल्या मेणबत्त्या ज्यास्त सुंदर व सफाईदार बनतात. ह्मणून हीच रीत ज्यास्त प्रचारांत आहे.

प्राणिज मेणाच्या दिव्याची कृति मेणबत्त्यांच्या रूपानें साधली, तेव्हां त्याच कृतीनें उद्भिज्ज आणि खनिज तेलांत जें एक मेणासारखें द्रव्य निघतें त्याच्याही मेणबत्या करूं लागले. या मेणांचें पुढील कांहीं निरनिराळे प्रकार आहेत.

उद्भिज्जांचे–(१) झाडांचा चीक-उदा०-राळ.

(२) स्टीरीन-हें खोबरेल व दुसरी घट्ट होणारीं तेलें यांपासून करतात. हा पदार्थ चरबींतून ही काढतात.

खनिजांचें–यांत पाराफीन श्रेष्ठ आहे. हेंही मेणासारखेंच एक द्रव्य आहे. हें दगडी कोळशांच्या खाणींत सापडतें.

पूर्वीं आपल्या देशांत मधमाशांच्या मेणापासून मेणबत्त्या करीत

असत. पण आतां तो प्रचार विरळ आहे. मेणबत्त्यांचा सर्व पुरवठा युरोप व अमेरिका यांतूनच बहुधा होत असतो. अमदाबाद येथें व आणखी एक दोन ठिकाणीं मेणबत्त्या करण्याचे कारखाने अलीकडे निघाले आहेत. पण तेथील मेणबत्त्या ठिसूळ असतात, आणि त्यांचें मेण व पाराफिन जपानांतून किंवा बाहेरील देशांतून आणिलेलें असतें. ब्रह्मदेशांत राकेल निघाल्यापासून तिकडे पाराफिनच्या मेणबत्त्या होऊं लागल्या आहेत. सहासहा मेणबत्त्यांचा एकेक पुडा असे पुडे घातलेल्या पेट्या बाजारांत मिळतात. त्या पुड्यांवर व पेट्यांवर कारखानदाराचें नांव व खूण असते. त्यावरून मालाचा गुण ओळखावा लागतो. यांत लबाड व्यापाऱ्यांना फसवेगिरी करण्याला सांपडते. ह्मणून केवळ वरच्या भपक्यावर न जातां एखादी मेणबत्ती प्रत्यक्ष जाळून खात्री करून घ्यावी.

मेणबत्त्या आकारानें जाड, बारीक, लहान मोठ्या, व निरनिराळ्या रंगांच्या मिळतात. पण तिचा उत्तमपणा जो आहे तो, ती ज्या द्रव्याची केली असेल त्यावर, आणि करण्याच्या कृतीच्या चांगुलपणावर, आहे. चांगल्या मेणबत्तीचें साधारण लक्षण ह्मणजे तिची वात वरपासून खालपर्यंत सारखी मधोमध असली पाहिजे. ती कलती असली तर एकाच बाजूचें मेण ज्यास्त वितळून फुकट जाईल. तिचें मेण सर्व ऋतूंत सारखें टणक राहिलें पाहिजे. तें उन्हाळ्यांत पातळ होऊं नये, व तिचें मेण पांढरें स्वच्छ असून, ती जाड असावी.

---

१ जगन्नाथ, व मेवाडांतील श्रीनाथजी यांच्यासारख्या जुन्या देवालयांतून अशा मेणबत्त्या अद्यापही करतात, आणि वापरतात. या दिसण्यांत पिंवळ्या आणि साधारणपणें खडबडीत असतात. त्या केवळ हातांत धरून इकडे तिकडे नेण्याच्या कामीं येतात.

मेणबत्ती जळतांना तिच्यांतच तेलाची वाटी ज्योतीच्या खालीं तयार होत असते ह्मणून वर सांगितलेंच आहे. अर्थात् मेणबत्तीला निराळें तेलपात्र लागत नाहीं. पण मेणबत्ती उभी ठेवण्याला कांहीं आधार लागतो. याला शमादान अथवा शामदान ह्मणतात. हें धातूचें किंवा चिनी मातीचें केलेलें असतें. यावर काचेची हंडी किंवा गलास घातल्यानें मेणबत्तीचें वाऱ्यापासून रक्षण होतें व तिचें मेण एकाच बाजूनें जळत नाहीं. अलीकडे राकेल तेल निघाल्यापासून मेणबत्त्या कांहींशा मागें पडल्या आहेत. तथापि अजून श्रीमंतांच्या येथें हंड्या, झुंबरें, शामदानें वगैरे क्वचित् दिसतात.

मेणबत्ती एकाच बाजूनें जळूं नये व तिचें मेण वितळून खालीं वाहून फुकट जाऊं नये ह्मणून एका पोकळ दांड्यांत स्प्रिंग घालून तिच्यावर बेताची मेणबत्ती दाबून बसवितात. या दांड्याचें तोंड असें केलें असतें कीं मेणाला उष्णता तर पोंचावी, पण ज्योत प्रत्यक्ष लागूं नये. दांड्यांतली मेणबत्ती वरून जसजशी जळत जाते, तसतशी खालच्या स्प्रिंगच्या जोरानें ती हळूहळू आपोआप वर येते. या युक्तीनें मेण अगदीं फुकट जात नाहीं व मेणबत्ती अधिक वेळ पुरते. या दांड्याला खालीं रुंद बैठक असून, वर काचेचा लहान ग्लोब घातलेला असतो. याला मेणबत्तीचा स्टयांड किंवा एक्का ह्मणतात.

मेणबत्तीसारखा थंड, संथपणानें जळणारा, व दृष्टीला प्रसन्नता देणारा दुसरा दिवाच नाहीं. त्याचें काजळ पडत नाहीं, धूर पसरत नाहीं व घाण येत नाहीं. मेणबत्ती सहज हातांत धरून वाटेल तिकडे नेतां येते. तिच्यांत दुर्गुण असा एकही नाहीं.

मेणबत्तीचा आतां सोंवळ्यांतही प्रवेश झालेला दिसतो. देवाजवळ व भोजनसमारंभांत ती निःशंकपणें लावतात. क्वचित् फार

सोंवळीं माणसें मात्र तिला शिवत नाहींत. मेणबत्त्या चरबीसारख्या अस्पृश्य पदार्थांच्या केल्या जात असतांही, त्यांचा सोंवळ्यांत सुद्धां इतका लवकर प्रवेश होण्याचीं कारणें त्यांच्या अंगचे गुण व सौंदर्य हीं होत.

दिव्यांचे विशेष प्रकार—वर सांगितलेले दिव्यांचे सामान्य प्रकार झाले. यांशिवाय त्यांचे विशेष प्रकार आहेत. ते असे:—

१ अखंडदीप—कांहीं लोकांच्या घरीं नवरात्रांत देवांजवळ अहोरात्र समई जळत ठेवण्याची चाल असते. ही जागेवरून हलवावयाची नसते. तसेंच वातही बदलावयाची नसते. ही समई जागचे जागीं दिव्याला धक्का न लागतां व ज्योत जाऊं न देतां पुसण्यास हरकत नसते. न पुसली तर तेलाचा गाळ, व चिकटा समईंत राहून खालीं काजळ व कोळीव पडलेलें, व तेल गळालेलें, तसेंच राहून सगळा ओंगळपणा माजेल. देवाजवळ तरी असा ओंगळपणा कामाचा नाहीं. यासाठीं हा दिवा व त्याचें ताट हीं युक्तीनें पुसावीं.

२ नंदादीप—कांहीं जुन्या देवळांतून देवाजवळ एक किंवा दोन मोठाल्या उंच समया सारख्या अहोरात्र जळत ठेविलेल्या असतात; याला नंदादीप ह्मणतात. या दिव्यांत ज्योत अखंड राहावी येवढाच नियम असतो. समई बदलणें, दिवा जागेवरून हलविणें वगैरे संबंधानें विशेष नियम नसतो.

३ दीपमाळ—कांहीं देवालयांतून लांकडी किंवा पक्की बांधलेले दीपस्तंभ असतात. त्यांवर पायऱ्यांसारख्या जागा केलेल्या असून,

१ हिंदु लोकांची गुणग्राहकता स्पृश्यास्पृश्य दोषांच्या विचारानें निगडित नसल्याचीं आणखी पुष्कळ उदाहरणें देतां येतील. उदा०—हस्तिदंत, वाघनखें, गाईच्या केसांच्या चवऱ्या, मृगाजिन, कस्तुरी, पोंवळीं, मोत्यें, रेशीम, सांबरशिंग इ०. वस्तु त्यांच्या सोंवळ्यांत खुशाल चालतात.

त्यांवर पंत्या ठेवून लाविल्या ह्मणजे दिव्यांच्या झाडाची शोभा त्याला येते. ही दीपमाळ उत्सवप्रसंगीं फक्त लावतात.

४ **आकाशदिवा**—घराच्या उंच भागावर एखाद्या बांबूला कागदाचा कंदील लटकावतात, त्याला आकाशदिवा ह्मणतात. दिवाळींत व कार्तिक महिन्यांत हे दिवे अद्यापही मुलें हौसेनें लावतात. पूर्वी पहाटेस कार्तिक स्नानाला वृद्ध बाया जात असत, त्यावेळीं त्यांना या दिव्यांच्या उजेडापासून कांहीं मदत मिळे.

५ **सभादीप**—श्रावणीला व इतर कित्येक धार्मिक कृत्यांचे वेळीं कणिकेचा दिवा करून त्यांत तेलवात घालून हा दिवा लावतात, आणि सुवासिनी स्त्रिया तो ब्राह्मणांस देतात. या दिव्यांच्या कणिकेंत थोडी हळद घालतात. हा दिवा विझवावयाचा नसतो.

६ **उकडीचे दिवे**—दिव्याच्या अवसेला कणिकेंत गूळ साखर घालून पंतीच्या आकाराचे करून ते उकडतात, आणि दिव्याला त्यांचा नैवेद्य दाखवून मग तो प्रसाद ह्मणून खातात.

७ **पुरणाचे दिवे**—कोंकणस्थ ब्राह्मणांत बोडणाचे वेळीं हे करतात.

८ **लक्षवाती**—देवापुढें लक्ष दिवे लावण्याची ऐपत नसते. ह्मणून बायका लक्ष दिव्यांच्या ऐवजीं लक्ष वाती करून, त्या त्रिपुरी पौर्णिमेला तूप घालून शंकरापुढें लावतात. अलीकडे ही चाल बहुतेक मोडली आहे.

९ **हिलाल आणि मशाल**—मोठ्या झगझगीत प्रकाशाचीं जुन्या काळचीं साधनें तीनच दिसतात— १ सरक्यांचे दिवे, २ हिलाल, आणि ३ मशाल. कोंकणांत मशालीच्या जागीं खोबऱ्याच्या वाड्या जाळतात. मशालीचा दांडा आखुड व हिलालाचा लांब असतो. दोन्हींत दांड्याला फडकीं गुंडाळून तीं तेलानें पेटवितात. उंच

स्वारींत हिलालांचा व पादचारी मिरवणुकींत मशालीचा उपयोग होतो. पूर्वीं मशाली बरोबर चालविणें हें श्रीमंतीचें लक्षण समजलें जात असे. मशाली धरण्याचें काम न्हाव्याचें असे. अजूनही कित्येक ठिकाणीं ही मशालीची चाल आहे. ही चाल महाभारताच्याही पूर्वींची दिसते. महाभारतांत मशालींचा उल्लेख आहे.

१० **गुबारे**—मशाल उलटी करून तिच्यावर कागदाचा उंच घुमट लाविला असतो. मशाल पेटविली ह्मणजे तिच्यापासून उत्पन्न होणाऱ्या ग्यास (वायु) च्या जोरानें तो घुमट उंच उडत जातो व मोठी मौज दिसते. मशाल विझली ह्मणजे तो आपोआप खालीं उतरत येऊन कोठें तरी पडतो. असे गुबारे अजूनही दिवाळीचे वेळीं व इतर आनंदोत्सवाचे वेळीं दारूकामाबरोबर पुष्कळ लोक सोडतात.

११ **ग्यासचे व विजेचे दिवे**—ग्यासचे दिवे निघून पुष्कळ वर्षें झालीं. विजेचे दिवे अलीकडे प्रचारांत आले आहेत. हे दोन्ही दिवे यंत्रानेंच होणारे असून त्यांत तेलवातींची जरूरी नसते. किटसनचा दिवा हा एक प्रकारचा ग्यासचाच दिवा आहे. त्यांची कृति वगैरे शास्त्रीय विषयावरील पुस्तकांतूनच समजून घेतली पाहिजे.

प्रकरण १४ वें.

विड्याचे सामानाची व्यवस्था.

विड्याचें सर्व सामान एके जागीं ठेवण्यासाठीं तबक किंवा एक विशेष प्रकारचा डबा असतो.

तबक—यांत सुपारी, कात, चुना वगैरे ठेवण्यासाठीं लहानमोठ्या डब्या, आडकित्ता, आणि पानपूड ठेविलेलें असतें. या तबकाचे कांठ

१ चिनी लोकांत ग्यासचे दिवे फार जुन्या काळापासून माहीत आहेत.

गोल खरबुजी असतात. मराठेशाहींत नाशिक, झांशी आणि सागर येथें हीं तबकें फार सुंदर व डौलदार बनत असत. आजकाल हीं तबकें बारीक पत्र्याचीं ठशांनीं वर फुलें-पानें वगैरे उठविलेलीं मिळतात.

डबा---तीस चाळीस वर्षांपूर्वी पानसुपारीचे पितळी डबे प्रचारांत आले. या डब्यांत खालच्या पोकळ भागांत पानें व वरच्या पाळ्यांत निरनिराळ्या खणांतून सुपारी, कात, लवंगा, वेलदोडे वगैरे, वरील तबकडींत चुना आणि त्यावर अडाकित्ता ठेवण्याची सोय असते. हे डबे आतां मागें पडले आहेत.

पानदान—हें पानें ठेवण्यासाठीं गोल किंवा एका बाजूला रुंद गोल व पुढें निमुळतें होत गेलेलें असें विड्याच्या पानाच्या आकाराचें असतें. त्याला खालीं पाय असून वर शोभेसाठीं राघू, मैना वगैरे चित्रें बसविलीं असतात. या पानदानांत एका तबकडीला लहान लहान भोंकें ठेवून त्यांत बुटकुलीवजा लहान लहान झांकणाचीं भांडीं कात, चुना वगैरे सामान ठेवण्यासाठीं घातलेलीं असतात. अडकित्ता आणि पानें वरील पोकळींत ठेवतात. हा पानदानाचा रिवाज मुसलमानांत व त्यांच्या पद्धतीनें राहणारांत विशेष आहे.

किश्ती आणि तशतरी—हीं एक प्रकारचीं तबकेंच आहेत. किश्तीचा घाट नावेसारखा दीर्घ वर्तुळ असून, त्या लहान मोठ्या आकृतीच्या असतात. तशतरी गोल असते. अलीकडे अशा प्रकारचीं तबकें सुंदर रोगण व रंगीत चित्रें काढलेलीं जर्मनींतून येऊं लागलीं आहेत. हीं स्वस्तही मिळाल्यामुळें त्यांचा खप मोठा आहे.

ट्रे—हें इंग्रजी तऱ्हेच्या तबकाचें नांव आहे. जेथें इंग्रजी फ्याशनचा प्रचार जास्त आहे, तेथें तबकाऐवजीं ट्रेचा उपयोग विशेष करण्यांत येतो.

थैली, चंची, बटवा—यांतूनही विड्यांचें सामान पूर्वी ठेवीत असत. थैली कापडाची निरनिराळ्या खणांची असे. जेव्हां मुलांच्या हातीं पानसुपारी पडूं नये अशी मोठ्यांची व आपलें पानसुपारी खाणें वडील माणसास कळूं नये अशी मुलांची मर्यादा असे. त्या-काळीं थैली फार उपयोगाची असे. आतां थैलीचीं सुधारलेलीं दोन रूपें दिसतात. एक दक्षिणेंत चंची हें, व दुसरें उत्तरेस बटवा हें. चंची व बटवा हीं निरनिराळ्या प्रकारचीं चित्रविचित्र रंगांचीं व नानाप्रकारें केलेलीं मिळतात.

चुनाळें—हीं कैरी, चक्री, लिंबू, खरबूज यांच्या व इतर कित्येक सुंदर आकृतींचीं आणि घाटांचीं असत. हीं जाड असून त्यांच्यांत ठेविलेला चुना सहा सहा महिने वाळत नसे असें सांगतात. पण हीं चुनाळीं महाग पडत व त्यांचीं तोंडें लहान असल्यामुळें दरवेळीं चुना कोरींत बसण्याचा त्रास पडे. ह्मणून त्यांच्याऐवजीं लहान लहान डब्या प्रचारांत आल्या.

कातदाणी—हिचे दोन प्रकार असत. एक गोल आकाराची. दोन पुडांची, झाकणाचीं असून एका पुडाला एके जागीं चाळणी-सारखीं चारसहा लहान लहान भोंकें पाडलेलीं असत. दुसरें पूड त्यावर आच्छादनासारखें असे. तें मळसूत्रानें त्या भोंकांच्या वरून मागेंपुढें सरकावितां येत असे. या तऱ्हेच्या कातदाण्या अजूनही कोठें कोठें दिसतात.

दुसरी एक कातदाणी उंच कोठीवजा असे. तिच्या झांकणाला मध्यभागीं भोंकें पाडून त्यावर तेथेंच फिरतें झांकण बसविलेलें असे. या तऱ्हेच्या कातदाण्या हल्लींही कोठें कोठें आहेत.

पानपुडा—हा बांबूचा केलेला असतो. शोकी लोक त्यावर बनात व गोटाही लावतात. पूर्वी पितळेचीं पानपुडें असत. तीं

आतां प्रचारांतून जाऊन, त्या जागीं साधे गोल किंवा पानाच्या आकाराचे डबे ठेवण्याची चाल पडली.

अडकित्ता—हा लोखंडी, पितळी किंवा चांदीचाही करतात. तरी त्याचें पातें पक्क्या पोलादाचें असावें लागतें. कित्येक पातीं इतकीं तीक्ष्ण असतात कीं, त्यांनीं पैशाचेही तुकडे करतां येतात. अडकित्ते सरळ, वांकलेले किंवा मोराच्या मानेसारखे असतात. ते लहानमोठे वाटेल त्या आकारांचे मिळतात. अलीकडे काफी दळण्याच्या यंत्रासारखीं सुपारी बारीक दळण्याचीं यंत्रें निघालीं आहेत. खराती (लेथ)वर धरूनही सुपाऱ्यांचे पातळ पापुद्रे काढतां येतात. कित्येक लोक खलबत्यांत घालून सुपारी कुटतात. अडकित्ते टेंभुरणी, तळेगांव, बुलढाणा, अलीगड वगैरे कित्येक ठिकाणीं फार चांगले होतात, अशी प्रसिद्धि आहे. होळकरशाहींत रामपुरा जिल्ह्यांत खडावद्याचे अडकित्ते प्रसिद्ध आहेत.

अडकित्त्याचा उपयोग सुपारी कातरण्याकडेच करावा. त्यानें कात फोडूं नये. त्यानें पात्याची धार बोथटते. त्याच्या आकाराच्या मानानें मोठी सुपारी फोडूं नये. तसें केल्यास त्याचें पातें वांकडें पडून, मग तें सुपारी कातरतांना बोटावर येतें, किंवा पात्यास खांडें पडतात.

स्वच्छता--विडयांचीं उपकरणीं ह्मणजे तबक, डबा इ० हीं नेहमीं स्वच्छ ठेविलीं पाहिजेत. विशेषत: चुनाळें फार किटत असतें. त्यामुळें त्याचें झांकण लागेनासें होतें, आणि मग चुना वाळून खराब होतो. यासाठीं तें वरचेवर स्वच्छ करीत जावें.

विड्याचें सामान.

विड्याच्या सामानांत पानें, चुना, कात, सुपारी, व लवंग हे जिन्नस अवश्य; आणि वेलदोडे, खोबरें, बदाम, जायफळ, जायपत्री,

केशर, कस्तुरी, शीतळचिनी, कापुर, पेपरमिंट, गुलाबपाणीं किंवा केवड्याचें पाणी, यांचा उपयोग इच्छेवर अवलंबून आहे.

विड्याचीं पानें–यांना नागवेलीचीं पानें असें दुसरें नांव आहे. हीं हिंदुस्थानांत बहुतेक सर्व प्रांतांतून होतात. नागवेलीच्या पानांचे मळे असतात. त्यांना पानमळे किंवा पानड्या ह्मणतात. या पानाला सूर्याचें ऊन अगदीं खपत नाहीं. ह्मणून हे मळे चोहींबाजूंनीं आच्छादावे लागतात. नागवेलींना पानें बाराही महिने येतात. तरी उन्हाळ्याच्या आरंभीं त्यांचा विशेष बहर असतो. एकादा पाऊस पडला ह्मणजे तीं अंमळ दळ धरूं लागतात, आणि खाण्यासारखीं होतात. ह्मणून नागपंचमी झाली कीं नवीं पानें खाण्यास सुरुवात करण्याचा जुना रिवाज आहे.

पानांच्या जाती–अनेक आहेत. तरी त्यांतल्या ठळक जाती येणेंप्रमाणें आहेत–

१ लांबट पानाची–हिचें दळ कोमल, शिरा बारीक आणि दबलेल्या, वर्ण पांढरा आणि रुचि स्वादिष्ट असते. उत्तर हिंदुस्थानांतलीं कपुरी, महाराष्ट्रांतलीं दक्षिणी, गुजराथेंतलीं गंगेरी, काशीचीं मघई, व मध्यप्रांतांतलीं रामटेकचीं, अशा याच्या पांच ठळक पोटजाति आहेत.

२ रुंद पानाची—हिचें दळ जाड, शिरा वर निघालेल्या, वर्ण पिंवळा किंवा दूर्वादलासारखा पांढुरका, रुचि तुरट, तिखट, किंवा कडू असते. हिच्यांत माळवी किंवा चोराणी, मंद्राजी (मद्रासी) व बंगाली अशा तीन पोट जाती आहेत. मद्रासी व चोराणी पानांतला भेद पुष्कळ वेळां ओळखतां येत नाहीं. स्वादावरून मात्र मद्रासी पान तेव्हांच ओळखतां येतें. मद्रासी पान खाल्लें ह्मणजे ढेकूण चिरडल्यासारखा वास येतो.

पान चांगलें कोणतें व त्याच्या अंगीं कोणते गुण असावेत, हें सांगणें कठीण आहे. कोणाला पान मऊ असलेलें आवडतें, तर कोणी ह्मणतात कीं, असलें निःसत्व पान बकऱ्यांच्याच खाण्याच्या उपयोगाचें आहे! यांच्या दृष्टीनें उत्तम पान ह्मणजे जें फेंकून मारलें असतां तुकडे तुकडे होतात तें होय. तथापि पानांचा उत्तमपणा[1] ह्मणजे साधारणपणें असा आहे कीं, तें दळदार असून, त्याच्या शिरा जाड व वर निघालेल्या नसाव्या. वर्ण हिरवा काळसर नसावा; मध्यें खळगा असूं नये; त्याला वाईट वास, अति तीक्ष्णता किंवा चरबटपणा नसावा.

पानांची निगा राखण्यासंबंधानें पुढील गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेतः—

(१) पानाचें देंठ कायम आहे तोंपर्यंत तें पुष्कळ दिवस टिकतें. पान सडूं लागण्याला प्रारंभ देंठाकडून होतो. सडूं लागलेला भाग कातरीनें कापून टाकला, तर राहिलेला भाग आणखी कांहीं दिवस टिकतो. कापण्याचें काम बोटांनीं मात्र करूं नये.

(२) लांबट जातीच्या पानाला पाणी अगदीं सोसत नाहीं. ते लागलें तर तीं नासूं लागतात. ह्मणून तीं नुसतींच केळीच्या किंवा दुसऱ्या कसल्या तरी पानांत किंवा नरमशा रोगणाच्या कापडांत गुंडाळून ठेविलीं किंवा तशींच डब्यांत ठेविलीं, तर नासत नाहींत. मात्र डब्याचें झांकण त्यांना दडपून टाकण्यासारखें लावूं नये. उलट रुंद पानाच्या जातीला पाणी सदोदित पाहिजे. तें मिळालें नाहीं तर पानें म्लान होतात व त्यांची रुचि जाते. ह्मणून अशा जातीचीं पानें पाण्यांत घालून ठेवावीं, किंवा फडकें पाण्यानें चांगलें तर्र

१ पर्णं पुराणमकटु क्षुल्लकं तनुपांडुरम् । विशेषाद्गुणवत् ज्ञेयमन्यद्धीनगुणं मतम् ॥

भिजवून त्यांत गुंडाळून ठेवावीं. फडकें सुकेल तसतसें पुनः पुनः त्यावर पाणी घालीत जावें. पानें दडपून ठेवूं नयेत. त्यानें तीं उबतात.

पानें पानमळ्यांतून चांगलीं ताजीं पाडाचीं आणण्याची सोय सगळ्यांनाच नसते. त्यांना तीं बाजारांतून तांबोळ्याच्या दुकानांतून घ्यावीं लागतात. पुष्कळ तांबोळी सर्व प्रकारच्या पानांची भेसळ करून त्यांच्या गड्डया लावून ठेवतात. त्या लावतांना वरचें पान तेवढें चांगलें लावून आंत सगळा गाळ भरतात, किंवा अन्यतऱ्हेनें लबाडी करून वाईट माल गिऱ्हाइकाच्या पदरीं घालतात. यासाठीं पानें विश्वासावर न घेतां तीं स्वतः नीट पाहून घ्यावीं. यासंबंधानें पुढील गोष्टी लक्षांत टेवाव्या—

(१) पानें होतां होईल तों देठाचीं घ्यावीं. देवापुढें विडा ठेवावयाचा असतो, त्याला तर देठाचेंच पान लागतें. पानांची जात पाहून ओळखतां न आली तर तुकडा मोडून चाखून पहावा.

(२) एकाच जातीचीं सगळीं पानें घ्यावीं.

(३) पानें नेंहमीं मिळण्यासारखीं असतील तर पुष्कळ दिवसांचा संग्रह एकदम करून ठेवूं नये.

(४) तांबोळ्यानें लाविलेल्या चळतींतून स्वतः चांगलीं पानें निवडून घ्यावीं.

(५) पुष्कळ पानें एकदम घ्यावयाचीं असलीं आणि ठेवून खर्चावयाचीं असतील तर ढोल्या विसकटलेल्या न घेतां बांधलेल्या असतील त्याच घ्याव्या.

(६) पानें हातांत खुलीं आणूं नयेत. तीं दुसऱ्या पानाच्या वेष्टनांत बांधून आणावीं.

(७) पानें घरीं आणिल्यावर तीं स्वच्छ पाण्यानें धुऊन टाकावीं. बरोबर चुना आला असल्यास व तो चांगला असल्यास चुनाळ्यांत भरावा, नाहीं तर फेंकून द्यावा. चुन्याचें पान इतर पानांत मिसळूं नये.

चुना.

प्रकार—जुन्या संस्कृत ग्रंथांतून चुन्याचे आठ प्रकार[1] सांगितले आहेत. पण त्यांतले दोनच ह्मणजे दगडी आणि चुनकळीचा असे सध्या प्रचारांत आहेत.

दगडीचुना हा संगमरवरी दगडासारखे दगड आहेत त्यांचें पीठ करून त्यांत पाणी घातल्यानें तयार होतो.

चुनकळीचा चुना जमिनींत चुनखडीचे दगड असतात ते खणून काढून व कोळशांच्या भट्टींत भाजून तयार केलेला असतो. चुनखडी भाजल्यानें चांगली फुलते. ज्या चांगल्या फुलल्या असतील त्याच कळ्या चुन्यासाठीं निवडून घेतात. चुना आयता बाजारांतून आणण्यापेक्षां चुनकळ्या घरीं आणून करावा हें चांगलें.

चुनकळ्यांचा चुना करण्याची रीत अगदीं सोपी आहे. चुनकळ्या पाण्यांत विरघळतात. यासाठीं या कळ्या एखाद्या स्वच्छ मडक्यांत घालून त्यांवर दुरून पाणी ओतावें व दांड्यानें ढवळून सारखें करावें. पाणी ओतल्याबरोबर त्यांत उष्णता उत्पन्न होते. यासाठीं तो कांहीं वेळ तसाच राहूं देऊन मग निवाल्यावर फडक्यांत गाळून

---

१ 'अर्जुनोऽर्कश्च कुटजो मौक्तिकं च शिलाभवं । कारंजं स्फाटिकं शुक्तेश्चूर्णमष्टाविधं मतम्' ॥ ह्मणजे अर्जुन, अर्क, कुडा आणि करंज हे चार वृक्ष, दगड आणि स्फटिक या दोन शिला व शिंप आणि मोतीं हे दोन कृमिज अशा आठ पदार्थांचा चुना करीत.

घ्यावा, आणि गाळलेल्या चुन्याचें मडकें तोंड बांधून दोनतीन दिवस न हालवितां तसेंच राहूं द्यावें, ह्मणजे चुन्याचा चक्का खालीं बसून वर निवळ येईल. ही निवळही तशीच जिरूं द्यावी. जिरून राहील ती एखाद्या बाटलींत गाळून भरावी. कारण, ही निवळ उपयोगाची असते. ज्यांना नुसतें दूध पचत नाहीं, त्यांना ही निवळ घालून दिलेलें दूध पचतें. चुना वाळूं देऊं नये. त्यांत वरचेवर पाणी घालीत जावें. वाळल्यानें चुना निर्जीव होतो. तसेंच त्यावर उजेड पडूं देऊं नये. त्यानें तो विरतो व फाटतो. ह्मणून चुन्याचें मडकें तोंडावर झांकण ठेवून अंधाराचे जागीं एखाद्या कोनाडयांत ठेवावें.

चुना पाहिजे असेल तेव्हां एखाद्या काडीनें मडक्यांतून काढून चुनाळ्यांत किंवा डबींत भरावा. कोणी शौकी लोक चुन्याला सुवास लागावा ह्मणून त्यावर गुलाब-पाण्यानें किंवा केवडयाच्या पानानें भिजविलेली फडक्याची पट्टी ठेवतात; कोणी त्यांत रंगासाठीं केशराच्या काडयाही टाकतात.

पानसुपारी खाणारांना चुना दुसऱ्याकडून मागून आणण्यांत अप्रतिष्ठा वाटत नाहीं, पण हें चांगलें नाहीं. चुना करण्याला फारसा पैसा किंवा श्रम लागत नाहीं. मात्र तो खराब होऊं नये ह्मणून थोडीशी सावधगिरी ठेवावी लागते. चुना फार खाण्यांत येऊं नये. तो अपाय करतो.

कात—हा कित्येक विशेष प्रकारच्या झाडांपासून काढतात. चांगला कात हलका व जांभळ्या रंगावर असतो. जो वाटला असतां त्यांतून बारीक वाळू निघत नाहीं, त्याच काताला धुऊन शुद्ध करून त्याचा सत्त्वांश काढतात. त्याला पांढरा कात ह्मणतात. हा किंचित् मोतिया रंगावर असतो. याच्या दोन जाती आहेत—१ शुद्ध माती-

सारखा गुणहीन असतो; २ सत्त्वयुक्त असतो. रुचीनें हे प्रकार ओळखतां येतात.

काताला सुवास देण्याची चाल आहे. कित्येक लोक वासाचे पाण्यांत काताची पूड घालून ठेवतात, व तें पाणीच विडा करतांना पानांस लावतात. कोणी हें पाणी सुकूं देऊन त्याच्या वड्या करून ठेवतात. कोणी काताच्या पुडीला अत्तराचा हात लावून गोळ्या बांधतात. कोणी केवड्याच्या कातगोळ्या करतात. या करण्याची रीत अशी आहे—काताची बारीक वस्त्रगाळ पूड करून ती पाण्यांत घट्ट भिजवावी. मग एक मोठें केवड्याचें कणीस घेऊन त्याच्या वरलीं मोठालीं हिरवीं पानें काढून टाकावीं. दांडयावरले तंतुगुच्छ तसेच राहूं द्यावे. पानें [illegible] काढून तीं आंतून स्वच्छ पुसावीं. नंतर प्रत्येक पानाच्या दलावर [illegible]ताचा थर घालून दुसरें पान त्यावर दाबून बसवावें; आणि अशीं सर्व पानें तयार करून एकावर एक रचून त्यांची रास करावी व पूर्वीं काढून ठेविलेल्या पानांच्या सोपटानें ही रास आवळून वरला कात सुरीनें काढून त्याच्या गोळ्या कराव्या.

कातगोळ्यांचे प्रकार त्यांच्यांतल्या द्रव्यांच्या मानानें पुष्कळ आहेत. उत्तम कातगोळ्यांचे एक दोन प्रकार येथें देतों.

पहिला प्रकार—कात ५ तोळे, जायफळ, कंकोळ, कापूर, लवंगा हीं प्रत्येकीं अडीच मासे, व कस्तुरी १ गुंज, यांचें चूर्ण करून आंब्याच्या चिकांत खलून ३ गुंजांच्या प्रमाणाच्या गोळ्या कराव्या.

दुसरा प्रकार—कात ५ तोळे, चंदन, वेलदोडे, जायफळ, कापूर, लवंग व कंकोळ हीं प्रत्येकीं २ मासे, यांचें चूर्ण करून तें गुलाब, कस्तुरी, केवडा वगैरे सुवासिक पाण्यांत मळून अगर अत्तराचा हात लावून ३ गुंजांच्या प्रमाणाच्या गोळ्या कराव्या.

सुपारी.

सुपारीचीं झाडें पूर्व, पश्चिम आणि दक्षिण तिन्ही समुद्रकिनाऱ्यांवर पुष्कळ होतात. तीं ४० पासून ६० फुटांपर्यंत उंच सोटासारखीं वाढत जातात. त्याच्या शेंड्याला फांद्यांचा झुपका असतो. त्या फांद्यांच्या मुळांस फळांचे घड लागतात. प्रत्येक घडांत १०० पासून २०० पर्यंत सुपाऱ्या असतात. त्यांचे वर्षांतून दोन बहर येतात. एक अश्विनांत पुरा होतो व दुसरा चैत्रांत. सुपारीला वरून नारळासारखें टणक कवच असतें. तें असतांना तिला पोफळ ह्मणतात. ही कवची हातानें सोलून काढतां येते. पोफळाची ह्मणजे ओली सुपारी रुचीला फार तुरट लागते.

सुपारींत मोहाची ह्मणून एक जात आहे. ती नरम असून रुचीला खोबऱ्यासारखी लागते. पण हिचें पीक फार थोडें येतें. यामुळें ती महाग विकते. सुपारी मूळ स्वरूपांत असते तिला बरडा ह्मणतात. ती ओलीच शिजवून चेपून वाळविली ह्मणजे चिकण सुपारी होते. या शिवाय सुकलेली सुपारी उकळून किंवा तिला बिबऱ्याचें पुट देऊनही एक प्रकारची सुपारी दक्षिणेंत तयार करीत असतात.

जी बरडा सुपारी मोठी, चांगली फुगलेली, तेजस्वी, पांढुरक्या रंगावर, वजनदार असेल, जिच्या मुळाशीं भोंक पडलेलें नसेल, सुकी खणखणीत असेल, आणि जी फोडली असतां आंत पांढरी स्वच्छ निघेल. ती चांगली समजावी.

जी चिकण सुपारी वरून भुऱ्या रंगाची, निस्तेज, सुरकुत्या पडलेली, फारच चेपलेली, बसकी, चपटी आणि आंत दुधाच्या सायीसारखी पांढरी असेल ती चांगली. जी काळी, तेजस्वी, फुगीर,

व वजनदार असेल, ती हलक्या प्रतीची समजावी. चिकण सुपारी फार महाग विकते.

विड्यांत घालण्याला शुद्ध बरडा सुपारी चांगली असते. ती आड-कित्यानें, किंवा दुसऱ्या कशानें बारीक करतात. सुपारी कातरण्याच्या दोन तऱ्हा आहेत. एक तिचे बारीक पातळ कापे काढण व दुसरी अष्टपैद्ध रवे रवे करणें. दक्षिणेंत पहिली व उत्तर हिंदु-स्थानांत दुसरी तऱ्हा विशेष आहे. कोणतीही तऱ्हा असो, विड्याला जितकी बारीक कातरलेली सुपारी असेल तितकी चांगली. अगोदर कातरून ठेविलेल्या सुपारीपेक्षां विडा करण्याचे वेळीं ताजी कातरून घेतलेल्या सुपारीला चव अधिक असते. सुपारी कातरण्यांतही कित्येक लोक फार कुशलता दाखवितात. दोन चांगल्या मोठाल्या सुपाऱ्या दिल्या असतां त्या कातरून अशा फुगवितात, कीं येवढी, सुपारी शेंपन्नास विड्यांना सहज पुरेल असें वाटतें!

कित्येक लोक सुवासिक पाण्यांत सुपारी भिजवून ती सुगंधित करतात. कोणी तिला पेपरमिंटांत भिजवितात. कातरलेली सुपारी फुलांत कांहीं वेळ घालून ठेविल्यानें तिला फुलाचा वास लागतो.

बरडा सुपारी फार खाल्ल्यानें तोंड सोलतें. केव्हां केव्हां लागते ह्मणजे छातींत अडकून बसल्यासारखें होऊन माणसाचा जीव घाबरतो. चिकण सुपारी इतकी दोषकारक नसते. ती फार खाण्यांत आली तर मात्र कित्येकांना एखादा जुलाब होतो.

सुपारी पूजेंत गणपति, वरुण, इ. देवतांबद्दल मांडतात. विड्याबरोबर ती दान ह्मणूनही देतात. जांवई, व सोयरेधायरे भेटण्यास आले असतां त्यांना निरोप देतांना व लग्न-मुंजीची अक्षत घेऊन येणाराला निरोप देतांना एक किंवा दोन सबंध सुपाऱ्या

देण्याची चाल आहे. लग्नकार्याला आरंभ झाल्यापासून (देवक बसल्यापासून) तों 'शुभलग्न सावधान' होऊन टाळी वाजेपर्यंत दरम्यानच्या पानसुपारीचे प्रसंगीं सबंध सुपारीच देण्याची चाल आहे. या अवधींत मांडवांत सुपारी कातरण्याचा देखील प्रतिबंध असतो. कोणाला जपजाप्य, अनुष्ठान वगैरेची वरणी द्यावयाची असली, तर हातांत सबंध सुपारी देतात. सुपारी उंबरठ्यांत फोडणें अशुभ समजतात.

लवंगा—या मलाका, अंबोयना वगैरे बेटांत होतात. सांबरी रंगाच्या, तेजस्वी आणि मोठ्या लवंगा चांगल्या असतात. फार काळ्या रंगाच्या व बारक्या लवंगा चांगल्या नसतात. लवंगांचीं फुलें खात नाहींत.

वेलदोडे—यांना एला, वेला, विलायची, वेलची, इ० अनेक नांवें आहेत. वेलदोडे मलबार, कोचीन, मंगलोर, शिरसी (कारवार) वगैरे मुलुखांत होतात. यांचे दोडे गोल व लांबट असे दोन तऱ्हांचे असतात. त्यांतही कांहीं भरींव, कांहीं पोकळ, कांहीं काळ्या दाण्यांचे, तर कांहीं पिवळ्या रंगाचे असतात. दोडे मोठे व शुभ्र दिसावे ह्मणून कोणी त्यांवर चुन्याचें पुट देतात. जे वेलदोडे हिरव्या टरफलाचे, चुन्याचें पुट न दिलेले, भरींव, मोठे व काळ्या दाण्यांचे असतात ते चांगले समजावे. चांगल्या मोठ्या एका वेलदोड्यांत ६० पर्यंतसुद्धां दाणे निघतात.

विड्याचें सर्व सामान पाहून नीटनेटकें करून ठेवण्याचें काम रोजच्या नियमित कामांतच गोंवून सायंकाळच्या केरवाऱ्याबरोबर करण्याचा नेम ठेवावा. जे ते जिन्नस ज्या त्या डब्यांत भरून ठेवावे. अगदीं संपण्याची वाट पाहूं नये.

विडा लावणें.

विडा लावण्यास प्रारंभ करण्यापूर्वीं त्याचें सगळें साहित्य सिद्ध

करून घ्यावें. पानांला चुना लाविल्यावर मग कात वाटूं लागावयाचें, किंवा कात घातल्यावर सुपारी शोधीत बसावयाचें, असें करूं नये. पानाला लावलेला चुना वाळण्यापूर्वी त्यावर कात पडला पाहिजे. नाहींतर विड्याचा स्वाद जातो.

पानें ओलीं असल्यास फडक्यानें अगोदर पुसावीं. देंठ असल्यास ते काढावे, अग्र तोडावें, शिरा जाड असल्यास सुरीनें किंवा अडकित्याच्या पानानें काढून टाकाव्या. त्या जाड नसल्यास उगाच्च शास्त्रार्थाकरितां काढण्यांत वेळ घालवूं नये. पानाच्या पट्ट्या लावावयाच्या असल्यास सुलट बाजूनें पान दुमडून मधली शिर काढावी; ह्मणजे पानाचे बरोबर दोन तुकडे होतात. तीन तुकडे करावयाचे असतील, तर दोन बाजूचे दोन तुकडे काढून मधला भाग वेगळा करावा.

पान तिखट, रुचकर व दळदार असलें तर विड्याला अर्धें पान सुद्धां पुरतें. तशीं नसलीं तर त्यांच्या आकाराच्या मानानें एक दोन किंवा ज्यास्त पानें लागतात. तीन पानांचा विडा लावीत नाहींत. दक्षिणेंत बहुधा दोन पानांचा लावतात. पांच पानांचा विडा प्रशस्त मानतात. पण येवढ्या मोठ्या विडयांत कात, चुना, सुपारी, वगैरेचें योग्य प्रमाण राहत नाहीं. त्यापेक्षां थोडया पानांचे अधिक विडे खाणें चांगलें.

पानाला बोटानें चुना न लावतां काडीनें लावणें चांगलें. बोटानें लावणें झालें तर त्याची गोळी घेऊन पानावर ठेवावी आणि अंगठ्यानें ती पसरावी.

चुना नवा, ताज्या कळ्यांचा केलेला असला, तर तो फार तीव्र असतो. तो पानाला बेताचा लागला तर ठीक आहे. ज्यास्त झाल्यास

तोंडाला फोड येतात. (तसें झाल्यास खोबरें किंवा बदामाचा गीर खावा ह्मणजे आगीचें शमन होतें.) लांबट जातीच्या पानांना रुंद जातीच्या पानांपेक्षां चुना अंमळ कमीच लागतो. पानाला चुना किती लावावा याचें नक्की प्रमाण सांगतां येत नाहीं. साधारणपणें पानांच्या एक चतुर्थांश भागापासून अर्ध्यापर्यंत पातळ लेप करण्यास पुरे इतका चुना लावावा. पुरुषांपेक्षां बायकांना कमी, व त्यांच्यापेक्षां मुलांना चुना कमी लागतो. दिवसांतून पुष्कळ वेळां विडा खाणाराच्या विड्याला चुना कमी लागतो. ज्यास्त पाहिजे असल्यास खातां यावा ह्मणून पानांच्या लहान चिंचोक्याएवढ्या पट्ट्या घट्ट चुना भरून विड्याच्या डब्यांत ठेवाव्या.

चुना पानांच्या पालथ्या बाजूस लावावयाचा असतो. त्याची एक पट्टी असली तर चुना त्याच्या मुळाकडे, एक पान असलें तर मध्यावर, व दोन पानें असलीं तर अग्रभागाला चुना लावण्याची चाल आहे. पण ही चाल देशपरत्वें भिन्न भिन्न आहे.

चुन्याच्या बरोबरीनें कात पाहिजे. त्याची भुकटी असेल तर चुन्यावर ती भुरभुरून अधिक झाली असल्यास दुसऱ्या पानावरच्या चुन्यानें टिपून घ्यावी, किंवा झटकून टाकावा. चुन्याच्या डबींत मात्र उडूं देऊं नये. कात कमी झाला तर तो वरून खातां येतो. पण ज्यास्त झाल्यास विडा कडू होतो.

इतर मसाला—वेलदोडे, बदाम, केशर वगैरे मसाला इच्छेप्रमाणें घालावा.

विडा बांधणें—विडा बांधण्याचे पुष्कळ प्रकार आहेत. जसें—विडी, हिंदुस्थानी वडा, दक्षिणी विडा, पट्टीचा विडा, गोविंद विडा, दरबारी विडा, इ०. विडी आणि पट्टी करण्याला थोडी चतुरता लागते.

यांना लवंग टोंचावी लागत नाहीं. दुसरे विडे लवंग टोचून करतात. दरबारी विडा ह्मणजे पांच सहा पानांची उभी सुरळी करून त्यांत विड्याचा मसाला व सगळ्या सुपाऱ्या एक दोन ठेवून वरून सूत गुंडाळावयाचें. या सुरळ्यांत पानांची सुलट बाजू वर करावयाची असते. दरबारच्या पानसुपारीचे वेळीं ज्याच्या त्याच्या मानमरातबाप्रमाणें माणशीं दोन पासून पांचपर्यंत या सुरळ्या देण्याची चाल आहे.

वर्खी विडे–गोविंद विडे चांगले मोठाले करून त्यांना वरून पाण्याचा हात लावून चांदीचा किंवा सोन्याचा वर्ख चढवितात. सबंध चिकण सुपाऱ्या, लवंगा, वेलदोडे यांनाही अशाच रीतीनें वर्ख चढवितात. हे विडे केवळ सन्मानासाठीं व शोभेसाठीं असतात, खाण्यासाठीं नसतात.

विडा सुकला कीं त्याची खरी चव गेली. ह्मणून विडे अगदीं आयत्या वेळीं लावावे. पंगत वगैरे असली, तर तास दोन तास अगोदर लावून ठेवावे लागतात. ते सुकूं नयेत ह्मणून एकाद्या परडींत ओल्या फडक्यांत गुंडाळून ठेवावे; पण एकावर एक दडपून उबूं देऊं नयेत.

विडा खाण्यांतले गुणदोष–विडा खाण्यानें तोंडाची घाण जाऊन रंजन होतें, उत्तेजन येतें, पचन होतें, आणि शक्ति वाढते, असें वैद्यकग्रंथांतून सांगितलेलें आढळतें. पण हे गुण विड्याच्या परिमित सेवनाचे आहेत. अतिरिक्त सेवनानें उलट

---

१ सुप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ व पुण्याच्या शेतकी खात्याचे प्रिंसिपाल डॉ० हॅरोल्ड मॅन यांनीं विडयांतल्या द्रव्यांचें पृथक्करण करून पाहिल्यावर असें ठरविलें आहे कीं, नियमित प्रमाणांत विडा खाणें सुद्धां शरिराला अपायकारक आहे. शरीराला गुण करणारें एकही द्रव्य त्यांत नाहीं, सगळींच अपाय करणारीं आहेत. पण हें मत सर्वमान्य आहे असें नाहीं.

हानि होते. दांतांना कीड लागते; तोंडाला दुर्गंधि येऊं लागते, पचनशक्ति बिघडते, आणि अंगांतील वीर्याचा नाश होतो, असें सांगतात. विड्याबरोबर आणखी तंबाखू खाणारांविषयीं तर बोलावयासच नको. विडा आणि तंबाखू या दोहोंचे अवगुण एकवटल्यावर दुप्पट हानि होते यांत आश्चर्य काय! तंबाखू खाणाराच्या तोंडाला लाळ सुटते, त्यामुळें त्याला थुंकण्यासाठीं वारंवार उठावें लागतें. इतके वेळ उठण्याचा मनुष्य आळस करतें. मग कोठें थुंकावें आणि कोठें नाहीं याचा विचार राहत नाहीं; आणि कित्येक बसल्या जागीं घाण करून ठेवतात. थुंकतांना थुंकीचे शिंतोडे माणसाच्या कपड्यावरही कित्येक वेळां उडतात, व तोंडावरून खालीं ओघळ येऊन सगळा ओंगळपणा दिसतो, हें तर निराळेंच.

आरोग्य, मर्यादा व शिष्टाचार यांच्या रक्षणासाठीं कांहीं लोकांना विडे खाण्याचा निषेध आपल्या पूर्वापार चालत आलेल्या रीतीनें केला आहे. विडा कोणीं, केव्हां, किंवा कशा प्रकारें खाऊं नये या विषयींचे पुढील नियम लक्षांत ठेवावे:—

१ तांबोळ्याच्या दुकानचे आयते लावलेले विडे खाऊं नयेत.

२ अपरिचित माणसानें दिलेला विडा खाऊं नये. त्याचा अनादर करावयाचा नसला, तर नुसता घेऊन ठेवावा, व त्याची पाठ वळल्यावर फेकून द्यावा.

३ समाजांत दिलेला विडा तेथेंच खाऊं नये. मागाहून देखील खाण्यापूर्वीं तो नीट उलगडून पहावा आणि मग वाटल्यास खावा.

४ अनशेपोटीं विडा खाऊं नये.

५ दुपारीं निजून उठल्यावर, पुष्कळसें दूध प्याल्यावर, स्नान केल्यावर, किंवा ओकारी झाल्यावर, लागलीच विडा खाऊं नये.

६ विषबाधा झाली असतां, मूर्च्छा आली असतां, किंवा पाण्याचा शोष पडला असतां विडा खाऊं नये.

७ तोंडांत विडा ठेवून झोपूं नये.

८ रस्त्यानें चालतां चालतां विडा खाऊं नये.

९ वडील व पूज्य मणसापुढें विडा खाऊन जाऊं नये.

१० लहान मुलांचे कोंवळे दुधाचे दांत पडून जाईपर्यंत त्यांनीं विडा खाऊं नये.

११ विद्यार्थी, विद्यार्थिनी, व विधवा स्त्रिया यांनीं विडा खाऊं नये.

१२ सुवासिनी स्त्रियांनीं पति परगांवीं गेला असतां विडा खाऊं नये. तो जवळ असतांना सुद्धां एकादा विडा खावा, पण उठतां बसतां विडा खाणें चागलें नाहीं.

१३ गर्भिणी स्त्रीनें विडा खाऊं नये.

१४ संन्यासी, बैरागी, वगैरे विरक्त माणसांनीं विडा खाऊं नये.

१५ व्रत वगैरेंचें आचरण चाललें असतां, एकादशी, शिवरात्र वगैरे उपोषणाचे दिवशीं, व सुतकाच्या काळांत विडा खाणें वर्ज्य केलें आहे.

१६ दांतांचे किंवा डोळ्यांचे विकार असलेले, अंगाला व्रण झालेले, रक्तपितीनें ग्रासलेले, वाताचा विकार असलेले, श्वासरोगी, व क्षयरोगी, यांनीं विडा खाऊं नये.

सन्मानाची पानसुपारी—लग्नकार्यासारख्या कार्यप्रसंगाला किंवा दसरा, संक्रांत, गणपतिउत्सव वगैरे दिवशीं आपल्या घरीं चार-मंडळी (स्त्री व पुरुष) येते, त्यांना सन्मानार्थ पानसुपारी देण्याची चाल आहे. याकरितां एका तबकांत एकीकडे पानांची रास व दुस

रीकडे कातरलेल्या सुपारीची रास घालून ठेविलेली असते. दोन दोन पानें घेऊन त्यावर थोडी सुपारी घालून तीं पानें, अग्रें घेणाराकडे व देंठ देणाराकडे करून, देतात. पुष्कळ मंडळी असली तर अगोदरच दोन दोन पानें वर सुपारी घालून तयार ठेवतात, ह्मणजे थोड्या वेळांत पानसुपारी देणें उरकतें. या दोन दोन पानांच्या जोड्या वर सुपारी घातलेल्या तबकांत अशा रीतीनें एकीवर एक रचतात कीं, तबकाच्या मध्याकडे सर्व पानांचीं अग्रें व काठाकडे देंठ येतील. अशा रीतीनें तबकांच्या घेरभर त्या लावून ठेवतात. एक रांग संपली कीं, तिच्यावर एका पानजोडीच्या उभ्या अर्ध्या भागावर दुसरी पानजोडी, तिच्यावर तिसरी, याप्रमाणें साधारणपणें दोन तीनशें पानजोड्या ठेवितां येतात.

खिचडी—ह्मणजे विड्याचा मसाला. पान-सुपारी देण्याचे वेळीं अनुकूलता असल्यास चिकण सुपारीचीं खांडें, लवंगा व वेलदोडे यांची खिचडी देतात. उत्तरहिंदुस्थानांत ही खिचडी निदान अर्ध-मूठ तरी देण्याची चाल आहे.

विशेष चाली—आदरातिथ्याचा विडा देण्याची चाल दक्षिणेंत निराळी, व उत्तरहिंदुस्थानांत निराळी आहे. दक्षिणेंत विडा लावून न देतां विड्याचें तबक पुढें करतात, व ज्याचा तो विडा लावून घेतो. उत्तरहिंदुस्थानांत घरचा यजमान निमंत्रित पाहुण्यांना स्वतःआपल्या हातानें पट्या लावून देतो.

मोठ्या माणसानें आपल्या हातानें लहानास विडा देणें हें मोठ्या कृपेचें चिन्ह समजलें जातें. लहानानें मोठयाच्या हातीं विडा न देतां तो एका तबकांत घालून तें तबक पुढें करावें. या तबकांत एकच विडा मात्र नसावा. निदान पांच चार तरी असावे. त्यांतलें कांहीं

उचलून घेणें न घेणें त्या मोठ्या माणसाच्या मर्जीवर असतें. विडा घ्यावयाचा नसल्यास, तो तबकाला नुसता स्पर्श करतो. तेव्हां ते विडे त्याच्या शागिर्दाला द्यावे.

स्त्रियांनीं आपला पति, पुत्र, आणि सासरचीं किंवा माहेरचीं निकट संबंधाचीं वडील माणसें यांच्याशिवाय इतर कोणासही आपल्या हातानें विडा लावून किंवा उचलून देऊं नये. असा सक्त नियम आहे. स्त्रीनें परपुरुषाला विडा लावून देणें किंवा मुलांमाणसाच्या हातून पोहोंचविणें अश्लाघ्य समजतात. तथापि ज्याच्या संबंधानें आदरयुक्त प्रेमभाव आहे किंवा नात्यासंबंधानें ममता वाटते, अशा पुरुषाला तिनें विडा लावून दुसऱ्याच्या हातून दिला किंवा त्याच्या पुढें ठेवविला, तर तें क्षम्य आहे.

विडा किंवा पानसुपारी द्यावयाची, ती नेहमीं उजव्या हातानें द्यावी.

प्रकरण १५ वें.

पान-पत्रावळ.

तीस चाळीस वर्षांपूर्वी बहुधा घरोघरीं पान-पत्रावळीचा वर्षभरचा साठा करून ठेवण्याची चाल असे. त्याला तशीं बलवत्तर कारणेंही होतीं. कुटुंबांतली सर्व मंडळी बहुधा एकत्र राही, त्यामुळें घरांत माणसांची संख्या मोठी असे. दुसरें, त्या दिवसांत तांबें पितळेचींच भांडीं तेवढीं वापरीत. त्यांतही तांब्याचें भांडें जेवणाखाण्याला वर्ज्य मानलें गेल्यामुळें,सगळा भार पितळेच्या भांड्यांवर येऊन पडे. तिसरें, कार्य प्रयोजनाला बहुधा सर्व गांवकऱ्यांना—निदान आपल्या आळींतल्या तरी सर्व लहान थोरांना—बोलावीत. इतक्या मंडळीला जेवण्याचें घेण्यास ताट-वाट्या कोठून आणणार ? चौथें कारण, त्या वेळचे

वरेच लोक नेमधर्मी असत. धातूच्या पात्रांत पुनः पुनः जेवणें निषिद्ध मानलें असल्यामुळें, ते जेवणास ताट-वाट्या घेत नसत. कित्येकांचा तर बाराही महिने पत्रावळीवरच जेवण्याचा नियम असे. आतांचा मनु सगळ्याच बाबतींत निराळा आहे. मध्यम वर्गाच्या लोकांत देखील आतां पान-पत्रावळीचा साठा करून ठेवण्याची चाल राहिली नाहीं. तरी अद्याप पान-पत्रावळ व्यवहारांतून अजिबात गेली आहे, असें मात्र नाहीं. ब्राह्मणी कुटुंबांत परसांत एखाद-दुसरें केळीचें झाड लावण्याची व त्याचें पान जेवणास घेण्या-देण्याची चाल अजून कांहीं ठिकाणीं दिसते. ताटें, वाट्या, व चिनी मातीच्या आणि एनामेल केलेल्या लोखंडी पत्र्याच्या बशा घरांत असतांही मुलांना थोडें फार फराळाचें देण्यास व पंक्तींतून लोणचें कोशिंबिरी वाढण्यास पानांचा उपयोग करण्यांत येतो, व चार दोन माणसें जेवण्यास बोलाविलीं असतां जेवण्यास घेण्यास पान-पत्रावळीचाच आश्रय करावा लागतो. म्हणून यासंबंधाची माहिती प्रापंचिकानें करून घेण्याची अवश्यकता आहे.

आपल्या आचार-पद्धतीप्रमाणें कांहीं झाडांचीं पानें भोजनास विहित आणि कांहीं निषिद्ध मानलीं आहेत. विहित मानलेल्या पानांत कांहीं सर्वदा आणि कांहीं विशेष प्रसंगीं मात्र ग्राह्य असतात. निषिद्ध पानें सर्वदा त्याज्य समजावीं.

विहित पानें—केळी, पळस, मोह, फणस, कुडा, औदुंबर, आंबा, जांभूळ इ०

निषिद्ध पानें—वड, रुई, पिंपळ, टेंभुरणी इ०

ग्राह्याग्राह्य—केळीचें पान सर्वदा जेवणाला ग्राह्य आहे. पळस श्राद्धीय भोजनाला आणि मोह मंगलकार्यांत भोजनाला ग्राह्य नाहीं.

श्राद्धीय भोजनाला मोह अवश्यक मानला गेला आहे. कोणी कितीही श्रीमान् आणि संपन्न असला, तरी त्यानें श्राद्धीय ब्राह्मणांना मोहाच्याच द्रोण-पत्रावळी देण्याचा नियम आहे. फणस, कुडा, इ० झाडें ज्या प्रदेशांत तीं होणारीं आहेत, तेथेंच उपयोगांत येतात. औदुंबर, जांभूळ, आंबा, इ० चीं पानें विशेष व्रतोपवासादिकांनाच घेतात.

निषिद्ध पानांपैकीं वडाचा निषेध विशेषेंकरून काशीयात्रा करून येणाराला केलेला आहे. ब्राह्मणाच्या मुलाचें उपनयन झालें ह्मणजे तो काशीस अध्ययनासाठीं जातो, अशी कल्पना आहे. ह्मणून द्विजत्वाचा संस्कार झाल्यापासून त्याला कधींच वडाच्या पानाचा उपयोग करतां येत नाहीं. स्त्रियांनीं प्रत्यक्ष काशीयात्रा केली असली, तर त्यांना वडाच्या पानाला निषेध आहे; तथापि पुष्कळ पोक्त बायका पापडया वडाच्या पानावर करतांना पाहण्यांत येतात. त्यावेळीं वडाचें पान त्या निषिद्ध समजत नाहींत.

व्यवहारदृष्टीनें ग्राह्याग्राह्यतेचा विचार केला, तर ज्या पानांत पुढील गुणधर्म असतील तीं ग्राह्य व नसतील तीं त्याज्य होतील—

१ पान मोठें असावें. निदान सात आठ पानें जोडल्यावर तरी त्यांचा आकार जेवणाचे सगळे पदार्थ मावण्याइतका मोठा झाला पाहिजे.

२ पान कोंवळें पण दळदार असावें. तें खरखरीत असूं नये. सपाट असावें. त्याच्या काठाला कंगोरे नसावेत. पाठीचा कणा फार जाड नसावा. असला तर तो सहज हातानें काढतां यावा आणि काढतांना पानाचे तुकडे होऊं नयेत. पानाच्या शिरा फार वर आलेल्या नसाव्या. त्यास भोंकें पडलेलीं नसावीं. पानांत चीक किंवा दूध भरलेलें नसावें. त्याला उद्दाम वास येऊं नये. तें किड्यांनीं खाल्लेलें नसावें. पानांवर काटेकाटे किंवा बारीक लव नसावी.

पानांचे दोन वर्ग करतां येतात. एक त्यावेळेपुरती उपयोगीं पडणाऱ्या पानांचा व दुसरा टिकाऊ पानांचा. केळीचीं पानें पहिल्या वर्गांत, आणि पळसाचीं दुसऱ्या वर्गांत येतात.

जेवणाखाण्याचे वेळीं चारी ठाव वाढण्याला एकच मोठें पान घ्यावयाचें असेल, तर असें पान केळीचें होय. साधारण जेवणाला कर्दळीचीं किंवा पळसाचीं दोन मोठालीं पानें जोडूनही काम भागवितात. कमळाचीं व अळूंचीं पानेंही मोठालीं असतात; पण तीं फारच पातळ व नाजूक असल्यामुळें त्यांचा क्वचित्च उपयोग करतात.

केळीचीं पानें—केळीला बहुधा श्रावण-भाद्रपदाच्या सुमाराला पुष्कळ पानें फुटतात, आणि हिंवाळ्याच्या अखेरपर्यंत त्यांचा भर असतो. पुढें उन्हाळ्यांत तीं कमी निघतात, व वाऱ्यानें फाटतात.

सामान्य केळीचें पान बहुधा चार हात लांब असतें, आणि त्यांतून जेवण्यास घेण्याजोगीं तीन पानें चांगलीं व चार सामान्य निघतात. या पानाचें साधारण प्रमाण सवा हात लांब आणि तितकेंच रुंदीचें आहे. कित्येक पानें अरुंद असतात.

ज्या गांवाला केळीच्या बागा असतात, तेथें केळीचीं पानें बाजारांत विकावयास येतात.

पंक्तीसाठीं केळीचीं पानें कापतांना, तीं सारख्या लांबी रुंदीचीं असलेलीं चांगलीं दिसतात, ह्मणून तशीं कापावीं. त्यांची मधली जाड शीर तासावी, पण तसें करतांना पान मात्र फाटूं देऊं नये, आणि मांडतांना मूळ खालीं आणि अग्र वर असें मांडावें.

कर्दळी—ही केळीचीच एक जात आहे. मात्र हिचीं पानें लहान, पातळ व अरुंद असतात. ही बहुतकरून बागेंत शोभेकरितां लाव-

लेली असते. कर्दळीचीं दोन पानें एकाला एक रुंदीला जोडून मध्यें टाके दिले असतां जेवण्यासारखें बेताचें पान होतें. मांडण्याची तऱ्हा केळीच्या पानासारखीच.

पत्रावळ—अनेक लहान लहान पानें एकास एक जोडून एका विशेष आकृतीचें भोजनपात्र करतात, त्यास पत्रावळ ह्मणतात. हिचीं पानें चोयांच्या टाक्यांनीं जोडलेलीं असतात.

पत्रावळीसाठीं सर्वांत उत्तम पानें ह्मणजे पळसाचीं, आणि त्यांच्या खालोखाल मोहाचीं. या पानांच्या पत्रावळी तत्काल किंवा पाहिजे तर मागून केव्हांही उपयोगीं पडतात. फणस, मुचकुंद वगैरेंच्या पानांच्याही पत्रावळी करतात; पण त्या तत्काल उपयोगीं पडणाऱ्या असतात, टिकाऊ नसतात.

पळसाला मोठालीं पानें येतात. तीन तीन पानांची बहुधा एकेक डगळी असते. एकादा पाऊस पडेपर्यंत हीं पानें नरम असतात. पुढें निब्बर होतात.

मोहाचें झाड उन्हाळ्यांत पालवीस येतें. त्याचीं पानें भाद्रपदाच्या कांहीं अगोदर पत्रावळी लावण्याजोगीं पक्क होतात. भाद्रपदांतच महालयेंही असतात. ह्मणून कदाचित् महालयें व मोहाच्या पत्रावळी यांची सांगड घालून देण्यांत आली असेल.

पत्रावळी लावण्यासाठीं लागणाऱ्या पानांचा संग्रह योग्य मोसमावर करावा लागतो. पळसाचे तीन तीन पानांचे डगळे तसेच राहूं दिले तर एक दोन दिवसांत पानें सुकून वाकडीं तिकडीं होतात. ह्मणून तीं पानें देठापासून खुडून एकावर एक रचून नीट दडपणाखालीं दडपून ठेवावीं लागतात. पत्रावळी लावण्यास लागलीच वेळ नसेल आणि पानें पुष्कळ असतील तर त्यांच्या देंठांच्या बाजूनें दाभ-

णानें भोंक पाडून तीं पानें एका सुतळींत ओंवून माळ करावी, आणि ती माळ दोन खुंट्यांना आडवी टांगावी. अशाकरितां कीं त्यांस वारें लागावें व तीं एकमेकांच्या आश्रयानें सरळ रहावीं, दुमटूं नयेत. अशा रीतीनें ठेवलेलीं पानें चांगलीं आठ पंधरा दिवस नरम व हिरवीगार राहतात.

मद्रासेकडे माहुली नांवाचें झाड आहे. त्याचीं पानें आभेटाच्या पानाच्या आकृतीचीं असून नरम असतात. यांच्या पत्रावळी लावून विक्रीसाठीं देशावर पाठवितात.

मोहाच्या पानांचीं पुडकीं बांधून ठेवतां येतात. पण तीं ओलीं आहेत तोंच त्यांच्या पत्रावळी लावतां येतात. ह्मणून या पानांचा साठा कोणी फारसा करीत नाहींत.

चोया--या बांबूच्या किंवा बोरूच्या करतात. बोरूच्या चोया नरम असतात. त्या पत्रावळी लावण्यास चांगल्या. कडू लिंबाच्या काड्या उन्हाळ्यांत वाळून गळून पडतात. त्याही तात्पुरत्या पत्रावळी लावण्याच्या उपयोगीं पडतात. चोय चांगली लांब करावी ह्मणजे पुष्कळ वेळ टिकते. ती सरदली असतां लवकर तुटत नाहीं, तेव्हां एकादा तवा किंवा टिनाचा पत्रा विस्तवावर ठेवून त्यावर चोया पसरतात, ह्मणजे विस्तवाच्या आगीनें त्या टणक होतात. चोया फुरसत मिळेल तेव्हां अगोदर करून ठेवाव्या. मात्र त्या ओलसर जागेंत ठेवूं नये.

पत्रावळ लावणें—पळसाच्या डगळ्यांतील मधलें पान मध्यें ठेवून बाजूंचीं पानें त्या पानाचे भोंवतीं शिराकडून आरंभ करून डावीकडून उजवीकडे लावीत यावें व अशा रीतीनें दीड, दोन किंवा तीन घरांत पानें मोठीं किंवा लहान असतील, त्या मानानें पत्रावळ संपवावी. पत्रावळ लावण्याचे संबंधांत पुढील गोष्टी लक्षांत ठेवाव्या:—

१ मधलें पान सर्वांत मोठें असेल तें आधीं निवडून घ्यावें.

२ प्रत्येक घेराला पानें सारखीं घ्यावीं, लहान मोठीं घेऊं नयेत.

३ प्रत्येक पान सुलटें लावावें, एक उलटें व एक सुलटें, असें लावूं नये.

४ पान वरून जोडावें. तें जोडतांना खालचें पान विनाकारण ज्यास्त आंत दाबलें जाऊं नये.

५ पानें उजवीकडून डावीकडे लावीत गेल्यास ती पत्रावळ अशुद्ध समजली जाते.

६ चोयीचा टाका काठाला गहूंभर जागा सोडून लावावा. यापेक्षां ज्यास्त खालीं लावूं नये. दोन टाक्यांत अंतर गहूंभरच राहावें. सगळे टाके आडवे एका ओळींत यावे. मागें—पुढें येऊं नयेत. जणूं टीपेचा दोराच भरला आहे असे ते दिसावे. प्रत्येक टाक्याचीं दोन्हीं टोकें सारखीं बाहेर निघालेलीं असावीं. उद्देश हा आहे कीं पत्रावळीवर भात वगैरे कालवितांना अन्न जोडाच्या संधींतून आंत शिरूं नये, व बोटांच्या स्पर्शानें टाका निघून अन्नांत कालविला जाऊं नये. पत्रावळीचा शृंगार करण्यांत निरर्थक श्रम व वेळ मात्र घालवूं नये.

७ मोहाच्या पत्रावळीला मधलें पान एकच पुरत नाहीं. त्यासाठीं तीन चार पानें सारखीं एकास एक जोडून मग घेरास सुरुवात करावी, आणि ४ किंवा ५ हवे तेवढे घालावे.

---

१ कांहीं वर्षांपूर्वीं बडोद्यास पत्रावळी करण्याचा धंदा करणारे लोकांनीं प्रथम त्यां टाक्यांत फुलें—वेली, नंतर मंडळींचीं नांवें आणि नंतर श्लोक व गाणीं काढणें सुरू केलें होतें. हा प्रकार क्षणमात्र मौजेचा असला तरी त्यापायीं केलेला श्रम, व घालविलेला काळ अनाठायीं होता असें म्हटलें पाहिजे. कारण, त्या मानानें मौज उपभोगांत येत नसे.

ज्याला पत्रावळी लावण्याची संवय आहे, तो मनुष्य चार तासांच्या बैठकींत साधारण आकाराच्या ५० पत्रावळी लावतो. मोहाच्या पत्रावळींचें काम बिकट असतें. त्या पत्रावळी १२।१५ लावतां येतात.

पत्रावळी लावण्याचें काम तिसरे प्रहरीं रिकामेपणीं करावें. रात्रीं दिव्याशीं बसून करूं नये. त्यापासून डोळ्यांना त्रास होतो.

ठेवणीच्या पत्रावळी प्रथम सावलींत चांगल्या वाळवाव्या. ओल्या राहूं देऊं नयेत. लावतांनाच त्या पसरून ठेवाव्या, आणि त्यांवर पाट, जाजम किंवा दुसरें कांहीं दडपण सारखें घालावें. आठ दहा तासांनीं त्या वाळल्या ह्मणजे त्यांची उलट पालट करावी. ह्मणजे खालचें अंग वर व वरचें खालीं करावें. ओल्या पत्रावळींचा ढीग केल्यास त्या उबतात, त्यांस काळे डाग पडतात, व बुरा चढून वाईट वास येऊं लागतो, इतका कीं त्यावर जेववत नाहीं.

पत्रावळी वाळल्यावर एकीवर एक सारख्या रचून दाबून सुतळीनें त्यांचे शंभरांचें किंवा पन्नासांचें पुडकें बांधावें. त्या मोकळ्या ठेवल्यानें वाळून फाटतात.

पत्रावळींची आकृति सारखी गोल असावी. यासाठीं पानांचे कोपरे बाहेर आले असल्यास कातरीनें कापून गोल करावे.

पत्रावळीचीं पुडकीं कोंदट हवा येत नाहीं, अशा ठिकाणीं किंवा ओलसर जागेंत ठेवूं नये. निजण्याबसण्याच्या जागेपासून त्या दूर ठेवाव्या. कारण त्यांत विंचवासारखे प्राणी व कीटक लपून बसण्याचा संभव असतो.

द्रोण—हे केळीच्या पानांचे, पळसाचे व मोहाच्या पानांचे लावतां येतात. इतर पानांचे द्रोण तितके चांगले होत नाहींत. केळीच्या

पानांचे द्रोण दोनटाकी, किंवा चारटाकी लावतात. दोनटाकी द्रोण डोंगीसारखा लांबट व चारटाकी द्रोण चौकोनी असतो. केळीच्या द्रोणाला पानें मऊ लागतात. निबर असलीं तर चोयीनें लांबपर्यंत फाटतात. निबर पानें शेकल्यानें नरम होतात. केळीचे द्रोण लाव-ण्याचें काम चातुर्याचें आहे. तें प्रत्येकाला साधत नाहीं.

पळस व मोह यांचे द्रोण दोन पानांचे व चार टाक्यांचे लावतात. त्यांचा गोल आकार शोभिवंत दिसतो. द्रोणाला बूड मात्र असलें पाहिजे. नाहींतर द्रोण पानावर नीट बसत नाहीं, लवंडतो. अभ्यास असलेला मनुष्य चार तासांच्या बैठकीला सुमारें चारशें पांचशें द्रोण सहज लावतो. द्रोणांचे कान बाहेर आले असल्यास ते ओलेपणींच कातरून त्यांचीं पुडकीं लहान मोठीं बांधून ठेवावीं, आणि सावलींत हवाशीर जागीं टांगून ठेवावीं.

पत्रावळी करणें झाल्यावर फाटकीं तुटकीं, लहान मोठीं पानें शिल्लक राहिलीं असतील, तीं सर्व पानें एका माळेंत ओंवून ठेवावीं. त्यांचा प्रसंगविशेषीं उपयोग होतो. तीं पानें ऊन पाण्यांत भिजवून घेतलीं असतां टाका लावण्यास तत्काल अनुकूल होतात. दुसऱ्याही अनेक कामांत त्यांचा उपयोग होतो.

सुटीं पानें जर ताजीं नेहमीं मिळण्यासारखीं असतील, तर वाळलेल्या पानांची माळ करून ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं.

पत्रावळी करून त्या विकण्याचा धंदा करणारे लोक शहरांतून असतात. यांच्या दुकानांतून पत्रावळी व द्रोण विकत घेतांना ते नीट पाहून घेतले पाहिजेत. कारण, पुष्कळ असे धंदेवाले लोक लबाड्या करतांना आढळतात. बिघडलेल्या पत्रावळी चांगल्या पत्रा-वळींत मिसळून त्या ते गिऱ्हाइकांच्या पदरांत बांधतात.

पत्रावळी घेतांना रोजच्या जेवणाला किंवा फराळाला त्या पाहिजेत किंवा पंक्तीसाठीं पाहिजेत, तें पाहून त्या मानानें लहान मोठ्या घेतल्या पाहिजेत. रोजच्या जेवणाला मोठ्या किंवा पंक्तीच्या जेवणाला लहान पत्रावळी व द्रोण उपयोगाचे नाहींत. केळीचीं पानें कापतांनाही असाच विचार व तारतम्य ठेविलें पाहिजे.

प्रकरण १६ वें.

बागेची निगा.

कुटुंबवत्सल गृहस्थाच्या प्रपंचाला रोज भाजीपाल्याची तशी फळफळावळ व फुलें यांचीही गरज लागते. हे जिन्नस शहरांतून व मोठाल्या गांवांतून बाजारांत आयते मिळतात. तरी त्यांस पैसे फार पडतात, आणि ते हवे त्यावेळीं ताजे व मनाजोगे मिळत नाहींत. यासाठीं स्वतःच्या घराभोंवतीं लहानशी बाग असणें अवश्य आहे. झाडें व वेली यांच्या योगानें घराला शोभा येते. त्यांच्या फुलाफळांची रमणीयता नेत्रांना सुख देते. वनस्पतींच्या योगानें हवाही शुद्ध होते, व उष्णतेचा ताप कमी होतो. शिवाय, बागेच्या कामानें अनायासें शरीराला व्यायाम घडून मनाची उत्तम करमणूकही होते. असे घराभोवतीं लहानशी बाग करण्यापासून अनेक फायदे आहेत.

घरगुती बागेचे प्रकार—घरगुती बागांचे अनेक प्रकार आहेत. श्रीमान् लोक आपल्या मोठाल्या बागेंतच बंगले बांधून राहतात. कांहीं लोकांच्या बागा घरापासून दूर असतात. कांहीं लोक परसांतच झाडें व वेली लावतात. कित्येकांच्या घरापुढें मोकळ्या जागेंत एखादा क्यारा दूर्वा व लहानमोठीं झाडें किंवा वेली यांनीं आच्छादित असतो. कांहीं लोक व्हरांड्यांत (पडवींत) व सज्जांत

फुलझाडांच्या कुंड्या मांडून किंवा तारांनीं लटकावून जागेला शोभा आणितात. जशी जागेची सोय, पाण्याचा पुरवठा व यजमानाची व यजमानिणीची हौस असेल व अनुकूलता असेल त्याप्रमाणें बागेचें स्वरूप असतें. कित्येकांना द्रव्याची अनुकूलता नसते. त्यामुळें हौस असून तिचा उपयोग होत नाहीं. कित्येकांना वाटतें कीं, बागेची निगा राखण्यांत वेळ आणि पैसा लागेल. त्यामुळें त्यांची हौस कमी होते. पण बागेचें मुख्य साधन जागा व हौस हीं आहेत. हौस ही स्वभावतःच पाहिजे. ती बाहेरून आणतां येत नाहीं. ती असली म्हणजे तिच्यासाठीं वेळ खर्चण्यास तो तयार होतो व आपल्या ऐपती-प्रमाणें काटकसरीनें बागेच्या प्रीत्यर्थ थोडाबहुत पैसाही खुषीनें खर्च करून, त्याच्या मोबदल्यांत सुखाचा लाभ करून घेतो. स्वतःला हौस नसली, तरी आपल्या कुटुंबांतल्या कित्येक माणसांना ती असते. त्यांच्या सुखासाठीं तरी घराभोंवतीं लहानशी बाग अवश्य करावी.

वर जे बागेचे प्रकार सांगितले आहेत, त्यांचे स्थूलमानानें घरांतली बाग व घरास लागून असलेली बाग असे दोन वर्ग करतां येतील. दुसऱ्या वर्गांतच घरावेगळ्या स्वतंत्र बागेचा अंतर्भाव केला आहे. आतां या दोन वर्गासंबंधानें काय करतां येण्यासारखें आहे, तें पाहूं.

घरांतील बाग—हिच्यासाठीं परस, पुढील चौक आणि पडवी किंवा सज्जा, अशा तीन जागा असतात. एखाद्या घराला तिन्हींची अनुकूलता असेल, कित्येक घरांला एक किंवा दोन्हींचीच अनुकूलता असेल. जशी अनुकूलता असेल, त्यामानानें त्या जागा उपयोगांत आणिल्या पाहिजेत.

परस—परसांत शेतखाना, गुरांचा गोठा, आड, स्नानगृह, तुलसीवृंदावन वगैरे अनेक गोष्टी असतात. मुलांच्या खेळण्या–बागड-

ण्याची व उन्हाळ्यांत रात्रीं क्षणभर हवाशीर पडण्याची हीच जागा असते. असा प्रकार असेल, तेव्हां त्यांत झाडें-झुडपें न लावतां जागा मोकळी ठेवणेंच योग्य आहे. कारण झाडें लावण्यापासून सुख न होतां उलट मंडळीला अडचण मात्र व्हावयाची, व आपले श्रम मात्र फुकट जावयाचे. या सर्व कामाला पुरून उरेल तेथें बाजूला नेहमीं उपयोगीं पडणारीं एक दोन झाडें लावावीं ह्मणजे पुरेत.

परस प्रशस्त असून त्यांत मोकळी जागा पुष्कळ असेल, तर त्यांत कांहीं झाडें लावावीं. मात्र वड[1], पिंपळ, उंबर, आंबा किंवा अशा जातीचें दुसरें कांहीं झाड लावूं नये. कारण, अशा झाडांचीं पाळें-मुळें परसभर पसरतात. त्यांच्या छायेंत दुसरीं झाडें वाढत नाहींत, व बागेचा हेतु सफळ होत नाहीं. या झाडांच्या बुंध्याशीं मुंगळे, मुंग्या, वगैरे कीटक होतात, खारी झाडावर घरें करतात, झाडांचीं पानें गळून पडतात, असा अनेक प्रकारें त्रास होतो. छायेसाठीं पाहिजे तर लिंबाचें, अशोकाचें किंवा दुसरें एखादें निरुपद्रवी झाड लावावें.

ज्या वेली फार फोफावतात, ज्यांना मोठीं व दाट पानें येतात, ज्यांच्या फुलांस उद्दाम वास येतो व ज्या गुरांना आवडतात, अशा वेली [उदा०—लाल भोपळा, पडवळ, चमेली] परसांत लावूं नयेत. यांत सर्प वगैरे विषारी प्राणी लपून बसण्याचा संभव असतो, व गुरें नजर चुकवून अशा वेलींना खाऊन टाकतात.

---

१ पूजा, प्रदक्षिणा वगैरेसाठीं असें एखादें झाड लावण्याची इच्छा होते, पण हें लक्षांत ठेवावें कीं ज्या नेमधर्मासाठीं तें लावावयाचें ते नेमधर्म सततचे नसतात. अशा झाडांची उपाधि मात्र सततची असते. शिवाय अशा झाडांवर मुंजा, भुतें, वगैरे वास करतात अशी भीति भोळ्या व भित्र्या बायामुलांच्या मनांत प्रवेश करते. यासाठीं नेमधर्मासाठीं पाहिजे तर हीं झाडें कुंड्यांतून लावावीं, आणि काम झाल्याव तो कुंडा दुसरीकडे पोहोचविण्याची व्यवस्था करावी. झाडांची अदलाबदल अशा रीतीनें वाटेल तितके वेळां करतां येईल.

ज्या झाडांना सतत पाणी मिळण्याची अवश्यकता असते, अशींच झाडें विशेषेंकरून परसांत लावावीं. अशा झाडांची निवड करण्यांत शोभेपेक्षां लाभाकडे अधिक दृष्टि ठेवावी, व तीं अशा रीतीनें लावावीं कीं, त्यांपासून इच्छित लाभ बारमहा सतत घडत राहील. उदाहरणार्थ कांहीं झाडांचीं नांवें येथें सांगतों:—

फळझाडें–केळ, शेवगा, मिरची.

फुलझाडें—कण्हेर, कर्दळी, अगस्ति, पारिजातक, तगर, गुलाब, शेवती, मोगरा, इ०.

वेली (चातुर्मासिक)—दोडकें, गिलकें, तोंडलें, कारलें इ०.

औषधोपयोगी—देवकापूस, आलें, कोरफड, अडुळसा, ब्राह्मी, गुळवेल, पुदिना, दवणा इ०.

पुढील चौक किंवा अंगण—पुढील चौक चांगला विस्तृत असेल व तितकी अवश्यकता असेल, तर त्याची कांहीं जागा गाडी-घोडे फिरण्याइतकी सभोंवतीं सोडून मध्यभागीं मंडलाकार, त्रिकोणाकृति, चतुष्कोणी, किंवा धनुष्य, कमल इ० आकारांची बाग तयार करावी. मधून मधून फिरण्यासाठीं पायवाटा ठेवाव्या. या जागा आंखण्याचें काम एखाददुसरी खुंटी व सुतळी येवढ्या सामानानें करतां येतें. तें असें–खुंटी मध्यें पुरावी, तिला सुतळीचें एक टोंक बांधून दुसऱ्या टोकानें मोजमाप घ्यावें आणि त्या बरहुकूम खुरपीनें जमीन उकरून खुणा कराव्या. जर दाराशीं गाडी-घोडें येण्याची अवश्यकता नसेल किंवा तसें करण्याची सोय नसेल, तर दारासमोर चांगला पैस रस्ता ठेवून, दोन्ही बाजूस बाग लावण्यास हरकत नाहीं.

चौकांत लावण्याचीं झाडें विशेषेंकरून शोभेचीं व सुवासिक फुलांचीं असावीं. ज्यांना नेहमीं पाणी लागतें, किंवा ज्यांचीं मुळें

खोल जाऊन कायमचीं झाडें होतात, अशीं झाडें तेथें लावूं नयेत. उदा०-मेंदी, पिवळा गुलाब, जुई, शेवती, निशिगंध, सूर्यफूल, गुलबास, दूर्वा इ०

व्हरांडा (पडवी), सज्जा वगैरे—व्हरांडा चांगला प्रशस्त असला, तर त्याच्या कांठाशीं आणि त्याचा ओटा उंच असेल तर त्या ओट्यास लागून जमिनीवर कांहीं दूरपर्यंत फुलझाडांच्या कुंड्या व लाकडी टबवर तारेचीं पात्रें वगैरे ठेवतां किंवा टांगतां येतात. त्यांत लावावयाचीं रोपें सुगंधित, शोभेचीं, ज्यांचीं पाळें दूरवर जात नाहींत व ज्यांना ऊन व पाणी फारसें लागत नाहीं, अशीं असावींत. उदा०-गुलाब, निशिगंध, शेवती, अमरवेल, व ज्यांच्या मुळाशीं कांद्यासारख्या गांठी असून, ज्यांतून वर फुलांचे व पानांचे गुच्छ निघतात [यांना इंग्रजींत बल्ब ह्मणतात] अशीं रोपें.

रोपाची एकेक कुंडी किंवा दोन तीन चार कुंड्यांचा समुदाय ओळीनें किंवा खांबाखांबाशीं ठेवतात. शक्य असल्यास गॅलेरीवजा किंवा एकेरी घडवंच्या करून त्यांवरही कुंड्या ठेवतात.

पडवीच्या खांबावर आणि दाराच्या तोरणावर, दारापुढील मंडपावर, कंदिलाच्या खांबावर, घराच्या खिडक्या, जाळ्या, गवाक्षें इ० वर वेली चढवितात. पण त्या वेली मोठाल्या किंवा दाट पानांच्या, सुगंधि पुष्पांच्या किंवा जाड फांद्यांच्या अगदीं लावूं नयेत आणि त्या फार वाढल्या असतां वेळच्या वेळीं त्यांची छाटाछाट करीत जावें.

घराभोंवतीं बाग असावयाची ती घराला अगदीं लागून नसावी. घर आणि बाग यांमध्यें बरीच खुली जागा असावी. जागेचा विस्तार व पाण्याची सोय असेल, त्याप्रमाणें भाजीपाला, फळफळावळ, फूलझाडें असे बागेचे निरनिराळे विभाग करावे.

१ **भाजीपाला**–यांत घेवडा, वाटाणे, कोबी, भोपळा, मेथी इ० भाज्या लावाव्या.

२ **फळफळावळ**–यांत केळी, कागदी लिंबू, पेरू, जांभूळ, आंबा, फणस, बोर, बेल, डाळिंब, आंवळा इ०चीं झाडें जमिनीचा मगदूर पाहून त्याप्रमाणें लावावीं.

३ **फुलझाडें**–यांत बकुळी, हिरवा चाफा, सोनचाफा, मंदार, मालती, पारिजातक, जुई, मोगरा, गुलाब, चमेली, जास्वंद इ० झाडें लावावीं.

बागेच्या सभोंवतीं आणि मधून मधून रोशीवर मेंदी, व दुसरे छायावृक्ष, कर्ढालिंब, लिंब, कवठ, इ० झाडें लावावीं.

स्वतंत्र बाग–यासंबंधानें निराळें सांगण्याची अवश्यकता नाहीं. या आणि घराभोंवतालच्या बागेंत फरक येवढाच कीं, स्वतंत्र बागेंत जमीन पुष्कळ असल्यामुळें तेथें झाडांना पाणी देण्यासाठीं मोटेची किंवा मोठ्या विहिरींतून वर पाणी काढण्यासाठीं पंपाची अवश्यकता असते व या उपायांनीं त्या बागेंतून उत्पन्नही पुष्कळ अधिक काढतां येतें.

कामाला आरंभ–वर बागेचे निरनिराळे प्रकार आणि त्यांची आवडनिवड यांविषयीं सामान्यतः वर्णन करण्यांत आलें आहे. पण बागेंत झाडें लावावयाचीं तीं कशीं, व त्यांची जोगवण कशी करावयाची, तें अगोदर समजणें हें अवश्य आहे. आणि हें बागकामासंबंधाच्या पुस्तकांचें वाचन, प्रत्यक्ष माळ्याकडून मिळणारी अनुभविक माहिती व स्वतःचा अनुभव, यांच्याच साह्यानें होणारें असल्यामुळें, व या विषयावर मराठींत एक दोन चांगलीं पुस्तकें अगोदरच स्वतंत्र रीतीनें प्रसिद्ध झालीं असल्यामुळें, त्या माहितीचा समावेश विस्तारभयास्तव येथें करीत नाहीं.

शेवटीं हें प्रकरण संपवितांना एक सूचना येथें करावीशी वाटते. ती ही कीं, आपल्या लोकांत चैत्रमासांत हळदीकुंकुवाचे दिवशीं गौरीपुढें आरास मांडतांना त्यांत धान्य उगविलेल्या कुंड्या कित्येक बायका मांडीत असतात. त्याऐवजीं सुंदर फुलांच्या कुंडया स्वतः लावून त्या मांडण्याची चाल सुरू होईल, तर ती फार उपयुक्त व अधिक शोभादायक होईल.

प्रकरण १७ वें.

दूधदुभतें.

यत्र नास्ति दधिमंथनघोषो । यत्र न सन्ति लघुलघूनि शिशूनि
यत्र नास्ति भगवद्गुणचर्चा । तान्यरण्यसदृशानि गृहाणि ॥

गाईचें माहात्म्य—घरांत दूधदुभतें असणें हें गृहस्थपणाचें एक लक्षण आहे. किंबहुना गृहस्थपण यथायोग्य संपादन होण्याला तें अवश्यक आहे; आणि ह्मणूनच पित्यानें आपल्या कन्येचे विवाहसमयीं जामाताला गृहस्थाश्रमाच्या सिद्धीकरितां ज्या कितीएक वस्तु देण्याविषयीं सांगितलें आहे, त्यांत गाय ही मुख्य आहे. घरांतल्या दुभत्यापासून मुलांबाळांना दुधाची जी सोय असते, तिची सर बाजारचे दुधाला कधींही येऊं शकत नाहीं. ह्याशिवाय गाय ही देवता आहे. धरित्रीचें रूप आहे. अत्यंत अनुकंपनीय, अत्यंत

---

१ गाईला नित्य प्रातःकाळीं वंदन करावें असा आपला आचार आहे. वसुबारशीला (आश्विन व० १२ रोजीं) स्त्रिया दिवसभर उपोषण करून सायंकाळीं गाईची पूजा केल्यावर अन्नग्रहण करतात.

गाईच्या अत्यंत उपकारकपणास्तव एका इंग्रज ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं, सुधारलेले लोक जर पुन्हां पशुपूजा करूं लागले, तर त्यांत गाईला निश्चयानें अग्रपूजेचा मान मिळेल. (एनसा० ब्रि० पु० ७ पान ७३८).

उपकारक प्राणी आहे, अशी जी आपली परंपरागत[1] समजूत आहे; तिनें आपल्याला कसेंही झालें तरी गाय पूज्य वाटते, वंद्य वाटते, घराचें मंगल वाटतें. तिच्या दानाचें आणि पालनपोषणाचें फार पुण्य सांगितलें आहे. सभ्य लोक गोविक्रय करीत नाहींत. ती ब्राह्मणांचें नित्य अग्निहोत्राचें साधन आहे. तिचें पालन करणें क्षत्रियांचा परमधर्म आहे. तिचें संतान कृषि आणि वाणिज्याचा केवळ आधार आहे. फार जुन्या काळांत वसिष्ठ, जमदग्नि, भरद्वाज इ० ऋषींनीं बाळगलेल्या गाईच्या अद्भुत कथा कोणाला अश्रुत आहेत? दिलीप राजानें गाईच्याच आशिर्वादानें पराक्रमी पुत्र, रघु, प्राप्त करून घेतला. भगवान् श्रीकृष्णानें गाईवासरांबरोबर बाललीला केली. गाईसारखीं दूध देणारीं आणि इतर प्रकारांनीं कामीं पडणारीं ह्मैस, बकरीं, आणि दुसरीं हीं जनावरें आहेत. परंतु गाईची रमणीय आकृति, आणि पावित्र्य

---

१ ही आपले लोकांची मनोभावना अज्ञात कालापासून आहे. गोपालन हजारों वर्षांपासून आपले लोकांत चालत आलें आहे. त्यांचा उल्लेख वेदांत आणि हिब्रू भाषेच्या अति जुन्या ग्रंथांत सांपडतो. ईजिप्त देशांत ६००० वर्षांपूर्वी उभारलेल्या स्मारकावर यांच्या प्रतिमा कोरलेल्या पाहण्यांत येतात. मनुष्य जातीच्या सुधारणेच्या आरंभाच्या कालांत एखाद्याची संपत्ति मोजावयाची तर ती त्याच्या गोधनावरून मोजली जाई. गोत्र शब्दाचा गोपालनाशीं संबंध आहे ह्मणतात. नाणें ज्याकाळीं प्रचारांत नव्हतें, तेव्हां क्रयविक्रयाचें साधन बैल असत. ती चाल हल्लीं देखील कितीएक रानटी व न सुधारलेल्या लोकांत चालू आहे. पुराणांतून कितीएक राजांनीं दहादहा हजार गाई दिल्याच्या ज्या कथा ऐकण्यांत येतात त्यावरूनही हें अनुमान बळकट होतें. जुन्या ग्रीस देशांत धातूचें नाणें जेव्हां प्रथम प्रचारांत आलें, तेव्हां पूर्वीचें क्रयविक्रयाचें साधन जो बैल त्याचे आठवणीकरितां नाण्यावर बैलाची प्रतिमा उठविली होती. राशींमध्यें वृषभाची गणना झाली ही गोष्टही बैलाविषयींचे पूज्यभावाची निदर्शक आहे.

हीं मनाला आकर्षण करणारीं आहेत; आणि ह्यामुळेंच गाय सर्व जगाला संग्राह्य झाली आहे.

म्हैस—म्हशीमध्यें दूध अधिक प्रमाणानें आणि अधिक स्नेह-युक्त देण्याशिवाय दुसरे गुण कांहींच नाहींत. उलट तिच्या दुधांत दुर्गुण बरेच आहेत. तें रोग्याच्या, तान्ह्याच्या आणि वाढल्या मुलाच्या उपयोगास येत नाहीं. शिवाय म्हशीचें अवजड शरीर आणि अंमगळ राहाणी ह्यामुळेंही ती लोकांना फारशी आवडत नाहीं. बहुधा धंदे-वाईक आणि ज्यांना दुधातुपाकरितांच दुभतें जनावर पाहिजे असतें असे लोक म्हैस बाळगतात.

बकरीच्या आणि इतर दुभत्याचा विचार आपल्याला फारसा मह-त्वाचा नसल्यामुळें, येथें करीत नाहीं.

दूधदुभत्याच्या कामाची माहिती—दूधदुभत्याचें काम कांहीं फार नाहीं, थोडें आहे. पण तें शिकल्या केल्याशिवाय नीट करतां येत नाहीं. त्याची माहिती करून घ्यावी लागते. ती सर्व एकेकाळीं एकेजागीं हवी तेव्हां मिळत नाहीं. म्हणून ती ठोकळमानानें येथें दिली आहे. तिचा उपयोग करून घ्यावा. ह्या विषयांत जी नवीन पुस्तकें किंवा मासिकें निघतात, त्यांतलें एकादें वाचीत जावें म्हणजे अगदीं चालू काळापर्यंतचें ज्ञान आपल्यास होतें, आणि उत्तरोत्तर सुधारणा करतां येते.

गोठ्याची व्यवस्था—दुभत्या जनावरासंबंधानें एक मुख्य आणि अत्यंत महत्वाची गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, त्याला मनुष्याप्रमाणेंच रहाण्यास मोकळी हवाशीर स्वच्छ जागा, पोटभर स्वच्छ खाणें, स्वच्छ पाणी, योग्य व्यायाम, आणि योग्य विश्राम इ० ची अवश्यकता आहे. त्याला कोठेंही

बांधिलें आणि कसला तरी चारापाणी दिलें ह्मणजे त्याचेसंबंधीं आपलें कर्तव्य झालें असें कधींही समजतां कामा नये.

गोठा—गुरांचा गोठा मनुष्याच्या रहात्या जागेपासून दूर असावा. तो मोठा वाडा असेल, तर त्यांतल्या मागील बाजूस किंवा त्यास चौक असल्यास दुसऱ्या चौकांत करण्यास हरकत नाहीं. कारण, गुरांच्या नाकातोंडातून श्वासोच्छ्वासाबरोबर जी हवा निघते, ती फार विषारी असते. ती शेजारच्या हवेला दूषित करते. शिवाय सांसर्गिक रोग वाहणारे सूक्ष्म कीटक या गुरांचे अंगावर आणि गोठ्यांत असले तर ते त्यांचे जवळ राहणारांत तो रोग फार त्वरेनें पोहोंचवितात. ह्मणून गोठ्याजवळ मनुष्यांनीं राहणें आरोग्यदृष्ट्या इष्ट नाहीं.

गोठ्यासंबंधानें पुढील गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या आहेत—

१ गोठा प्रशस्त असावा. इतका कीं, त्यांत गाईला दोन वासरांसहित ठेवतां यावें. गोठ्याची उंची १०।१२ फूट आणि प्रत्येक गुराला जागा ८ फूट लांब व तितकीच रुंद असली पाहिजे. दोन गुरांमध्यें अंतर एका गुराला आपल्या अवयवाचा स्पर्श कोणचेही प्रकारें दुसऱ्या गुराला करतां येणार नाहीं इतकें राहिलें पाहिजे. गोठ्यांत वरचे बाजूला माळा करूं नये किंवा इकडे तिकडे कांहीं अडगळ-लांकडें, गवऱ्या वगैरे—ठेवूं नयेत. त्याच्या भिंती स्वच्छ असाव्या.

२ तो कोंदट, अंधेरांत, दमट, किंवा लोण्याच्या मातीचा नसावा.

३ त्याचे आंत दिवसांतून केव्हां तरी सूर्याचे किरण येत असले पाहिजेत.

४ त्यांत वाऱ्याचा संचार समोरासमोर दोन दिशांनीं झाला पाहिजे, पण तो गुरांच्या अंगावरून होऊं नये. त्याकरितां दरवाजे, खिडक्या, गवाक्षें इ० गोठ्यांला असावीं.

५ गोठ्याचा मागील दरवाजा फाटकाचा करावा, निदान त्यास बांबूची जाळीदार तट्टी तरी लावावी. दरवाजा बंद करणें जसें चांगलें नाहीं, तसाच तो खुला ठेवणेंही योग्य नाहीं. बंद करणें जनावराचे आरोग्याला अपायकारक आहे आणि खुला ठेवल्यापासून गुरूं एकादे वेळीं दावें तोडून बाहेर पडल्यास बागेला अपायकारक आहे.

६ त्यांत पावसाची ओसारी किंवा सूर्याचें ऊन गुरांचे अंगावर जाऊं नये.

७ गोठ्याची जमीन मुरमी किंवा फरसबंदी केलेली असावी. फरस दगडी असूं नयेत. जमीन मागील भागाला अंमळ उतरती असावी. तिच्या खालीं सबंध लांबींत एक मोरी करावी. ती उथळ असावी.

गोठ्यांत स्वच्छता राखांवी. दुभतें जनावर सतत घरीं रहात असलें तर दिवसांतून दोन तीन वेळां आणि निजण्यापूर्वी एक वेळ मजबूत खराट्यानें गोठा झाडून स्वच्छ करावा. शेण गोळा करून गोठ्यांतच न ठेवितां कांहीं अंतरावर नियमित जागेंत ठेवावें. शेणामुतांत भरलेला चाराही शेणाबरोबर काढून टाकावा. मूत्र मोरींतून वाहून मोठ्या गटारांत पडत नसेल तर तें एकत्र गोळा होण्यासाठीं मोरीच्या खालीं एका बाजूला चुनेगच्चीचा एक खड्डा करावा आणि त्यांतून सांचलेलें मूत्र बालटीनें भरून [खत केलें असल्यास त्यांत] टाकावें.

गोठ्यांत ओल राहूं देऊं नये. विशेषतः पावसाळ्यांत याबद्दल ज्यास्त खबरदारी घेतली पाहिजे. ज़मीन फरसबंदीची असल्यास पाण्यानें धुवावी. ती मुरमी किंवा मातीची असलयास तींत गोमूत्र शिरून ती भिजते. तेवढा भाग फावड्यानें खरडून काढून त्यावर दुसरी बारीक माती किंवा राख पसरावी, आणि खरडून काढलेली राखमाती [खत जमविलें असल्यास त्यांत] टाकून द्यावी.

गोठ्यांत दुर्गंधि राहूं देऊं नये. संध्याकाळ झाल्यावर त्यांत एकादें लाकूड, गवताचा उरलेला भाग, झाडांचीं वाळलेलीं व गळून पडलेलीं पानें, गवऱ्या, राळ, गुगुळ, किंवा ऊद यांचा धूर करावा. चुन्याचें, फेनाइलचें किंवा कार्बोलिक ॲसिडचें पाणी (१:४०) शिंपडल्यानेंही दुर्गंधि नाहींशी होते. वर्षांतून एक दोन वेळां (वसुबारस, गोवर्धन–उत्सव वगैरेला) भिंतीची लिंपाई पोताई करावी. गोचिड, गोमाशा, गांधिलमाशा वगैरे प्राणी दुर्गंधीमुळें गोठ्यांत येतात आणि तेथें घाणीच्या आश्रयानें वस्ती करून गुरांना त्रास देतात. हे सांसर्गिक रोग पसरीत असतात. ह्मणून गोठ्याच्या सफाई-कडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.

पातळ, घाणेरडें आणि रोगग्रस्त जनावराचें शेणमूत असेल त्याची लागलीच विल्हेवाट लावावी. तें वस्तीपासून लांब जमिनींत पुरण्यास किंवा जाळण्यास पाठवावें. निरोगी गुरांचें शेणमूत एकत्र मळून त्याच्या गवऱ्या करून एका नियमित जागेंत वाळवाव्या. रहात्या घरांतल्या परसांच्या भिंतीवर, शेतखान्याजवळ किंवा विहिरीजवळ गवऱ्या कधींही थापूं नयेत. सवड असल्यास गवऱ्या न करतां शेणमुताचें खत तयार करून तें उपयोगास आणावें किंवा तीं कोणा खत कर-णारास रोजचे रोज काढून नेण्याचा मक्ता द्यावा.

शेजारीपाजारी शेण घेण्यास येतात त्याशीं वाद घालूं नये. कारण शेणाची मोठीशी बाबत नाहीं. तरी सगळें शेण हातोहातीं उठून जाऊं देऊं नये, आणि तें नेणारानें शेणचें शेण नेऊन आणखी उपद्रव करूं नये यावर लक्ष ठेवण्याची उपाधि आपले मागें लावून घेऊं नये.

खत करणें—शेणमूत आणि त्यांचें खत भुईवर उघड्या जागेंत जमविलें तर तें कामास येत नाहीं. तें एकादी खाच करून त्यांत

जमविण्याची जरूरी असते. बाग किंवा शेत असल्यास त्यांच्या एका कोपऱ्यांत अशी खाच करतां येते. एरव्हीं ती लोकवस्तीचे भागांत करण्याची सोय नसते. लहान लहान गांवांत वस्तीचे बाहेर खाच करून तेथल्यातेथें शेणमुतारी पोंहचविणें कांहीं कठीण नसतें.

खताची खाच—खताची खाच जरूरीप्रमाणें पांच सहा फूट लांबरुंद आणि तितकीच खोल करून ती चुना-विटांनीं तळाला आणि सभोंवतीं बांधून काढावी. वर टिनाचें छप्पर असें घालावें कीं त्यापासून पावसाचें पाणी किंवा ऊन खाचेंत जाण्यास पूर्ण प्रतिबंध व्हावा. ह्या खाचेंत शेणमूत टाकीत जावें. घरांतील राख व झाडणही त्यांत घालावी. खाचेच्या तोंडावर लाकडी फळ्या घालाव्या किंवा लांकडें आणि गवत, पानें वगैरेचें आच्छादन करावें. हें शेणमूत नेहमीं ओलें राहून सडलें पाहिजे. तें सुकल्यासारखें दिसलें तर पाणी शिंपडून ओलें करावें. फार पातळ दिसलें तर दांड्यानें वर खालीं करावें, ह्मणजे त्यांत हवेचा प्रवेश होऊन ती फुगेल. त्यांतून उद्दाम घाण येऊं लागली असतां त्याला दांड्यानें उकरून थोडें पाणी शिंपडावें. खाच भरली ह्मणजे ३।४ आठवडे तशीच राहूं देऊन मग तें खत कामास आणावें. खाचेंतलें बाहेर निघून ती रिकामी होईपर्यंत थोडे दिवस सांठवणीकरितां दुसरी एक लहान खाच करावी. ही आंतून चुना-विटांनीं पक्की केली नाहीं तरी चालेल. खाचेंतलें खत काढतांनां त्याबरोबर तळाची आणि सभोंवतालची थोडथोडी मातीही काढून घ्यावी. ह्मणजे खतांतले रस जवळच्या मातीनें शोषून घेतलेले असतात ते वायां जाणार नाहींत.

दुभतं जनावराची स्वच्छता—गाईला स्वभावतःच स्वच्छता आवडते. ह्मणून तिला निर्मळ राखावी. त्यासाठीं तिला रोज स्नान

घालूं नये. पण अंगावरून खरारा करून ब्रश फिरवावा. अंगास डाग पडला असेल तेवढा भाग धुऊन पुसावा. आठवड्यांतून एकदां हवेंत सर्दी किंवा गरमी असेल त्यामानानें ऊन किंवा थंड पाण्यानें तिला स्नान घालावें. गांवाचे काठीं नदी किंवा ओढा असेल तर केव्हां केव्हां तिला वस्तीचे खालीं नेऊन धुवावी. स्नान घातल्यावर तिचें सर्व अंग फडक्यानें पुसावें. सर्दी लागूं देऊं नये. तिच्या सडांचे सभोंवतीं, कानांच्या आंतल्या भागास, गळ्याच्या पोळीला वगैरे गोचिडी चिकटून बसून रक्तशोषण करीत असतात. त्या बारीक चिमट्यानें धरून काढून माराव्या. सडा सभोंवतीं केस पुष्कळ असून ते निर्मळ राखतां येत नसतील तर कापून काढावे.

म्हशीला उष्ण प्रदेशांत उष्ण काळांत दिवसांतून दोन वेळ आणि दुसरे काळांत एक वेळ थंड पाण्यानें स्नान घालावें. तरटाचे तुकड्यानें तिचें आंग चोळावें. तिचे केस फार वाढतात व ते राठ होतात. म्हणून वर्षांतून तीन चार वेळ ते कापून काढावे.

गुरांचें खाणें—गाय आणि म्हैस हीं निसर्गतः चारा खाणारीं जनावरें आहेत. चारा विपुल असला तर त्यांस दुसरें कांहीं नको. पण चारा नसला तर त्यांस दुसरें कांहींही दिलें तरी त्यापासून त्यांचें पोषण होत नाहीं, किंवा त्यांस समाधान वाटत नाहीं. तरी असें अनुभवास आलें आहे कीं, चाऱ्याबरोबर दुसरे पदार्थ—पेंड, भुसा, भुशी वगैरे—त्यांस दिल्यानें तीं पुष्ट आणि अधिक दुधाळ होतात. म्हणून चाऱ्याबरोबर हे दुसरे पदार्थ गुरांना चारीत असतात. सामान्यतः खालील पदार्थ गुरांच्या वैरणींत येतात.

१ **चारा**—गवत, जोंधळ्यांचा कडबा, भूस, वगैरे.

२ **चुणी**—चुरी, आणि धन्यांची भरड.

३ पेंड, सरक्या, गाजरें, हिरवा बूट् वगैरे.

गवत—गवताच्या मुख्य दोन जाती आहेत. एक जमीनीवरचें. हें नरम, अधिक रसदार आणि सकस असतें. दुसरें डोंगरी. ह्याची काडी राठ, रुक्ष आणि कमी सकस असतें. गवतांत एक मोठा फरक कापणीमुळें होत असतो. जें गवत त्यास फुलें येण्यापूर्वी आश्विन--कार्तिकांत कापलेलें असतें तें सरस व चांगलें असतें. जें फुलें आल्यावर किंवा वाळल्यावर कांपलें जातें तें नीरस व वाईट असतें. ह्याशिवाय गवतांचे वर्ण, आकृति, गुण आणि रुचि यांच्याप्रमाणें किती एक पोटभेद समजले जातात. ते निरनिराळे देशांत निरनिराळ्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत.

निरनिराळ्या गवतांच्या बारीक भेदांची माहिती आपले किंवा शेजारचे एकाद्या मोठ्या गांवांत गवताचा व्यापार करणाऱ्यांकडून मिळविली असतां तिजपासून चांगले मालाची निवड आणि भावामध्यें किफायत हीं दोन्हीं साधतां येतील.

साधारणपणें जें गवत नरम, हिरवें, रसदार, बारीक काडीचें, लांब व थोडया पातीचें असतें तें चांगलें असतें. लाल फुलांचें,कुसळांचें, जाड दांडीचें, मिसळणीचें, ओढ्याच्या कांठच्या पाणथळांत उगवलेलें, अतिहिरवें गार, पाती झडून शुष्क काड्या राहिलेलें, लहान, खुजट व पावसानें भिजून काळें पडलेलें किंवा जुनें गवत निकृष्ट प्रतीचें होय. असें गवत होतां होईतों घेऊं नये.

हिरवें गवत—हिरवें गवत पावसाळ्याचे आरंभीं उगवतें. तें गुरांना चारूं नये. कारण, तेव्हां त्यांत पाण्याचा अंश अतिशय असतो. असें गवत खाल्ल्यानें गुरांना हगवणीसारखे रोग होतात. त्यांचें पोट फुगतें, दूध पातळ होतें, आणि त्या दुधांत सत्वांश नसतो. ह्मणून

हिरवें गवत चांगली काडी धरूं लागल्यावर घालावें आणि आरंभीं आरंभीं वाळलेल्या गवताबरोबर तें थोडें थोडें मिसळून द्यावें.

वाळलेलें गवत—हिरवें गवत फुलून वाळण्यापूर्वीं कापून पेंड्या बांधून नीट रचून ठेविलें असतां तें बारा महिने चांगलें राहतें. ह्मणून व्यापारी लोक तसें करीत असतात. असें गवत जरूरीप्रमाणें पुरविणाऱ्या व्यापाऱ्याशीं हंगामावर[1] ठरवून घेतलें असतां उन्हाळ्यांत सुख होतें. असें करण्याची सवड नसल्यास घरगुती गंजी लावून ठेवावी, किंवा थोडें थोडकें गवत असेल तर कोठ्यांत भरून ठेवावें.

ल्यूसर्न किंवा विलायती गवत—हें उन्हाळ्यांत सुक्या गवताबरोबर गुरांना देतात. हें गवत फार पुष्टिकारक असतें. पण दुभत्या जनावराला ह्या गवताचेंच खाद्य देणें अपायकारक आहे. तें फार थोड्या प्रमाणापासून द्यावें लागतें आणि कमी कमी करीत जावें लागतें. तें एकदम चालू किंवा बंद करण्यापासूनही गुरांना अपाय होतो. तें गवत दिवसाला ५ शेरांहून अधिक देऊं नये.

कडबा—जोंधळा, बाजरी आणि मका यांचा कडबा गुरांना घालतात. ह्या तिहींत जोंधळ्याचा कडबा उत्तम प्रतीचा असतो.

ज्वारीच्या कच्च्या कडब्याविषयीं कित्येक साधारण नियम लक्षांत ठेवण्यासारखे आहेत ते हे:—

---

१ हा हंगाम कार्तिकांत असतो. वर्षाला गवत किती लागेल याचा अंदाज गुरांची संख्या आणि त्यांचें रोजचें खाण्याचें सरासरी प्रमाण यांवरून करतां येतो. एका गुराला १ वर्षाला साधारणपणें ९० मण गवत पुरें होतें.

गवतासाठीं कुरण घ्यावयाचें तर तें एका गाईला एक एकर एका वर्षाला पुरतें, एका एकरांत ओलें गवत ३०० मण, आणि वाळलेलें ९० मण निघतें असा अंदाज धरून घ्यावें.

१ पीक लहान असेपर्यंत किंवा त्याची वाढ बंद पडली असतां त्याचीं झाडें गुरांना मुळींच चारूं नयेत.

२ तें वाढीवर असतांना चारावयाचें झाल्यास तीं उन्हांत दोन दिवस पडूं द्यावीं. त्यांत चांगला कोरडेपणा आल्यावर तीं चारावीं.

३ कच्चा कडबा त्याला फूल आल्यावर चारण्यायोग्य होतो.

वरील लहान, कच्चा कडबा कृतीनें सांठवून ठेवून उपयोगांत आणितां येतो.

कडब्याचीं ताटें—कणीस काढून घेतल्यावर ताटें हिरवीं आहेत तोंच कापून चार-चार, सहा-सहा पेंढ्यांचे ढीग शेतांत उभे करून ठेवितात. ताटें ऊन आणि वारा यांनीं हडकून कोरडीं झालीं ह्मणजे सावलींत त्यांचा साठा करून ठेवावा. तीं घरावर किंवा अंगणांत खुलीं टाकूं नयेत. उन्हानें आणि पावसानें तीं खराब झालीं असतां गुरें खात नाहींत.

चरी—केव्हां ज्वारी किंवा बाजरीचें पीक वैरणीकरितांच करीत असतात. त्यासही वरील नियम लागू आहेत. ह्या पिकापासून दाणा घेण्याची अपेक्षा नसते ह्मणून त्याचें बीं दाट पेरितात; आणि झाडें फुलास येतांच कापून घेतात.

भूस (भुसा किंवा भुशी)—तांदुळ, गहूं, जव इ० एकदल धान्यांचे झाडांतून, दाणा काढून, घेतल्यावर जो भाग रहातो, त्यास भुसा[1] आणि द्विदल धान्यांच्या (डाळींच्या), टरफलांला भुशी ह्मणतात. एकदल धान्यांच्या कोंडयाचाही भुशींत समावेश होतो. (भुसा आणि कोंडा यांतील फरक लक्षांत ठेवण्यासारखा आहे).

---

१ तांदुळाच्या भुशाला ' पेंढा ' असें एक विशेष नांव आहे.

चुणी आणि भरडा—चुणी ह्मणजे धान्यांचें कडदण. हें डाळींचें चांगलें असतें. त्यांत तुरीच्या डाळीचें कडदण दूध वाढविणारें आणि उडदांच्या डाळीचें शक्ति वाढविणारें आहे. गहूं, जव, बाजरी, मठ आणि कुळीथ यांचा भरडाही देतात.

पेंड—सामान्यतः ज्या धान्यांचें तेल मनुष्याच्या खाण्यांत येतें, त्या धान्यांची पेंड गुरांना चारतात. ज्या देशांत ज्या धान्याच्या तेलाचा अधिक प्रचार, त्या देशांत त्याच धान्याच्या पेंडेचा प्रचार असतो. आणखी ज्या धान्यांत जे गुण असतात, ते त्याच्या पेंडेंतही येतात. ह्या तत्त्वांवर कोणते देशांत कोणती पेंड चारतात आणि कोणत्या पेंडेचे काय गुण-दोष असतात, याची समज होण्यासारखी आहे. सामान्यतः भुईमुगाची पेंड फार गुणकारी असते. पण ती फार महाग पडते. हिच्या खालीं तिळांची किंवा कारळीची पेंड आणि हिच्याखालीं करडई, खसखस, जवस वगैरेंचा नंबर येतो.

पेंड देशी घाण्यांतलीच गुरांच्या खाण्याजोगी असते. मिलमध्यें तेल काढून राहिलेली पेंड निरुपयोगी आहे. कारण, ती अगदींच सत्त्वहीन झालेली असते. पेंड ओली रसयुक्त एक-दोन दिवसांची इतकी शिळी द्यावी. ती ताजीतटकी, किंवा बुरसलेली व वाळून लाकूड झालेली देऊं नये.

पेंड चारतांना तोडून कडा फोडून पाण्यांत भिजवून द्यावी.

नुकत्याच फळलेल्या (सगर्भ झालेल्या) गाईस उष्ण पेंड दिली असतां गर्भपतनाची भीति असते. तसेंच नुकत्याच व्यालेल्या गाईला ती फार चारली असतां जुलाब होऊं लागतात, आणि तिच्या दुधांत देखील त्या खळीचा वास येऊं लागतो. तरी समधात खळ केव्हांही योग्य प्रमाणांत चारण्यास हरकत नाहीं. उष्ण खळीचा उपयोग शीत काळांत करणें योग्य आहे.

पेंड गाईपेक्षां ह्मशीला विशेष मानवते.

सरक्या—पेंडेचा विशेष गुण दूध काढण्याचा आहे. सरक्यांनीं ह्मशी दूध कमी देतात खऱ्या, पण या दुधांत लोणी ज्यास्त असतें.

गाजर—कच्चें गाजर आणि त्याचीं पानें पुष्टिकारक असतात.

मीठ—गुरांना दाणा चारतांना त्याबरोबर थोडें मीठही घालावें.

रोजचें प्रमाण—चांगल्या दुधाळ गाईला सुकें गवत एक दिवसाला १० शेर पाहिजे. हिरवें याचे दुपटीनें आणि सायलेज २५ शेर हवें. हेंच प्रमाण सुक्या आणि ओल्या कडब्याचें आहे. त्याशिवाय तिला रोज दोन अडीच तोळे मीठ दिलें पाहिजे.

वर लिहिलेलीं प्रमाणें सामान्य आहेत. दुभत्या जनावरांचें शरीर आणि वय असेल, त्या मानानें या प्रमाणाहून कमीअधिक वैरण लागणें शक्य आहे.

वेळा—गुराला दिवसभरांत चारावयाचा चारा सगळा किंवा वारंवार थोडाथोडा किंवा अनियमित रीतीनें केव्हां तरी घालूं नये. गुरूं खरेंखरें पहिल्या व उत्तर रात्रीं पोटभर चारा खात असतें. त्या दोन्ही वेळां भरपूर चारा त्याचे पुढें घालावा. मध्यान्हानंतर थोडथोडा एक किंवा दोन वेळां धार काढण्याच्या आरंभीं देणें, हा उत्तमपक्ष आहे. मागाहून दिल्यासही हरकत नाहीं.

पाणी—गाईला दिवसांतून मण-सवामणपर्यंत पाणी लागतें. तें तीन वेळां करून द्यावें. दूध देणारी गाय तें न देणाऱ्या गाईच्या

१. कोणी असें ह्मणतात कीं, जनावराला आपले वजनाच्या दशांश खाण्यास लागतें आणि तें विसांश दूध देतें.

दुप्पट पाणी पिते. ह्मशीचें प्रमाण गाईच्या दीडपट आहे. वासराला पहिल्या महिन्यांत पाणी पाजावें लागत नाहीं.

गुराला पाजावयाचें पाणी डबक्यांतलें, पानें पडून सडलेलें, चिखलमातीचें, धुणें धुतलेलें, मळकट भांड्यांत ठेवलेलें, फार शिळें, गार, जड, खारें, असें असूं नये. झऱ्याचें किंवा विहिरीचें स्वच्छ ताजें पाणी पाजावें. पहाटेस थंडीची वेळ निघून गेल्यावर, सायंकाळीं थंडावा होण्यापूर्वी, आणि पुनः मधल्या वेळीं.

व्यायाम—गुरांना सोय असली, तर दिवसास बाहेर चरण्यास जाऊं द्यावें; त्यांना बाहेर पाठवायाचें तें मुख्यत्वें चारण्याकरितां नव्हे, तर व्यायामाकरितां आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवावी. जनावर बाहेरून जाऊन आल्यानें आनंदित होतें. बाहेर सोडण्याची सोय नसेल तर त्यास एक-दोन दिवसांआड थोडें फिरवून आणावें. वाड्यांतले वाड्यांत तरी फिरवावें. निदान गोठ्यांत मोकळें ठेवण्याची सोय करावी. एके जागीं दिवसभर उभें राहिल्यानें अन्नपचन होत नाहीं, व गुरांचे पायांत रस उतरून ते भरून येतात. आणि तशी संवय पडली असतां, मग त्यांस फारसें चालवत देखील नाहीं. वासरांना तर मोकळें सोडलेंच पाहिजे; नाहीं तर त्यांची वाढ खुंटते.

विश्रांति—गाय रात्रीची विश्रांति घेते. त्याकरितां तिच्या ठाणावर भुसा किंवा गवत २।३ इंच जाड पसरावें. वाईट, घाणेरडा चारा पसरला असतां सुखाऐवजीं त्यांस दुःख होईल. सायंकाळीं गोठ्यांत दीपदर्शन अवश्य झालें पाहिजे. रात्रभर प्रकाश ठेवण्याची मुळींच अवश्यकता नाहीं. वासरूं गाईचे फार जवळ बांधूं नये. कारण, तें तिला दुधासाठीं वारंवार त्रास देईल. कदाचित् सुटूनही थानास लागेल; आणि अतिशय दूध त्याचे पोटांत गेलें असतां त्यापासून

अपचन होऊन तें एखादेवेळीं मरेलही. स्पर्शजन्य रोगानें पछाडलेलें जनावर निरोगी जनावराच्या शेजारीं बांधूं नये. उष्ण प्रदेशांत उष्ण दिवसांत गाय आणि तिच्या कुटुंबीयांला रात्रीचे वेळीं चौकांत बांधावें. वर्षा आणि शिशिर ऋतूंत त्यांचे गोठ्यांत ऊन राहील अशी तजवीज करावी. शक्य असल्यास कांबळें किंवा गोणपाटें वगैरे आच्छादन त्यांचे पाठीवर बांधावें. शिंगांच्या मुळाशीं तिळाचें तेल चोळल्यानेंही शैत्यांची बाधा कमी होते म्हणतात. गुरांना रागें भरल्यानें, ओरडून बोलल्यानें, किंवा त्यांचे भोंवतीं गडबड केल्यानें तीं चिडतात आणि त्याचा परिणाम दुधावर होतो. धार काढण्यासाठीं किंवा चारण्यासाठीं त्यांस नेतांना पळवूं नये. त्यांचे चालीनें त्यांस चालूं द्यावें.

दुभत्या जनावरांची निवड--गाय किंवा ह्मैस घेतांना तिच्या शुभाशुभ चिन्हांच्या[1] आणि वेळ-मुहूर्तांच्या विचाराशिवाय आणखी ती दुधासाठीं घ्यावयाचीं कीं वासरासाठीं, याचा विचार करणें अवश्य आहे. कारण कांहीं जनावरें दुधाळ असतात व कांहींचे बच्चे मात्र घेण्यासारखे असतात. जनावर दुधाळ आहे कीं नाहीं, याची परीक्षा त्याचे जातीवरून करतां येते. एकाच जातीचे दोन जनावरांचे दुधाचे प्रमाणांत वयपरत्वें न्यूनाधिकता होते; ह्मणून या बाबतींत कांहीं माहिती खालीं दिली आहे[2]. ती लक्षांत ठेविली आणि एखाद्या

१. जी (१) आपलें दूध आपणच पिते (२) आपलेखालील जमीन आपले खुरानें खोदिते किंवा (३) जिला आंचळे असतील अशी गाय अशुभ समजावी.

ज्या ह्मशीला भवरी किंवा नार्गीण असते ती अशुभ.

२ इंग्लंडांत तर आतां दहा शेरांखालीं दूध देणारी गाय दुधाकरितां कोणी बाळगीत नाहीं.

मध्यवर्ती मोठ्या गांवाला भरणाऱ्या गाई-ह्मशींच्या बाजाराला जाऊन निरनिराळ्या जातींचीं जनावरें एकत्र एकाच काळीं पुनः पुनः लक्षपूर्वक पाहिलीं, ह्मणजे त्यांची पारख करण्यांत फारशी चूक होणार नाहीं.

जनावर घेतांना एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी ही आहे कीं, एका हवापाण्यांत वाढलेलें जनावर त्यांच्याहून भिन्न अशा हवापाण्यांचे देशांत जगत नाहीं, निदान बदललेल्या देशांत पहिल्या देशच्या इतकें दूध देत नाहीं. दुसरी याहूनही अधिक महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे त्याच्या निरोगीपणाची–विशेषेंकरून त्याला क्षयरोग नाहीं, त्याबद्दलची परीक्षा करविणें–ही होय. ही परीक्षा जाणत्या माणसांकडून करविली पाहिजे.

दुआब मधील देशांत आणि घाटमाथ्यावर जेथें पाऊस फार पडतो, तेथें गुरें भिकार व दुबळीं निपजतात. जेथें पाऊस ३०।४० इंचपर्यंत होऊन तो वाहून जात असतो, तेथें जनावरांना वैरण चांगलें मिळून तीं चांगलीं वाढतात. शुद्ध जातीच्या गुरांचा रंग बहुतेक पांढरा किंवा करडा असतो. लाल आणि काळा थोडा.

बंगाल्यांतलीं गुरें मातबर नसतात. मद्रासचें नेलोरचें खेत दुधाळ गाईविषयीं प्रसिद्ध आहे. येथील गाई मोठ्या, पांढऱ्या किंवा करड्या रंगाच्या असतात.

मध्य प्रांतांतील 'अरवी' चे खेताचें नेलोरशीं इतर बाबतींत बरेंच साम्य आहे. ह्यास दूध मात्र त्यांचें इतकें नसतें.

सिंधी देशांतील 'सिंधी' खेताच्या गाई लहान बांध्याच्या काळसर तांबूस रंगाच्या असतात. कांहींच्या अंगांवर पांढरे डाग असतात. उत्तम गुरें मध्यम बांध्याचीं असतात. हीं पंधरा शेरपर्यंत दूध देतात.

काठियावाडांतल्या गीरच्या गाई ह्या मध्यम बांध्याच्या आणि देखण्या असतात. त्या बारा शेरपर्यंत दूध देतात. ह्यांचे विण्याचा कांहीं नियम नाहीं आणि ह्या लवकर आटतात.

पंजाबांत हंसी किंवा हरीयाना खेताच्या पांढऱ्या रंगाच्या गाई मोठ्या ऐटदार व सुंदर आकृतीच्या असतात. ह्यांचे इतकें दूध दुसऱ्या कोणच्याही खेताची गाय देत नाहीं.

मांटगोमेरी (पंजाब) च्या गाई हंसीसारख्याच पुष्कळ दूध देणाऱ्या आहेत. ह्या काळसर, लाल, शुद्ध पांढऱ्या किंवा करड्या रंगाच्या असतात. कबऱ्याही पुष्कळ असतात. ८ शेर दूध देणारी गाय तेथें ५०।६० रुपयांला विकते. परंतु पहिल्या प्रतीच्या गाईला १०० किंवा अधिक रु० पडतात.

मारवाडी–नागोरच्या गाई आकृतीनें काठियावाडीसारख्या, पण डौलदार, पांढऱ्या रंगाच्या व शरीरानें सुटसटीत असतात.

नेमाडी, माळवी वगैरे जाती वरील जातींच्या खालीं आहेत.

ह्मशींच्या जाती––दक्षिण आणि माळवा येथील लांब अणकुचीदार शिंगांच्या ह्मशी उत्तरेकडील ह्मशींपेक्षां दुधाला कांहीं अंशीं कमी असतात. गुजराथेंतल्या खेडा जिल्ह्यांतल्या ह्मशी (यांस सुरती ह्मणतात) ३० शेरपर्यंत दूध देतात. त्यांस किंमत १२५ पासून १४० रु. पर्यंत पडते.

जाफराबादी किंवा काठियावाडच्या ह्मशी––गीरच्या डोंगरी प्रदेशांत होतात. या पंधरावीस शेर दूध देतात. किंमत रु. १५० पडते.

दिल्लीच्या उत्तम ह्मशी ह्मणून ज्या प्रसिद्ध आहेत, त्या दिल्लीचे पश्चिमेस रोहटवा येथें होतात. ही जात संयुक्तप्रांत, पंजाब, राजपुताना आणि सिंधपर्यंत पसरली आहे. त्यांतल्या चांगल्या ह्मशी

जाफराबादेसारख्याच अंगापिंडानें मोठ्या, पण त्यांपेक्षां पुष्कळ नीटस व डौलदार असतात. त्यांचीं शिंगें मेंढ्याच्या शिंगांसारखीं आंत वाढलेलीं असतात. कांस मोठी व डौलदार असते. ती २५ शेर-पर्यंत दूध देते आणि तिची किंमत १५० पासून २०० रुपये-पर्यंत असते.

दुधाळ गाईचें लक्षण—१ ज्या गाईचें डोकें मोठें, छाती आणि कंबर रुंद, पोट मोठें, त्वचा कोमल (पातळ), केस पातळ, शेपटी लांब व गोंडेदार, बांधा सुटसुटीत, व कांस आणि सड मोठे असतात, ती गाय बहुधा चांगली दुधाळ असते.

२ पांढऱ्या रंगाची, आखुड शिंगांची गाय बहुधा दुधाळ असते. गाईच्या कांसेपासून एक शीर हृदयाकडे जातेशी दिसते. ती ज्या गाईची जितकी जाड आणि लांब गेलेली असेल, तितकी ती गाय जास्त दूध देणारी असते. जिची ती शीर सर्पाकृति ह्मणजे वांकडी गेली असेल किंवा जिला कांसेच्या बाजूस गांठी गांठी दिसतील, ती गाय फारच दूध देणारी असते.

३ जिची मान बारीक, मागील धड मोठें, पाय बारीक व आंखूड, शेपूट लांब व गोंडेदार असते व जी स्वभावानें गरीब, निरुपद्रवी ऐटीनें चालणारी, व पुष्कळ खाणारी असते, ती चांगली दूध देणारी असते.

४ जी गाय फार लठ्ठ असते ती बहुधा फार दूध देत नाहीं.

दुधाळ ह्मशीचें लक्षण—ज्या ह्मशीचा रंग काळा, केस विरळ, डोकें, पोट, कांस, आणि आंचळ मोठे व वक्ष आणि कटि रुंद असते, ती ह्मैस पुष्कळ दूध देणारी असते. भुरी ह्मैस लोण्याला आणि काळी ह्मैस दुधाला चांगली असते असें ह्मणतात.

गाभण गाईचें रक्षण—गाभण असलेल्या गाई-ह्मशीचें यत्नानें पालन करावें. तिला फार वेळ उपाशीं ठेवूं नये. तिला पांचवा महिना लागल्यापासून तिचें खाणें कमी होतें. त्या वेळेपासून तिला कसदार खाणें—चुणी, कडबा वगैरे—घालावें.

विणें—गाय व्यायला झाली ह्मणजे तिची कंबर शिथिल होते, ती आळसते, कांस सोडिते, मलमूत्र लवकर लवकर सोडूं लागते, प्रसववेदना होऊं लागली ह्मणजे ती पुच्छ उंच करिते, व ऊठ बैस करिते. त्यावेळीं तिचे दावें सोडून आडोसा करावा. वासरूं बाहेर पडतें, तेव्हां प्रथम त्याचे पुढील दोन पाय बाहेर येतात आणि मग बाकीचें अंग हळू हळू निघतें. गाईला स्वाभाविक प्रसूतींत मदतीची गरज नसते. गाय बहुधा बसून प्रसवते आणि थोडे वेळानें आपले आपण उठून उभी रहाते. ती आपले वासरास चाटून त्याचें अंगाची सर्व घाण काढून स्वच्छ करिते. तें तिला करूं द्यावें. तों पावेतों आपण वासराला स्पर्श करूं नये. पण वासरूं झाल्यानंतर जी वार बाहेर पडते ती गाईला खाऊं देऊं नये. ती तिनें खाल्ली असतां दूध आटतें ह्मणतात. तिला तीन दिवस थंड पाणी देऊं नये किंवा आणखी कांहीं थंड पदार्थ देऊं नये. प्रसवाचे कष्ट दूर करण्याकरितां अर्धशेर मीठ आणि एक छटाक आलें किंवा सुंठीचें चूर्ण वाटून कोंबट पाण्याबरोबर कालवून पाजावें ह्मणजे तिला जुलाब होऊन कष्ट दूर होतात. पुढें ८ दिवसपर्यंत तिला हरीरा (ओषधियुक्त गोड-सांजा) द्यावा. त्याचें प्रमाण, गव्हांचा भरडा सवाशेर, तूप अतपाव, गूळ तीन पाव, सुंठ एक छटाक, जिरें पांढरें दीड छटाक, हळद दीड छटाक. भरडयाला तूप चोळावें. तो एका बोघण्यांत भाजून त्यांत गूळ मिळवावा व पाणी घालावें. पातळ झाल्यावर ओषधी मिळवाव्या.

खदखदला ह्मणजे खालीं काढून घ्यावा व कोंबट झाला ह्मणजे खायाला घालावा. आठ दिवसानंतर गाईला फार भूक सुटते, तेव्हां तिला यथेच्छ खाऊं घातलें पाहिजे. ह्मशीला हरीरा गाईचे दुप्पट द्यावा.

सोयेर—गाई ह्मशींचे सोयेर ३ दिवस, ५ दिवस किंवा कोणी ८ दिवस मानितात. ह्मणजे ह्या दिवसांत तिचें दूध घरच्या कामास आणीत नाहींत. तरी दूध काढलेंच पाहिजे. कारण, तें तिच्या कांसेंत राहिलें असतां तिला त्रास होतो. वासराला तिसरे दिवशीं क्षुधा वाटते. तेव्हांपासून त्याला तिचे आचळास दिवसांतून तीन वेळ लावावें आणि फाजील दूध काढून वरील हरीरा शिजतांना त्यांत घालून तिचें तिला खाऊं घालावें. पहिले दोन दिवसांचे दुधांत क्षाराचें प्रमाण अधिक असतें; ह्मणून तें खाण्यापिण्याचे कामीं येत नाहीं. सोयेर संपल्यावर तिला स्नान घालून स्वच्छ करावें, आणि तिचें दूध कामास आणावें.

धार काढणें—धार काढणाराचीं वस्त्रें आणि तोंडहीं निर्मळ असावीं. त्यानें आपले हात, दुधाचें भांडें, गाईची कांस आणि आंचळें कढत पाण्यानें स्वच्छ धुऊन कोरडीं करावीं. गोठ्यांतली जागा झाडून स्वच्छ केलेली असावी. निदान गाय सोडून धार काढण्यापुरती तरी स्वच्छ जागेंत न्यावी. गाईपुढें खाण्याचें ठेवावें.

प्रथम वासरास सोडून गाईस पान्हा आणवावा. गोवत्सानें उच्छिष्ट केलेलें दूध आरोग्यदृष्ट्या गुणकारी होत असतें. (जर वासरूं प्रथम लाविलें नाहीं, तर प्रत्येक आंचळाच्या पहिल्या दोन तीन धारा खालीं सोडाव्या. भांडयांत घेऊं नयेत. त्यांत पाणी फार असतें.

१ तें चुलीवर ठेवल्याबरोबर गोठतें. तें ताटांत घालून त्याच्या वड्या कापतात. त्यांस खरवसाच्या वड्या ह्मणतात.

आणि त्यापासून सगळें दूध बिघडण्याचा संभव असतो. नंतर वासरास गाईचे पुढच्या उजव्या पायास बांधून गाईस त्याला चाटूं द्यावें.

धार काढणारानें गाईचे डावे बाजूस बसून साधेल तसें एका हातानें किंवा दोन्ही हातांनीं दूध पिळून काढावें. दुधाचें भांडें दोन्ही गुडघ्यांत मजबूत धरावें. तें भांडें अरुंद तोंडाचें असावें. दुधाची चरवी कांसेखालीं जमिनीवर ठेवणें धोक्याचें आहे. गुरूं काबूंत नसलें तर तें एकादे वेळीं तें भांडें लाथाडून दूध सांडील. एका भांड्यांत दूध काढतां येण्यासारखें नसलें, तर भांडीं अधिक करावीं. जें भांडें भरेल तें लागलेंच दूध ठेवण्याचे जागीं पाठवून द्यावें. गोठ्यांत दुधाची ओताओत करीत बसूं नये.

दूध काढतेवेळीं पाळीव कुत्रें, मांजर, किंवा रिकामटेकडीं माणसें सभोंवतीं असूं नयेत.

धार काढण्यास आंचळें बोटांनीं ओढूं नयेत किंवा आंगठा मोडून त्याच्या पेऱ्यानें तीं दाबूं नयेत. मुठींत आंचळ धरून पिळावें. जोडीचीं आंचळें पिळूं नयेत. पहिलें आणि तिसरें, दुसरें आणि चवथें पिळावें.

धार नियमित वेळीं, नियमित पद्धतीनें, सारखी, सपाट्यानें, मुकाट्यानें, संपूर्ण काढावी. रेंगाळूं नये; किंवा मध्यें थांबूं नये. तसें करणें गाईला आवडत नाहीं.

दूध सकाळ–संध्याकाळ दोन वेळां काढावें. गुरूं जास्त दुधाळ असलें, तर ३।४ वेळां काढण्यास हरकत नाहीं. जास्त दुधाळ गुराचें दूध आंचळांत थबथबून येतें. तें काढण्याला पिळण्याचे श्रम पडत नाहींत. पहिलटकरणीचें दूध काढिल्यानंतर दिवसांतून एकदां तिच्या कांसेला एरंडेल चोळावें.

धार काढतेवेळीं तोंडांत विडी किंवा तंबाकू धरूं नये, व मधून मधून बोटें दुधांत बुडवूं नयेत.

दूध काढिल्यानंतर वासरास सोडावें. वासरूं जसजसें मोठें होईल, तसतसें त्याच्या पोषणाला दूध अधिक सोडीत जावें. एक आचळ सोडायाचें, दोन सोडायाचीं, असे नियम करणें नको आहे. वासराला तेवढें सगळें दूध नको असतें. तीन महिन्यांनंतर त्यास चारा जास्त देऊन त्याचें दूध सोडविण्याचा प्रयत्न करावा.

धार काढतांना दूध रक्तमय, तंतुमय, किंवा निराळ्याच रंगाचें दिसूं लागलें, तर तें सगळें दूध टाकून द्यावें.

भांड्यांतलें दूध थोडें असो कीं पुष्कळ असो, कांहीं आकस्मिक कारणानें घाणेरडें झालें, तर तें गाळून घेण्याचा प्रयत्न न करतां टाकून द्यावें.

रोगी गुरांचें, विशेषतः सांसर्गिक रोगानें ग्रस्त झालेल्यांचें दूध घरांत अगदीं उपयोगांत आणूं नये; किंवा वासराला पाजूं नये. तें काढून जमिनींत पुरून टाकावें.

गाई–म्हशींच्या मधील भेद—गाईचें दूध अंमळ पातळ आणि पिंवळसर रंगाचें असतें. म्हशीचें दूध दाट आणि शुभ्र रंगाचें असतें. म्हशीच्याच दूधाचें चक्का दहीं चांगले जमतें. त्याच दुधाची रबडी व खोवा होतो; आणि त्यांतच लोणी विशेष निघतें.

नाठाळ गाय—कांहीं गाई नाठाळ असतात. त्या धार काढूं देत नाहींत. प्रायशः पहिलटकरणीची धार काढणें कष्टकारकच खरें. तिचीं आंचळें प्रथम प्रथम पिळलीं जातात, तेव्हां तीं दुखतात.

---

१ अशा रीतीनें काढलेलें दुधाचें दहीं चांगलें असतें आणि त्यांत लोणी अधिक निघतें असा लोकांचा अनुभव आहे.

त्यामुळें तिला व्यथा होऊन दूध काढणाऱ्याला ती शिंगें मारिते, लाथा झाडिते व दूध आचळांत येऊंच देत नाहीं. एकादी गाय वासराला देखील सुखानें पाजीत नाहीं. अशा गाईस स्थिर व उपद्रवशून्य करण्यास तिचे मागील पाय बांधणें, त्यास भाला घालणें, क्वचित् तीस ताडण करणें, असले उपाय योजावे लागतात. पण हे उपाय सारखे करीत गेलें असतां गाईला दुधाचा पान्हा कमी होत जातो. व तिला जी वाईट संवय लागते, ती जन्मभर तशीच राहते. दूध काढण्याची एक युक्ति आहे. ती ज्यास साधते तो गाईंचें आंचळाला न दुखवितां सहज आणि लवकर दूध काढितो. दुसऱ्याला ती युक्ति साधली नाहीं ह्मणजे गाय केव्हां केव्हां एका हाताची होते. ही गोष्टही अडचणीची असते.ह्मशीचें दूध काढण्यास इतके प्रयास पडत नाहींत.

दूध काढण्याचें यंत्र—अलीकडे दूध काढण्याचें आणि तें भांड्यापर्यंत नेऊन पोंचविण्याचें यंत्र निघालें आहे. तें यंत्र जनावराच्या आंचळाला लावून दुसरीकडे दाबीत गेलें ह्मणजे अति थोड्या वेळांत आंचळांतून दूध निःशेष ओढिलें जाऊन नळीच्या द्वारें भांड्यांत येतें. नाठाळ गाईसंबंधानें ह्या यंत्राचा उपयोग करण्यास केवळ तिचे मागील पाय बांधणें पुरें होतें. हें यंत्र हातानें चालविण्याचें आणि वाफेच्या एंजिननें चालवण्याचेंही असतें. ह्या यंत्रानें दूध निःशेष दुहिलें जाण्याशिवाय वेळेची आणि श्रमाचीही पुष्कळ किफायत होते. पण त्याला गाई-ह्मशी पुष्कळ पाहिजेत. ह्या यंत्राला ७५ रु० किंमत पडते.

दुधाची व्यवस्था.

धार काढल्याबरोबर दुधाचें भांडें घरांत न्यावें. तें खुल्या, हवाशीर व उजेडाच्या जागेंत ठेवावें. दुर्गंधि, कोंदट किंवा अंधेऱ्या जागेंत ठेवूं नये.

दुधाचा फेस जिरल्यावर (हा जिरण्यास प्रथम कांहीं दिवस पांच चार मिनिटें लागतात. भांडें हालविल्यानें फेस लवकर जिरतो.) तें धातूच्या सूक्ष्म छिद्रांच्या गाळण्यानें किंवा जाड खादीच्या स्वच्छ फडक्यांतून गाळावें. उद्देश हा आहे कीं, दुधामध्यें केस किंवा धुळीमुळें रज उडून पडले असतील, तर ते पाहून बाहेर टाकतां यावे. ह्मणून गाळणें आणि गाळण्याचें भांडें स्वच्छ पाहिजे. त्याला कसलाही वास नसावा. भांडें कोरडें असावें. दूध गाळल्यावर तें तसेंच ठेविलें असतां किंवा चुलीवर तापत ठेविलें असतां, अर्थात्च त्यांत पुनः केरांतले रज उडूं नयेत.

धारोष्ण दूध––धारोष्ण दूध प्यावयास द्यावयाचें, तर तें धारेंतली उष्णता मोडली नाहीं, तोंच दिलें पाहिजे. फेस जिरण्याची व गाळण्याची वगैरे वाट पाहूं नये. धार काढतेवेळींच भांडें, गोठा, गुरूं आणि दूध काढणारा या चौघांची स्वच्छता आणि निरोगिता पहिले प्रतीची असेल, तरच धारोष्ण दूध पिण्याजोगें असतें.

दूध तापविणें––कच्चें दूध थंड हवेंत बराच वेळ टिकतें. परंतु हवेंत किंचित् गरमी झाली असतां दूध नासूं लागतें. ह्मणून तें तापवून ठेवणें हा उत्तम पक्ष आहे.

एक उकळी चांगली येईपर्यंत दूध तापवावें. तापल्यावर तें लागलेंच थंड करून ठेवावें. हवा गार असल्यास दूध गार करण्यास कांहीं वेगळी खटपट करणें नको. पण हवेंत उष्णता असली, तर दुधाचें भांडें गार पाण्यांत घालून ठेवावें. उबट दूध तसेंच झांकून ठेविलें असतां नासूं लागतें. दूध आंबूं नये ह्मणून त्यांत कोणताही पदार्थ घालण्याची अगदीं अवश्यकता नाहीं. दूध स्वाभाविक स्थितींत ठेवण्याला दोन उपाय आहेत. एक स्वच्छता आणि दुसरा थंड ठेवणें.

दूध विरजणें—दूध विरजण्याची अगदीं सोपी रीत ही आहे कीं, दूध चांगलें कढत तापवावें. तें जितकें संथपणें जास्त वेळ तापेल, तितका त्याच्या दह्याला सुंदर वर्ण आणि जास्त स्वाद येतो; आणि तितकें तें जास्त घट्ट विरजतें. तापविण्याला एकादें पातेलें, पोलादी लोखंडाची कढई, किंवा मातीची हंडी घ्यावी. त्यांतून पुढें लोणी काढावयाचें तर तें दूध तापत ठेवतांना पांच शेराला अतपाव स्वच्छ पाणी घालावें. थंडीचे दिवसांत दूध ऊन्ह आणि उन्हाळ्याचे दिवसांत कोंबट विरजावें. विरजण्याचें भांडें बेताचें ह्मणजे दूध त्याचे गळ्याखालीं एकदोन बोटें राहील असें—पितळी, कल्हई केलेलें, किंवा अल्यूमिनमचें किंवा कथली—घ्यावें. मातीचें मडकें किंवा कुंडा सर्वांत उत्तम. कारण, धातूचें भांडें जितकें पातळ तितकीच लवकर दुधांतली उष्णता त्या भांड्यांतून हवेंत बाहेर पडते. तशी ती मातीचे भांड्यांतून जात नाहीं. भांड्यांत दूध ओतल्यावर त्यांत दह्याची घट्ट गोळी करून टाकावी किंवा चमच्यानें पातळ करून ती सर्व दुधास लावावी. उन्हाळ्यांत आंबट ताक घालणेंही पुरें होतें. विरजण शेरीं दोन तोळे घालावें. तें फार आंबट असूं नये. नाहीं तर दूध विरजणार नाहीं. थंडीचे दिवसांत भांड्याखालीं उष्ण फुपाटा घालावा. आणखी थंडी फार असली तर भांड्यावर कांबळ्याचा तुकडा लपेटावा. भांडें उबाऱ्याचे जागेंत ठेवावें. सकाळीं थंडी नाहींशी झाली ह्मणजे भांडें पहावें. दहीं जमलें नसल्यास पुनः त्याचे खालीं फुपाटा घालावा. भांडें अंमळ उन्हांत किंवा चुलीचे आश्रयानें ठेवावें. असें केल्यानें तास दोन तासांत दहीं जमतें. उन्हाळ्यांत तें थंड पाण्यांत ठेवावें. गरम जागेंत राहिलें असतां गरमीमुळें तें फसफसून वर येतें आणि त्याचा स्वाद नष्ट होतो. दूध सामान्यतः बारा तासांत जमतें. उन्हाळ्या दिवसांत ४।६ तास कमजास्त लागतात.

एखादें दुधाला तार येते, याचें कारण दुधाची अस्वच्छता हें होय. गरमीचे दिवसांत दूध ठेविल्या ठेविल्याच आंबुसतें किंवा नासतें. याचें कारण दुधांतला आंबट अंश गरमीनें लवकर वाढतो हें असतें.

दूध विरजण्याचें आणखी कांहीं प्रकार आहेत. जसें एक प्रकारचें गवत आहे तें दुधांत फिरविणें, दुधी नांवाच्या वनस्पतीच्या दुधाचे किंवा सल्फ्यूरिक आसिडचे थेंब घालणें, इंग्रजी रुपया टाकणें, दूध चुलीवर असतांच लिंबाचा रस किंवा ताक, मीठ वगैरे टाकणें, वगैरे. पण अशा कृतीनें जमविलेल्या दह्याला, रीतसर जमविलेल्या दह्याचें माधुर्य येत नाहीं. ह्याशिवाय एक शास्त्रीय प्रकार दधिजंतु दुधांत मिळवून दहीं जमविण्याचा आहे, पण तो बराच श्रमसाध्य आहे.

दूध केवळ लोणी काढण्याकरितांच विरजावयाचें असतें, तेव्हां दुधांतली मलई आणि त्याखालचें जवळजवळचें थोडें दूध घेऊन वेगळें विरजावें. असें करण्यापासून लोणी काढण्याचें काम अंमळ सोपें होतें आणि मलईशिवाय विरजलें, तरी त्याची किंवा त्याच्या ताकाची रुचि कमी होत नाहीं.

चक्कादहीं—दूध आटवून एक शेराचें पाऊण शेर करावें. नंतर तें थोडा वेळ तसेंच निखाऱ्यावर राहूं द्यावें. खरपूस तापून लाल झालें ह्मणजे निववून मातीचें कुंडयांत, हंडींत वगैरे विरजत घालावें; ह्मणजे तें चांगलें घट्ट जमून येतें.

---

१ सामान्यतः गाईचे दुधांत शेंकडा ८७ आणि ह्मशीच्या दुधांत ८१ पाण्याचा अंश असतो.

आंबटाचा अंश गाईच्यांत शेंकडा तीन आणि ह्मशीच्यांत ६ असतो.

मीठ गाईच्यांत ७५ आणि ह्मशीच्यांत ९ इतकें असतें.

चमनदहीं—दूध त्यांत एक छटाक साखर घालून वरप्रमाणें तापवावें, विरजण घालावें, व वर मलमलीचें बारीक फडकें दुधास लागून भांड्याचे काठावर घालावें. त्यावर हलकीं सुवासिक फुलें ताजीं सुमारें अर्धा छटाक पसरावीं. हें दहीं स्वादिष्ट आणि सुगंधि होतें.

गंगाजमनी दहीं—मातीचे परळांत एक उभी आणि एक आडवी अशा दोन अंगच्याच खांचा करून त्या खाचांत टिनाचे पत्रे बसवावे, ह्मणजे यांत ४ घरें होतील.प्रत्येक घरांत विरजावयाचें दूध घालून विरजण मिळवावें आणि ४ घरांत ४ पदार्थ घालावे. एकांत साखर, दुसऱ्यांत किंचित् मीठ, तिसऱ्यांत मीठ जिरें, मिऱ्यें व चवथ्यांत आणखी कांहीं. दहीं जमण्याच्या बेतास आलें ह्मणजे टिनाचा पत्रा काढून घ्यावा. थोड्या वेळानें दही जमून सारखें होईल. ह्याचा चमत्कार असा असतो कीं, दहीं दिसण्यांत सारखें दिसतें आणि चवीला मात्र निरनिराळे स्वाद लागतात.

लोणी काढणें–जमलेल्या दह्यापैकीं विरजणाला, खाण्याला, किंवा कालवणाला वगैरे जरूरीपुरतें काढून ठेवून बाकी दह्याचें तें राहील त्या मानानें रोज, एक दिवसाआड, किंवा दोन दिवसांनीं ताक करावें. डेरा, रवी व सभोंवतालची जागा स्वच्छ असावीं. डेऱ्यांत दहीं ओतावें. शेरीं दोन शेर पाणी ऊन, कोंबट किंवा थंड (हवेंत थंडी किंवा गरमी असेल त्या मानानें) घालावें. रवी खांबाला अडकवून तिनें तें दहीं घुसळावें ह्मणजे त्यांतून लोणी सुटतें व त्याच्या गोळ्या रवीभोंवतीं जमूं लागतात. त्या हातानें गोळा करून वाडग्यांत ठेवाव्या. लोणी निःशेष निघालें नाहीं असें वाटलें, तर शेरीं शेरभर ऊन पाणी आणखी घालून पुनः घुसळावें ह्मणजे असेल नसेल तें

सर्व लोणी निघून येईल.साधारणपणें एक शेर दुधांतून दीड छटाकपर्यंत लोणी निघतें[1].

ताक—साजुक ताक तसेंच खाण्यास उपयोगीं पडतें. संग्रहणीच्या रोग्याला तर तें अमृत होय. तापकऱ्यालाही हें ताक देणें पथ्यकारक असतें; आणि त्याची कढी निर्दोष होते.

तूप करणें—लोण्यांतलें ताक निथळून टाकावें. तें देवाच्या नैवेद्याला व भाकरी बरोबर खाण्यास वगैरे लागेल तसें ठेवून उरेल तें रोज किंवा एक दोन दिवसांआड कढवून त्याचें तूप करावें. तूप खर्चण्यास पुरेसें होऊन उरल्यास बाजारांत पाठवावें किंवा नियमित रीतीनें त्याचा कोणास पुरवठा करावा. एक शेर लोण्यांतून सरासरी १४ छटाक तूप निघतें. अर्थात् तें बाजारभावाला कमी पडतें. पण

---

१ कच्च्या दुधांतून लोणी काढण्याचें एक यंत्र आहे. त्यांत दूध टाकून त्याचा दांडा फिरविला ह्मणजे त्या यंत्राचे आंत रवी असते, ती जोरानें फिरूं लागते. त्या योगानें दुधाचें मंथन यथास्थित होऊन थोड्या वेळानें त्या यंत्राच्या वरच्या भागाच्या तोटींतून लोणी बाहेर येऊन पडतें, आणि खालच्या भागांत त्या तोटींतून उरलेलें दूध पडतें.

हें लोणी एकाद्या भांड्यांत दोन एक दिवस तसेंच राखून ठेवितात. मग तें ऊन पाण्यांत मिळवून दुसऱ्या एका यंत्रांत ओततात. ह्या यंत्रानें त्यांतला निखालस लोण्याचा भाग वर येऊन ताक बाहेर पडतें. हें लोणी कांहीं दिवस टिकावें ह्मणून ह्यांत मीठ मिसळून तिसऱ्या एका यंत्रांत घालतात. ह्या यंत्रानें त्या लोण्यांतील पाणी निःशेष बाहेर निघून येतें. मग तें लोणी निर्वात केलेल्या टिनांत भरून बाहेरगांवीं पाठवितात. त्याला पुष्कळ दिवसपर्यंत घाण लागत नाहीं किंवा तें नासत नाहीं.

यंत्रांतून लोणी वेगळें होऊन निघालेल्या दुधाचें दहीं, ताक वगैरे करतां येतें; पण त्यास चव मुळींच नसते. ह्मणून तें फार स्वस्त दरानें विकतें.

ज्यांचे तोंडी देशी पद्धतीनें ताकांतून काढलेलें लोणी लागलें असतें, त्यांस यंत्रांतून निघालेलें लोणी आवडत नाहीं.

त्याच्यापेक्षां स्वादाला अधिक चांगलें असतें. कच्च्या दुधांतून काढलेल्या लोण्याचें तूप शेरीं १२॥ किंवा १३ छटाक निघतें, आणि त्यास ओशटपणाही कमी असतो.

दूध दुसरे दिवशीं, दहीं तिसरे दिवशीं, आणि ताक चवथे दिवशीं खाण्यालायक राहत नाहीं. लोणी एकादा दिवस जास्त टिकतें. नंतर तें कढवून त्यांतलें पाणी नाहींसें केलें नाहीं, तर तें वाशाळतें, कडू होतें, व कुजतें.

प्रथमच गाय व्याल्यावर सोयराचें दूध गाईलाच पाजावें ह्मणून पूर्वीं लिहिलें आहे. सोयेर फिटल्यावर प्रथम दूध काढणारें दुसरें कोणी असेल तर त्याला द्यावें, शेजारीपाजारी व इष्टमित्रांकडे पाठवावें, देवाला निवेदन करावें,ब्राह्मणाला द्यावें व मग आपण उपयोगांत आणावें, अशी जुनी रीत आहे. वेळप्रसंगीं गरीब कुटुंबांत तान्ह्याकरितां दूध मागावयास कोणी येतें. त्यास कांहीं मोबदला न घेतां लागेल तितकें दूध खुशीनें द्यावें. तसेंच, आपल्याला एक दिवसापुरतें ताक ठेवून बाकी राहील तें मागतील त्यांस द्यावें.

दृष्ट–एकादे वेळीं गुरूं प्रत्यक्ष कारण कांहीं नसतां दूध देण्याचें एकदम बंद करितें. एकादे वेळीं त्याच्या आचळांतून रक्त येऊं लागतें. गुरूं मनुष्याला पाहून भितें, बुचकळल्यासारखें करितें, व कांपतें. तेव्हां गुराला दृष्ट लागली, असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. दृष्ट आहे तसे तिचे उतार, अंगारेधुपारेही आहेत. ह्या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत कीं खोट्या आणि पुष्कळ वेळां ह्या उताऱ्याबिताऱ्यांनीं गुरें बरीं होतात तीं त्यांत सिद्धि असल्यामुळें किंवा उपाय होण्यास आणि गुण घेण्यास एकच गांठ पडते ह्मणून, ह्याचा निर्णय करणें ज्याच्या त्याच्या श्रद्धेवर आहे. तरी असा प्रसंग येईल, तेव्हा अंगारेधुपारे पाहिजे तर करावे, पण डॉक्टरकडून योग्य उपायही करण्यास विसरूं नये.

गुराखी आणि गोचराई—गुराखी शक्य असेल तेथपर्यंत घरदारवाला आणि ज्याला गुरांच्या रोगाची चिकित्सा माहीत आहे, असा ठेवावा. त्याचें नांव, नातेवाईक आणि पत्ता हीं टिपून ठेवावीं. त्याचें घर आणि गुरें चारण्याची जागा आपले घरचे कोणीतरी माणसानें एक दोन वेळ पाहून ठेवावी. गायरानांत सावलीला झाडें आणि पिण्याचें पाणी चांगलें मुबलक आहे कीं नाहीं, हेंही तपासावें. त्यांची व्यवस्था नसली तर शक्य असेल त्याप्रमाणें हस्तें परहस्तें ती व्यवस्था करण्यास झटावें.

ओढाळ गुरूं—एकादें गुरूं ओढाळ असतें. हा त्याचा स्वभाव असतो. अशा गुराला गळ्यांत फासा घालून पाय अडकविल्याशिवाय गत्यंतर नसतें. एकादें गुरूं विष्ठाभोगी निघतें. त्याला जोपासना करणाराची हयगय किंवा मूर्खता पुष्कळदां कारण होत असते. तरी गुराच्या ह्या संवयीला उत्तेजन न देतां ती हरप्रयत्नानें मोडावी. गुरूं म्हातारें होऊन किंवा अन्य कांहीं कारणानें उपयोगाचें रहात नाहीं. तेव्हां त्याला नीटपणें पोसण्याचें सामर्थ्य नसेल, तर पांजरापोळांत पोहोंचतें करून, यथाशक्ति त्या संस्थेला मदत करावी. अशा गुराला घरांत बाळगून आपल्याला आणि त्याला कष्टांत घालूं नये. कांहीं व्यवस्था न करतां नुसता त्याचा त्याग करणें पाप आहे. कृतघ्नपणा तर उघडच आहे.

गुरांचे रोग—गुरें स्वभावतः शरीरानें बळकट आणि निरोगी असतात. तीं कुपथ्य करीत नाहींत, किंवा फारशीं आडवाटेला जाऊन रोगाला बोलावीत नाहींत. जखम लागणें, शिंग मोडणें, गर्भपात, वगैरे आपत्ति ह्यांवर क्वचित् येतात. त्यांना जे रोग होतात, ते पुष्कळ अंशीं जोपासना करणाराचे दोषानें होत असतात. जसें ऊन किंवा

थंडी यापासून त्यांचें संरक्षण न करणें, त्यांस दूषित जागेंत ठेवणें, दूषित पाणी पाजणें, दूषित चारा खावयास घालणें किंवा अपुरता अथवा अतिरिक्त प्रमाणानें देणें, वगैरे वगैरे. ह्यापासून ज्वर, शैत्य, खोकला, अपचन, हगवण इ० रोग होतात. तिसरा प्रकार सांथीच्या रोगांचा आहे. हा संसर्गानें * वाढत असतो. त्याला टाळणें मनुष्याचें हातीं पुष्कळ आहे.

रोगाचीं पूर्व चिन्हें–दुखणें यावयाचें असलें ह्मणजे मनुष्याला जशीं पूर्व चिन्हें होतात, तशीं गुरालांही होतात. विशेष चिन्हें हीं आहेत:–

(१) त्याच्या अंगाला स्पर्श केला असतां तें भोंवरा करीत नाहीं.

(२) अंगाची कातडी ताठ होते. जेथें नेहमीं वळ पडावयाचे तेथेंही ते नाहींसे होतात.

(३) नाकपुडीवरील ओलावा नाहींसा होऊन तोंडांतून केव्हां केव्हां लाळ व फेस येतो, आणि डोळ्यांतून पाणी गळूं लागतें.

मनुष्याचा, तसाच गुराचाही, ताप थरमामिटरनें मोजतां येतो. त्याची नाडी पहातां येते आणि श्वासोच्छ्वासांतील फरक जाणतां येतो. पण हें पहाणें आणि रोगाचें निदान करणें कठीण आहे. ह्मणून त्याचा विस्तार येथें करीत नाहीं.

उपचार–गुरांच्या रोगांचें निदान करणें जसें कठीण आहे, तसेंच त्यांचे उपचार करणें, एनिमा देणें, धुरी देणें, औषध चारणें वगैरे कठीण आहे. तें पुस्तकांतलीं वर्णनें वाचून कोणालाही करतां येण्यासारखें नाहीं. त्याला गुरू कडून प्रत्यक्ष काम शिकलें पाहिजे. तें बायकामुलींनां साधण्यासारखें नाहीं. ह्मणून त्या भानगडींत न पडतां

* जीं गुरें उताराच्या भूमिप्रदेशांवर चरतात, किंवा पानें आणि वेली सडून खराब झालेल्या तळ्यांतलें पाणी पितात, त्यांस हटकून साथींचे रोग होतात

गुरांना पूर्वचिन्हें होऊं लागलीं ह्मणजे तीं सूक्ष्मतेनें पाहून टिपीत जावीं. तज्ज्ञाला गुरास दाखवावें, व त्याकरवीं किंवा पशुवैद्याकडून त्याचा इलाज करवावा.

सांथीचे रोग—गुरांच्या रोगांत पुढील रोग घातुक असतात.

१ तोंड येणें, २ खुरांत फोड होणें,
३ फेफसें, ४ काळपुळी, ५ रक्तमूत्र,
६ क्षय, व ७ देवी.

हे रोग बहुतेक संसर्गानें होतात. संसर्ग टाळण्यासाठीं गुरांस गांवाबाहेर क्वारंटाईनमध्यें ठेवावें. क्वारंटाईनची व्यवस्था आपले देशांत अद्याप झाली नाहीं. गांवाबाहेर चोरांची किंवा जनावरांची भीति असते. एकटें मनुष्य रहाण्यास धजावत नाहीं. तथापि ही व्यवस्था परस्पर सहकारी तत्त्वावर पैसा गोळा करून सहज करतां येईल.

प्रकरण १८ वें.

बालसंगोपन.

मुलें सांभाळण्यास मनुष्याचे अंगीं प्रेम आणि कष्ट सोसण्याची शक्ति हे दोन गुण हवे आहेत. हे गुण स्त्रियांचे अंगीं निसर्गतः उत्पन्न झालेले असतात; आणखी त्यांचा विकास त्यांच्या लहानपणापासूनच करण्याकडे लोकांची प्रवृत्ति फार जुन्या काळापासून दिसून येते.

मुलगी ३।४ वर्षांची होते, तों तिच्या हातीं बाळाचें बाहुलें खेळायाला ह्मणून देतात. ह्याच वेळेस मुलीचें प्रेम अंकुरित होतें. तिला तें बाळ कृत्रिम असल्याची कांहीं कल्पना नसते. ती त्याला परोपरीचे उपचार करिते, कुरवाळिते, जपते, त्याला किंचित् धक्का लागला

असतां ती जो भयसूचक अंगसंकोच आणि सुकुमार सीत्कार करिते, तो कोणाच्या हृदयाला कंपित करीत नाहीं !

कष्ट सोसण्याचा अभ्यास—मुली सहा-सात वर्षांच्या झाल्यावर बहुतेक मुलींना मुलें सांभाळण्याचें बरेंच काम करावें लागतें. कारण, गरीब कुटुंबांत मुलांबाळांचा परिवार बराच मोठा असतो, आणि त्यांस सांभाळण्यास गडी-माणसें नसतात; तेव्हां तें काम मुलींच्या वांट्यास येत असतें. तें बहुधा त्या सासरीं कायमच्या जाऊन राहूं लागेपर्यंत सारखें त्यांच्याकडे असतें. ह्यामुळें त्यांना ह्या कामाची संवय लागते, त्यासंबंधानें अनेक प्रकारचे अनुभव येतात, आणि घरांतल्या वडील माणसांकडून सारखें पावलोपावलीं शिक्षण मिळत असतें. हा त्यांचा बाळपणीं झालेला व्यासंग व मिळालेला अनुभव त्या सासरीं गेल्यावर आणि मातृपदावर आरूढ झाल्यावर किंवा नणदा जावांच्या मुलांस सांभाळण्याचा प्रसंग त्यांजवर आला असतां, त्यांच्या फार उपयोगीं पडतो. त्यांना मग हें काम मुळींच जड जात नाहीं.

ही चाल फार चांगली आहे. परंतु हिच्यांत एक मोठें वैगुण्य हें आहे कीं, मुलींच्या आयुष्याचीं पुष्कळ उत्तमोत्तम वर्षें ह्या कामांत फुकट जातात; आणि त्यांच्या वाढत्या अवस्थेंत या कामाचें न झेपणारें आणि अनुचित असें ओझें त्यांच्यांवर पडून, त्यायोगें त्या शरीरानें आणि मनानेंही दडपल्या जातात. पण, असें आहे तरी त्यांना ह्या कामापासून सबंध सोडविण्याचा विचार करणें घातक आहे. त्यांना हें काम तर आलेंच पाहिजे आणि तें शिकण्याचा योग्य काळही हाच आहे. त्याच्या पद्धतींत मात्र कांहीं बदल केला पाहिजे. ह्मणजे मुलींना हें काम, त्यांचा तो उद्योगच आहे अशा समजुतीनें न सांगतां, शिक्षणाचा धडा ह्मणून सांगितलें पाहिजे

आणि त्याचा अभ्यास धडा तयार करण्यापुरताच त्यांचेकडून करविला पाहिजे. ह्या धड्यांतलें शब्दज्ञान शाळेंत देखील करून देतां येईल, अभ्यास मात्र घरींच केला पाहिजे.

धंद्याच्या दृष्टीनें उपयोग—मुलें सांभाळण्याचें काम शिकणें धंद्याच्या दृष्टीनेंही फायद्याचें आहे. कारण, सांप्रत आपल्यांत घरगुती पद्धतीनें मुलें सांभाळणाऱ्या बाया (नर्सेस किंवा गवरनेसिस) इतर देशांतल्याप्रमाणें मिळत नाहींत आणि त्यांची वाण तीव्रतेनें भासूं लागली आहे. मुलें सांभाळणाऱ्या मोलकरणीला ४।५ रु० दरमहा मिळतो. तोच पद्धतशीर रीतीनें शिकलेल्या नर्सला, किंवा गवरनेसला, ४०।५० रु० पर्यंत मिळतो. यावरूनही या कामाची योग्यता व प्रतिष्ठा हीं दिसून येतात.

विषयाचा उपक्रम.

मूल सांभाळण्याचे कामाचा संबंध मुलाच्या बाळपणाशीं—पहिलीं सहा वर्षें—येतो. त्यांत पहिलीं दोन वर्षें अत्यंत महत्त्वाचीं असतात. कारण, ह्या दोन वर्षांत तें मूल अनेक लहान लहान अवस्थान्तरें[१] झपाट्यानें आक्रमीत मनुष्यभावाला येतें. ह्या दोन वर्षांत त्याची आश्चर्यकारक वाढ[२] होते. ह्याच दोन[३] वर्षांत त्याजवर दुखण्याचे

टीप–१ खालीं प्रत्येक अवस्थेचा काल आणि मर्यादा दिल्या आहेत, त्या सरासरीच्या आहेत. त्या प्रत्येक मुलाच्या अंगच्या शक्तीच्या आणि निरोगितेच्या तारतम्याप्रमाणें महिना दोन महिने पुढें मागें होत असतात.

१ डिंभावस्था–पाठीवर नुसतें उताणें पडून राहणें, जन्मापासून दोन महिने.

२ चलनावस्था–तिसरे महिन्यांत.

३ वलनावस्था--कुशीस वळणें, मान सांवरणें, मुठी बांधणें, दृष्टि स्थिर करणें, चवथे महिन्यांत. ह्या महिन्यांत त्याच्या ज्ञानेंद्रियांचें उद्बोधन होतें.

अपरिमित हल्ले होतात. आणि ह्याच दोन वर्षांत कांहींना कांहीं कारणानें त्यांचे अतिशय मृत्यु होतात. ह्मणून एकंदर शैशवावस्थेमध्यें पहिल्या दोन वर्षांत मुलाला सांभाळण्याचें काम फार नाजुक व फार जोखमीचें असतें.

---

४ पालथें पडणें—चवथे महिन्यांत.

५ उरानें सरपटणें— ,,

६ बसणें—पांचवे महिन्यांत.

७ दांत येणें–सहावे महिन्यांत.

८ रांगणें—आठवे महिन्यांत.

९ आधारानें उभें राहणें—नववे महिन्यांत.

१० आधारावांचून—दहावे महिन्यांत.

११ पाऊल टाकणें (आधार धरून)—१२ वे महिन्यांत.

१२ चालणें (आधारावांचून)—१८ वे महिन्यांत.

१३ वाचा फुटणें—१२ वे महिन्यांत.

१४ बोलणें—१८ वे महिन्यांत.

मूल पहिल्यानें चालूं लागलें तर मागाहून बोलूं लागतें, व पहिल्यानें बोलूं लागलें, तर चालावयास उशीर लागतो.

२ इंग्लिश मुलांविषयीं इंग्रजी पुस्तकांत लिहिलें आहे कीं, मुलाचे जन्मकालीं वजन बहुधा ३॥ शेर आणि लांबी १८ इंच असते. पुढें त्याचें योग्य पालनपोषण होत गेलें, तर तें मूल तिसऱ्या महिन्याच्या शेवटपर्यंत दरएक आठवड्याला सुमारें अडीच छटाक वाढत जातें. पुढें नवव्या महिन्याच्या शेवटपर्यंत दरएक आठवड्याला दोन छटाक आणि नंतर दर आठवड्याला सुमारें दीड छटाक वाढतें.

टीप--वरील परिमाण युरोपियन मुलांचें आहे. आपले देशांतील मुलांची जन्मकालीं लांबी सरासरी १२ इंच आणि वजन एक शेर असतें व वयाच्या मानानें त्यांची वाढ होते.

पुढील तख्त्यावरून मुलांचें वजन आणि परिमाण जन्म झाल्यापासून पुढें दरवर्षी कसकसें वाढत जातें, तें कळून येतें—

जन्म	वय–वर्षाचा शेवटला दिवस.	मुलगा.		मुलगी.	
		उंची–इंच	वजन–पौंड	उंची–इंच	वजन–पौंड.
	१	२९ १/२	१८ १/२	२७ १/२	१८
	२	३२ १/२	३१ १/२	३१	२५ १/४
	३	३५	३४	३४	३१ १/२
	४	३७	३७	३६	३६
	५	४०	४०	३९	३९
	६	४३	४४ १/२	४२	४१ ३/४
	७	४६	४९ ३/४	४४	४७ १/२
	८	४७	५५	४६ १/२	५२
	९	४९ ३/४	६० १/२	४८ ३/४	५५ १/२
	१०	५१ ३/४	६७ १/२	५१	६२
	११	५२ १/२	७२	५३	६८
	१२	५५	७६ ३/४	५५ १/२	७६ १/२
	१३	५७	८२ १/२	५७ ३/४	८७
	१४	५९ १/४	९२	५९ ३/४	९६ ३/४
	१५	६२ १/४	१०२ ३/४	६१	१०६ १/४
	१६	६४ ३/४	११९	६१ ३/४	११३
	१७	६६	१३१	६२ १/२	११५ १/२
	१८	६७	१३७ १/२	६२	१२१
	१९	६७ १/४	१३९ १/२	६२ ३/४	१२४
	२०	६७ १/२	१४३ १/४	६३	१२३ १/२

१ जन्मलेल्या मुलांपैकीं एक—दशांश मुलें पहिल्या महिन्यांतच मरतात आणि एक–चतुर्थांश पहिले वर्ष पुरें होण्यापूर्वी मरतात त्यांच्या मृत्युचीं कारणें बहुधा मुलांच्या जोगवणीच्या आणि मुख्यत्वेंकरून आहाराच्यासंबंधानें उद्भवलेलीं असतात. (गृहिणीकंठभूषण, पान ८०).

मूल सांभाळण्याचे कामांत सामान्यतः पुढील बाबींचा समावेश होतो—

मुलांस सुखविणें--मूल जन्मल्यावर पहिल्या दहा–बारा दिवशीं त्याची उचल–साचल फारशी करीत नाहींत. कांकीं, ह्या दिवसांत त्याची त्वचा अतिशय कोमल असते. तिला स्पर्श सहन होत नांहीं. आणि त्याला स्वस्थ पडूं देणें जरूरीचें असतें. त्याची आई ह्या दिवसांत खाटेवर स्वस्थ पडत असते. तसेंच तिच्या शेजारीं तिचें बालक असतें. आईला ह्या त्याच्या जवळपणामुळें जागचेजागीं वरचेवर पाजतां येतें, ही मोठी सोय आहे. तिच्या अंगची ऊब मुलाला भरपूर मिळते व उंदीर–मांजरांपासून त्याचें संरक्षण होतें.

मुलाला आईची ऊब मिळण्याच्या अवश्यकतेसंबंधानें आपल्या लोकांचें बहुतेक एकमत आहे. इंग्रज लोकांत मात्र याविषयीं मतभेद आहे. पुष्कळ इंग्रज लोकांना वाटतें कीं, मुलाला आईच्या पुढ्यांत निजविण्यांत उलट तोटे आहेत. एक तर आईच्या श्वासोच्छ्वासानें दूषित झालेली हवा मुलाच्या पोटांत जाते आणि दुसरा हा कीं, आईकडून गैरसावधपणें मूल चेंगरलें जाण्याची भीति असते. शिवाय, आईला किंवा सांभाळणारणीला आपले हातून असें होऊं नये ह्याची सारखी धास्ती बाळगावी लागते. ह्मणून ते ह्मणतात कीं, मुलाला वस्त्रप्रावरणांच्या उबेशिवाय आणखी ऊब पाहिजे, तर ती कृत्रिम उपायांनीं द्यावी.

मूल १०।११ दिवसांचें झाल्यावर त्यास आईपासून अंमळ वेगळें करण्याचा काळ येतो. मुलास पाळण्यांत घालण्याचा आचार जणूं काय या गोष्टीची सूचना करीत असतो.

---

(१) मुलास सुखविणें; (२) अंगांत घालणें; (३) निजविणें; (४) न्हाऊं घालणें; (५) भरवणें; (६) औषधउपचार; (७) चांगल्या संवयी लावणें; ह्यांपैकीं पहिलीं तीन कामें मुलींस सहापासून अकरा वर्षांच्या आंत आणि पुढील चार कामें १२ वर्षांच्या वयानंतर शिकतां येण्यासारखीं आहेत.

मुलास पाळण्यांत निजविण्यापासून त्याला सुख वाटतें. ह्मणून पाळणा, आंथरूण, पांघरूण आणि तत्संबंधीं अवांतर गोष्टी सोयीच्या व सुखोत्पादक होतील अशा कराव्या.

पाळण्याचे प्रकार—पाळणे पुष्कळ प्रकारचे करतात. कापडाची झोळी, बांबूचें किंवा वेताचें टोपलें, पाटी, झाप, लांकडी पाळणा, तारेचा पाळणा वगैरे. पाळणा आंतून-बाहेरून रेशमी किंवा साध्या गाद्यांनीं मढविणें, त्यास तरतऱ्हेच्या झालरी लावणें, त्यावर चित्रें मढविणें, वगैरे प्रकार पैशाचे आणि हौसेचे आहेत.

पाळणा कशाचाही केलेला असो, तो तकलादी, उथळ, सांकडा, व झोल पडलेला नसावा. त्याच्या बाजू जाळीदार असाव्या व तो जमिनीपासून दोन फूट उंच रहावा. *

तान्ह्याच्या आंथरूण-पांघरुणाचीं वस्त्रें आटपसर, थोडीं, ऊबदार व नरम असावीं. आंथरुणाला तळाशीं कांबळयाचा किंवा गोणपाटाचा तुकडा, वर बारीकशी रू भरलेली गादी, त्यावर मेणकापड (मॅकिंटाश), चादर, आणि बाळंतें हीं एकावर एक घालावीं. पांघरण्याला बारीकशी रजई, नरम लोकरीचें जाड कांबळें, पासोडी किंवा चादर, ह्याप्रमाणें एक किंवा अनेक ऋतुमानाप्रमाणें घालावें.

गादीमध्यें रू घातला असतां, तो गरम असल्यामुळें, तान्ह्याच्या अंगाला पुरळ आणील ह्मणून घालूं नये, असें कांहीं लोकांचें ह्मणणें

---

* पाळण्यासंबंधानें पुढील समजुती आपल्या लोकांत चालत आल्या आहेत.

(१) घरीं पाळणा बनवूं नये, तो आयता घ्यावा. नांदत्या घरचा मागून आणलेला पाळणा चांगला. ज्यांत एकादें मूल मेलें असेल, तो पाळणा उपयोगांत आणूं नये.

(२) पाळण्यास पाठ लाविल्यानें पाळणा चालू राहण्याचें (मुलें होण्याचें) बंद पडतें.

(३) रिकाम्या पाळण्यास झोंके दिले असतां मुलाचें पोट दुखतें वगैरे.

असतें. पण थंडीच्या दिवसांत ही भीति मुळींच धरावयास नको. आणि रू दोन वर्षांचा जुना घेतला, तर त्यांत गरमी ह्मणण्यासारखी नसते. रुईच्या ऐवजीं फर्नस्, नारळाचा काथ्या, किंवा गव्हा-तांदळांचा भूस, ह्यांपैकीं हवें तें गादींत घालावें. पण परांचीं किंवा केसांची गादी घालूं नये.

मूल वळूं लागेपर्यंत उशी घालण्याची अवश्यकता नाहीं. नंतर गोल आकृतीची चपटी उशी डोक्याखालीं घालावी.

पडदा किंवा मच्छरदाणी, सबंध पाळण्यावर किंवा डोक्याचे बाजूनें घालावी; ह्मणजे प्रकाश व वाऱ्याचा झोत आणि चिलटें--मच्छरें, यां-पासून तान्ह्याचें रक्षण होईल. झापीच्यां (जपानी) पाळण्यांत दोन झापी एकीस एक अशा जोडलेल्या असतात कीं, एका झापींत मुलास निजवून दुसरी झाप डोक्याकडून वर आड करतां येते.

शेगडी बाजूस ठेवून खोलींतली हवा गरम होऊं द्यावी. पाळ-ण्याचे खालीं किंवा जवळ शेगडी ठेवूं नये किंवा हवा आंत गेल्यास प्रतिबंध करूं नये. मुलास ऊब देण्याकरितां लोंकर भरलेली लांबशी उशी किंवा गरम पाण्यानें भरलेली रबरी बाटली शेजारीं ठेवावी. किंवा गरमपाण्याचे बाटलीनें अंथरूण शेकून काढावें. पण चटका लागण्याइतकें कढत करूं नये.

मुलाचें मन रमण्यासाठीं पाळण्यावर एखादें कापडी किंवा लांकडी झुंबर बांधावें. मूल हात-पाय हालवूं लागलें असतां त्या झुंबरास मुलाचा हात पोंहचेल इतकें खालीं तें टांगावें.

मूल पाळण्यांत घातल्यावर खेळत राहील, स्वस्थ पडेल, किंवा झोंपेल. स्वेच्छेनें तें करील तें त्यास करूं द्यावें. आपण त्यास बळेंच कांहीं करावयास लावूं नये. त्यानें निजावें ह्मणून झोंके देणें, गाणीं

ह्मणणें, थोपटणें वगैरे उपचार करूं नयेत. मुलाला बळें निजविल्यापासून ज्वराची कणकणी येण्याचा संभव असतो व त्याच्या नेहमींच्या झोंपेंत प्रत्यवाय होतो. ती जितकी स्वस्थपणें, शांतपणें व्हावी तितकी होत नाहीं, आणि मुलास अशा उपचारांची एकदां संवय जडली ह्मणजे मात्र ते केल्याशिवाय त्यास चैन पडत नाहीं. गाणीं वगैरे ह्मणावयाचीं तीं नुसतीं मौजेखातर आणि मुलाला रमविण्याकरितां ह्मणावयाचीं असतात.

पाळण्यांत ओल राहूं देऊं नये; वाळंत बघत जावें आणि भरलें असतां बदलावें. गादी व दुसरीं आंथरा-पांघरावयाचीं वस्त्रें, तिसरे चवथे दिवशीं वाऱ्यांत किंवा उन्हांत प्रहर–सहा घटका घालावीं, पाळण्याचे सांदींतून ढेकूण पाहत जावे. मूल पाळण्यांतून खालीं पडणार नाहीं किंवा आगीच्या ठिणगीनें त्याचीं वस्त्रें पेट घेणार नाहींत याविषयीं खबरदारी ठेवावी. मुलाला रात्रीचें पाळण्यांत निजवूं नये.

मुलाला घेणें–मुलाची उचलसाचल तें स्वतः मान धरीपर्यंत फार हुषारीनें केली पाहिजे. ह्या अवस्थेंत मुलाच्या शरिराचीं संधिबंधनें दृढ झालेलीं नसतात; ह्मणून त्यास हाताच्या केवळ पंज्यावर उचललें असतां, त्याचें अंग मोडण्याची भीति आहे. तरी ज्यास तान्ह्याला जपून उचलतां येत नसेल, अशाला उचलूं देऊं नये. हवें तर आपण त्याचे मांडीवर द्यावें आणि आपणच उचलून घ्यावें.

मूल वळूं लागल्यावर आपले डावे हाताचा पंजा त्याचे मानेखालीं आणि उजवे हाताचा कंबरेखालीं देऊन त्यास आडवें उचलण्यास हरकत नाहीं. त्याचे उजवे हातावर डोकें आणि डावे हातावर कमरेचा भाग घेणें अशुद्ध आहे.

मूल उरानें सरकण्याच्या अवस्थेंत आल्यावर त्याच्या दोन्ही बगलांत हात घालून खवाव्यावर उभें उचलतां येतें.

मूल बसूं लागल्यावर त्याला मांडीवर बसवून डोलबाई करण्यापासून त्यास व्यायाम घडून सुख होतें. तरी फार वेळ तसें करूं नये. आणि झोप्याबरोबर डोकें सोडून आपटूं देऊं नये. मांडीवर घेऊन मुलाला निजावयाची संवय लावणें, किंवा झोंप येण्याकरितां मांडी सतत हालवून त्याच्या शरीरास झोके देणें, वगैरे प्रकार त्याच्या आरोग्याला अपायकारक होतात.

मूल दोन महिन्यांचें झाल्यावर त्याला उघड्यांत–हवेंत गारठा किंवा उष्णता फारशी नसेल तेव्हां–पलंगडीवर किंवा भुईवर कांहीं आंथरून दिवसांतून एक-दोन वेळ तास-दोन तास टाकावें, ह्मणजे तें तेथें आनंदानें खेळतें, हात चाळवतें, लाथा झाडतें, व केव्हां मान वळवतें. ह्यापासून त्यास व्यायाम घडतो, व त्याचीं अंगें दृढ होतात. ह्मणून त्याला तसें मनःपूर्वक करूं द्यावें. अंगावर जड वस्त्र घालून त्यास प्रतिबंध करूं नये. त्याच्या जवळ बसून त्याचे हे चाळे पाहण्याची गंमत असते. सांभाळणारणीनें त्याला अशा स्थितींत एकटें मात्र टाकूं नये.

मुलाला व्यायाम घडण्याकरितां बाहेर फिरावयास न्यावें. आचार असा आहे कीं, बाळंतिणीनें चवथे महिन्यांत मुलाला घराबाहेर ग्रामदेवतेच्या दर्शनास न्यावें. सांप्रत महिना--दीड महिन्याच्या बाळंतिणी बाहेर पडतात, आणि मुलास वागवतात. इंग्लंड देशांत पंधरा किंवा आठ दिवसांच्याही मुलाला हवा स्वच्छ असली, तर वसंतऋतूंत बाहेर फिरावयास नेतात. हेमंत ऋतूमध्यें तें महिन्याचें झाल्याशिवाय नेत नाहींत.

हातावर घेणें—मूल मान सावरूं लागेपर्यंत त्यास हातावर फिरवावें. मुलास हातावर घेतांना बरेंचसें वस्त्र त्याचे अंगाखालीं घ्यावें आणि वरूनही गळ्यापर्यंत पांघरवावें, ह्याप्रमाणें त्यास हातावर घेऊन घरांत, मोकळ्या दालनांत किंवा पडवींत ऊन नसेल तेव्हां रोज दिवसांतून तीन-चार वेळां फिरवायास हरकत नाहीं. पण प्रत्येक वेळीं पंधरा मिनिटांहून जास्त फिरवूं नये. तेव्हां त्याला उभें घ्यावें. एकाच हातावर घेतल्यानें मुलाचें एकच अंग दाबलें जातें आणि सांभाळणारणीचाही हात दुखूं लागतो.

मूल सांवरूं लागलें आणि त्याच्या हातां-पायांला अंमळ दृढता आली म्हणजे त्यास सांभाळणारानें अमळ उलटून पालटून आपले डावे आणि उजवे छातीवर उभें धरून एक डावा हात त्याचे कुल्याखालीं आणि दुसरा मानेखालीं द्यावा. पुढें पुढें दुसरे कमरेला हाताचा टेका देणें पुरें होतें.

मूल चलनवलन करूं लागतें, तेव्हां त्यास स्वभावतःच पुष्कळ व्यायाम घडत असतो. तरी त्यास बाहेरची मोकळी हवा मिळणें अवश्यक आहे. ती मिळवून देण्यास गाडी नसली, तर त्यास छातीवरच धरून नेलें पाहिजे. ही गोष्ट मोकळी हवा घरापासून विशेष दूर नसेल तर साधण्यासारखी आहे. कारण त्यास छातीवर धरणें एके वेळीं अर्ध्या तासाहून अधिक इष्ट नाहीं आणि शक्यही नाहीं. जवळपास एकादी बाग असेल, तर तींत फिरविणें योग्य होईल.

कडेवर घेणें—मूल बसूं लागल्यापासून सपाटून सारखा शरीराचा व्यापार करितें आणि त्यास मुबलक व्यायाम घडतो. त्यास ह्या अवस्थेंत बाहेर न्यावयाचें झालें, तर कडेवर नेण्याची आपले देशांत चाल आहे. पण ह्यावेळीं त्याच्या तंगड्या दृढ झालेल्या नसतात.

पुष्कळ मुलें त्यांस ह्या अवस्थेंत कडेवर घेतल्यामुळेंच फेंगडीं होतात; ह्मणून त्यांस गाडींत न्यावें हें उत्तम. तिच्या अभावीं सांभाळणारणीनें आपल्या हाताची खुर्ची करून तींत मुलाला बसवावें. मुलाचा भार आपले छातीकडे असूं द्यावा. मूल जड असलें व माणसांच्या गर्दींतून किंवा लांब अंतरावर त्यास न्यावयाचें असलें, तर त्यास आपले पाठीशीं उभें करून बांधावें. असें कीं, त्याचें गळ्याखालून सगळें अंग पायांसकट बांधलेल्या वस्त्रांत यावें आणि बंधनाचा एक पदर उचलणाराचे एका खांद्यावरून आणि दुसरा पदर दुसऱ्या खाकेखालून पुढें आणून, छातीच्या डाव्या किंवा उजव्या बाजूवर दुहेरी गांठ द्यावी. हा प्रकार देखील मुलांसाठीं माणसानें किंवा जनावरानें ओढून न्यावयाची गाडी मिळण्यासारखी नसेल तेव्हांच करावा. मुलास खांद्यावर किंवा डोकीवर बसवून नेणें गांवढळपणाचें लक्षण समजलें जातें.

मुलास कडेवर बसवून नेण्याच्या प्रकारांत नेणाराचा एक हात पूर्ण मोकळा राहतो, हा एक बरेपणा आहे. त्याच्या उलट त्यांत दोष पुष्कळ आहेत. त्यांतल्या त्यांत त्याचें अति वाईटपण चालत्या-बोलत्या मोठ्या मुली–मुलाला विशेष विचार न करतां कसल्याही प्रतीच्या गडीमाणसाच्या कडेवर देण्यांत आहे. हिंदुस्थानांत कित्येक जातींत मुलांस कडेवर घेत नाहींत, आणि हिंदुस्थानाबाहेर तर हा प्रकार कोणास ठाऊकही नाहीं. तरी आपले लोकांतही ही चाल जितक्या लवकर मोडेल तितकें इष्ट आहे.

गाडींत नेणें—मुलांच्या निरनिराळ्या अवस्थेंत त्यांना फिरविण्या-साठीं निरनिराळ्या सोईच्या, माणसानें मागें चालून पुढें ढकलीत नेण्याच्या वगैरे गाड्या केलेल्या असतात; त्यांतली जरूरीप्रमाणें एखादी उपयोगांत आणावी. मात्र मूल चलनवलनावस्थेंत येईपर्यंत गाडीचा उपयोग न करणें बरें.

हवेंत गारवा किंवा उष्णता नसेल, त्या दिवसांत मुलास बाहेर फिरावयास न्यावें; किंवा मोलकरणीबरोबर पाठवावें. दिवसाउजेडीं फिरवून आणावें. गांवाबाहेर, मोकळ्या हवेंत, गुराढोरांची किंवा माणसांची वर्दळ नसेल अशा शांत, सपाट, सारख्या सडकांवरून फार सावकाशपणें न्यावें. गाडी ढकलणारानें गाडीकडे दुर्लक्ष करून मध्येंच कोठें गप्पा मारीत बसूं नये.

गांवठी गाडी आणि गांवठी रस्ते हीं दोन्हीं मूल दोन वर्षांचें होई-पर्यंत त्यास फिरवण्यास निरुपयोगी आहेत. तरी इंग्रज लोकांचें अनुकरण करावयास जाऊन तान्ह्या मुलाचे हाल मात्र करूं नयेत.

मुलास बाहेर नेतेवेळीं डोकीचें कुंचडें हलकें व विरळ विण-करीचें घालावें. तोंडावर रुमाल घालूं नये. पण उन्हाळ्याशिवाय इतर दिवसांत आंगावर हलकीशी शाल घातली तर चांगलें. त्याच्या हाता-पायाला गारठा बाधूं नये, इकडे विशेष लक्ष ठेवावें.

पायीं चालविणें.—मुलाचे पाय शरीराचें ओझें उचलण्यास समर्थ झाले ह्मणजे तें आपले आपण पाऊल टाकूं लागतें, आणि थोडे दिवसांनीं मोठ्या डौलानें चालतें. सांभाळणारणीनें त्यास बेंळ चालवूं नये. त्यापासून तें कुबडें किंवा फेंगडें होण्याची भीति असते. शिवाय, मुलाकडून अतिरिक्त परिश्रम घेतले असतां, त्याच्या शरिराला थकवा येतो. त्याला हवी तर एक पांगूळगाडी करून द्यावी आणि स्वच्छं-दानें चालूं द्यावें.

मूल चालूं लागल्यावर तें कधींच स्वस्थ बसून राहत नाहीं, त्याच्या येरझारांत मैल अर्ध्यामैलाचा चक्कर सहज होतो. तें पायां-वर चालून दमतें, तेव्हां गुडघ्यांवर चालूं लागतें. हे दोन्ही प्रकार चांगले आहेत. अशा मुलाला दूर चालत नेण्याऐवजीं आंगणांत किंवा

बागेंत खेळण्या-हिंडण्याच्या मिषानें सकाळीं व तिसरे प्रहरीं चालवावें. त्यास बाहेर मोकळ्या हवेंतून न्यावयाचें, तें गाडींतून नेऊन तेथें पोंहचल्यावर त्याला अप्रत्यक्ष रीतीनें पायीं फिरवावें.

खेळविणें—मुलाच्या प्रथमावस्थेंत पाळण्यावर कापडी किंवा लांकडी झुंबर बांधण्याविषयीं वर लिहिलेंच आहे. दोन महिन्यांनीं मूल हातापायांचे आंगठे चोखूं लागतें. तेव्हां त्यास तसें करूं देऊं नये. त्यापासून दांत वांकडे तिकडे उगवण्याची किंवा ओठाबाहेर येण्याची भीति असते. मुलाला लांकडी चोखणी किंवा पितळी खुळखुळा द्यावा. तें बसूं लागतें तेव्हां त्यास फिरकी, भोंवरा, चिनी किंवा धातूचीं पशुपक्ष्यांचीं चित्रें, किंवा रबराचीं उडणारीं, नाचणारीं, किंवा वाजणारीं अशीं चित्रें द्यावीं. तें रांगूं लागतें तेव्हां चेंडूसारखीं वाटोळीं किंवा चाकांवर चालणारीं चित्रें द्यावीं, आणि तें चालूं लागतें तेव्हां पांगूळगाडी किंवा चाकावरचे घोडे द्यावे.

तान्ह्या मुलास तीक्ष्ण अणींचें, घशांत जाणारें, रंग सोडणारें, विषारी, भीतिकारक व जड असें खेळणें देऊं नये.[1]

शांत करणें—मूल रडलें कीं त्याला दूध पाजावयाचें, मांडीवर घ्यावयाचें, घेऊन फिरावयाचें, किंवा गाणें ह्मणावयाचें, असे त्याच्या रडण्याचे गोडवे करूं नयेत. मूल दिवसांतून एकदोन वेळां चांगलें खडसून रडलेलें चांगलें. त्यापासून त्याची छाती मोकळी होते. ह्मणून त्याच्या रडण्याची एकादे वेळीं उपेक्षा करावी. कारण, तें केव्हां केव्हां केवळ झोंपेला आलें ह्मणजे देखील रडतें. तें दरवेळीं कांहीं दूध पिण्याकरितांच रडत नाहीं. केव्हांतर त्याचें पोट दुधानें तुडुंब फुगल्या-

---

१ क्रीडनकानि खल्वस्य तु विचित्राणिघोषवंत्यभिरामाणि अगुरुण्यतीक्ष्णाग्राणि अनास्यप्रवेशीनि अप्राणहरानि अवित्रासनानिस्युः । चरक.

मुळेंच तें रडतें. ह्मणून दुधाची वेळ झाल्याशिवाय तें पाजूं नये. रडण्याचें कारण शोधून काढावें. तें केव्हां खालचें बाळंत भिजल्यामुळें, केव्हां डासमच्छर चावल्यामुळें, केव्हां थंडी किंवा गरमी लागल्यामुळें, केव्हां झोपेंत भ्याल्यामुळें आणि केव्हां शरीरांत दुखणें झाल्यामुळें रडतें. शेवटलें कारण तपासण्यासाठीं त्याच्या निरनिराळ्या अंगावर हात ठेवून पाहावा. ज्या अंगावर हात ठेवल्यानें मूल रडेल तें अंग दुखतें असें समजावें. रडण्याचें कारण समजलें ह्मणजे मुलाला उगी करण्याचें काम फार सोपें जाईल. अशक्त मुलें बहुतेक आणि सदृढ मुलांपैकीं एकादें जन्मतःच किरकिरें, रडकें व हट्टी असतें. त्याचें कशानेंही समाधान होत नाहीं. अशा मुलाकडूनही आहार आणि विश्राम काळजीपूर्वक, यथायोग्य करविले असतां त्यास बरेंच सुख होतें.

सामान्य नियम—मुलाला सुख होण्यासंबंधानें खालील साधारण नियम लक्षांत ठेवण्यासारखे आहेत—

(१) त्यास सुख होईल अशा रीतीनें मांडीवर घ्यावें.

(२) वाकडें तिकडें बसवूं नये किंवा स्वतः बसतां येण्यापूर्वीं बसवूं नये.

(३) एकाच हातानें ओढून किंवा त्याचे हात उंच करून खवाद्यावर उचलूं नये. उंच उडवून झेलूं नये. दुसरें कोणी असें करील तर मुलाला त्याचे हातून तत्काळ घ्यावें.

(४) त्यास एकदम उंचावरून बिछान्यावर टाकूं नये, किंवा झोपेंतून एकदम जागें करूं नये.

(५) त्याला अवश्यकतेवांचून अगदीं अंगावर घेऊं नये.

(६) त्याला उंच सखल जागेवरून आणि पाणी व अग्नि यांपासून जपावें. मेघांची गर्जना, बंदुकींचे आवाज, कर्कश वाद्यें, रडारड वगैरे होत असेल तेव्हां मुलास पोटाशीं धरावें.

(७) ज्या त्या मनुष्याला त्याचा मुका घेऊं देऊं नये किंवा श्वासोच्छास त्याच्या तोंडावर टाकूं देऊं नये.

(८) त्यास ज्या त्या गोष्टींत रडवूं नये, आणि केव्हांही चिडवूं नये.

(९) त्यास कृतीनें किंवा गोष्टी सांगून भेवडावूं नये. एऱ्हीं तर काय, पण तें सांगितलें समजावलेलें ऐकत नसेल तरी सुद्धां असें करूं नये. मूल एकदां भ्यालें तर त्याची ती भीति निघत नाहीं, व त्यामुळें एकादे वेळीं प्राणान्त कष्ट होतात.

(१०) त्याच्या इच्छेप्रमाणें करावें. त्याचा उत्साह वाढवावा. साहस वाढवावें. त्याला जेव्हां तेव्हां हटकूं नये, किंवा दडपूं नये. इजा होण्यापासून मात्र वांचवावें.

(११) त्यानें ऐकलें नाहीं तरी त्यास अपशब्द बोलूं नये. धास्ती धरील असें रागें भरूं नये. बागुलबुवाची भीति दाखवूं नये. थोडी नासधूस केली ह्मणून भडाभडा बडवूं नये. डोक्यावर तर कधींच मारूं नये. उपाशीं ठेवण्याची शिक्षा देऊं नये.

(१२) वस्त्राचा (लुगड्याचे पायघोळाचा) वारा, परक्या, मळीण, रोगट माणसाचा स्पर्श आणि कोणी त्याची ओलांड करणें, यापासून त्यास जपावें.

अंगांत घालणें—आपले लोकांत मुलाचे अंगांत आरंभीं १० दिवस मुळींच कांहीं पेहरणें घालीत नाहींत. एकादें पातळ, जीर्ण, टाकाऊ असें फडकें पोटावरून गुंडाळतात. अकरावे-बारावे दिवशीं कुंची घालतात. ह्यापुढें अंगडें कुंचडें (अर्धी कुंची) ही दोन वस्त्रें येतात. (अंगडें ह्मणजे सदरा). तीन महिन्यांपुढें मुलाच्या डोक्याला अंमळ आकार आल्यावर कुंचड्याचे जागीं टोपडें घालतात. सामान्यतः एवढेच कपडे बारशापासून तों एक वर्षपर्यंत मुलाचे अंगा-

वर असतात. हे कपडे बहुधा सुती, काळ्या रंगाचे किंवा छिटांचे केलेले असतात. सण थंडा, रेशीम महाग, लोंकर गरम आणि रू घातलेले कपडे अंगास उबवतात; ह्मणून ह्यांतल्या कोणच्याही कापडाचे कपडे मुलाचे अंगावर घालण्याचा फारसा परिपाठ नाहीं.

वरील तीन कपडे (कुंची, आंगडें आणि कुंचडें) यांत कुंची निरुपयोगी आहे. कारण, तिच्यापासून मुलाच्या पुढील अंगाचा बचाव मुळींच होत नाहीं. ती आतां प्रचारांतून जात चालली आहे. तिचा क्वचित् औपचारिक उपयोग करतात. दुसरें अंगडें. तें अंगांत असणें-नसणें सारखेंच आहे. कारण, त्याचा गळा आणि छातीचा भाग सगळा खुला राहतो, त्याच्या घेराला मुलास उचलण्या-सांचलण्यांत वळकट्या पडून त्या अंगाखालीं जातात. आणि त्याचा गळा व बाह्या इतक्या तंग असतात कीं, त्यांतून मुलाचें डोकें आणि हात घालणें काढणें फार कष्टकारक होत असतें. तिसरें कुंचडें किंवा टोपडें. हें योग्य कालीं योग्य शिरस्त्राण आहे. याच्या रचनेंत डोक्याला घाम न येऊं देणें, फाजील वाऱ्यापासून बचाव करणें, वगैरे गुण असावे तसे आहेत.

मुलाच्या वस्त्राविषयीं जो हा हलगर्जीपणा आपल्यांत आहे, त्याला दोन समजुती कारण आहेत. एक ही कीं, मुलाचें अंग जितकें उघडें ठेवावें तितकें तें बळकट होतें आणि तितकी त्याला शीतोष्ण सहन करण्याची शक्ति येते. दुसरी समज ही कीं, कपडे थोडे दिवसांत फाटतात किंवा जीर्ण होतात, तेव्हां त्यांत पैसा खर्च करणें व्यर्थ आहे. ह्या दोन्ही समजुती तत्त्वतः योग्य आहेत. तरी त्या व्यवहारांत आणि विशेषेंकरून मुलांच्या बाबतींत अगदीं निरुपयोगी आणि अत्यंत अपायकारक आहेत.

कपडे कसे असावे ?---मुलाचे कपडे मुलाचे शरीरावर योग्य होतील असे असावे. मुलाचें शरीर सुकुमार असतें, त्याला स्पर्श सहन होत नाहीं, त्याला शैत्य आणि उष्ण थोडेंही बाधा करते आणि त्याचे अंगाला घाम पुष्कळ येत असतो. ह्मणून त्याचे कपडे नरम, सहज घालतां–काढतां येण्यासारखे, हलके, शैत्योष्णापासून त्याच्या सर्वांगाचें रक्षण करणारे, घाम शोषणारे, साधे, व घरीं धुतां येण्यासारखे असले पाहिजेत.

मूल हालचाल करूं लागेपर्यंत त्याला एक एक वस्त्र घालणें पुरे आहे. ह्या अवस्थेंतही आरंभींच्या, दहा दिवसांतल्याप्रमाणें, पोटा-सभोंवतीं पट्टा गुंडाळणें तसेंच कायम ठेवावें. ग्रीष्मऋतूंत तो हवा तर थोडा अगोदर टाकून द्यावा. पट्टा बारीक, नरम पोताच्या गर्भरेशमी किंवा गर्भलोकरी कापडाचा करावा. तो सैलसा व छाती आणि पोटा-वरून दोन वेढे येतील असा लपेटावा, आणि त्याच्या खालीं वर दोन्ही बाजूंस बंद बांधावे. तो मुळींच आवळूं नये. त्यावरून अंगडें घालावें.

अंगड्याच्या आकृतींत सुधारणा करणें इष्ट आहे. ती अशी कीं, अंगड्याचा गळा समोरून न कातरतां आडवा रुंदीकडून कातरावा. त्यांत सरफीत घालावें ह्मणजे त्यानें गळा हवा तितका लहान मोठा करतां येईल.गळ्याला उंच पट्टी लावावी. अंगड्याची लांबी कुल्ह्या-पर्यंत करून खालीं घेराला रुंद पट्टी लावावी. बाह्या ढिल्या अर्धा पंजा झाकेल इतक्या लांब कराव्या. उन्हाळ्याकरितां अंगडें जाड, पण मऊ, घट्ट पोताचें व कापसाच्या कापडाचें करावें. हिंवाळ्या-करितां मध्यम जाडीचें, निवळ लोकरी किंवा रेशमी अथवा गर्भलोकरी किंवा गर्भरेशमी कापडाचें करावें. लोकरी कापड फ्लानेलचें चांगलें

असतें. अति गरीबीला जाड खादीचें केलें असतां हरकत नाहीं. छीट किंवा मांजरपाटासारखें कापड निरुपयोगी होय. त्यांत गरमी राखण्याचा गुण नसतो.

मूल मान सावरूं लागेपासून त्याच्या पोटाला पट्टा गुंडाळणें सोडून द्यावें. अंगड्याच्या जागीं सदरा किंवा चौबगली बाराबंदी घालावी. वरून ढिलासा कोट किंवा जाकीट व मांड्याला चोळणा घालावा. त्याच्या मध्यसंधीचा भाग मलमूत्रोत्सर्गाकरितां मोकळा ठेवावा. पायांत मोजे ढिले घालावे. हे गुडघ्याखालीं राहतील इतके उंच असावे. मुलाला जर मलमूत्र नियमित वेळीं करण्याची संवय लाविली असली, तर रात्रींचे वेळीं (चोळणा आणि मोजे न घालतां) अंगांतल्या कपड्या-वरून एक लांब पायघोळ सदरा केला असतां चालेल. नियमित वेळेच्या सुमारास हगण्याकरितां मुलास बाहेर धरलें ह्मणजें झालें. पण अशी संवय केली नसेल तर पायघोळ सदरा हा घालूं नये. मूल अन्न खाऊं लागल्यानंतर त्याच्या हगण्यामुतण्यांत बराच नियमित-पणा येतो. तेव्हां चोळण्याचा मध्य संधि खुला ठेवण्याची जरूरी नाहीं. (ताणून लहान मोठे होणारे कमरपट्टीचे चोळणे बाजारांत आयते मिळतात.) ग्रीष्म ऋतूंत वरील सगळेच कपडे सुती किंवा तागाचे हवेत. हिंवाळ्याकरितां सगळे गरम, आणि मध्यम ऋतुमाना-करितां अंगाबरोबर असणारे कपडे सुती आणि वरून घालाव-याचे कपडे गरम हवेत. बारा महिने फ्लानेल किंवा गरमच कपडे वापरण्याची आपणा लोकांना कांहीं अवश्यकता नाहीं.

मूल चालूं लागल्यानंतर चोळण्याऐवजीं ढिला पायजमा करावा, आणि पायांत जोडा घालावा. तो सहज काढतां घालतां यावा. (त्याला ह्या अवस्थेंत बूट किंवा शूज घालूं नयेत.) स्लिंगदार पँट, कमरपट्टा

किंवा कटीच्या वरचें-खालचें वस्त्र जोडून एक केलेलें पेहेरणें घालणें, पाठीकडे बटन लावणें, वगैरे प्रकार आपल्या लोकांना विशोभित दिसतात; म्हणून ते करूं नयेत. दोन वर्षांनंतर मुलाचे आणि मुलीचे कपड्यांत त्यांच्या जातीला शोभेसा फरक करावा.

टोपडें किंवा टोपी सर्दी गरमी करितां निरनिराळ्या योग्य कापडाची करावी. कापड एकेरी किंवा दुहेरी लावावें. पण तिला मधून गादी घालूं नये. ती निवळ लोकरीच्या कापडाचीही नको. जें कापड घ्यावयाचें तें जाळीदार किंवा विरळ पोताचें घ्यावें.

मुलाचे कपडे करण्यांत आणखी एक धोरण हें असावें कीं, मुलाचा गळा, मान, कान, कपाळ, छाती, आंतडीं, आणि पायाचे तळवे यांचें शैत्यापासून पूर्ण संरक्षण व्हावें. मानेला तर उन्हाचीही बाधा होतां कामा नये. दोन वर्षांचें मूल होईपर्यंत रू भरलेले कपडे त्याच्या अंगांत घालूं नयेत. तसेंच त्यास बनियानीही घालूं नयेत. आंतून घालायाचे कपडे रोज धुतां यावे ह्मणून त्यांला झालरी, फीत, वगैरे लावू नये. बटन सुती लावणें आणि कसे रुंद, जाड फित्यांचे लावणें चांगलें. बिरड्यांच्या गुंड्या लावू नयेत. कारण त्या काढण्या-घालण्याला फार त्रास पडतो. तसेंच टांचण्याचा उपयोग करूं नये. आणखी कपडे करण्यांत हें धोरण ठेवावें कीं, मुलाचे अंगावर त्यांचें ओझें होऊं नये, किंवा त्यांनीं त्याचें अंग जखडलें जाऊं नये. त्यांच्या प्रत्येक अवयवाचे व्यापार सुखानें होण्यास अगदीं अडथळा होऊं देऊं नये.

मुलांच्या वाढत्या शरीराला निरनिराळ्या अवस्थांत अंगाच्या बेताचे कपडे करवावे. पहिले दोन महिन्यांतले कपडे पांचवे सहावे महिन्यांत कामीं येत नाहींत; आणि ह्या काळांतले कपडे मूल बारा

महिन्यांचें झाल्यावर उपयोगीं पडत नाहींत. ह्मणून कपडे एकदांच पुष्कळ न करतां लागतील तसे करावे. तरी प्रत्येक अवस्थेंत कपड्यांचे निदान चार जोड पाहिजेत. जे लोक पुढील अवस्थांतही कामीं पडावे ह्मणून अगोदरच ढिले कपडे करतात, त्यांस कपडे कशाकरितां घालावयाचे हेंच माहीत नसतें असें ह्मटलें पाहिजे. रात्रीचे कपडे वेगळे आणि दिवसाचे वेगळे असावे. रात्रीचे कपडे सकाळीं बदलावे. सकाळचे कपडे रात्रीस मूल झोपीं जाण्यापूर्वीं बदलावे. अंगास लागून राहणारे कपडे धुतल्याशिवाय पुन: घालूं नयेत. वरचीं वस्त्रें देखील एकदां अंगांत घातल्यावर उन्हांत किंवा वाऱ्यांत घातल्याशिवाय पुन: वापरूं नयेत.

अंगांत घालावयाचीं वस्त्रें गारठलीं असतील, तर तीं पाटावर पसरून त्यांवरून गरम पाण्याची बाटली फिरवावी; किंवा तीं वस्त्रें आंचेवर टोपली घालून तिजवर पसरून गरम करावीं किंवा आंचेवर दोरी बांधून तिजवर घालावीं. पण अंगाला चटका बसेल इतकें ऊन वस्त्रही घालूं नये. कपड्याचे सळ मोडावे.

अंगावरील कपडा भरला अथवा फार मळला असतां लागलाच बदलून दुसरा घालावा, आणि शिलकीला आणखी दुसरा कपडा त्याच जातीचा नसेल तर तो लागलाच धुऊन वाळत घालावा.

निजविणें–तान्ह्या मुलाला झोंपेची फार अवश्यकता असते.त्याला जितकी जास्त झोंप येईल, तितकी त्याची प्रकृति चांगली राहते. मूल जन्मल्यावर पहिले कांहीं आठवडे २४ तासांतून २० तास झोंप घेतें. तें ३ महिन्यांचें झाल्यावर सहा महिन्यांपर्यंत १७–१८ तास झोंप घेतें. दुसरे वर्षीं बहुधा १२ तास रात्रीं आणि दोन तास दिवसा झोंपतें. मूल मोठें होतें, तशी त्याची दिवसाची झोंप कमी करावी. तें

पांच महिन्यांचें झाल्यावर तिसऱ्या प्रहरीं त्यास मुळींच निजूं देऊं नये. तें सात-आठ महिन्यांचें होईपर्यंत सकाळचें, स्नानानंतर किंवा त्या सुमारास एकादा तास निजलेलें पुरे. पुढें दुपारची त्याची झोंप चांगली दोनतीन तासपर्यंत वाढवावी. मूल दुपारचे वेळीं झोंपलें नाहीं, तर तें तिसऱ्या प्रहरीं निजतें आणि सायंकाळीं चिडचिड करूं लागतें. पुन्हां त्यास निजवावें तेव्हां तें पूर्वी जागल्यामुळें इतकें थकल्यासारखें झालें असतें कीं, त्याला झोंप येत नाहीं, आणि आल्यावर देखील तें स्वस्थ सुखानें पडत नाहीं. पुन्हां पुन्हां चाळवीत असतें. मुलाला दुपारच्या झोंपेची संवय तें चांगलें सहा-सात वर्षांचें होईपर्यंत चालू ठेविली, तर फार चांगलें. बाळपणीं जास्त झोंप घेणारीं मुलें मूळचीं कृश आणि अशक्त असतां पुढें अंगापिंडानें बळकट झालेलीं आणि ह्याचे उलट कमी झोंप घेतल्यानें सशक्त मुलें अशक्त व कृश झालेलीं पाहण्यांत आलीं आहेत. सायंकाळीं मुलाला पहिलीं ३ वर्षें साडेसहाच्या सुमारास आणि तीन वर्षांपासून पुढें पांच वर्षांपर्यंत सात वाजण्याच्या सुमारास निजवावें. त्याहून पुढें त्यास जागवूं नये. आणि रोजच्या नियमित वेळेंत तसेंच कांहीं विशेष कारण असल्याशिवाय झोपेंत व्यत्यय आणूं नये. मुलाला नऊ–दहा वाजेपर्यंत जागें ठेवणें फार वाईट. त्यापासून त्याला अकालीं वार्धक्य येतें आणि तें अनेक रोगांचें मूळ होत असतें.

तान्ह्याला पहिल्या पहिल्यानें नुसतें पाठीवर उताणें निजवावें. तें सहज वळूं लागलें व उपडें होऊं लागलें ह्मणजे त्यास उताणें न निजवितां कुशीस निजवावें. ह्या अवस्थेंत उताणें निजण्यापासून त्याच्या माकडहाडाला अपाय होण्याची भीति असते. कूस बदलीत जावी. एकाच कुशीवर नेहमीं निजवूं नये.

मुलास निजण्यास अंथरुणावर जागेंच सोडावें. थोड्या वेळांत तें निजतें. पहिल्या पहिल्यानें तें असें टाकिलें असतां रडतें, तरी आपण

त्याची परवा केली नाहीं आणि आपला क्रम तसाच चालू ठेविला, ह्मणजे मग तें आपल्या आपणच निजूं लागतें. तें झोंपीं जाईपर्यंत त्याचे-जवळ बसणें, किंवा तें मध्येंच जागें झालें असतां त्यास उचलून फिरविणें, रडूं लागलें असतां त्याची समजूत घालणें, उजेडाजवळ नेणें, अथवा तें निजल्यावर त्याची झोंप मोडेल ह्मणून घरांत गलबला न होऊं देणें वगैरे खोडी मुलांस लावूं नयेत. लोक बोलत असोत, किंवा शेजारीं गाणें-बजावणें चाललें असो, त्यांत देखील मुलाला गाढ झोंप यावी, त्यानें चाळवूं नये अशी त्यास संवय असली पाहिजे. त्याला निजावयास मांडीवर घेणें, डोलविणें, झोंके देणें, चोखावयास देणें किंवा दुसरा कोणचाही उपाय करणें इष्ट नाहीं. मूल आणखी मोठें झाल्यावर त्याची उजेडाची संवय मोडण्याचा देखील विचार करावा. ज्या मुलाला बिछान्यावर टाकल्याबरोबर झोंप येते, आणि तीही गाढ येते, अशा सशक्त मुलाला अंधारांत झोंप येणें कांहीं कठीण नाहीं. पण अशक्त आणि झोंपेंत भिऊन उठणाऱ्या मुलाविषयीं प्रश्न असतो. अशा मुलाची देखील ती संवय सांभाळणारणीला युक्तीनें पुष्कळ कमी करतां येण्यासारखी आहे. तरी त्यास अंधार करूं नये. केवळ डोळ्यावर उजेड पडूं नये ह्मणून आडपडदा करावा, हा उत्तम मार्ग आहे. मुलें भित्रीं होण्याला पुष्कळदां त्यांस सांभाळणारीं माणसेंच कारण होत असतात. तीं त्यांस बागुलबुवा उचलून नेईल वगैरे गोष्टी सांगतात, त्यामुळें त्यांच्या मनांत भीति बसते, आणि त्यांची कल्पनाशक्ति ह्या वयांत तीव्र असल्यामुळें ती भीति अनेक रूपांनीं त्यांच्या मनावर विस्तारत जाते. ती इतकी कीं, मुलें मोठीं झाल्यावर देखील भित्रीं राहतात आणि त्यांची ती भीति कांहीं केल्या जात नाहीं. तरी मुलांस बाळपणीं जखिणींच्या,

भुताखेतांच्या वगैरे गोष्टीं सांगून भेवडावूं नये; किंवा त्यांचे समोर तशा गोष्टी बोलूंही नयेत.

कांहीं मुलें रात्रीचीं झोंपेंत बिछान्यांत मुततात. पुष्कळदां जंतांच्या विकारामुळें मूल असें करितें. तरी जंत झाले असल्यास ते पाडण्याचा प्रथम उपाय करावा. केव्हां केव्हां पुष्कळ सावधगिरी ठेविली असतांही मूल मुतल्यावांचून राहात नाहीं; तेव्हां त्यास डॉक्टरास दाखवावें. पुष्कळ वेळां मोठ्या मुलांची बिछान्यांत मुतण्याची ही संवय रात्रीं जेवतांन त्यांना पाणी कमी पिण्यास देण्यानें व निजण्यापूर्वीं त्यांना मोरीवर नेऊन आणण्यानें मोडते. अशा रीतीनें ती संवय मोडावी. तिच्यासाठीं त्यांस विनाकारण शिक्षा करूं नये.

मुलांस सूर्योदयाला उठण्याची संवय करावी. ती त्याच्या जन्मभराला चांगली असते. सकाळचें उठणें आयुष्कर व आरोग्यकर आहे. सकाळींच जागें होऊन पुन्हां झोंपीं जाणें आरोग्याला विघातक आहे.

मुलाला उचलल्याबरोबर आंथरुणाची उलटापालट करून त्यास हवा लागूं द्यावी. पुनः बिछाना घालण्यापूर्वीं तासभर तरी त्यास हवा लागूं दिली पाहिजे. तसेंच मुलास खोलींतून बाहेर आणल्यावर खोलीचीं सगळीं दारें उघडून बाहेरची हवा आणि ऊन हीं आंत येऊं द्यावीं.

ज्या देशांत उष्ण वारें अंग भाजण्याइतकें चालत असतें, तेथें दिवसास खुशाल खोली शक्य तितकी थंड करावी. रात्रीचें मोकळ्या हवेंत खुशाल मुलास घेऊन निजावें. अशी कांहीं सोय केली नाहीं, तर मुलें माशासारखीं तडफडतात, त्यांचा घसा कोरडा पडतो, आणि तीं रोगास पात्र होतात. उष्ण प्रांतांत महिन्याच्या मुलाला

देखील थंड पाणी पाजल्याशिवाय गत्यंतर नसतें. अशा ठिकाणीं शीत उपचार करण्यास भिऊं नये.

न्हाऊं घालणें.

न्हाणें ह्या शब्दांत अभ्यंग करण्याचा ह्मणजे तेल लावण्याचा समावेश होतो. आपले लोकांत तान्ह्या मुलाला सकाळचें स्नान अभ्यंग केल्याशिवाय घालीत नाहींत. सायंकाळीं नुसतेंच अभ्यंग करितात. सायंकाळच्या अभ्यंगांत तेलाचा उपयोग थोडा—केवळ अंग चोळण्यास सोपें जाण्यापुरता—करावा.

आपल्या जुन्या वैद्यक ग्रंथांत सांगितलें आहे कीं, अभ्यंग (तेल लावणें) सर्व शरीराला आणि विशेषेंकरून डोकें, कान आणि पायांचे तळवे यांना रोज करावें. ह्यानें त्वचेला मार्दव येतें, शरीर दृढ होतें आणि निद्रा येते. स्नान केल्यानें अंगाचा मळ, कंडु व घाम यांचा नाश होऊन अग्नि प्रदीप्त होतो, श्रमाचा परिहार होतो. बळ वाढतें आणि तेज येतें. ऊन पाणी डोक्यावर घालूं नये. त्यापासून केसांस व दृष्टीस धक्का बसतो. मुलास भरवल्यानंतर लागलेंच स्नान घालूं नये.

ह्याप्रमाणें मुलाचे अंगास तेल लाविलें असतां त्यावर मळ जमतो. तो स्नानाचे वेळीं अंगाला हरभऱ्याचें पीठ चोळून काढून टाकितात. तरी मुलाचीं पांघुरणें तेलकट होतात तीं बरोबर धुतलीं जात नाहींत, त्यांना वाण येते आणि ती खोलीभर सर्वत्र पसरते; ह्मणून साधें तिळेल लावण्याऐवजीं लाक्षादि[1] सुगंधि तेल मुलाच्या आंगाला लावावें.

---

१ सुगंधी तेलांच्या भपकेदार जाहिरातीला भुलून त्यांतल्या एकाद्या तेलाची नांवावरूनच निवड करूं नये. कारण पुष्कळ तेलांत नांवाशिवाय दुसरे गुण कांहीं नसतात अशीं तेलें मुलांच्या अंगास लावण्यास निरुपयोगी होत.

तेलाचे कपडे फारच स्वच्छ धुवावे आणि खोलींतली घाण सुगंधि धुरानें नाहींशी करावी.

अति अशक्त, व अंग गार राहाणाऱ्या, मुलास रोज स्नान न घालतां, कधीं कधीं आणि दिवस बराच वर आल्यावर घालावें. मुलाला जुलाब किंवा उलट्या होत असतील किंवा कफ झाला असेल, ज्वर, डांग्याखोकला किंवा दृष्टिविकार झाला असेल, तर त्यांतून बरें होईपर्यंत स्नान घालूं नये, किंवा अभ्यंग करूं नये. फार गार वारा सुटला असेल त्या दिवशींही स्नान घालूं नये. तथापि स्नान घातलें नाहीं तर त्याऐवजीं ऊन पाण्यांत पिळलेल्या फडक्यानें त्याचें अंग पुसून निर्मळ करावें. त्याला मळीण अगदीं होऊं देऊं नये. कारण, अर्धें दुखणें नुसत्या स्वच्छतेनें नाहींसें होतें.

संध्याकाळचें तेल लावायाचें तें मूल झोंपीं जाण्यापूर्वीं लावावें, त्याकरितां त्याला आठ नऊ वाजेपर्यंत जागें ठेवूं नये; किंवा झोंपेंतून जागें करूं नये. सकाळीं देखील काम उरकून घेण्याच्या दृष्टीनें

लाक्षादि तेल तयार करणें फारसें कठीण नाहीं. त्याची साधारण रीति अशी आहे:—

लाखेचा काढा ४ शेर (८० तोळे=१ शेर)

शुद्ध तिळेल १ शेर दह्याची निवळी ४ शेर

सुगंधि औषधि पदार्थ -।- शेर.

हें मिश्रण मंद आंचेवर आटूं द्यावें. पाणी निःशेष आटलें ह्मणजे भांडें अग्नीवरून खालीं उतरावें आणि तेल निवालें ह्मणजे गाळून कुंपींत भरून ठेवावें.

लाख बोरीची किंवा कुड्यांची घ्यावी. तिच्यांत चौपट पाणी घालून काढा करावा. एक पंचमांश उरवावा.

दिवस उजाडण्यापूर्वीं त्यांची झोंपमोड करून स्नानाची गर्दी करणें योग्य नाहीं. तें त्यास दिवस उजाडल्यावरच घातलें पाहिजे. मूल घामानें डवरलें असेल तर घाम पुसून अंग चांगलें कोरडें होऊं द्यावें.

तेल लावणारणीनें लांकडी लांब फळीवर गुडघे पसरून बसावें. त्यांवर मुलाला त्याचे पाय आपले पायाकडे करून घ्यावें. टाळूच्या खळग्यांत तेल भरून ती अंमळ दाबली ह्मणजे तें तेल त्यांत जिरतें. नंतर सर्वांगाला तेल लावावें. उराला, मानेला, पाठीला आणि तळव्यांना हलक्या हातानें तेल चोळावें. करंगळी तेलांत बुडवून नाकपुड्यांतून फारच हलके फिरवावी. दोन्ही कानांतून तेलाचे दोनदोन थेंब टाकावे. मूल चलनवलनावस्थेंत आल्यानंतर त्यास तेल लावणें झालें ह्मणजे त्याच्या हातापायाला थोडा व्यायाम करवावा. त्याचे गुडघे पोटाकडे आणून एढीखालीं कुल्याला लावल्यानंतर पाय लांब करावे. हात छातीवर आणावे, वर मानेकडे न्यावे, खालीं कोपर पार्श्वभागाला चिकटवावें व नंतर हात लांब करावे. असें दोन तीन वेळां करावें.

तेल लावणें झाल्यावर मुलाचे अंगावर पाणी डाव्या हातानें ओतून उजव्या हातानें छिडकल्यासारखें टाकावें. अंगाची मळी काढण्यास साबू वापरावा. तो नरम, तेलमिश्रित (उदा० ग्लिसरीन सोप, हनी सोप, किंवा पीयर्स सोप) घ्यावा. साबूचा फेस हातावर काढून तो मुलाच्या अंगाला चोळावा. साबू त्याच्या अंगाला घासूं नये. वरून पाणी घालून अंग स्वच्छ धुऊन काढावें. प्रथम डोळे धुवावे, साबणाचें पाणी डोळ्यांत न जाण्याची खबरदारी घ्यावी. सर्व संधिभाग, खाका, मांडया, गुडघे, हातापायांचीं बोटें, कानांचा मागील भाग, त्यांच्या पाळ्या, यांतून रोज मळ सांचतो तो स्वच्छ धुवून काढावा. डोकें धुण्यास अवश्य पाहिजे त्यापेक्षां जास्त पाणी त्यावर

घालूं नये. माने खालीं आणि पाठीवर पुष्कळ पाणी घालावें. स्नान झाल्यावर कानांत फुंकर घालून त्यांतलें पाणी उडवावें. अंग-पुसणें त्याच्या खालून घालून न्हाणींतून त्यास बाहेर उचलून घ्यावें. अंग आणि तोंड पुसून कोरडें करावें. संधींतून ओल राहूं देऊं नये. लागलीच अंगांत कपडे घालावे. टाळूवर कायफळाची भुकटी भुरभुरावी. (ह्या भुकटीची खपली जमेल तर ती रोज काढण्याचा प्रयत्न करूं नये. ती असते तोंपर्यंत टाळूचें संरक्षण करिते आणि मग आपोआप पडतें.) कपडे घातल्यावर आणखी त्यास कांहीं वेळ मांडीवर राहूं देऊन त्याचें कौतुक करावें, दूध पाजावें आणि पाळण्यांत घालावें. ह्यापासून मुलाला पुष्कळ सुख होईल व तें थोड्याच वेळांत झोंपीं जाईल. मुलांस नुसतें तेल लावायाचें तर चार मिनिटें आणि स्नान घालावयाचें तर आणखी ४ मिनिटें वेळ पुरे आहे. त्याहून अधिक वेळ त्यास उघडें ठेवूं नये. ग्रीष्म ऋतूंत तेलाचें प्रमाण आणि तें चोळण्याचा वेळ हिंवाळ्यापेक्षां कमी करावा. मूल बसूं लागल्यावर त्यास गुडघ्यावर घेण्याची आणि तेल सर्वांगाला चोळण्याची मुळींच जरूरी नाहीं. फक्त डोक्याला तेल लावणें पुरें आहे. रोजरोज डोक्यावरून स्नान घालूं नये.

मुलाला वरचेवर न्हाऊं घातल्यानें त्याला शैत्य किंवा पडसें होतें अशी कित्येकांची समजूत असते. पण ही समजूत चुकीची आहे. त्यांच्या हें कधींच लक्षांत येत नाहीं कीं मुलाला शैत्य होण्याला त्यांचा स्वतःचा दीर्घसूत्रीपणा आणि दुर्लक्ष हीं दोन कारणें होत असतात.

मुलाच्या अंगास तेल लावतांना त्याच्या शरीरांत कोठें कांहीं फेरबदल होत आहे कीं काय, इकडे लक्ष द्यावें. हे फेरफार हाताच्या

स्पर्शानें आणि दृष्टीनें समजण्यासारखे आहेत. जसें अंगाच्या एखाद्या भागास गांठ उठणें, सूज येणें, खरूज, फुनशी, कान वाहणें, डोळ्याला चिपडें येणें, वगैरे; आणि कांहीं दिसल्यास त्याच्या उपायाला तत्काळ लागावें.

मुलाचे तोंडांत, हिरड्यांवरून आणि ओठांच्या आंतून सांजसकाळ एकदां तरी बोट फिरवावें. दांत निघाल्यापासून ते सुपारीच्या, बदामांच्या सालांच्या, किंवा बकुळीच्या मातीच्या राखेनें हळूच घाशीत जावें, अथवा इंग्रजी पद्धतीप्रमाणें बोटाला चिंधी गुंडाळून बोरासिक आसिड सोल्यूशनमध्यें बुडवून मुलाच्या तोंडांत फिरवावें. दांत आल्यावर दंतमंजनानें किंवा वरील सोल्यूशननें दांत स्वच्छ करावे. मुलाच्या पहिल्या कोंवळ्या दांतांस मोठालीं दंतमंजनें नको आहेत. मुलास चॉकचें किंवा दुसरें साधेंसें मंजन योग्य होईल.

मुलाचीं नखें स्वच्छ ठेवावीं. त्यांत मळ सांचूं देऊं नये. तीं वारंवार नीट काढावीं. वांकडींतिकडीं कशीं तरी कापल्यानें नखें बेढब होतात.

काजळ घालणें—काजळ[1] घालण्यापासून मुलांच्या कोवळ्या डोळ्यांना थंडावा राहून उष्णतेची शांति होते यांत कांहीं संदेह नाहीं. पण अलीकडे हे निरर्थक समजलें जाऊं लागलें आहे. त्यांत दोष हा आहे कीं तें घालतांना मूल रडतें. पण त्याचा दोष काजळाकडे नसून तें घालणाराकडे आहे. घालणारानें तें युक्तीनें घातलें, तर मुलास त्यापासून खात्रीनें सुख होईल आणि डोळ्यांचें रक्षण होईल.

१ हें काजळ [illegible]ळीच्या तेलाचा दिवा करून त्याचें काजळ धरून तें तुपांत खलून करतात. यांत कापूर वगैरे दुसरे पदार्थ घातले तर तें अर्थातच चुणचुणतें.

भरवणें.—मुलाचें पोषण जन्मापासून ९ महिनेपर्यंत केवळ दुधानें आणि नंतर तें दोन वर्षांचें होईपर्यंत दुधाबरोबर कांहीं धान्यसत्त्वें मिश्रित करून त्यांनीं करावयाचें असतें. मूल मोठें झाल्यानंतर तें ७ वर्षांचें होईपर्यंत मोठ्या मनुष्यांनीं खावयाचीं पण निवडक पथ्यकर अन्नें त्यास देतां येतात. या कालमर्यादा ज्यास्तींत जास्ती अशा सांगितल्या आहेत. मुलाच्या प्रकृतिमानाप्रमाणें त्या कमीज्यास्त करतां येतात.

वरचें दूध— तान्ह्या मुलाची आई त्याला पाजण्यास दुर्दैवानें असमर्थ झाली, व उपमाता ह्मणजे पाजणारी दाईही नसली, ह्मणजे त्याला वरचे दुधावर वाढविण्याची पाळी येते. हें त्या मुलाच्या आयुष्यांतलें एक मोठें संकटच ह्मटलें पाहिजे. ह्या प्रसंगाला मुलास भरवणारी बाई जितकी दक्षता ठेवील तितकी थोडी आहे. वरचें दूध मूळचें कितीही चांगलें असलें आणि कितीही काळजीपुरस्कर मुलाला दिलें, तरी त्याला आईच्या दुधाची सर येत नाहीं. त्याशिवाय तें देण्यांत अनेक चुका होतात. त्या कळणें फार मुष्किलीचें असतें, आणि त्या चुकांपासून वेळेस फार अनर्थ होतात.

दूध तयार करणें.–वाग्भटांनीं वरचे दुधांत शेळीचें दूध उत्तम ठरविलें आहे. तें न मिळाल्यास गाईचें दूध शेळीच्या दुधासारखें करून पाजण्यास सांगितलें आहे. हें करण्याचे हल्लींचे प्रकार दोन आहेत. (१) एक दूध कडकडीत तापवून त्यावरची साय काढून टाकितात. (२) दुसरा, दुधांत तितकेंच पाणी आणि चार–दोन वावडिंगें किंवा एकादी पिंपळी घालून तें मिश्रण–त्यांत घातलेलें पाणी संपूर्ण जळून तें मूळच्या दुधाइतकें राहिलें ह्मणजे–गाळून घेऊन साय वगैरे काढून टाकितात.

ह्या दोन प्रकारांपैकीं कोणच्याही एकानें दूध दोन्ही सांज ताजें तयार करून तें कथलींत किंवा कल्हईचे भांड्यांत ठेवितात. दूध पाजायाचे वेळीं त्यांत कोणी साखर घालितात, अशाकरितां कीं, तें गोड होऊन मुलानें किरकिर न करतां सुखानें प्यावें.

पाजण्याची पद्धति.—मुलाला पायावर निजवून, किंवा मांडीवर आडवें घेऊन दूध पाजण्याची रीत घातुक, निदान धोक्याची तरी खास आहे. मुलाचें डोकें आडवें झाल्यानें दुधाचा घोट गिळतांच पुष्कळ वेळां त्याला ठसका लागण्याचा व त्यामुळें जीव घाबरण्याचा संभव असतो. अशानें पुष्कळ वेळां उलटी होऊन पाजलेलें दूध उलटून पडतें, आणि दूध पाजण्याचे श्रम व हेतु निष्फळ होतात. यासाठीं दूध पाजतांना मुलाचें डोकें नेहमीं उचललेलें असावें. आईच्या अंगावर मूल पीत असतां त्याचें डोकें वर उचललेलें असतें. तसें असावयास पाहिजे. मूल थोडें मोठें झाल्यावर त्याला अर्धवट बसवून दूध पाजणें चांगलें.

सामान्य परिणाम.–ह्याप्रकारें तयार केलेलें आणि तान्ह्याच्या पोटांत घातलेलें दूध जीं मुलें मूळचीं निरोगी आणि सशक्त असतात त्यांना मानवतें, इतरांना तें अगदीं पचत नाहीं. मूल दूध घेत नाहीं किंवा ओकून टाकितें. अशा वेळीं त्यास तांदळाचें पीठ किंवा आरारूट वगैरे घालतात. त्यानें मुलाची प्रकृति आणखी जास्तच बिघडते.

डॉक्टराची सल्ला.–असें मूल डॉक्टराकडे उपचारांकरितां नेलें ह्मणजे ते प्रथम दुधाची चौकशी करून नेहमीं अशीच सल्ला देतात कीं, " दुधांत थोडें पाणी मिळवून तें पाजावें, त्यांत चिमटीभर साखर घालावी, थोडासा सोडा, नाहीं तर चुन्याची निवळ मिळ-

वावी, किंवा मेलिनचें किंवा दुसरें एकादें फुड (सिद्धान्न) दुधाबरोबर द्यावें." परंतु असें करण्यास पुष्कळ स्त्रियांचें धैर्य सहसा होत नाहीं. त्यांना भीति वाटते कीं ह्यापासून मुलास शैत्यविकार होतील, हगवण लागेल, पोटांत वायु धरील, पाणी मिळविल्यावर दुधाचें दूधपण तें काय राहिलें आणि त्यानें मुलाचें पोट कसें भरणार ? त्या ह्मणतात कीं इंग्रजांच्या मुलांस इंग्लंड देशांत असें दूध मानवत असेल, त्यांचे पिंड मद्यमांसाहाराचे, त्यांचा मुलुख थंड, त्यांची गोष्ट निराळी, तें आपल्या देशांत कसें मानवेल ? डॉक्टरचें औषध देत असतां त्यांचे सल्याप्रमाणें दूध दिलें तर हरकत नाहीं असें कोणी त्यांस सांगितल्यास त्या तसें करतात. पण तें डॉक्टरचें औषध चालू असेपर्यंत, आणि तेंही अनमानीतच करतात.

घट्ट केलेलें दूध (कंडेन्स्ड मिल्क)—हें दूध त्यांतलें $\frac{२}{३}$ पाणी यंत्रसाह्यानें तापवून वाफेच्या द्वारा घालवून तयार केलेलें असतें जसें दूध निरनिराळया गुणधर्मांचें असतें तसें हें घट्ट केलेलें दूधही निरनिराळया गुणधर्मांचें असतें. ह्याशिवाय हीं दुधें कांहीं निर्भेळ असतात, कांहींमध्यें साखर मिसळलेली असते, आणि कांहीं चिकणाई काढून टाकलेलीं असतात. ह्यांतल्या कोणत्याही प्रकारचें दूध देणें झालें तर तें गाईच्या स्वाभाविक दुधाच्या सारखेंच पातळ करून दिलें पाहिजे. अशा घट्ट केलेल्या दुधांत ' नेसल्स ' आणि ' मिल्क मेड ' ची दुधें उत्तमांपैकीं समजलीं गेलीं आहेत.

इतर सिद्ध केलेलीं अन्नें.—तान्ह्याकरितां आणखीही कितीएक सिद्ध केलेलीं अन्नें बाजारांत मिळतात. त्यांतलीं कांहीं गाईच्या दुधाऐवजीं

आणि कांहीं दुधाबरोबर देण्याचीं असतात. दुसऱ्या प्रकारचीं अन्नें तान्हें मूल नऊ महिन्यांचें होईपर्यंत त्यास देणें केवळ अनवश्यक आहे एवढेंच नाहीं, तर अपायकारकही आहे. पहिल्या प्रकारचीं अन्नें तान्ह्या मुलाला देण्यायोग्य असतात. परंतु असें अन्न देणें तें ताजें दूध मिळण्याची सोय होणें अशक्यच असेल तेव्हां—केवळ अडचणीच्या प्रसंगीं—दिलें पाहिजे. अशा अन्नांत ' एलनबरी ' नं. १ मूल दोन तीन महिन्यांचें होईपर्यंत द्यावें. तीन महिन्यावरील मुलाला ' एलनबरी ' नं. २ आणि ' हॉर्लिक ' चे मॉल्टेड मिल्क हीं फार योग्य आहेत. हीं तिन्हीं अन्नें देतांना त्यांत पाणी मिसळावें लागतें. दुधाबरोबर द्यावयाकरितां जीं अन्नें तयार करतात, तीं धान्याच्या सत्त्वाचीं असतात. त्यांत दुधाचा लेशही नसतो. अशा अन्नांत ' मेलिन्स फूड ' आणि होविस नं. १, बेंजरचें फूड, आणि एलनबरी नं. २ हीं प्रमुख आहेत.

दुधाची बाटली.— दूध पाजण्याची लांब नळीची बाटली आतां वाईट ठरविण्यांत आली आहे. आजकाल नावेच्या आकाराची ऐकनबरीची बाटली उत्तमापैकीं समजली जाते. हिला दोन्हीकडे तोंडें असतात. एका तोंडास रबरी झांकण आणि दुसऱ्यास चोखणी घालावयाची असते. चोखणीचें छिद्र मोठें असतां कामा नये. तें मोठें असलें तर मूल सपाट्यानें दूध ओढून घेतें. तें त्यास विकार करतें. दूध सावकाश पिण्यास निदान १५ मिनिटें लागलीं पाहिजेत. दूध पिणें झाल्यावर बाटलींत दूध राहिल्यास बळें पाजूं नये. तें टाकून द्यावें. रिकामी बाटली चोखूं देऊं नये, त्यापासून पोटांत वारा धरतो. बाटली, झांकण, आणि चोखणी हीं आंतून बाहेरून स्वच्छ कढत पाण्यानें धुवावीं. केसांचा ब्रश वापरूं नये. कारण एकादा केस कोठें

अडकून राहिला असतां तो दुधाबरोबर बाळाच्या पोटांत जाऊन वेदना करतो. चोखणी लांब असावी. इतकी कीं ती उलटून धुतां येईल. ती कामांत नसेल तेव्हां ऊन पाण्यांत घालून ठेवावी. तसेंच रबरी झांकण, आणि ह्या दोन्ही जिनसा कामांतल्याशिवाय कांहीं शिलकीसही असाव्या.

मिश्रण जेव्हां जेव्हां द्यावयाचें तेव्हां त्याची बाटली कढत पाण्यांत धरून तें कोंबट झालें ह्मणजे द्यावें. तें प्रत्यक्ष अग्नीवर तापवूं नये. किंवा थंड देऊं नये. त्याची साधारण उष्णता ९८ डिग्री असावी.

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे मुलाच्या पोषणाच्या संबंधांत पुढील गोष्टींकडे लक्ष द्यावें:-

१ मुलाला गाईचें स्वच्छ, शुद्ध आणि ताजें दूध द्यावें.

२ दुधांत साखर घालावयाची ती दुधापासून काढलेली मिळेल तोंवर चांगली.

३ अन्न नियमित प्रमाणांत नियमित वेळीं द्यावें.

४ वाजवीपेक्षां ज्यास्त अन्न किंवा दूध घालूं नये; कमी घालून मुलाची उपासमारही करूं नये.

५ दुधाचीं भांडीं, बाटली, चोखणी वगैरे स्वच्छ ठेवावीं.

६ मुलाला जें कांहीं खाऊं घालावयाचें किंवा पाजावयाचें तें मनुष्याच्या अंगांतल्या ह्मणजे ९८ डिग्री उष्णतेइतकें गरम असावें.

७ प्रत्येक आठवड्याला मुलाचें वजन करून त्या वजनाचें टिपण ठेवावें.

८ मुलाला पचन होतें कीं नाहीं यावर नेहमीं नजर ठेवावी. तें

जर बरोबर होत नसलें तर निरोगी मुलासारखें त्याचें शौच असणार नाहीं, ही त्याची खूण समजावी.

९ जरासें निमित्त झाल्याबरोबर अन्नांत फेरबदल करूं नये. एकसारखीं लक्षणें लागोपाठ होत गेलीं तर डॉक्तराची सल्ला घ्यावी.

१० सहासात महिन्यांचें मूल होईपर्यंत धान्यसत्वमिश्रित अन्न त्याला अगदीं देऊं नये.

११ मेलिन्स फूड, बेंजर्स फूड वगैरे पेटंट फूड द्यावयाचें झालें तर डॉक्तराच्या सल्ल्याप्रमाणें द्यावें.

आपल्या चालीरीतीप्रमाणें मुलाचे उष्टावणास तुरीच्या वरणाच्या पाण्यापासून आरंभ होतो. पुढें साधा वरणभात, नंतर तुपासहित, नंतर वरणपोळी किंवा दूधपोळी आणि तिच्या जोडीला भाजल्या गव्हांचें किंवा तांदळांचें पीठ देतात. नुसतें दूध उत्तरोत्तर कमी आणि अन्नाचा भाग अधिक देण्यांत येतो. आरोळी (गाकर) सारखा पदार्थ त्यास पचण्यास कठीण ह्मणून देत नाहींत. भाजीपाले, मीठ मसाल्यांचे पदार्थ किंवा फळें देत नाहींत; पण किसमिस वगैरे मेवा देण्याचा परिपाठ आहे. दुधाची खीर, बर्फी, जिलबी, लाडू, व तळणाचे पदार्थ यांचें पथ्य नसतें. ह्या वयांत ह्यास दिवसा आणि सांयकाळीं चार किंवा पांच वेळां मिळून दूध पावशेरपर्यंत आणि इतकेंच अन्न देण्यांत येतें.

वाग्भटांनीं एक वर्षाच्या मुलाला देण्याच्या अन्नाचे कितीएक प्रकार सांगितले आहेत. त्यांतले कांहीं हे आहेत:—

(१) :चारोळ्या, ज्येष्टीमध, साळीच्या लाह्या आणि खडीसाखर ह्यांचा लाडू द्यावा. हा समाधानकारक आहे.

(२) साळीच्या लाह्यांचें पीठ, गव्हांच्या किंवा जवांच्या लाह्यांचा सातू, वेलदोडे, व बाळबेल, खडीसाखरेची पूड हें सगळें दुधांत कालवून द्यावें. हें अग्नि प्रदीप्त करतें.

(३) लाह्यांचें आणि धापटीच्या फुलांचें पीठ खडीसाखरेच्या पिठीबरोबर दुधांत द्यावें. हें स्तंभन करतें.

इंग्रजी पद्धतीप्रमाणें नववेदहावे महिन्यांत दुधाबरोबर अन्नसत्त्वें देऊं लागावें. शेवटीं शेवटीं बारावे महिन्यांत आणि दुसरे वर्षी मुलाला पांच वेळ अन्न द्यावें. एकाद्याला ४ वेळां देणेंही पुरे होतें. मध्यंतरी थोडें थोडें पाणी पाजावें. परंतु भरविण्याचा वेळ चुकवूं नये. किंवा मध्यंतरीं कांहीं खावयास देऊं नये. दुसऱ्या वर्षी दोन पाइंट दूध दररोज मुलाला द्यावें. तें कांहीं तसेंच आणि कांहीं जेवणांत अन्नाबरोबर द्यावें. ह्या वर्षी चांगली शिजविलेली भाजीही त्यास द्यावी.

लाइम (लिंबाचा एक प्रकार), कागदी लिंबु, द्राक्षें, किंवा नारिंग ह्यांचा रस मुलाला रिकेट (अस्थिक्षय) किंवा स्कर्वी (रक्त बिघडणें) रोग, मुलास तापलेलें दूध दिल्यामुळें किंवा दुसऱ्या अन्नदोषाचा वगैरे कारणानें होण्याचा संभव असतो, त्याच्या प्रतिबंधार्थ देण्याची चाल आहे.

साबूदाणा, आरारूट, व टापिओका हलके समजून मुलाला देतात. पण वस्तुतः हे मुलांना कष्टानें पचतात. कारण त्यामध्यें स्टार्च असतें. त्याशिवाय त्यांत पोषक तत्वेंही कांहीं नसतात, तेव्हां हे पदार्थ मुलांस न देणें चांगलें. बारामहिन्यांपुढें दुधाबरोबर बटाटे व दुसरी सत्त्वविशिष्ट भाजी देऊं लागावें.

अठरावे महिन्याचे सुमारापासून पांच खुराकांचे जागीं ४ देणें पुरे होईल. मुलाला त्या वयांत मद्य, चहा, काफी, चटण्या कोशिं-

बिरी, लोणचीं, मसालेदार पदार्थ, कच्च्या भाज्या, मिष्टान्नें किंवा पक्वान्नें, कवचीचीं फळें (बदाम वगैरे) आणि कच्चीं फळें कधीं देऊं नयेत.

दोनवर्षांपुढें सातवर्षांपर्यंत.

दोन वर्षांचे पुढें मुलाची पाचनशक्ति चांगली वाढते आणि त्याला क्षुधाही तीव्र लागते. त्याला बहुतेक अन्नें योग्य प्रमाणांत दिलीं असतां ह्या अवस्थेंत पचतात. यावेळीं पुढील गोष्टी मुख्यत्त्वें ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत:—

(१) त्याचें अन्न कसदार असलें पाहिजे; ह्मणजे त्यांत पोषक, बल देणारे, आणि शरीराची उष्णता कायम ठेवणारे पदार्थ भरपूर असावे.

(२) अन्न नियमित वेळीं बिनचूक द्यावें. मध्यंतरीं दुसरें तिसरें कांहीं एक देऊं नये.

(३) अन्न साधें असावें. मुद्दाम क्षुधा वाढविण्यासारखें अन्न देण्याची कांहीं जरूरी नाहीं.

(४) अन्नाचा बराच भाग चांगला चावून खाण्यासारखा असावा. कारण, मुलाला अन्नाचें योग्य चर्वण करून खाण्याची संवय झाली पाहिजे.

(५) मुलाच्या आहारामध्यें दूध विशेष असावें. त्याच्या वयाप्रमाणें दिवसांतून २ किंवा ३ पाइंट दूध त्याला मिळालें पाहिजे. तें कांहीं तसेंच साधें आणि कांहीं अन्नाबरोबर द्यावें. यावेळीं कोको देणें हितावह आहे.

(६) कांहीं थोडीं ताजीं फळें त्यास दररोज द्यावीं. जसें नारिंग, द्राक्ष, केळें वगैरे. हीं सकाळीं कांहीं खाल्ल्यानंतर किंवा दुपारीं

द्यावीं. रास्पबेरी, वाळविलेलीं द्राक्षें किंवा अंगुर, इ० चांगलीं उकडून त्यांच्या रसाचें पन्हें द्यावें. स्टॉबेरी मुलांना क्वचित् द्याव्या. कारण त्या कितीएकांना सोसत नाहींत.

(७) गोड फळांच्या द्वारें आणि अन्नाबरोबर साखर द्यावी. मध, मोरंबा, केव्हां चाकोलेट योग्य प्रमाणानें देण्यास हरकत नाहीं. पण पेढेबर्फी व पाकाचे पदार्थ अविचारानें देऊं नयेत. गूळ निर्मळ असला तर कधीं कधीं बेताबातानेंच देणें योग्य होईल. मळीण गुळापासून प्रकृति बिघडते. शिवाय त्यापासून जंत होतात.

वर्ज्यान्न.—कांदे, बीटच्या मुळ्या, मुळे, कांकड्या, ताजा पाव, चहा, काफी, वगैरे पदार्थ मुलांना या वयांत देऊं नयेत.

उपसंहार.

प्रपंचांत माणसाला—विशेषतः स्त्रियांना—करावीं लागणारीं जीं घरांतलीं कामें आहेत, त्यांतल्या ठळक कामांपैकीं कांहींचें विवेचन आतांपर्यंत करण्यांत आलें आहे. राहिलेल्या कामांपैकीं एक मुख्य काम ह्मणजे स्वयंपाक करणें हें आहे. या कामासंबंधानें या पुस्तकांत विवेचन यावयास पाहिजे होतें. पण या विषयावर मराठी भाषेंत बरींच पुस्तकें अगोदर झालीं असल्यामुळें त्या विषयाची भर घालून पुस्तकाचा आकार वाढविणें इष्ट दिसलें नाहीं. स्वयंपाकाशिवाय इतरही कित्येक महत्त्वाचीं कामें (उदाहरणार्थ घरच्या जमाखर्चाचें बजेट तयार करणें, रोजचे रोज होणारा खर्च लिहून ठेवणें, घरगुती औषधीउपचार, पत्रें लिहिणें, इ०) राहिलेलीं आहेत. त्याविषयींचें विवेचन 'संसार–' मालेंतल्या पुढील एखाद्या भागांत करण्यांत येईल. प्रस्तुत पुस्तकांतल्या कित्येक गोष्टी दिसण्यांत अगदीं क्षुद्र दिसतील; पण प्रपंचांतल्या अशा क्षुद्र गोष्टी सुद्धां व्यवस्थितपणें करण्याची संवय स्वतःला लावून घेणें आणि मुलींना लावणें अवश्य असल्यामुळें त्यां अंमळशा विस्तारानें या पुस्तकांत सांगितल्या आहेत.

सध्या शाळेंत देण्यांत येणाऱ्या पुस्तकी विद्येला नांवें न ठेवतां एवढें ह्मणतां येईल कीं आमच्या मुली सुगृहिणी व कर्तव्यदक्ष माता होण्याला नुसतें शाळेंत दिलें जाणारें शिक्षण पुरेसें होत नाहीं. त्यांतली उणीव भरून काढण्याला प्रस्तुत-सारख्या पुस्तकांतल्या माहितीची–मग ती माहिती आई किंवा सासू यांच्या-कडून तोंडीं किंवा कृतीनें मिळो, अगर पुस्तकाच्या वाचनानें प्राप्त होवो–अत्यंत अवश्यकता आहे. लेखकांची खात्री आहे कीं त्यांनीं या पुस्तकांत दिलेली माहिती खरी खरी व्यवहारोपयोगी व अनुभवजन्य असल्यामुळें, आया व वाचणाऱ्या मुली यांनीं जर हें पुस्तक वाचण्याचे श्रम घेतले, तर त्यांना आपला काळ फुकट गेला असें कधींच वाटावयाचें नाहीं, व यांत जागोजागीं केलेल्या सूचना ध्यानांत ठेवून प्रपंचांतलीं कामें केल्यास त्यांचा प्रपंच सुखाचा होईल. ज्यांना स्वतः वाचतां येत नसेल त्यांनीं दुसऱ्याकडून हें पुस्तक मोठ्यानें वाचवून त्यांतल्या गोष्टी ध्यानांत ठेविल्या, तर त्यांनाही प्रपंचाचे कामीं लिहिण्यावाचण्याचा उपयोग कसा होतो तें लक्षांत येऊन शिक्षणाकडे त्यांच्या मनाचा कल होईल, व स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराचे कामीं थोडा फार तरी हातभार या पुस्तकानें लाविला असें समाधान या लेखकांस वाटेल.